


जी ए कुलकर्णी यांच्या ९ कथांवरील चर्चा- भाग -२




तळपट,

दूत,

निरोप

राधी

लक्ष्मी

विदूषक

मत्स्यकन्या

काली,

स्वामी

# जीए कथास्वाद

# भाग २

# जीए कथास्वाद २

## जी ए कुलकर्णी यांच्या कथांवरील चर्चांचे संकलन


संकलन व संपादन- विलास वाघोलीकर

सहाय्य- सुनीळ सामंत



ई प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

9987737237



या पुस्तकातील सर्व लेखनाचे व चित्रांचे अधिकार त्या त्या लेखकांकडे व चित्रकारांकडे आहेत. पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# जीए कथास्वाद- २

तळपट,

दूत,

निरोप - पारवा,

राधी,

लक्ष्मी,

विदूषक,

मत्स्यकन्या,

काली,

स्वामी,

एकूण 9 कथा

# चर्चेतील सहभागी व्यक्ती

आशा भागवत
अतुल ठाकूर
अभयकुमार कुलकर्णी
अलका तडकलकर
अशोक पाटील
उमेश तुपे
कस्तुरी महेश
जयश्री जंगले
माधव पुराणिक
दिलिप बडे
नागेश कुलकर्णी
नितीन वैद्य
निशा क्षिरे
परमजीत सिंग
प्रदिप कुलकर्णी
प्रमोद कुलकर्णी
प्राची बापट
मंजिरी देशमुख
मनमोहन आंबेकर
महेश आफळे
मिलिंद सकपाळ
मिहीर ठकार
यतीन गुळवणी
राजेश उनवणे
राम कुलकर्णी
लक्ष्मीकांत देशपांडे
लखन दगडे
वंदना बोकील
वर्षा हळबे
विलास वाघोलीकर
विशाखा आपटे
विशाखादत्त
विश्वेश्वर नांदेडकर
वैभव कुलकर्णी
शिवाजी कुऱ्हाडे
श्रीकांत देशमुख
संजीव कुलकर्णी
साधना डोंगरे
सुनीळ सामंत
सुमन महामुनी
स्नेहल बोकील
हेमंत खडके
पुरुषोत्तम मोने
मेघा महाजन

२०२२ ते २०२३ हे जी ए कुलकर्णी यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे झाले. या वर्षात त्यांचे काही नियमित वाचक एका व्हॉट्सऍप ग्रुपवर एकत्र जमले व त्यांनी एकावेळी एक कथा घेऊन त्यावर किमान चार दिवस ते पंधरा दिवस चर्चा केली. अशा सुमारे १०० कथांवर चर्चा केल्या. त्या चर्चांचे संकलन करून पुस्तकं बनवली. जी एं च्या कथांचा आनंद घेताना या चर्चा नक्की उपयोगी पडतील. ही पुस्तकं जीए प्रेमी आपल्या संग्रही नक्की ठेवतील.

या चर्चांचे वैशिष्ट्य हे की जीएंचे वाचक त जीएंच्या कथा हे दोन्हीही बहुआयामी आहेत. त्यामुळे जीएंच्या कथांकडे वेगवेगळ्या कोनांतून पहाताना वाचकांनी अनेकदा संपूर्णपणे ३६० अंशांतून त्यांच्याकडे पाहिले. एकच कथा आध्यात्मिक, राजकीय, स्त्रीवादी, भौतिक, मानवीय, अस्तित्ववादी अशा विविध वैचारिक पातळ्यांवरून वेगवेगळी दिसली व दाखवली गेली. याला जीएंच्या लेखणीची कमाल तर जबाबदार होतीच पण त्यांना लाभलेल्या वाचकांच्या बौद्धिक सखोलतेची कमालही तितकीच कारणीभूत होती. वाचकवर्गाची उंची या बाबतीत जीएंचा हात धरणारा लेखक मराठीत तरी कोणी नसेल.

त्यामुळे या चर्चांना एक वेगळेच परिमाण लाभते व त्या चर्चा वाचताना उच्च प्रतीचा आनंद अनुभवाला येतो.

-सुनीळ सामंत

# तळपट- कथासंग्रह- पिंगळावेळ

तळपट कथा पिंगळावेळ पुस्तक - यतीन गुळवणी: संदर्भच्या (जानेवारी १९७५) अंकात प्रकाशित झालेली जीएंची 'तळपट' ही कथा पिंगळावेळ (१९७७) या कथासंग्रहात समाविष्ट आहे.

स्थळ सिद्धनहळ्ळी गावाच्या मागील सपाटीवरील 'नूरमने' (कानडीत शंभर घरे) नावाचे माळरान. सध्या तेथे तीस चाळीस झोपड्या आहेत. तेथे 'गोल्ल' गारूडी व दोर मांग यांची वस्ती. दोन्ही समुदायत थोडेफार सौहार्दपूर्ण संबंध पण त्यांच्यात पक्के जेवणखाण मात्र होत नसे. दोरमांग (घातपाताचा?) आडचक्र फिरवून दोऱ्या वळीत तर (कृष्ण) गोल्ल गारूड्यांच्या बायका हरणाचे कातडे तळाशी लावलेल्या दुरड्या डोक्यावर घेऊन 'वशीऽद' ओरडत हिंडून, प्रसंगी 'शकुन' सांगून पैसे कमवत.

पुरुष गारूड्याचे काम करीत. पण आता गारूडी काम करणारे फार थोडे व त्यातलाच वस्तीतला एक दानय्या! दूसरा गोंदा. म्हातारा दानय्या एका झोपडीत एकटाच रहाणारा.

हा कृष्णगोल्ल जमातीतील पिढीजात गारूडी. नाग पकडून त्यांचे विषारी दात काढण्यात पटाईत. चार पाच मैलांवरील गावात बुट्टयातून नेऊन 'नागप्पा नागप्पा' म्हणून ओरडत नाग साप दाखवून चिल्लर, दूध, अन्न व कपडे मिळवण्याचा त्याचा व्यवसाय. आपल्या कौशल्याचा दानय्याला अभिमान तसेच व्यवसायावर त्याची निष्ठा. तो म्हणतो " नाग म्हणजे आमचं पोट, आमचा देव. एक पोर वाढवावं, ते फार सोपं; पण जनावर वाढवणं नको. आता नाग हातात घेऊन जन्मलो म्हणा, की आता संपायचं ते हातात नाग घेऊनच."

फार पूर्वी दानय्या तरणाबांड असताना आईबापाबरोबर मल्लिकार्जुनाच्या माळावर रहात होता. तेथे एकदा रावण्या (पूर्वी दानय्याच्याच वस्तीत रहाणारा पण आता वस्ती सोडून दूर वावभर जमीन कसणारा) आपल्या मुलीचे (रूक्मीचे)

दानय्याशी लग्नाचा प्रस्ताव घेऊन आला. दानय्याची आई खूष झाली. कारण 'एकटीच पोरगी, रावण्यानंतर जमीन दानय्याचीच होणार. म्हणजे एकदा पायावरील नक्षत्र तरी जाईल, पोरगा एका जागी मूळ रूतवेल' असे तिला वाटले. पूर्वी एकदा जत्रेत दानय्याने रूक्मीला बघितले होते. 'ती भेंडी फुटायला आल्यासारखी होती आणि डोळयांत बिब्याच्या रक्तासारखी काळी विषारी होती.

दानय्या रावण्याच्या घरी रहायला गेला. त्यावेळी त्याने रूक्मीला जवळून पाहले. त्याला ती आगाऊ, चंचल, नखरेल गावभवानी वाटली. दानय्याने दोन तीन दिवस तण काढले, ढिकळे फोडली.पुढच्याच पहाटे आपले कपड्याचे बोचके घेऊन वस्तीवर परतला. पुढच्या एका रविवारी रावण्या चार माणसांना घेऊन आला. सोबत पुरूषी काचा घातलेली रूक्मी दाणदाण पावले टाकत आली व कमरेवर हात ठेवून उभी राहिली. रावण्या म्हणाला, " अरे ही काय रीत झाली व्हय? माणसं थुंकायला लागली की रे तोंडावर."

"दादा मी आपला सापवाला माणूस. मला तसलं ढोरकाम नाही पटायचं. ती हितचं येत असेल तर ये म्हणावं. नाहीतर तुमची हळद निराळी, आमची निराळी" दानय्या म्हणाला.

त्यावर रूक्मी तरारून पुढे आली व म्हणाली " व्हय, तु बुट्टी घेऊन फुडं आणि मी डोक्यावर दुरडी घेऊन मागं 'वशीssध' ओरडत."

दानय्याचा सौम्यपणा संपला व त्याचे मन रानमांजरासारखे झाले. तो चिडून म्हणाला, "तसं कशाला? तू बस शेतात कडकलक्ष्मी होऊन आणि मी अंगावर चाबूक मारून घेत दुर्गाई मरगाई करत हिंडतो बांधाबांधनं, मग तर झालं?" त्याचा राग एकदम खुळा झाला व तो हात हलवत ओरडला, "हे बघ, तुझ्याशी सोयरीक करायची म्हणजे दहाजणांत एक भाकरी खायची, नव्हे? मला पाहिजे माझी एक हक्काची घोडी, मी करू काय घेऊन शंभर माणसांची आगीनगाडी?" पण मग तो फटदिशी थांबला व त्याला वाटले, आपण फार तोंड केले.

पण तोपर्यंत भोवतालची माणसे खिंकाळू लागली होती. रूक्मीचा लालबुंद चेहरा रागाने काळसर झाला व तिचे लाल लुगडे विटल्यासारखे दिसू लागले.

"चार चौघांत घुबडा माझं हसं केलंस " ती म्हणाली, "तुझं मूळ खणून तुझं चंदन केलं नाही, तुझ्या चुलीत शिरं वाढवलं नाही, तर नाव सांगणार नाही मी रूक्मी!"

त्यावर रावण्या काही बोलण्याच्या आत तिने त्याला थांबवले व तो परत फिरण्यापूर्वीच ती तेथून मोकाट धावत निघून गेली.

मग दानय्याला समजले, गावात छीःथू झाल्याने रावण्याने जमीन फुंकून टाकली होती . "बरं झालं, बैदा गेली एकदाची." दानय्याचा बाप समाधानाने म्हणाला.

पुढे शेजारच्या गावातील लोकांनी दानय्याच्या वस्तीवर येऊन "वस्ती उठवा नाहीतर परिणाम वाईट होतील" असे सांगितले. काही दिवसांनी एका मध्यरात्री सारी झोपडपट्टी पेटली. आई बापाला घेऊन ओढ्यापलीकडे जाईपर्यंत दानय्याची हाडे वितळली. एक दिवटी हातात घेऊन रूक्मी ओढ्याच्या काठाजवळ येऊन म्हणाली, " हे काय नव्हचं रे रेड्या, अजून काय काय बघशील! तुझं तळपट केल्याखेरीज कपाटाचा गोंदण झाकणार नाही. मग तु पाताळात जाऊन लप. मेले तर हडळ होऊन येते की नाही बघ. मग म्हणशील, जिती परवडली, मेली रूक्मी नको."

दानय्याने आधी आईबापाला आडोशाला बसवले. मग तो म्हणाला " आता तुला सोडतो; पण एक दिवस तुझा गळा चिरल्याशिवाय राहतो काय बघ!"

वस्ती मग नागझरीला गेली. दानय्याचे आई बाप तेथेच मातीत गेले. मग तो पाच पंचवीस गावे भटकला.

रावण्या मेल्याचे त्याला समजले. रूक्मी आता जीवंत तरी आहे का याची त्याला खात्री वाटेना; पण मेली तरी खवीस होऊन आपल्या पाठीवर ती असणार याची त्याला खात्री होती.

दुखवलेला नाग परवडला. तो झुंजताना काहीतरी नियम पाळील; पण पिंजारलेली उंडगी बया नको!

शेवटी तो इकडे आला आणि इथल्या मातीत त्याने खोप्याचे वासे खुपसले.

"तु जर जीवंत असलीस तर अजून माझ्याशी गाठ आहे, मेली असलीस तर मी मरूनच तुझा गळा चिरतो बघ!" असे त्याला अजूनही अनेकदा वाटे.

तळपट हा एक शाप आहे. ही पूर्व कथा समजून घेतले तर पुढील दानय्याचा अंत विचार करायला लावतो.

या पार्श्वभूमीवर कथा पुढे सरकते. एके दिवशी संध्याकाळी दानय्या 'सुस्त दिसल्यामुळे' नागाला बाहेर काढतो. वेटोळी ताणत नाग सरळ झाला व पाण्याने भरलेले डेरके (मातीचे मडके) घेऊन येत असलेल्या हुच्च (कानडी शब्द, अर्थ वेडगळ) म्हातारीच्या पायापर्यंत पोहोचतो. ओरडत म्हातारीने डेरके नागावर टाकले. नाग मृत होतो. दानय्याला बराच वेळ डोळयांतले पाणी आवरतं नाही.

तो दिवस नेमका नागचतुर्थीच्या आदला दिवस असतो. नागचतुर्थी व पुढचा दिवस (बहुतेक नागपंचमी?) असे दोन दिवस बक्कळ कमाईचे असतात. दानय्याने रात्रभर बसून काळया चिकणमातीचा नऊ तोंडांचा साप केला. त्यांच्या डोळयांत गुंजा घातल्या. अंगावर रांगेने कुसुंब्याचे दाणे रूतवून त्याने ते वेटोळे बुट्टीतून गावात नेले. पण सणाच्या दिवशीच खोटा मातीचा साप आणला म्हणून दानय्याला हाकलून लावले जाते. त्याची बुट्टी उचलून दूर फेकतात मातीच्या सापाचे तुकडे सगळीकडे पडले. पोरांनी तर त्याच्यावर दगड, करट्यांच्या कडूजार फळे फेकायला सुरुवात केली. कसाबसा दानय्या वस्तीवर येतो.

वस्तीवर वेगळाच कार्यक्रम सुरू झालेला असतो. बायकांची गडबड चालू असते. ओळखीच्या वासाने तो वडाकडे जातो. बरेचसे वस्तीतले पुरूष तीथे असतात. वडाखाली मोठ्या चुलवणीत मोठ्या भांड्यात मासाचे तुकडे रटारटा शिजत असतात. सिद्रामाकडून त्याला बेत कळतो. त्याच्याचकडून दानय्याला कळते की कांबळ चोरल्यामुळे

गोंदा पोलीस चौकीत आहे. चार दिवस तरी त्याची सुटका नाही. गोंदाच्या झोपडीत दोन बुट्ट्यांत जनावरे असतात. आता चार दिवस त्या जनावरांना खायला कोण घालणार कारण गोंदासुध्दा दानय्यासारखा एकटाच असतो. दानय्या या काळजीत उठून आपल्या झोपडीत परतायला निघतो. कारण मटण शिजून पोरांचे दारू पिऊन जेवणाच्या वेळेला रात्र होणार हे जाणून दानय्या आपल्या झोपडीकडे निघतो. जाताना वाटेत गोंदाची झोपडी लागते. नेहमीप्रमाणे दाराला तारेचा आकडा अडकवलेला असतो.

दानय्याच्या मनात विचार येतो. एक दिवस गोंदाची बुट्टी नेली तर पंचमी भागेल. झटकन पुढे होऊन त्याने दार उघडून आत शिरून एक बुट्टी उचलली. परत दाराकडे वळताच तो जागीच थिजला. समोर हुच्च म्हातारी त्याच्याकडे डोळे वटारून पहात उभी होती. ती ओरडू लागताच वस्ती गोळा झाली. दानय्याच्या सफाईचा काही उपयोग न होता त्याला 'घरातल्या चुलीत मुतणारा' चोर ठरवून वस्ती सोडून जाण्यास सांगण्यात येते. रात्री त्याला ना जेवायला बोलावतात ना मटण पाठवतात.

दुसऱ्या दिवशी पहाटेच तो बाहेर पडतो. बरोबर दणकट कडी कोयंड्याची मृदुंगासारखी उभी बुट्टी, काठी, कोयता व दात काढायची पक्के घेतो.

बाहेर पडून थोडे चालल्यावर निंबाकडे कपाळावर कुंकू लावलेली व लाल जुनेरे नेसलेली हुच्च म्हातारी दिसते. पण ती खरंच दिसली की आपल्याला डोळ्यांनी फसवले हेच त्याला कळेना. तो डोंगराकडे चालू लागतो.

पूर्वी नागासाठी डोंगरावर जायची गरज नसे. अष्टापूरच्या माळावरच जनावरं मिळायची. पण आता तेथे झाडझुंबाड नसल्याने डोंगरावर जावे लागणार होते.

त्याच्या डोक्यात विचारांचे काहूर थैमान घालत असतात. आज जनावर मिळालेच नाहीतर?

गोंदाच्या झोपडीतून बुट्टी उचलल्यामुळे चोर ठरवून वस्ती सोडून जाण्यास सांगण्यात आल्याचा अपमानकारक प्रसंगाने दानय्या व्यथित होतो. आपण केलेली

मदत ते लोक विसरले. त्यातल्या काही आपल्याशी वाईट वागले, आपली चोरी केली. पण आपण एक शब्द काढला नाही. त्यानी थोडा रस्सा व मटणाचे तुकडे पाठवले असते तर भीक लागली नसती. परत कधी बोलावले तरी ढुंकून पाहणार नाही.

आपल्याच जमातीचा चंदर पिढीजात गारूडीकाम सोडून रोजगारीवर काम करून रात्री निवांत झोपू शकतो याची दानय्याला चिड येते.

त्यात नाग शोधायला खूप दूरवर जावे लागते. एकीकडे उन्हाची रखरखीत, त्यात शरिर थकलेले. हातपाय थरथरत. त्याचे पाय गुडघ्यापाशी तटल्यासारखे होत. हाताची बोटे सुध्दा वाकडी होत. त्यांच्यातील चलाखी झिजू लागली होती. डोळे घुरकटून त्यांच्यावर सारा आल्याप्रमाणे वाटे. मध्येच त्याला लाल कपड्यात कोणतरी दिसल्यासारखे वाटले.

एका दगडांच्या ढिगाऱ्यापायी दानय्याचे अंग इशारा दिल्याप्रमाणे खबरदार होऊन त्याच्या हातावरून हलका फुलोरा झरझरला. जवळच कुठेतरी नाग असल्याचा हा परिचित संकेत होता. तेथे दानय्याला नाग दिसला. काठीच्या आकडा नागाच्या एका वळशात घालून त्याने नागाला झटक्याने मागे ओढले. ओढलेल्या जागीच परत जाण्याच्या (अनाकलनीय)

गूढ सवयीने नाग दगडांकडे धावला. दानय्याने शिताफीने काठी नागाच्या अंगावर तिरपी टाकून एक पाऊल काठीच्या मध्यावर कसबदारपणे ठेवले. काठीवरचा दाब न काढता पालथ्या कोयत्याने फण्याकडील आणखी पुढचा भाग दाबून धरला. नागाच्या फण्याच्या हालचालीबरोबर आपला हात फिरवत त्याने एकचाल मेळून घेतली व मग वेगाने बोटे गळ्याशी गुंडाळत अंगठा दाबून त्याने पकडला. कोयता सरकवत काठीवरील पाय काढला. उजव्या हातात पक्कड घेऊन नागाचे सुळे काढणार इतक्यात उन्हामुळे सारवल्यासारखे होऊन दानय्याला दगडांच्या ढिगाऱ्यावर कुणीतरी उभे असल्यासारखे वाटले. तांबडे लुगडे, लालकाळसर संतापपलेला चेहरा, काळया विषाने भरलेले डोळे! हलत्या सावल्यांनी

वाळवी मातीच्या रंगाने माखलेले झाड दृश्य झाले व उन्हाचा पदर अंगावर पडून परत लाल होण्याची वाट पाहू लागले.

दानय्याला ही जाणीव होईपर्यंत उजव्या हाताच्या

बोटांत धरलेली पक्कड थरथरली व डाव्या हाताची बोटे एकदम शरण गेल्याप्रमाणे दुबळी झाली. नाग उसळून निसटला. फणा मिटवत दानय्याच्या उघड्या मांडीवर नागाने झेप घेऊन अत्यंत द्वेषाने त्याच्या मासात दात रूतवून दंश केला.

गोंघळलेल्या दानय्याने कोयत्याने नागाची खांडोळी केली. पण दानय्याच्या मांडीवर आग पसरू लागली. दंश केलेल्या जागेवर कोयत्याने छेद करून बोटाने दाबून रक्त बाहेर काढण्याचा प्रयत्न विफल होऊन दानय्या कोसळला. त्याने कोयत्याने उरलेल्या नागावर वार करणे चालू केले. मग त्याची कोयता चालवण्याची गती कमी होत त्याचा हात थांबला. एका झटक्याने दानय्या मृत झाला.

हे झाले थोडक्यात कथानक. कथानक सांगतानासुध्दा काय गाळावे व काय सांगावे क

असा प्रश्न पडतो. कारण प्रत्येक वाक्य, प्रत्येक मुद्दा इतकाच महत्त्वाचा. कथा सर्व चाहत्यांनी फक्त वाचलीच नाहीतर संपूर्णपणे उमजून घेतली असणारच याबद्दल शंकाच नाही.

मी समजलो ती अशी.

या कथेत संघर्ष, द्वेष, त्वेष व सूडाचा प्रवास आहे. हा प्रवास फक्त गारूडी व नाग. यांचा नसून तो दानय्या व रूक्मी यांचासुध्दा आहे. एकमेकांचा द्वेष तर इतका की मरतानाच नाहीतर मेल्यावर सुध्दा कदाचित न संपणारा!

मला ही कथा खूप आवडली.

यातील चपखल बसणाऱ्या उपमा छानच आहेत. मुद्द्यांची

अत्यंत सुरेख गुंफण आहे.

मला जाणवलेली वैशिष्टे.

सफाईदार ग्रामीण बाजात कथा फुलवली आहे.

इथल्या मातीतील एका जमातीतील अभ्यासपूर्ण लेखन वाचताना अनेक नावीन्यपूर्ण गोष्टी कळतात. एक नवा अनुभव विशेषत शहरी वाचकांना मिळतो.

पूर्णपणे कौशल्यपूर्ण मांडणी पाहून कुठेही कृत्रिमपणा जाणवत नाही.

सूक्ष्मातिसूक्ष्म तपशील इतका की जणू प्रत्यक्ष डोळयांसमोर घडणाऱ्या घटना वाटतात.

एकंदरीत जीएंनी या कथेत इतका जीव ओतला आहे की या कलाकृतीसाठी माझा सादर दंडवत!

अलका तडकलकर : ही दीर्घ कथा आहे. खूप वेगळ्या वळणाने जाणारी.मनात रेंगाळणारी अशी. सापाचे खेळ दाखवणारे गारूडी आता जरी पहायला मिळत नसले तरी माझ्या लहानपणी सुदैवाने मी असे खेळ अगदी टक लावून बघितलेले आहेत.आणि ही कथा वाचताना दानप्पा मला दिसू लागतो. कालानुसार प्रत्येकाची जीवनशैली व उपजीविका साधन कसे बदलत जातात याचेही सुंदर चित्रण या कथेत दिसते... 🙏 अलका तडकलकर

यतीन गुळवणी: मी पूर्ण सहमत आहे. मी सुध्दा लहानपणी गारूडी, डोंबारी, कडकलक्ष्मी यांचे खेळ पाहीले आहेत. एकेकाळी भारत गारूडी, चेटक्यांचा देश म्हणत. आता असे लोक शोधावे लागतील. कालानुरूप बदल होत आहेत.

वैभव कुलकर्णी : यतीनजी 🙏

अलकाताई 🙏

तळपट ही कथा सर्पाच्या वेढ्या प्रमाणे अनेक , एकात एक वेढे घेत जाते......

दानय्या ,रख्मी , आणि कथेतील सभोवताल , वातावरण निर्मिती आपल्याला सून्न करतात.

जीएंचे गारूडी या जमाती विषयी चे किंवा त्यांच्या अनेक कथानकात येणाऱ्या विशिष्ठ फिरस्त्या जमाती विषयीचे इतके सखोल ज्ञान आणि बारकाव्या सहीत वर्णन वाचताना अचंबीत व्हायला होते.

पाश्चीमात्य जिप्सी समूहा सारखे असे आकर्षण जीएंना असावे.

जीए स्वतः अशा लोकां सोबत काही काळ (ग्रिक देवते सारखे ) जाऊन राहीले होते की काय असा प्रश्न पडावा इतके बारकावे आणि सूक्ष्मता दिसते.

......,,,,हे वरवरचे झाले .

पण जीएंना प्रतीत असलेला नियतीवाद , कर्मवाद आणि स्त्री संताप हे अत्यंत ठळकपणे कथेत जाणवत रहाते.

या कथेतील सौंदर्यस्थळां विषयीच चर्चा करणार आहे ,

पण कथा एकदा पुन्हा वाचून जगून अनूभवून घेतो........

विलास वाघोलीकर : तळपट कथेवर प्रतिसाद - व्ही एस वाघोलीकर . । ) 25 पानांच्या या कथेचा सारांश

यतिन गुळवणीजींनी सुंदरपणे सांगीतला आहे. सारांश करणे अवघड असते . ते करून व कथेवर विवेचन करून ,त्यांनी या कथेकडे लक्ष वेधले ,त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो . कथा वाचताना मला काही वैशिष्ट्ये जाणवली ती येथे मांडतो . 2 ) जीएंनी अनेक वन्य जमातींचे अनेक कथांमध्ये सविस्तर वर्णन केले आहे. उदा . स्वप्न ,अहम् ,कांचनमृग, कळसूत्र ,ठिपका इत्यादी . ही कथाही गोल्ल गारुडी, दोर मांग या जमातींचे, त्यांच्या रुढींचे यर्थार्थ वर्णन करते . त्यांच्या सोयरिकी, अंतर्गत नियम ,ते मोडल्यास शिक्षा, हे बारकाईने सांगितले आहे . 3 ) जी एंची प्राणीसृष्टी

गजबजलेली आहे . कारण त्यांची कथा फक्त माणूसकेंद्री नाही . विशेषतः त्यांच्या कथांत, गाय ,कुत्रा व साप वारंवार येतात .सापाबद्दल ,सर्प ,इस्किलार ( गारूडी) ,लक्ष्मी, नाग ,या कथा लक्षणीय असल्या तरी ,तळपट कथा, नाग पाळण्यापासून ,नाग पकडण्यापर्यंत विस्तारलेली आहे. शेवटी नाग पकडण्याचा व नागाच्या दंशाने दानय्याचा झालेला मृत्यू अद्वितीय ,विलक्षण प्रभावीपणाने ,दाखवले आहेत . 4 ) मानवांचे मनोविश्व अनंत आहे. त्याचे ताणेबाणे मानसशास्त्रज्ञानाच्या कौशल्याने कथेत दाखवले आहेत. दानय्या ,समाज -जमाती पासून अलग होतो . माणसाला जीवनात ,ही अलगतेची ,विलगतेची एकाकी भावना ,सहन करावी लागते . हा महत्वाचा भाग कथेत येतो . 5 )रुक्मीचा तळतळाट दानय्याच्या सुप्त मनात बसतो . व तो नाग पकडत असताना ,भासाच्या रूपाने मनाच्या पृष्टभागावर येवून परिणाम करतो - व दानय्याचा घात होतो . 6 ) विश्वाने- आकाशस्थ शक्तींनी ,दोन्हीही निर्माण केले आहे. अन्न केले आहे व सापाचे विषही केले आहे . त्याची वैज्ञानिक कारणे देता येतील . पण त्यावरून विश्व - नियती, अनाकलनीय ,अनिर्वचनीय आहे ,हे प्रतिभावंत जी ए कुलकर्णी दाखवून देतात. यात या कथेचे यश आहे. धन्यवाद .विलास वाघोलीकर

विशाखा आपटे : तळपट या कथेत दानय्या च्या मनातील द्वन्द्व परिणामकारक रीतीने दाखवली आहेत. दानाय्या ची guilt, ( अपराध बोध ) आणि त्याचं स्वतः ला आपल्या कृतीचे सारखे मनातल्या मनात स्पष्टीकरण देणे..आणि तरी त्याचे मन त्याला कुठेतरी खात आहे. कारण इतकी वर्ष तो त्यांच्या समूहात व्यवस्थित जगला आहे. पण दानाय्या च्या हातून एक गोष्ट होते, त्याचा साप आयत्या वेळी मरतो आणि गावातून खरा साप जवळ नसल्याने आणि त्यामुळे तो हाकलला गेल्यामुळे ती घडते. त्याचं वय झालंय आणि खायला काही नाही,अशा अपरिहार्य परिस्थिती मुळे तो गोंदा 3/4 दिवस घरात नाही म्हणून त्याचा साप उचलतो. त्याच्या

आजूबाजूला असलेले कोणीच धुतल्या तांदळाचे नाहीयेत. पण ही घटना सर्वांना योगायोगानेच कळते आणि कळल्यावर ते लगेच

त्याला वाळीत टाकतात.

इतके वर्ष नागपंचमी ला दानाय्या नाग घेऊन जातो, फक्त या एका खेपेस नाग मेल्यामुळे नेऊ शकत  नाही तेव्हा  इतक्या वर्षांचं त्याचं प्रामाणिक वर्तन विसरून त्याला हडत हुडूत करतात, पोरं दगड मारतात... पूजेसाठी मातीचा नाग त्यांना चालतं नाही, ज्यानी नाग आणला आहे त्याच्यावरच त्याचं पोट औलंबुन आहे ह्याची जाणीव त्या लोकांना नाही. कर्मकांडाच्या समोर माणुसकीला काही किंमत नाही, हे विदारक सत्य दाखवलं आहे.

प्रमोद कुलकर्णी : प्रत्येक कलाकाराला downfall हा असतोच. अशा वेळी कलाकाराला समाजाकडून सहानभूतीची, उदारपणाची आवश्यकता असते. पण समाज मात्र कठोर, निर्दयी असतो. समाजाने म्हाताऱ्या दानय्याला समजून घेतले नाही. उलट दगडं फेकून मारली.

यतीन गुळवणी: मला आणखी एक विचार सुचतो. जीएंना फक्त मानव-नाग, दानय्या-रूक्मी असा प्रतीकात्मक संघर्ष दाखवून सर्वसाधारणपणे स्त्री-पुरूष यांच्यातील द्वेषपर्ण संबंध सुचवायचा प्रतत्न असू शकेल का? षडरिपूनी ग्रस्त मानवांच्यात द्वेष हा अवगुण

साहजिकच असतो व संधी मिळताच त्याचा फायदा घेताल्याची उदाहरणे समाजात अनेकदा दिसतात.

सुनीळ सामंत : तळपट- जी ए कुलकर्णी- काजळमाया-

तळपट ही कथा वाचताना मला अनेकदा आणि अनेक कारणांसाठी अर्नेस्ट हेमिंग्वे यांच्या द ओल्ड मॅन अँड द सी या कादंबरीची आठवण होते. म्हातारा दानय्या याने आपल्या आयुष्यात सापांना आणि नागांना पकडण्यासाठी, खेळवण्यासाठी पूर्ण

आयुष्यभर जे जे पराक्रम केले त्याची त्याला अभिमान्पुर्वक आठवण आहे. पण नवीन पिढीतील मुलांना त्याचे ते पराक्रम माहीतही नाहीत आणि त्याचे कौतुकही नाही. ती मुले अगदी प्रॅक्टिकल जगात जगत आहेत. गवताचे भारे वाहणे, झाडांची रखवाली करणे किंवा गाड्या पुसणे, याची त्याची नोकरी करणे, आणि निवांत आयुष्य घालवणे , रात्री निवांत झोपणे यातच त्यांना आयुष्याचे इतिकर्तव्य वाटते. पण दानय्या हा ओल्ड मॅन अंड द सी मधल्या म्हाताऱ्या प्रमाणे आपल्या आयुष्याला काही अर्थ देऊ इच्छितो तो सहजासहजी हार मानत नाही आणि गावातील मुलांनी हाकलून लावल्यानंतर तो पुन्हा एकदा त्याच गावात उग्र जातीचे नाग खेळवण्याची इर्षा मनात धरून आहे. त्याच बरोबर एका क्षणी त्याला दुसऱ्याचे नाग चोरण्याचा मोह होतो. पण नंतर मात्र आपल्याच लोकांना नाग पकडून आणण्याचा आपला कसब दाखवण्याची ईर्षाही त्याला असते.

हा सर्व कथाभाग ओल्ड मॅन अंड द सी सारखा आहे पण यात जी दानय्याला त्याच्या मनात खोलवर रुजलेली, रुक्मिणी वर अन्याय केल्याची रुखरुख या कथेत आहे आणि त्यामुळे ऐन क्षणी दानय्याचा घात होतो. या एका टोचणीच्या भावनेने ही कथा अधिक उंच होते.

यतीनजी

तुम्ही केलेले सूतोवाच अतिशय सुंदर झाले आहे. कथेचा सरांश करणे या कथेच्या बाबतीत खरोखरच अवघड आहे. कोणता शब्द गाळावा असा प्रश्न पडतो.

जीए एकही वाक्य विनाकारण लिहीत नव्हते याचा प्रत्यय नेहमीच येतो. आणि त्यामुळे ही सुमारे दहाहजार शब्दांची कथा, त्यातला प्रत्येक शब्द देखणा कसदार, या एकाच गोष्टी साठी जीएंना वंदन.

तुम्ही लिहीलेली वैशिष्ट्ये -

सफाईदार ग्रामीण बाजात कथा फुलवली आहे.

इथल्या मातीतील एका जमातीतील अभ्यासपूर्ण लेखन वाचताना अनेक नावीन्यपूर्ण गोष्टी कळतात. एक नवा अनुभव विशेषत शहरी वाचकांना मिळतो.

पूर्णपणे कौशल्यपूर्ण मांडणी पाहून कुठेही कृत्रिमपणा जाणवत नाही.

सूक्ष्मातिसूक्ष्म तपशील इतका की जणू प्रत्यक्ष डोळ्यांसमोर घडणाऱ्या घटना वाटतात.

-- अगदी सहमत. जीएंचं जणू अख्खं आयुष्य त्या जमातीत गेल्यामुळे त्यांच्यातील बारिक सारिक अस्मितांचाही अभ्यास केला की काय असे वाटायला लागते.

विलास वाघोलीकर : योग्य संदर्भ . फक्त या कथेत जीएंनी नागाला पकडण्याचा जीवनमरणाचा खेळ दाखवला आहे . त्याबद्दल एखादा सर्पमित्र जास्त लिहू शकेल . पोस्ट आवडली . विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत : विलासजी, यतीनजी आणि विशाखाजींच्या या तीन टिप्पण्यांनी वेगळ्या पद्धतीने, वेगळ्या प्रकाशात कथा वाचावी असे मनात आहे.

१) ही १९७५ ची कथा आहे. म्हणजे जीएंच्या वैचारिक प्रवासाचा सर्वोच्च काळ. त्यांचे तत्त्वज्ञान संपृक्त झाल्याचा काळ. इस्किलार, प्रवासी लिघून झाल्यानंतरचा काळ.

२) त्यामुळे ही कथा केवळ साप नागांची कथा नाही हे ओघाने आलेच. गारुड्याचीही नाही. ही आपली, तुमची आमची कथा आहे. तुमच्या आमच्या आयुष्यातले अपमान, आणि तुम्ही आम्ही केलेल्या अपराधाची टोचणी, तुमचे आमचे अभिमान, गर्व आणि आपल्या सर्वांच्या आयुष्यातले साप, नाग, आपण खेळवलेले, आपल्याला चावलेले, आपण ज्यांना खाऊ पिऊ घातले ते आणि आपण आपले पोट बरण्यासाठी ज्यांना खेळवले ते. ते सर्व साप यांवर विचार करायची जी ए इथे संधी देतात.

३) कथेचे नाव तळपट. सर्वनाश. कथेच्या नायकाचे नाव ’दानय्या’, दानी, दाता, देणारा. कितीही दान करा, तुम्ही केलेले एक पाप, एक चूक, एक अपराध तुम्हाला तळपटापर्यंत नेईल. तुम्ही भले सर्वशक्तीमान कलाकार असाल. तुमचे बाहू

कितीही दणकट असोत. तुमच्या कलाईत कितीही कला असो. पण तुमच्या पापातून तुमची सुटका नाही. ’आदमी जो कहता है - जिंदगीभर वो सदाएं पीछा करती हैं"

आता पुन्हा एकदा वेगळ्या प्रकाशात तळपट वाचायलाच हवी.

विलास वाघोलीकर : 🙏 👌 जीएंनी निवडक पत्रांत आत्मचरित्रा बद्दल लिहिले आहे . ते येथे आठवते . माणूस सर्वपूर्ण नाही . त्याने इतरांचे अपमान केले असतात .चूक केली असते . इतरांनी त्याचे अपमान केले असतात. त्याला हे प्रचंड प्रमाणात भोगावे लागते . ते आत्मचरित्रात यावे . असे म्हटले आहे . त्याचा या कथेशी संदर्भ आपण दाखवला . अशा विवेचनाची अपेक्षा . धन्यवाद . विलास वाघोलीकर

अलका तडकलकर : पान क्रमांक 143 वरचे दानय्याच्या तोंडचे वाक्य ..*आण्णा त्याला काय सोनं ,मोती खायला घालतो व्हय?पण जनावर नुसत्या खाण्यानं नाही जगत,त्याला काळजाचं रक्त असायला पाहिजे.नाग म्हणजे आमचे पोट, आमचा देव.एक पोर वाढवावं,ते फारसोपं;पण जनावर वाढवणं नको.*आता नाग हातात घेऊन जन्मलो म्हणा,कीआता संपायचं ते नाग हातात घेऊनच.*

आपलेच बोलणे काही वेळा तथास्तू जाते.

दानय्याचे मरण अशीच बोलाफुलाचे झाले

विशाखा आपटे : जसं प्रमोद जी नी म्हंटले आहे की प्रत्येक कलाकाराला डाउनफॉल हा असतोच, दानाय्या ची खरी शोकांतिका ही आहे की इतक्या वर्षांपासून तो साप पकडण्यात माहीर आहे. पण आता उतरवयात सुद्धा त्याच्या कलेशी कोणालाच घेणं देणं नाहीये, किंवा त्याच्या हातात जे कसब आहे त्याची किंमत नं ज्या गावांत नाग दाखवायला जातो त्यांना आहे ना त्याच्या समूहातील

लोकांना.समाजाला अनेकदा कलाकारांचं महत्व ते जिवंत असताना कळत नाही, ह्याकडे कदाचित जी ए ना लक्ष वेधायचे असेल.

सुनीळ सामंत : फक्त कलाकार की आपण सर्व?
मला हे सार्वत्रिक अनुभव वाटतं.

यतीन गुळवणी: जीएंनी दानय्याच्या तोंडी एक वाक्य घातले आहे. झाली चूक! चूक न करायला मी मठातला स्वामी नाही. मला हे खूप भावले.

# दूत –
# कथासंग्रह-काजळमाया -

विवेचक - व्ही एस वाघोलीकर

ही कथा दोन पातळीवर पहावी लागते. एका पातळीवर त्यातील कथानक, गोष्ट ,या दृष्टीने पहाता येते. दुसऱ्या पातळीवर, त्यातून जीएंना काय सांगायचे आहे ,हे पहावे लागेल .

भाग एक -कथानक

ही ऐतिहासिक काळातील कथा आहे. राजधानीतील सम्राटांना मंदिरात साक्षात्कार होतो की, दुसऱ्या, राजपुत्राच्या नगरीतील कालमुख डोंबाला तीन दिवसांत मारावे .नाहीतर ,स्वत : सम्राटाला, राज्याला, व जनतेला ,जीवघेणा धोका आहे . सम्राट लगेच ही आज्ञा कळविण्यासाठी, खास दूताला पाठवतो . दूत लगेच राजपुत्र ,धर्मस्थविर रहात असलेल्या नगरीत येतो . आज्ञा सार्वजनिक असल्याने चौकात जाहीर करतो - "सम्राटांची आज्ञा अशी आहे . .. .."

आणि त्याक्षणी त्याला विस्मरण होते व आज्ञा आठवत नाही .

राजपुत्राला उत्तराधीकारी होण्याची महत्वाकांक्षा असते . तर धर्मस्थविराला धर्मप्रमुख होण्याची महत्वाकांक्षा असते . संधी साधून अमात्माच्या सांगण्यावरून ,राजपुत्र दूताला म्हणतो -तुम्हाला प्रवासाने दगदग झाली आहे .आपण भवनात विश्रांती घ्यावी . धर्मस्थविर, पाळतीसाठी सहायक भद्रानंदला सोबत पाठवतो . पाहुणचार झाल्यावर रात्रभर दूत जागा रहातो . सकाळीसुद्धा त्याला आज्ञा न आठवल्याने राजपुत्र, शिक्षेने आज्ञा आठवेल ,अशा विचाराने प्रयत्न करतो . डोंबाला

,दूताच्या पाठीवरची तळहातभर त्वचा सोलून काढावी लागते . असह्य वेदना झाल्यावरही आज्ञा न आठवल्याने दूताला रस्त्यावर टाकले जाते .

नंतर भद्रानंद ,त्याला धर्मस्थविरांच्या आलिशान मठात नेतो . तेथेही सामोपचाराचा मार्ग अवलंबूनही आज्ञा न आठवल्याने ,भांड्यात तेल उकळले जाते व दूताच्या अंगावर काही थेंब टाकून फोड आल्यावर, आज्ञा विचारली जाते . पण आज्ञा आठवत नाही. वृद्ध दूत मरेल म्हणून ,त्याला रात्री स्मशानात टाकले जाते .

तेथे पुन्हा डोंब येतो व सांगतो की, तेव्हा मी माझे व्यावसायिक काम केले होते . येथे माणुसकीने आलो आहे . व तो दूताला औषधी पेय देतो . आता मृत्यूक्षण जवळ आला आहे हे कळत असतानाच दूताला आज्ञा आठवते. तो डोंबाकडून, आज्ञेची अंमलबजावणी करण्याचे पवित्र वचन घेतो व आज्ञा सांगतो . त्यानंतर व्रृध्द दूत मरण पावतो. येथे कथा संपते . शेवटी जी ए लिहितात--

- - -डोंब म्हणाला "त्याबद्दल तुम्ही निश्चित असा. मी कालिकेची अत्यंत पवित्र शपथ घेऊन

सांगतो की ,माझ्यात प्राण असेपर्यंत मी सम्राटांचा पवित्र शब्द निष्फल होऊ देणार नाही."

"तर मग ऐक. सम्राटांची आज्ञा एका डोंबाविषयीच आहे. त्याचे नाव कालमुख आहे. सम्राटांत शैलेश्वराच्या मंदिरात साक्षात्कार झाला. त्या अति पापी कालमुखास तीन दिवसांत देहान्ताचे शासन झाले नाही, तर साऱ्या साम्राज्यावर महान संकट कोसळेल,परचक्र येईल, जनांची भीषण हत्या होईल, व रक्ताचे पूर वाहतील, आणि स्वतः सम्राटांना

जीवितास मुकावे लागेल. त्यामुळे सम्राटांनी मला तात्काळ येथे पाठवले. कालमुखाच्या

सर्वांगावरील त्वचा सोलून काढावी, व मग सर्व जनांसमोर त्याला उकळत्या तेलात टाकावे

अशी ती आज्ञा आहे. ती तू सर्व जनांस विदित कर, व आज सूर्यास्ताच्या आत त्याप्रमाणे कृती घडव. जर तू या कर्तव्यात अंतर दाखवशील, तर तुझ्याच सर्वांगावरील त्वचा सोलली जाईल व तू तप्त तेलात अति यातनेने मृत्यू पावशील. कालमुख हे नाव तुझ्या स्मृतीत राहील ना ? ' डोंबाने आपला हात मागे घेतला व तो शिलाखंडाप्रमाणे स्तब्ध राहिला. त्याने

दूताच्या क्षीण निर्जीव होत चाललेल्या डोळयांकडे अजाणपणे पाहिले. दूत सारा प्राण डोळयात आणून पुन्हा विचारीत होता, 'कालमुख हे नाव तुझ्या स्मृतीत राहील ना?'

'होय, त्या नावाचा मला विसर पडणार नाही. राजदूत, या नगरात मीच एकटा डोंब आहे आणि माझेच नाव कालमुख आहे. 'राजदूताने अविश्वासाने त्याच्याकडे पाहिले. त्याच्या डोळयांत विलक्षण हालचाल झाली, पण दुसऱ्या क्षणी ते निस्तेज होऊन विझले. त्याचा चेहरा म्लान झाला आणि

भूमीतील बीजांकुर सतत वर येत असावा, त्याप्रमाणे सतत स्पष्ट होत चाललेली त्याच्या चेहऱ्यामागील कवटी अखेर पूर्णपणे स्पष्ट होऊन गेली.

0000000000

भाग दोन -जीएंचे दिशादर्शन -

धों वि देशपांडे यांच्या , "जी एंच्या कथा - एक अन्वयार्थ "या पुस्तकात दूत कथेची समिक्षा आहे . त्या विवेचनाची पार्श्वभूमी विचारात घेण्यासारखी आहे .

I ) जीएंच्या' विदूषक ' कथेची आठवण करून देणारी दूत ही कथा वाटते . संस्कृतप्रचुर भाषा - उपमा - सुभाषिते - राजवैभवाचे वर्णन - राजकारणी कुटिल भाषा - यांमुळे चंद्रगुप्तसारखा काळ कथेत येतो . 'विदूषक' प्रमाणे या कथेतही सत्तास्पर्धा दाखवली आहे .

ही सत्तास्पर्धा जीवघेणी दाखवली आहे . ती राजसत्ता असो की धर्मसत्ता . दोघांच्या सत्तास्पर्धेत दूताला विनाकारण प्राण गमवावे लागले . अशा निखळ सत्तेचे येथे रूप दाखवले आहे.

- 2) सत्तेपायी सामान्यांचा छळ होतो .त्या छळाचे अनेक प्रकार ,राजपुत्र व भद्रानंद यांच्याकडून वापरले जातात . राजकारणात स्टॅलिनने असे छळ करून कबुलीजबाब मिळवले ,हे इतिहासात सिद्ध आहे . मध्ययुगीन पोपकडे इक्विझिशनची सत्ता होती . त्याने ब्रुनोला जिवंत जाळले. पोपने अमेरिका खंडाची, युरोपियन सत्तांमध्ये वाटणी करून नकाशा तयार केला .इतिहासातील हिटलर ,औरंगजेब हे ,त्यांनी केलेल्या इतरांच्या छळासाठी प्रसिद्ध आहेत.

- 3 )कथेतला सम्राटही हुकुमशहा असतो .त्यामुळे तो साक्षात्काराच्या नावाखाली निरपराध डोंबाला तातडीचा मृत्यूदंड देण्याची आज्ञा करतो .

- 4 )दूताला विस्मरण का होते, याचे मानसशास्त्रीय कारण पहाता येईल . निरपराध डोंबाला, विनाचौकशी प्राणदंड देण्याची आज्ञा होती . हे करणे दूताला मनात पटत नव्हते. म्हणून त्या आज्ञेचा विचार, त्याच्या अंतर्मनात गेला व आज्ञा सांगताना मनाच्या पृष्ठभागावर न आल्याने विस्मरण झाले . छळ सोसल्यावर ,मृत्यूक्षण जवळ आल्यावर, ती आज्ञा अंतर्मनातून जाणीवेत - वाणीत आली . यावरून जी एंचे मानसशास्त्रीय ज्ञान दिसून येते.

कथेत दूत स्मशानात जिवंतपणे येतो व तेथे मरतो . यामध्ये जीवनातील विसंगती दाखवली आहे .

- 5 ) या कथेचा आणखी काही अर्थ निघतो का हे अधिक वाचनाने कळेल .

- ए) डोंबाचे नाव 'कालमुख ' आहे.

- बी )कालमुखाला तीन दिवसांत म्हणजे - भूत - वर्तमान -भविष्यकाळांत शिक्षा मिळणार आहे. ती मृत्यूची शिक्षा आहे. म्हणजे जीवनात मृत्यूची टांगती तलवार दरक्षणी आहे. कालचा दिवस जिवंत राहीलो हे भाग्य . आज संपूर्ण दिवस जिवंत राहू ही प्रार्थना . भविष्यात येवढेच की मृत्यू अटळ आहे .

- सी)कालमुख म्हणजे कालपुरुष हा ,सम्राट, साम्राज्य, जनता ,यांना गिळंकृत करणार आहे. म्हणजे सर्व क्षणभंगुर आहे . काळपुरुष अनाकलनीय, अनिर्वचनीय आहे . ( जी एं ची

- ' निरोप' - कुसुमगुंजामधील - निवेदन स्वरूप कथाही कालपुरुषाला संबोधीत करते - हे येथे आठवते .)

- डी) सम्राटाला वाटते की, स्वतःला मृत्यूपासून संरक्षण करायचे तर कालमुखाला नष्ट केले पाहीजे . सम्राटांना आपले जीवन क्षणभंगुर आहे ,हे मानवत नाही .

इ)कथेत घटना अशा घडतात की, कालमुखाला म्हणजे कालपुरुषाला नष्ट करण्याची वेळ ,( डोंब ) स्वतः कालमुखावर येते .

- एफ् ) कालमुखाने स्वतःला नष्ट केले तर कालपुरुष राहणार नाही . म्हणजे काळाची सुरुवात -मध्य- शेवट ; म्हणजे जन्म -जीवन - मृत्यू - राहणार नाही . म्हणून कालपुरुषाने स्वतःला नष्ट करणे अशक्य आहे.

- जी)पण त्याने कालीची - नियतीची - प्रतिज्ञा घेतली आहे . भगवतगीतेत विष्णु भगवानाला अनेक मुखे आहेत व सर्व जीव त्यामध्ये जात आहेत ,असे सांगीतले आहे .त्याप्रमाणे कालमुखाने काही केले नाही , तरी कालपुरुषाकडून सर्व नष्ट होणार आहे .

- एच )विश्वाचा हा डायलेमा आहे .जन्माला घातले पाहीजे व जीवन संपवले पाहीजे . मानव, सजीव, हे जन्म पावत असतात - तसेच नष्ट होत असतात .

येवढेच काय पण ,पृथ्वी ग्रह, सूर्य, तारे हे जन्म पावत असतात व नष्ट होत असतात.हे लाखो वर्षांत घडत असते. हे वैज्ञानिक सत्य आहे.

कालपुरुष जन्म देतो व मृत्यू ही देतो . मग कालपुरुष कधी जन्मला व कधी नष्ट होईल का ,हा डायलेमा आहे . हा डायलेमा विश्व कसे सोडवते , हा प्रश्न जी ए उपस्थित करतात . जीएंच्या पत्रिका ( सांजशकुन ) कथेत म्हटल्याप्रमाणे, ज्या प्रश्नाला एकच उत्तर मिळते ,तो बकप्रश्न असतो . खरा प्रश्न पुन्हा पुन्हा मांडावा लागतो

व त्याचे उत्तर एकच असेल असे नाही . त्या कथेतील नायकाचा सहकारी रमल मांडतो . उत्तर काय आले, विचारल्यावर म्हणतो ," रमलाच्या उत्तराचे पुस्तक हरवले आहे ." त्यापमाणे ,कालाचा जन्म कसा झाला व शेवट कसा होईल ,हे समजणे माणसाच्या कल्पनेपलिकडचे आहे . असे विचार वाचकांपुढे ठेवून दूत कथा संपते . धन्यवाद . विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत : दंडवत विलासजी.

अतिशय सखोल विश्लेषण.

ही कथा मला सामान्य रंजनात्मक कथा वाटत असे. त्याची अनेक परिमाणे व पैलू तुम्ही दाखवले. आता कथा पुन्हा वाचून मला काय वाटते ते लवकरच लिहितो.

सुनीळ सामंत : जीएंची दूत ही कथा आजवर अनेकदा वाचली आहे. ही कथा माझ्या अत्यंत आवडीच्या कथांपैकी एक आहे. एकदम सुस्त निवांत वेळी वाचायची कथा.

या कथेतील प्रासादिक भाषा आणि भव्य वर्णने यातून वि स खांडेकर यांची ययाती तसेच शिवाजी सावंत यांची मृत्युंजय अशी बहारदार पुस्तके आठवतात. पण यातील ओळी ओळी मागे वाढत जाणारी उत्सुकता आणि गडद होणारे गूढ यातून बाबुराव अर्नाळकर किंवा रत्नाकर मतकरी, अगाथा ख्रिस्ती यांची फ़ील येते. दुताचे दौडत येणे, ती नगरी, त्याचे घोडे, त्यांची आयाळ, त्यांना लावलेला लगाम, रस्त्यावरच्या फरशा, तुतारीचा निनाद ,लोकांचे उत्सुकतेने जमा होणे हे सारेच एखाद्या परिकथेसारखे रम्य आहे. मग दूताला आपल्या निरोपाचा विसर पडणे, त्याचा फायदा घेण्यासाठी राजपुत्र आणि आर्यस्थविर यांची चढाओढ, अमात्य आणि भद्रानंद यांनी एकमेकांवर केलेली कुरघोडी हे वाचता असता कथा एखाद्या क्राईम स्टोरीप्रमाणे वेग पकडते. जीएं च्या इतर कथांच्या मानाने ही एक वेगवान कथा आहे. आणि याचे कथानक जरी लहान असले तरी वाचकाला विचार करायला उसंत

न देणारे आहे. त्यामुळे यामागे विलासजींनी म्हटल्याप्रमाणे तात्विक वैचारिक पैलू असले तरी माझ्यासारख्या वाचकाकडून ते दुर्लक्षित होतात.

परंतु या कथेची दुसरी गंमत ही आहे. ती ही कि या कथेचे गुढ शेवटी सुद्धा उकलत नाहीच. दूताने आणलेला निरोप ऐकेल त्याला त्याची अंमलबजावणी करणे अपरिहार्य आहे. त्यातून कालमुखाने निरोप ऐकण्यापुर्वीच दूताला तसे वचनही दिलेले आहे. त्यामुळे त्याला ते वचन पाळणे आवश्यक आहे. पण तो निरोप त्याच्या स्वतःच्याच मृत्यूला कारणीभूत होणारा आहे. तेव्हा त्याचे पालन तो करील की नाही हे आपल्याला कळतच नाही. इतर गूढ कथांपेक्षा या कथेचे गुढ असे अखेर ला सुद्धा उलगडत नाही. या गूढाची उकल स्वतः वाचकाच्या स्वतःच्या नीतीमत्तेनुसारच ठरते.

--- आणि नीतीमत्ता तरी का? कारण निरोप सांगितला नाही तरी मृत्यूदंडच होणार. निरोप सांगितला तरी मृत्यूदंडच होणार आणि तो मृत्यूदंड द्यायला या राज्यात एकमेव डोंब कालमुखच आहे. म्हणजे कालमुखाने निरोप दिला तर कालमुखाला कालमुखाच्या मृत्यूची अंमलबजावणी करावी लागेल. आणि निरोप दिला नाही तर कालमुखाला मृत्यूदंड होईल. आणि तो कालमुखालाच द्यावा लागेल.

या कथेमागचे तत्त्वज्ञानही हेच असावे. थोडा विचार केला तर उकलेल. पण कथा इतकी गोड आहे की गुंगीच येते.

गौरी देशपांडे : ह्या तुमच्या विश्लेषणातील प्रत्येक शब्दाशी मी सहमत आहे. मलाही ही कथा वाचताना असाच अनुभव येतो नेहमी.

सुनीळ सामंत : नगराकडे येत असलेल्या रुंद मार्गावर एक रथ अतिवेगाने येत आहे व त्यावर सम्राटाचा नीलवस्त्रावरील हंसचिन्हाचा ध्वज आझे, हे पाहाताच द्वारपालांनी अत्यंत प्रचंड अर्गल बाजूला केल आणि त्याबरोबर अवजड धातूच्या दोन लाटांपमाणे, त्थाचे दोन पक्ष संथपणे मागे येऊन स्थिर झाले, नगरात प्रवेश्

करताना रथाची गती किच्तिही कमी झाली नाही. शुभ्र घोड्यांच्या टापा फरशी बसवलेस्या रस्त्याबरून धावताना ठिणग्यांच्या चांदण्या उडवू लागले, रस्त्यावरील जनसंमर्दात भयाने दोन भाग होऊन त्यातून रथ पुढे जाताच उसुक जनांचा समुदाय त्याच्यामागे धावू लागला. नगरातील भव्य चोकात रथ येताच सारथ्याने एकदम लगाम खेचला. त्या क्रियेबरोबर उतावीळ, विस्तूत डोळयंचे शुभ्र घोडे मागच्या पायांवर उभे राहिले व त्यांच्या डोलदार आयाळ्ांच्या माना सागराच्या वक्र लाटांप्रमाणे क्षणभर वर गेल्या. शक्तिमान घोड्यांच्या पायांना आता थारा मिळाला, पण पूर्वीच्या अतिवेगाचा परिणाम अद्याप औसरला नव्हता व त्यांची निथळत असलेली शरीरे अद्याप थरथरत होती. भोवतालचा समुदाय वाढत गेला प्रत्येकजण रथातून राजदूत खाली उतरण्याची उत्कंठेने वाट पाहू लागला.

---क्या बात है....

या कथेची सुरुवातच इतकी नाट्यमय आणि सुंदर आहे की ही कथा आपोआप वाचली जाते. सलग. तहानभूक विसरून. प्रवसात तर वाचूच नये, स्टेशन मागे गेले तरी कळणार नाही.

वैभव कुलकर्णी : हो.

जीएंच्या कथा वाचताना सभोवतालचा संपुर्ण विसर पडतोच ....

विशाखा आपटे : दूत आणि कालमुख डोंब दोघेही आपापल्या कर्मानी बांधलेले आहेत, पण त्यांनी त्या अंतर्गत काय कर्म करायचं हे सत्ताधारी व्यक्ती आपापल्या सत्तेच्या परीघप्रमाणे स्वतः च्या whim वर किंवा लालसेवर ठरवत आहेत. एका दु:स्वप्नाच्या आधारावर सम्राट, जो डोंब आहे, आणि जो तसं पाहिलं तर अतिशय महत्वाचे कामं करतो आहे : म्हणजे प्राण गेलेल्या व्यक्तींना अग्नी देण्याचं म्हणजेच नगराला स्वच्छ व निरोगी ठेवण्याचं कामं त्याचं आहे आणि तो ते

कामं बजावण्यात प्रामाणिक आहे . त्याला अतिपापी ठरवून त्याचा बळी देण्याची आज्ञा घेऊन दुताला पाठवतात.

सर्वसामान्यपणे असे मानले जाते की दूत फक्त निरोप वा आज्ञा पोचवण्याचे कामं करतात, ते स्वतः neutral असतात, त्यांची स्वतः ची त्याबद्दल काहीच भूमिका वा मत नसते त्यामुळे त्यांना अभय असते. पण ह्या गोष्टी त दूताला सम्राटाच्या आज्ञयेचे विस्मरण होते व त्यामुळे त्याचा छळ होतो. कारण राजपूत्राला वं आर्यस्थ विरांना स्वतःला अनुकूल जे ऐकायचे आहे तशी आज्ञा सम्राटांची नव्हती हे मात्र दूताला आठवते आहे. दूताचा ह्या राजकीय व्यवस्थेमध्ये उगाचच बळी जातो. कालमुख डोंब ही राजा दन्येचं पालन म्हणूनच दूताचा वेगवेगळया रीतीने छळ करतो. मुलत : तो वाईट वृत्तीचा नाही. म्हणूनचं तो जेव्हा अंगावरील डोंबाची वस्त्रे उतरवतो तेव्हा दूताला औषधी पेय पाजतो. हे दोघेही स्वतःचे कामंचं करत असतात पण घडवून आणलेल्या परिस्थितीचे बळी ठरतात. उच्च थरातील लोकं या दोघांचे भाग्य म्हणजे मृत्यू हे ठरवतात.

दूत कथा पूर्ण

-- - -

# निरोप - ( कथासंग्रह- पारवा)

सुनीळ सामंत: निरोप-

लेखक- जी ए कुलकर्णी- कथासंग्रह- पारवा

निरोप ही कथा करूण रसाची परिसीमा ठरावी इतकी करूण आहे, इतकी दुःखमय आहे. या कथेतील प्रत्येक शब्द, वातावरण, व्यक्ती आणि केंद्रिय कथा, सर्व काही कारुण्यपूर्ण दुःखाने भरलेले आहे. सुजल्याप्रमाणे अंधार, ठसठसणारी वेदना, कोसळणारा किडा, त्याचे भाजणारे पाय, थरथरणारे पंख, सांदरीत अंग दुमडून झोपलेली आई, तिची कडा बोंदरी झालेली पोथी, नानू चा श्रांत चेहरा, त्याची अस्वस्थ झोप, विजू निपचित, गारठलेली, तिचा ओलसर तवंगलेला चेहरा, चिकट दिसणारी बशी, कुंद वातावरण, औषधाच्या कागदांचे कपटे, आजारी रडणारे मुल असे वातावरण. हे वाचतानाच कमालीची उद्विग्नता, दुःख यांनी वाचक घायाळ व्हावा. जीए मराठीचे शब्दप्रभूच. ते जेव्हा काही भव्य रंगवतात तेव्हा कसलीच कसर ठेवत नाहीत आणि करूण रसाच्या वेळी रकाशाची तिरीपही दाखवत नाहीत. नुसता काळोख, ओला, दुःखद.

विजू नुकतीच बाळंत झालेली. अशा एका रात्रीची ही कथा. आजारी विजू. तिचे छोटेसे कृश बाळ, लहान भाऊ नानू, त्याची पत्नी वारलेली आणि आईविना त्याची दोन मुले. मोठा भाऊ नारायण. त्याने परजातीची मुलगी लग्न केलेली. त्यामुळे घराबाहेर. आता मात्र त्याला घराबाहेर काढणारी आई थकलेली. तिला वाटते, आता मुलीच्या या आजारपणात तरी त्याने यावे.

ही रात्रही रोजच्या रात्री सारखी नाही. ही विजू च्या मरणाची रात्र आहे. जीएंनी विजू चे मरण आणि मरणाचा काळ मरणाच्या वेळी मनात येणारे विचार हे आपल्या वेगळ्या शैलीत अतिशय कलात्मक रित्या चितारले आहेत. त्याला सतत

कारुण्याची टोचणारी सल आहे. विजू मेल्यानंतर तिचा हलका आत्मा भटकणे, तिला नारायण चा मित्र माधव ची आठवण होणे, नारायण कुठे आहे याचा कोणालाही पत्ता नसणे, पण मेलेल्या विजूला तो दिसणे आणि त्यातून मृत्यूपश्चात आयुष्याची झलक जीए दाखवतात.

सहसा मरण हे दुःखद आयुष्याची सुटका असते. पण या कथेत तेही नाही. विजूला मरणामुळेच आणि मरणानंतरच आपल्या प्रिय भावाच्या मृत्यूचे समजते.

प्रचंड दुःख कारुण्य आणि आणि नियतीचे आघात गैरसमज यांनी भरलेली ही कथा वाचवत नाही. वाचल्यावर बराच काळ सुन्न व्हायला होते. हे सुन्नपण जीएंच्या तुती, कैरी किंवा राधी हून वेगळे आहे. इथे हताशा तर आहेच. पण जीएंची निर्विकार शैली आणि सतत टोचणारे करूण शब्द यांनी या कथेत निःश्वास टाकायला एकही विश्रांतीस्थान नाही. अंगावर येणारी ही कथा. मराठीत इतक्या टोकदार शोकांतिका मला तरी आढळल्या नाहीत. ही शोकांतिका तरी का म्हणावी, अथ पासून इतिइपर्यंत शोक, उद्विग्नता, पराभव, दुःख, टोचणी यांनी भरलेली ही कथा मराठीतील एक मैलाचा दगड आहे.

विलास वाघोलीकर- सुनीळजींनी या लक्षणीय कथेची ओळख करून दिली त्याबद्दल आभार मानतो .थोडी सविस्तर प्रतिसाद देत आहे.

कथेत अनेक घटक गुंफलेले आहेत. पण शेवटी वाचकाला जो धक्का बसतो, त्याचा मागमूसही पहिली अनेक पाने लागत नाही . यात जी एंची कथा सांगण्यावरची हुकूमत दिसून येते . कथेत खालील महत्वाचे घटक आहेत -

। )कुटुंब व माहेरी आलेली विजू - वडीलांचे पूर्वी निधन झाले आहे. आई ,दोन मुलगे ,व विजू ही मुलगी, असे कुटुंब असले तरी ते विस्कटलेले आहे. एक मुलाने - नारायणने - परस्पर लग्न ठरवून ,तो मुंबईला गेला आहे . दुसरा, नानूच्या बायकोचे निधन झाले असून ,दोन लहान मुलगा -मुलगी त्याच्या पदरात आहेत. विजूचे ,नारायणच्या मित्रावर, माधववर प्रेम होते .पण ते वडिलांना न पटल्याने तो

दूरगावी जातो . विजूने नाईलाजाने जमवून घेतलेल्या, कारखानदाराशी लग्न करून ती माहेरी बाळंतपणासाठी आली आहे . पण दुखणेकरी झाली आहे.

2 ) गावाचे ,घराचे बारकाईने वर्णन केले आहे . त्यात देवघर ,खोल्या ,बाहेरचे अंगण अगदी हुबेहुबपणे दाखवले आहे . की वाचक जणू त्या घरी ,पावसात फिरून येतो .

3 ) धक्का - कथेची सुरुवात रात्री ११ -११ .३० वाजता होते .आई ,नानू, मुले झोपलेली असताना विजू उठते . बऱ्याच दिवसांनी उभी राहते . व घर पाहील्याप्रमाणे घरभर फिरते . वाचकांना घरभर फिरवून ,लहान नुकत्याच काही आठवड्याच्या मुलीच्या पाळण्यापाशी आणते .

4 ) स्त्रीजीवन - मुलीच्या पाळण्यापाशी आल्यावर या मुलीचे कसे होणार ही मातृभावना जागृत होवून तिला स्त्रीजीवनाचे सार डोळ्यासमोर येते . ते पर्यायाने जीएंचे निवेदन आहे .

- 5 ) वाचकाला इथपर्यंत सर्वसाधारण वातावरण वाटत असले तरी ,खिडकीतून थंड वारा आला इथपासून एकदम बदल होतो . जीएंनी मृत्यू समयाचे प्रत्ययकारी वर्णन, ऑर्फियस ,काली ,कांचनमृग,घर इत्यादी कथांत केले आहे. मृत्यू अनिर्वचनीय, अनाकलनीय आहे . त्यामुळे जी ए त्याचे अनेक पैलू दाखवतात. विजू मृत्यूसमयीची रुग्णाईत आहे. तिचे डोळे खोल गेले आहेत. हात वाळून ,कडब्याच्या काटक्यांप्रमाणे झाले आहेत. चेहरा दाबल्यासारखा झाला आहे. गळ्याप्रमाणे पांघरूण घेवून निपचित झोपली आहे . खिडकीतून थंड फुंकरी सारखा वारा आल्यावर तिचे अंग शहारते . व ती उभी राहित्यावर हलके वाटते . . . . तिला माहित असते की ,अजून अर्धा तास अवकाश आहे.

- तिची नजर आपल्या अंथरुणाकडे गेली आणि ती चमकली . तिचे प्रतिबिंब तेथे होते. डोळे खोल गेलेले असून मिटलेल्या तलम पापण्यांतून ते टपोरे आकार दाखवन होते . होय ,तिचाच तो देह होता.

- म्हणजे साऱ्याचे हे अखेर असे झाले .. भांडे रिते करावे त्याप्रमाणे आता सारे संपले होते .

- जी ए नंतर  मृत्यूचे वर्णन करतात, ते एकाकी, अटळ, भयाण प्रवासाचे आहे . जीए लिहितात-

घड्याळात बाराचे ठोके पडले व ती गेट बाहेर वाट पाहील्यासारखी आली. दुरून कुठे टांग्याचा आवाज ऐकू येतो काय हे ऐकण्याचा तिने प्रयत्न केले . . . एक प्रचंड रक्तांजनी घोडा अक्कड तिक्कड पावले टाकत आला व गेटपाशी उभा राहिला . त्याची ऐटबाज मान गेटवरही चांगली दोन हात वर राहिली. आत प्रकाश लावल्याप्रमाणे त्याचे डोळे प्रज्वलित, तापलेल्या नाण्यासारखे दिसत होते. जणू एखाद्या खडकातून अखंड खोदल्याप्रमाणे त्याचा आकार घोटीव आणि सामर्थ्यशाली होता. टांगेवाल्याने पावसात चकचकत असलेले काळे मेणकापड सर्वांगाभोवती गुंडाळले होते. त्याआड त्याचा चेहरा

लपला होता. फक्त लगाम घेतलेली त्याची बोटे मात्र फिक्कट, अस्पष्ट बाहेर दिसत होती.

विजू खालच्या मानेने टांग्यात चढली. कुठे जायचे हे तिने सांगितले नाही.

टांगेवाल्यानेही ते विचारले नाही. सारा रस्ता विषारी फुंकर टाकल्याप्रमाणे निर्जन होता.

रस्त्याचा एकेक तुकडा गिळीत घोडा पुढे जात होता.

तोच एका दिव्याच्या उजेडात कुणीतरी उभे असलेले विजूला दिसले. आश्चर्याने विजूचे शब्दच बधिर झाले.--तो नारायण होता ! घरातून बाहेर पडला त्याच साध्या, किंचित चुरगळलेल्या पोशाखात. पण त्याचा चेहरा अगदी सुकला होता आणि सारे अंग विरून गेल्यामुळे हिसकते की काय असे दिसत होते. एकदम टाळी वाजवून विजूने हाक मारली, "नारायण ! अरे नारायण ! " पण तो बोलला नाही की पुढेही आला नाही. तिने त्याच्याकडे निरखून पाहिले. त्याचे डोळे मेल्याप्रमाणे स्मृतिहीन होते आणि चेहऱ्यावर भावनेचा पुसता हातही नव्हता. तिने पुन्हा हाक मारण्यासाठी तोंड उघडले,

तोच त्या घोड्याने काळ्या सापाप्रमाणे वळयावळयाने पडलेले आपले आयाळ ऐटीत उडवले आणि तिच्याकडे धगधगीत माणकाच्या एका डोळयाने रोखून पाहिले. विजू घाबरून गप्प झाली.

--तोच सारे तिच्या ध्यानात आले. साऱ्या स्मृती हिरावून घेतल्या गेलेला नारायण तिथे उभा होता. म्हणजे वेशीपलीकडे सारे असेच का ?...या विचाराने विजू जागच्या जागीच थिजली. म्हणजे टांग्यात चढतानाचा निरोप शेवटचा म्हणायचा तर ! नंतर कधीतरी नानू, आई, गौरीला घालायच्या वस्त्रासारखी सोज्वळ वहिनी, माधव, कृष्णा गाय,

ही सारी भेटतील; पण ती अशी आंधळ्या सावल्यासारखी... अंधारात वाऱ्याने कागदाचे

कपटे भिरभिरत असावेत, एकमेकांवर आदळावेतसुद्धा. पण त्यांच्यात काही संबंध नाही...

काही संबंध नाही !...

ही जाणीव होताच विजूच्या मनातील उरल्यासुरल्या सुखदुःखांच्या तारांचा जिवंत गुंतवळा वटण दाबल्याप्रमाणे विझला. तिचे डोळे काचेचे असल्याप्रमाणे निस्तेज झाले, आणि मान खाली गेली. घोडा न थांबता पुढे चालू लागला, आणि दिव्याखालच्या पातळ,ओलसर डबक्यातून पिवळा उजेड उडवीत तसाच पुढे निघून गेला....

मृत्यूसमयीच्या या वर्णनाने जीएंची ही कथा अविस्मरणीय ठरते . व तुमची आमची कथा होते . थोडा सविस्तर प्रतिसाद देत आहे. धन्यवाद . - विलास वाघोलीकर

वैभव कुलकर्णी : विलासजी खूप खूप कठीण आणि गुंतागुंतीची कथा आहे. पण मस्त ऊलगडून दाखवलीत.. 👍 👍

# राधी

विलास वाघोलीकर- - जी ए कुलकर्णी यांची राधी कथा , एक महानाट्य आहे . जीएंच्या विदूषक, स्वामी, तुती, कैरी इत्यादी सारख्या वजनदार कथांसारखी ही कथा लक्षणीय आहे . नेटाने वाचायला लागेल अशी ही31 पानांची कथा आहे .

- जीएंनी ऑर्फियस कथेची सुरूवात , या अर्थाच्या एका सहज वाक्याने केली - ऑर्फियसने मृत्यूलोकातून वर पाहिले तेव्हा वाट सर्पाप्रमाणे वर वर गेली होती व ती संपली तेथे गवताचे हिरवे पाते डोकवताना दिसत होते . राधी कथेची सुरूवात अशीच महादेव गल्लीच्या सहज वर्णनाने होते . मग एखादी नदी महाविस्ताराची व्हावी, प्रचंड प्रपात यावेत तसे सविस्तर वर्णन येते. एखाद्या यक्षाने हातावर गाव घेवून उचलून ठेवावे, तितक्या यथातथ्यपणे जीएंनी बेळगावची महादेव गल्ली शब्दांमध्ये आणली आहे . रंगमंचावर राधीचे हे महानाट्य सुरु होते. यामध्ये एकएक प्लेयर येतो, आपले काम करतो व रंगमंचावरून निघून जातो .

- सुरुवातीला महानाट्याची प्लेयर म्हणून राधी येते . ती फाटक्या लुगड्यातील पण कष्टाळू, तरतरीत आहे . ती रस्त्यावरच्या खांबावरचा सगळा रॉकेलचा दिवाच उचलून नेते . तिची पैशाची परिस्थिती येथून दिसते . तिचा नवरा वेडयाच्या हॉस्पिटल मध्ये आहे . ( प्रत्यक्षात तो मेला आहे ) गावातील, मिरची कुटण्यासारखी हातावरची कष्टाची कामे करून ती दिवस घालवत आहे. ती काळपट गुळाचा चहा पिते . गणेशवाडी भट तिला त्याच्याकडचे उरलेले अन्न पत्रावळीवर आणून देतो . गल्लीत तिचे 'वार' लावलेले असते . आई रखमेकडून तिला लुगडे, चोळीचे कापड देते . आबा त्याबरोबर दोन रुपये देतात . गल्लीत तिला सवाष्ण म्हणून बोलवतात . आबा, गोठयाच्या घराला पत्रे मारून तिची खोली तयार करतात . तेथे ती अतिदारिद्र्यात पण तरतरीतपणे राहात असते .

- पण राधीची 'नजर' वाईट आहे अशी लोकसमजूत , अफवा पसरलेली असते . लहान , रूढीग्रस्त गावात अशा समजूती असता त. आणि बनेल माणसे त्याला योग्य असे,निवडून प्रसंग सांगत असतात . उदाहरणार्थ, अमक्याचे जेवणावरून मन उडाले . तिने पाहील्यावर वासरू हरवले . गौरीचे मूल सातव्या महिन्यात गेले . ती आल्यावर घरातील दूध संध्याकाळी खराब झाले . . .

- नंतर कथेत गणेशवाडीभट हा प्लेअर येतो . तो काळा , द ण कट, बेफिकीर ,बुद्धीमान असल्याने राधीचा गल्लीत टिकाव लागतो .

- नंतरचे प्लेअर्स आहेत, बाल कथानायकाची आई व आबा (वडील ) .त्यांना राधीबद्दल मनातून कळवळा आहे. नंतरचे प्लेअर येते कुत्र्याचे लहान पिल्लू, त्याचे' काळे' असे नाव ठेवले जाते . त्याला पाहून आबा म्हणतात," हेच का तुझे काळे ? अशक्त दिसतेय . खाऊ घाल त्याला . पण जिवंत गोष्टीत फार जीव लावून गोत्यात पडू नकोस, पोरा ." राधी, आई, आबा, व 'काळे' यांच्या सहवासात बाल नायकाचे दिवस पिसासारखे हलके फुलके जात असतात .

- बालनायकाच्या आठवणींचा कथेत सुंदर गोफ आहे.त्यात अभ्यासाचा, एकसमयावच्छेदेकरून असा थोडाफार अवघड भाग असतो .तसेच अशक्तपणा आल्यावर परसात चूल रचून अंडी खाण्याचा भाग असतो ! आमसोल ,करवंदांचा भाग आहे . आईने घेतलेली उलट तपासणी आहे . राधीने म्हटलेले कृष्णाबाईचे, गाय , वासरू, वाघाचे गाणे आहे . मामाच्या घरातील आठवणींच्या, विरुध्द बालनायकाच्या घरातील मनोज्ञ स्मरणे आहेत.

- कथेत मधेमध्ये थोडा विनोद विखुरलेला आहे . गणेशवाडीभटाची दत्ताची पूजा, आबांचे खोटे रागवणे आहे.

- जीएंची राधी कथा ही, एका कथेत अनेक प्रकारच्या कथा दाखवते . म्हणून ती महानाट्य - लघु कादंबरी वाटते . 1 .ती तुती, कैरीसारखी संसार कथा आहे . 2. ' इस्किलार' सारखी सर्व गावाचे वर्णन करणारी गाव - कथा आहे . 3.बालपणीच्या आठवणींची कथा आहे . सर्व कथा , बालकाच्या शब्दात का येते ते पहाण्यासारखे

आहे . आई - मित्रांना लहान मोठ्या गोष्टी बालक सांगतात . त्याच वेळी त्यांना मोठी माणसे अनेक गोष्टी सांगत नसल्याने त्यांचे जगाचे ज्ञान अदभुत राहते .

4-ही 'बळी'सारखी हिंसाचाराची कथा आहे . जी एंनी एक भयानक परिस्थिती व्यूह कथेत दाखवला आहे. माणूस जीवन काढत असतो . पण त्याला उद्या काय होईल हे कळत नाही . टेकडीच्या पलिकडे काय होणार हे कळत नाही . पण टेकडीचा जीवघेणा प्रवास तर करावा लागतो . राधीच्या मृत्यूचा परिस्थिती व्यूह, अभिमन्यूच्या चक्रव्यूहासारखा आहे. त्यातून मृत्यूच सुटका करतो .

- बालनायकाला 'काळे' कुत्र्याचा लळा लागत असतो . पण त्याचवेळी ते पिसाळते . शेळयांना चावत सुटते . दुर्दैवाने ते राधीला चा व ते . मग पाच सहा जण त्याला मारायला धावतात . ग णूने नारळाएवढा दगड त्याच्या डोक्यात घालून ते मरते . एक अरुंद गल्ली एवढे आयुष्य जगून 'काळे'  मरून गेले . . . असे जी ए लिहितात .

- त्यानंतर राधीला हायड्रोफोबिया होवून तिचा करूण मृत्यू दाखवला आहे . कथेचा काळ असा आहे की त्या काळात इंजेक्शन्स नव्हती व करुण मृत्यू व्हायचा.

- गावाला जाण्याआधी राधी मुलाला म्हटली होती - "गावाहून आल्यावर तू मला ओळख दाखवणार नाहीस ."   आल्यावर राधीच त्याला ओळखत नाही . .

- सरळ माणसाच्या अशा वाईट कालखंडात, माणसांतली आडदांड, दुष्ट माणसे त्याला क्रूरपणे त्रास देतात . नाऱ्याची टोळीतली मुले, राधीच्या खिडकीपुढे तांब्याभर पाणी ओततात, पत्र्यावर दगडे मारतात . शेवटी राधी ओरडून ओरडून रात्री मरते . त्या रात्री आई , आबा, मुलगा उपाशी झोपतात ..

कथेत बालनायक गावाला जाण्याआधी आईबरोबर सुताराच्या लक्ष्मी च्या दर्शनास जातो व सुताराच्या लक्ष्मीचे रेखीव वर्णन केले आहे. ती सुताराची लक्ष्मी सहा हातांची होती . कथानायकाला राधी सुताराच्या लक्ष्मीसारखी वाटली . लक्ष्मी सहा हातांनी देत असे . तसे राधी भरभरून देत असे . देववादी माणूस तसेच मूल ,आई - वडील - गुरू यांच्यावर देवसदृश्य श्रद्धा ठेवून जीवन जगत असतो . (

एकलव्याने द्रोणाचार्यांच्या पुतळ्यावर श्रद्धा ठेवून धनुर्विद्या मिळवली ) बालकथानायकाला राधी देवता स्वरूप वाटते ."…. राधीने मला सहा हातांनी दिले .पण मी मात्र तिला काही देवू शकलो नाही …" म्हणून सुताराच्या लक्ष्मीला कथेत लक्षणीय स्थान दिले आहे . डोळ्यासमोर येईल असे वर्णन केले आहे

जीएंनी कथेत दृश्यांना स्थान दिले . कुत्र्याचा आवाजाचे वर्णन आहे. कुत्र्याचा स्पर्शाचा उल्लेख आहे. आमसोलच्या चवीचा उल्लेख आहे . पारीजातकाच्या गंधाचा उल्लेख आहे. चित्रपटासारखी किंबहुना जास्तच गतीची ही कथा आहे.

- ही 'बळी'सारखी हिंसाचाराची कथा आहे . जी एंनी एक भयानक परिस्थितीव्यूह कथेत दाखवला आहे. माणूस जीवन काढत असतो . पण त्याला उद्या काय होईल हे कळत नाही . टेकडीच्या पलिकडे काय असेल ते कळत नाही . पण टेकडीचा जीवघेणा प्रवास तर करावा लागतो .

- या कथेत जी एंनी एक भीषण परिस्थिती व्यूह दाखवला आहे . माणूस परिस्थितीव्यूहामध्ये जीवन जगत असतो . पण माणसाचे दुर्दैव कोणत्या पावली समोर येईल हे सांगता येत नाही. त्याकाळी हायड्रोफोबीयावर औषध सहजी उपलब्ध नव्हते .राधीच्या मृत्यूचा परिस्थितीव्यूह, अभिमन्यूच्या चक्रव्यूहासारखा आहे. त्यातून . बघ . खोटे बोलल्याशिवाय तुला जगता आले असते का ते ? मोठ्या गप्पा मारतोस आता जीभ लांब करून .. आबांच्या आवेशाने तर मी भेदरून गेलो . व त्यांच्याकडे पाहात च राहीलो . पण मी त्यांना तसे कधी पूर्वी पाहिले नव्हते .

कधी नव्हे ते आबांचे डोळे पाण्याने भरले होते ."

०० सुनीळ सामंत : जी एं ची ही एक अशी कथा आहे जी वाचवत नाही. झोप उडते. अन्नावरची वासना उदते. अगदी जगण्यावरची श्रद्धाच नाहिशी व्हावी अशी ही कथा आहे.

वाचणाऱ्याची ही स्थिती तर जीएंना ही कथा लिहिताना काय यातना झाल्या असतील याची कल्पना करवत नाही.

आणि जर खरेच असे अनुभव जीएंनी प्रत्यक्ष घेतले असतील तर...?

०० रमा गर्गे : मला गणेशवाडी भट दर दत्तजयंतीला आठवतात। बुद्धिमान, स्वच्छ मनाचा,घट्ट शरीराचा,काळा, तेजस्वी,युगानुकूल वागणारा सनातनी दशग्रंथी ब्राह्मण।

मनात कधीकधी तुती,कैरी आणि राधी मिक्स होतात। मग पुन्हा एकदा वाचन केले जाते।संदर्भ नेटके केले जातात।पण पुन्हा त्या कथा एकमेकींत मिसळत रहातात। महादेवगल्लीत परत जाऊन यावे लागते,तानी मावशीच्या माळरानावर फिरून यावे लागते,ब्रह्म असलेले घर ,गाय,आबांची (?)भरली वांगी हे रेफरन्स पुन्हा स्मरावे लागतात।

या सगळ्यात कुंकू फिस्कारलेली राधी विसरून जावी वाटते।पण ती मात्र असतेच,आमसुले दिसली तरी,कुणी कोरा चहा पित असेल तर,लहान मरतुकडे कुत्रे दिसले की किंवा अकारणच।पण राधी मनाच्या भिंती ओलांडून येऊन बसते।तिची नजर,तिचे गायीच्या शेपट्याला कुरवाळणे, आल्मीनच्या पातेलीत चहा उकळणे। 🥹

०० Manjiri Deshmukh: राधी मनाला सतत अस्वस्थ करते . ही अस्वस्थता स्वतः साठीच्या भीतीने येते.

०० LAKHAN DAGADE Reasonable Ga Premi Gr: जी.ए.च्या अनेक कथांपैकी 'बाधा' आणि 'राधी' या कथा मला विशेष जवळच्या वाटतात.कथेतील जी.ए.नी उभी केलेली स्त्री पात्रं कुठेतरी हृदयाचा ठाव घेतात.

आयुष्यातील रोजच्या धकाधकीच्या जीवनातील जिवंत माणसाच्या गर्दीतून बाहेर पडल्यावर जेव्हा स्वतःला एकाकी वाटतं तेव्हा मला जी.ए.च्या कथेतील पात्रं जवळ घेतात. हळुहळू मन रितं होत जात.

'रमा' वाचताना मन भरून येतं.'राधी' वाचताना रडूच कोसळत. जीविताचा लवलेश नसेलेली ही पात्रं जीवंत माणसाला रडण्यास भाग पाडतात.

खरतर मला लिहीण्याचा फार कंटाळा तरी सुद्धा 'राधी' वर आवर्जून लिहीण्याचा प्रयत्न करेन......

०० विलास वाघोलीकर : माननीय, नमस्कार . आपण जे सार दाखवणारे विवेचन केले आहे, त्यावरून आपण राधी कथा अनेकदा वाचली असणार . लिहिण्याचे काम कष्टदायक व वेळकाढू आहे हे निश्चित . पण जी एं नी आपणा वाचकांसाठी एवढे कसदार लिहिले आहे, हे लक्षात घेता ,वाचकांनी शक्य ते विवेचन करून वेगवेगळे पैलू दाखवावेत असे वाटते . आपणास वाटते ते कागदावर लिहून मोबाईल फोटो काढून पोस्ट के ल्यासही चालेल . पण या कथेवर आपण अजून विवेचन करावे अशी विनंती करतो . अनेक साक्षेपी वाचकांना ही कथा डोळे पाणावलेले करते . आपल्या प्रतिसादाबद्दल आभार . विलास वाघोलीकर

०० Deelip Badhye: मी राधी कथा पहिल्यांदा वाचली होती तेंव्हा विमनस्कावस्था आली होती.त्यानंतर ही कथा वाचण्याचे धाडस झाले नाही.


०० विलास वाघोलीकर : राधी - पार्ट । ते पार्ट 4 अभिवाचन ऐकून पुन्हा सुन्न झालो . वाचकांनी हे ऐकावे म्हणजे पुन्हा कथा वाचल्यासारखे होईल . व नंतर आपला प्रतिसाद 2 / 3 परिच्छेदांत *अवश्य* द्यावा ही विनंती . दिलीप जींना खूप धन्यवाद .


-----

# लक्ष्मी - कथासंग्रह पिंगळावेळ

जीए कुलकर्णी यांची लक्ष्मी कथा - पुस्तक पिंगळावेळ

विवेचक - व्ही एस वाघोलीकर





-ही संसार कथा आहे . तशीच ही मिथ कथाही आहे . या कथेला धार्मिक कहाणीचा तोंडावळा आहे.

-कथेत नायिका, लक्ष्मी व श्राद्धादी कर्मे करणारा तिचा नवरा केसूभट आहेत . ते लहान गावात रहातात .तीन मुलांचा संसार करतात . थोरला मुलगा श्रीपाद हा शाळेत जाण्याच्या वयाचा असला तरी या गरिबीमुळे किरकोळ कामे करतो . तो पहिल्या बायकोचा, म्हणजे लक्ष्मीच्या सवतीचा मुलगा आहे . ( ती सवत कपिलेश्वराच्या तळयात पडून मेली ) दुसरा मुलगा, नरसू व मुलगी कृष्णी ही लहान आहेत .

- केसूभट हा आळशी व मग्रुर आहे. पूर्वी शाकरणी करताना पडल्यामुळे तो पायाने अधू झाला आहे . त्यामुळे तो काही कमवत नाही . लक्ष्मीला गावभर धुणे भांडी सारखी कामे करून संसाराचा गाडा ओढावा लागतो .

त्यामुळे साऱ्या घरावर दारिद्र्याचे सावट आहे .

जीएंनी घरातील  दारिद्र्याचे असे चित्रण केले आहे - -. . . .केसूभटाचे धोतर सकाळी दोन ठिकाणी शिवून दिले होते. लक्ष्मीच्या लुगड्याचे उंदराने कुरतडलेले भोक गुडघ्यावर येत होते. रात्रभर भुकेची स्वप्ने पडत . चहा नव्हता .कारण गूळ संपून गेला होता . ... .. घर इतके मानी झाले आहे, की आता आपणा कुणालाच स्वाभीमान उरला नाही . धुणे भांडी आवरून दुपारी येताना अनवाणी पायांना दर पावलाला डाग बसे . पोट भरले म्हणून ताट सोडले, असे कधी झाले नाही .  करवत चालवल्याप्रमाणे भूक स्वस्थ बसू देत नाही . . . .. माहेरी दारिद्र्य असते ,सासरीही दारिद्र्य असते .जीएंच्या' भू क ' कथेप्रमाणे, या कथेत भूकेचे यथातथ्य वर्णन आहे.

अशी ती गरिबीला कंटाळून गेलेली असताना सायंकाळी गंगू जोगतीण येते. ती नेहमी निमूट उभी राहून भिक्षा घेते. भिक्षा नाही मिळाली तर पुढे जाते .लक्ष्मीकडे तांदूळही नसल्यामुळे जोगतीणच तांदूळ देते व तोडगा सांगते . एखाद्या देवळाला दररोज 2 । ,असे 2 । दिवस *उलट्या* प्रदक्षिणा घातल्या की इच्छा पूर्ण होईल . गजबजलेल्या ठिकाणी 2 । उलट्या प्रदक्षिणा घालायला लोकांचा विरोध असल्याने, गावाबाहेरील निर्जन कपिलेश्वराच्या देवळात ती संध्याकाळी 2 । प्रदक्षिणा घालते . आज शेवटचा एकविसावा दिवस असतो .

- त्याप्रमाणे आज एकवीस उलट्या फेऱ्या मारल्यावर ती पाहते तर, बाहेर जायच्या दरवाज्यापाशी एक अवजड , लांबलचक अजगर  पसरलेला असतो .

-कथेत अजगराचे जिवंत वर्णन केल आहे . . ..मऊ अवजड वस्तू पडल्यासारखा आवाज झाला . अजस्त्र अजगर खाली उतरत होता . त्याची वेटोळी हळूहळू संथपणे उलगडली . तो वळशा वळशाने मंडपभर पसरला व त्याचे तोंड सरकत पुढे आले . त्यातील डोळे तिच्यावर स्थिर झाले . काळ्या शिंपल्याप्रमाणे ते

दिसत होते .फरशीवर काळया जरीकाठाप्रमाणे अजगराचे अंग पसरते होते . त्याची हालचाल काळया लाटेने अंगभर पसरली .तिच्या जीवाचे पाणीपाणी झाले . तिने प्राणासाठी देवाची प्रार्थना केली.

-मग हळूहळू अजगर सरकत जातो . ती म्हणते, मी दर नागपंचमीला तुझी पुजा करेन . व अजगराच्या , शेपटापाशी नमस्कार करते . अजगर जातो . ती पाहते तर शेपटीपाशी सोन्याचे कांड पडलेले असते .

- ती घरी जाते . नवरा वाट पहात असतो . ती हकीगत सांगून सोन्याचे कांड दाखवते . त्यावर नवरा भांडतो की, माझे नशीब फुटके .सर्व सापाला का हात लावला नाही . तिलाही राग येवून ती म्हणते," हे घ्या तुमच्या नशीबाचे" ती सोन्याचे कांड टाकते .तर ते नवऱ्याला डोक्याला लागून तो जखमी होवून खाली पडतो . सवतीचा मुलगा ,श्रीपाद, यालाही राग येवून तो काठी उगारून तिला घराबाहेर काढतो .

-आता कुठे जायचे, म्हणून ती परत कपिलेश्वरापाशी येते . रात्र झालेली असते . तेथे तिला म्हातारी भेटते . म्हातारी म्हणते, गंगू जोगतीण ही तुझी सवत होती . तुला भेटतात ती खरोखर जिवंत माणसे असतात होय? ( येथे अंजन कथेची आठवण येते) म्हातारी तिला हाताला धरून शेवाळलेल्या पाण्यात नेते .

कथा धार्मिक कहाणीसारखी आहे . तसेच आटपाट नगर आहे . शंकराचे गावाबाहेरचे देऊळ आहे . जेष्ठागौरीच्या कहाणीत म्हातारी व्रत सांगते . तसेच येथे व्रत सांगीतले आहे . अदभूतरितीने फळ सांगीतले आहे

- जीएंच्या दुसऱ्या पाणमाय कथेत ( सांजशकुन पुस्तक ) शेवटी सोने मिळाल्यावरही अनेक स्त्रीयांचे पुढे झालेले अनेक भोग सांगीतले आहेत . . . . वीरभद्राच्या देवळाजवळच्या तानी मावशीला त्या माणसांनी धर्मशाळेत बेवारशी

कुत्र्याप्रमणे टाकून दिले . मेहंदळेच्या रमेकडे अजून खूप सोने लपवले आहे, म्हणून प्रत्यक्ष तिच्या पोराने जीव घेतला. लोभ, क्रूरपणा यांच्या कितीतरी छटा असतात . पाणमाय कथेत *एका* प्रकारचा, तर लक्ष्मी कथेत *दुसऱ्या* प्रकारचा, जवळच्या माणसांचा -नवऱ्याचा लोभीपणा दाखवला आहे . या कथेत नवऱ्याला वाटते की सगळ्या सापाला हात लावला तर किती सोने मिळेल .

-दोन्ही कथांचे स्त्रीयांविषयी सार हे एकच आहे . कथेत एका स्त्रीचे, शारिरीक, मानसिक, आर्थीक, सामाजिक, कौटुंबिक,(व आत्म-विश्व दर्शनाचे आध्यात्मिक) जीवन दाखवले आहे. त्यांमध्ये, माहेरचे दारिद्र्य, सासरची गरिबी, कष्ट टाळणारा नवरा, वाढलेला संसार; व नंतरची अचानक आलेली श्रीमंती, या संसाराच्या घटना दाखवल्या आहेत. त्यात तिचे बालपण, सासर, संसार, अंत, हा सर्व जीवन पट दाखवला आहे. संसारात एकदम पैसा येवू शकतो. तरीही कुटुंबातील ताणतणाव राहतात. कारण, मानवी स्वभावातच , क्षुद्रता, दंभ, लोभ , अहंकार इत्यादी प्रकारचे , तडकणारे असे काहीतरी असते.

- -पाणमाय कथेत शेवटी पाणमाय नायिकेला म्हणते . - "शेवटी माणसांना आपला कंटाळा येतो .

पुन्हा कुठेतरी, कुणाचीतरी, बहीण, मुलगी, बायको,आई, म्हणून खेळ मांडावा लागेल. --हा तुझा काय, माझा काय, सगळयांचाच शाप आहे. आमच्याखेरीज त्यांचे क्षणभर चालत नाही. आम्ही नसलो, तर ती माणसे निखाऱ्यावरच्या फटिकाच्या लाहीसारखी फुटतील.... असे ओंजळीने, ओंजळीने देत राहणे, एवढाच आपला शेर! मग तू देखील एक ओझे होशील. तू आणखी जगावेस, असे कुणालाही काळजापासून वाटणार नाही."

पाणमाय व लक्ष्मी कथांमध्ये दारिद्रय असते . त्यातून चमत्काराने अवाचित सोन्याचा लाभ होतो . व्यवहारातही अशा प्रकारे अचानक धनलाभ होवू शकतो .पण वेगळया दोन प्रकारे घटना पुढे होत जातात .

पाणमाय मध्ये नवरा सुप्तपणे स्वार्थी असतो . त्यामुळे तेथे नायीका स्वस्थपणे सोने वापरून संसार करते . लक्ष्मीचा नवरा आतून -बाहेरून कृतघ्न असतो . तो इतक्या वर्षांच्या मुलांच्या संसारानंतरही तिला पत्नी म्हणून अजिबात किंमत देत नाही .तो मिळालेल्या सोन्यावरूनही भांडतो व स्वतः जखमी होतो .

तसेच सावत्र मुलालाही आई नको असते . तिला घरात स्थान द्यायला नकोच असे त्याला वाटत असते .म्हणून तो दया न दाखवता, सोन्याचे कांड स्वतः कडे ठेवून लक्ष्मीला घराबाहेर काढतो . काही धार्मिक कहाण्यातही स्त्रीला घराबाहेर काढतात,असे दाखवले आहे . म्हणून या कथेला कहाणीचा बाज आहे .दुसरी मुले लहान असतात . पण दारिद्रय असल्याने त्यांच्या गरजा पुरवलेल्या नसतात . . कदाचित मोठेपणी तेच त्यांच्या लक्षात राहू शकते. पाणमाय कथेपेक्षा या कथेत हा वेगळा पैलू आहे . स्त्रीजीवनातला सावत्र मुलाचा अनुभव या कथेत आहे . सध्याच्या दिवसात तो सावत्र मुलाचा अनुभव खूपदा नसला तरी बऱ्याच दा दिसून येतो.

- अचानक सोने मिळण्यावरून, म्हणजे परिस्थितीत अचानक खूप पैसा आल्यावरून, होणारे *दोन* प्रकार जीएंनी दाखवले आहेत.तो कृतघ्न नवरा तिच्या माहेरच्यांचे उणे काढतो . आणखी सोने का आणले नाही असे बेलगाम भांडतो . गरीबीत किंवा श्रीमंतीत मनाचा मोठेपण आपोआप येत नसतो . म्हणून ही कथा *सार्वकालिक* आहे , महत्वाची आहे, लक्षणीय आहे .

- धन्यवाद . विलास वाघोलीकर

- 🙏 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 🙏

- - सुनीळ सामंत : पोट भरले म्हणून ताट सोडले, असे कधी झाले नाही . --- हे वाक्य जीएच लिहू शकतात.

- - सुनीळ सामंत : सुंदर विवेचन. पिंगळावेळ हे जीएंच्या कथांच्या कळसाचे पुस्तक (आणि रमलखुणा हा त्या कळसावरचे सुवर्णटोक) असे मला कायम वाटत आले आहे. त्यातल्या सर्वच कथा लक्षणीय आहेत.

या कथेवर मी वेगळे लिहीन.

- - Shashank Mhasavade: मी नववी दहावीत असताना म्हणजे वयाच्या 14-15 व्या वर्षी माझ्या आईने मला ही कथा सांगितली होती. जी ए या जादुगाराशी झालेली ती पहिली ओळख. तेव्हापासून ही कथा डोक्यात रुतून बसली होती. प्रत्येक ठिकाणी चांगले वागुनही फाटक्या पदरात अपयशाचेच माप घेत लक्ष्मी जगत राहते. जोगतीणीचे रूप घेऊन आलेली सवत तिला एक विचित्र उपाय सुचवते आणि एका पातळीवर आपल्याला सुद्धा तो उपाय पटतो. म्हणजे लक्ष्मी ने तो उपाय करावा असे आपल्यालाही वाटते. त्या शंकराला आपणही लक्ष्मी साठी मनोमन साकडे घालतो. मंदिरात समोर अजगर दिसल्यावर लक्ष्मी गर्भगळीत होते तेव्हा आपलीही तीच अवस्था होते. जी ए यांच्या लेखणीचे हे वैशिष्ट्य आहे. सगळे प्रसंग, सगळी स्थाने, वर्णनातून अगदी जिवंत करतात, आणि आपल्याला एक अदृश्य पात्र बनवून त्यात नेवून ठेवतात. Extremely graphic description of the scenes, situations, locations and characters that make the reader a part of it all. लक्ष्मीला अजगराची सोन्याची शेपटी मिळते तेव्हा आपणही आनंदून जातो. केसुभट लक्ष्मीला हीन शब्दात बोलतो तेव्हा आपलाही संताप होतो. आणि लक्ष्मीच्या हातून केसुभट मरतो त्याचे आपल्याला कणभरही दुःख वाटत नाही. लक्ष्मी परतून मंदिरात येते आणि शंकराची माफी मागते तेव्हा आपण रडवेले होतो.

अंतिम प्रसंगाची ताकद आणि मोहिनी काही वेगळीच आहे. एका झटक्यात जी ए इह-परलोक एका पातळीवर आणून ठेवतात. सोन्याविषयी, जगण्याविषयी एक महान तत्वज्ञान सांगतात. मुळात लक्ष्मीला हे पटवून देतात की तू पाण्यातून आली होतीस, आता परत पाण्यातच जायचे आहे. ती सुद्धा सर्व समजून, सर्व मोह सोडून, सर्व ऐहिक बंधने सहजपणे त्यागून पाण्यात विलीन होते. ही आत्महत्या नव्हे. हा सर्वसंग परित्याग आहे, जलसमाधी आहे. यात नकारात्मक हताशा नाही. लक्ष्मीने आपले जीवन कर्तव्य पार पाडून परलोकाचा प्रवास सुरू करणे आपल्याला पटते, भावते. एरवी हा छळ झाला म्हणून किंवा नवऱ्याचा खून झाला म्हणून लक्ष्मीने रणांगणातून काढलेला पळ वाटू शकतो, पण ते तसे नाही. जी ए अतिशय सहजतेने आपल्याला लक्ष्मी सोबत सगळ्याच्या पल्याड नेतात. आपणही तिच्या सोबत त्या पाण्यात उतरतो, आनंदाने.

वयाच्या 42 व्या वर्षी या कथेवर लघुपट करता आला. स्मिता तांबे यांनी लक्ष्मीच्या भूमिकेला उत्तम न्याय दिला. कोकणात उत्तम लोकेशन वर शूटिंग करता आले. लघुपटाला अनेक पुरस्कार मिळाले, ते सर्व जी ए यांना अर्पण. 🙏 🙏 🙏

लघुपट इथे बघता येईल.

https://m.youtube.com/watch?v=gy1-ZPp46K8

- -sagar kulkarni Athang Ambejogalअथांग सागर: शशांक सरअतिशय सुंदर रीतीने कथेचे रसग्रहण आणि तितकाच दर्जेदार असा लक्ष्मी हा आपला लघुपट आहे.

माध्यमांतर करताना आशयाला कुठेही धक्का पोहोचला नाही.

उलट अधिक प्रभावीपणे दृश्य माध्यमातून ही कथा सगळ्यांपर्यंत पोहोचली आहे .

खूप खूप धन्यवाद आणि असे अनेक सिनेमे तुमच्याकडून होवो ही सदिच्छा

- - sagar kulkarni Athang Ambejogalअथांग सागर: दिग्दर्शकाची दिग्दर्शन शैली अनेक छोट्या छोट्या बारीक गोष्टींमधून समोर येते आहे. कास्टिंग उत्तम केलेल आहे.

अभिनय तर अतिशय दर्जेदार असा प्रत्येकाने.

आपला काम चोखपणे पार पाडलेल आहे.

- - Shashank Mhasavade Domkawala: आभार सागर सर... आपण प्रयत्न करत राहायचे... जी ए यांच्या अतिशय सिद्धहस्त, ताकदवान लेखणीची ही कृपा आहे. त्यांना त्रिवार वंदन.

- - sagar kulkarni Athang Ambejogalअथांग सागर: लक्ष्मी सिनेमाला अनेक आंतरराष्ट्रीय पारितोषिकही मिळालेली आहेत.

- - विलास वाघोलीकर : 'लक्ष्मी ' लघुपट फार सुंदर झाला आहे. या ग्रुप मध्ये ही फिल्म कळाली हा फायदा . I ) घर, देऊळ , रस्ता हे नेपथ्य ,शूटींग छान झाले आहे. लक्ष्मी , नवरा, श्रीपाद, जोगतीण, शेवटची पाण्यातली नायिका यांचे अभिनय यथायोग्य, संवाद योग्य, पार्श्वभूमी प्रत्ययकारी झाल्यामुळे कथा डोळ्यासमोर उभी राहीली . पाटीवर अंक लिहीण्याची सूचकता , गंगू जोगतीणीचा फ्लॅशबॅक परिणामकारक आहे. एक शंका -शंकराची वाटी सोन्याची ( पितळी ) योग्य दिसली असती का? जीएंच्या कथेतील भयानकता, कारुण्य, गरीबी ची वेदना लघुपटात उतरली आहे. (आपण पाणमायही वाचली असेल ) अशा अनेक कथांवर लघुपट करावेत ही शुभेच्छा . विलास वाघोलीकर

- - Shashank Mhasavade Domkawala: आभार विलास सर.

पितळी वाटीच आहे ती... स्पेशल इफेक्ट्स न केल्याने ती सोन्याची दिसून येत नाही.

पाणमाय अप्रतिम कथा आहे. विहिरीतील पाण्याखालचे जग उभे करणे हे मोठे आव्हान असेल. पुढे कधी जी ए कृपेने कुणी फायनान्सर मिळाला तर अवश्य प्रयत्न करेन. 🙏

- - - - SANJEEV sargaonkar, Kothrud: कथा: लक्ष्मी कथासंग्रह : पिंगळावेळ. प्रथम प्रसिद्धी: दिपावली दिवाळी अंक 1975

आस्वादक: संजीव सावरगांवकर. कोथरूड, पुणे.

... ......

लक्ष्मीचा संसार तसा ओढ ग्रस्तीचा, एकादशीच्या घरी शिवरात्र म्हणतात तसाच. केशव भटाला दुसऱ्यावरती दिलेली व तिच्या काकाने तिच्यावरती तसे उपकारच केलेले. ती तिच्या संसाराला तरी लागली. सवती चा पहिला मुलगा श्रीपाद, स्वतःची दोन मुले असा तिचा संसार चालू होता. गावात कपिलेश्वराचा देऊळ मात्र चांगलेच प्रसिद्ध होतं ते चांगल्या अर्थाने नाहीच. त्याचा संदर्भ पुढे कथेमध्ये येतोच. या अशा दिवसांमध्ये गंगू जोगतीण गावात जोगवा मागायला येत असते. ती जेव्हा लक्ष्मी कडे येते तेव्हा लक्ष्मी तिला अडचण सांगते आज काही तुला जोगवा देता येत नाही. त्यावर गंगु जोगतीणच म्हणते मीच तुला एक पर्याय देते अगं गाऱ्हाणी घालून देव उठत नाही तर त्याला चिडवून जागा कर. पण तुझे मन मात्र घट्ट असलं पाहिजे बघ. आणि गंगू जोगतीण सांगते कुठल्याही देवळात करकरीत तिन्ही सांजेला 21 दिवस दररोज 21 प्रदक्षिणा घालून बघ, मात्र या सर्व प्रदक्षिणा उलट्या घातल्या पाहिजेत. लक्ष्मी थोडी कचरते, विचार करून निर्धाराने प्रदक्षिणेचे काम पूर्ण करण्याचे ठरवते. खरेतर त्या क्षणी तिच्या मनात कोणताही विचार येत

नाही की आपण हे का करायचे? कोणासाठी करायचे? याचे मिळणारे फळ चांगले आहे का वाईट आहे?

आणि मुख्य म्हणजे गंगु जोगतीण सुद्धा यामागची कारण मीमांसा, का अशा प्रदक्षिणा घालायच्या ह्याचे सूतोवाचही करीत नाही? का करत नाही? सवत असल्याने? काहीच तर्क करता येत नाही.

गणपतीच्या देवळात गर्दी असल्याने ती प्रदक्षिणा घालू शकत नाही विठोबाच्या देवळात पुजारी धावून आल्याने तिला प्रदक्षिणा घालायला बंदी झाली, दुर्गा आईच्या देवळात अपमानच झाला आणि मग एकदम तिला थोडे गावाबाहेर असलेले कपिलेश्वराचे देऊळ आठवले. कथेत कपिलेश्वराचे देऊळ हे एक गूढ व्यक्तिमत्व आहे. त्याची ख्याती चांगली नाही. देऊळ अतिशय जुने प्रचंड मोठे आहे. मध्ये वाट सोडून पलीकडे मोठा चौकोनी तलाव आहे. तलावातील पाणी कायमच शेवाळलेले हिरवेगार असते. तलावाचा वापर गावाकडून फक्त गणेश विसर्जना करता वर्षभरामध्ये होत असतो. एरवी ते देऊळ आणि तलाव दुर्लक्षित असतो. पायऱ्या चढून आल्यावर ती शंकराच्या पिंडीचा गाभारा आहे. तिथे एक लाकडी समई आहे. पिंडी वरती बेल असायचा, समई तेवत असायची, आणि आज लक्ष्मीचा शेवटचा दिवस होता 21 वा दिवस तिच्या 21 उलट्या प्रदक्षिणा आटपलेल्या होत्या आणि ती देवळाबाहेर पडणार होती. एवढ्यात एक मोठा अजगर तिच्यासमोर पडला ती घाबरली, गलितगात्र झाली, मुला बाळांची, संसाराची आठवण झाली, शेवटी उसने अवसान आणून म्हणाली ( हे अजगरा) माझ्यावर दया कर, मला भाऊ नाही, दर नागपंचमीला मी तुझी पूजा करेन .आणि आवेगाने तिने अजगराचा जो दोन विती भाग बाहेर उरला होता त्याला अनाहूतपणे स्पर्श करते. कथेला या क्षणी कलाटणी मिळते. तो दोन विटी भाग सोन्याची लगड होऊन खाली पडतो. लक्ष्मीला तिच्या नकळत तिने केलेल्या 21 दिवसांच्या प्रदक्षिणांचे अनपेक्षित फळ मिळते ती लगड उचलून परत घरी येते.

लक्ष्मीची अजगर ला स्पर्श करण्या आधीची मानसिकता, विचार धारा आणि स्पर्श झाल्यानंतरची लक्ष्मी यात महद अंतर आहे.

अजगराला स्पर्श व्हायच्या आधी तिला तिला संसाराची काळजी असते, तिला मुलांची काळजी असते ते अगदी

मनापासुन देवाला विनंती करते बाबा मला यातून सोडव, अजगर अगदी समजल्यासारखे वागतो आणि निघतो.मध्यंतरी ते स्पर्श आणि लगडीचे अपरूप घडते. आणि मग सोन्याची लगड झाल्यानंतर ती जेव्हा घरात येते आणि कथा सांगते त्यावेळेस संपूर्ण घराचा नूर पालटतो. केशव भट तिला शिव्या देतो, मारायला उठतो. श्रीपाद ही बोलतो. त्यांच्यामध्ये बरीच बोला चाली होते आणि त्याचा परिणाम म्हणजे लक्ष्मी सोन्याची लगड केसुभटावर फेकून मारते आणि ती त्याला वर्मी लागते आणि तो खाली पडतो. या क्षणी श्रीपाद अत्यंत व्यवहारी दाखवलाय तो लक्ष्मी कडे नेहेमीसारखेच दुर्लक्ष करतो पण डॉक्टरला बोलवणे पाठवतो, लगड लपवतो , लक्ष्मीला घरातून हाकलून देतो. हे सर्व तो एकाच वेळेला करतो. लक्ष्मी त्या त्याच्या वागण्याने अवाक होते. ती एक शब्द बोलत नाही. शेवटी घरदार नसलेली लक्ष्मी कपिलेश्वराकडे निघते.

या कथेवरील बाकीच्या माझ्या मित्रांची विचार धारा किंवा इतर कथांच्या बरोबर केलेली कम्पॅरिझन व भाष्य वाचल्यावर मी थोडा वेगळा विचार केला. की असे का घडतं आहे? लेखकाला हीच दिशा कथेला का द्यावीशी वाटली.? खालील प्रश्न मला पडले आहेत

1) लेखकाला जोगतीण च्या रूपात सवतीला का पाठवावे लागते ?

2) तिच्याच पूर्वीच्या जन्मातील संसाराची अठरा विश्व दारिद्र्याची अवहेलना थांबवण्याकरता ती लक्ष्मीचा का उपयोग करते?

3) तिलाही लक्ष्मीला आपल्या विश्वात ओढून घ्यायची का इच्छा होते?

4) स्वतःची ( सवत ची) याबाबत कुटुंब सुखी व्हावे याकरता केलेल्या अशा उर्फट्या प्रदक्षिणांची तिच्यातर्फे पूर्तता जीए का करून घेतात?

5) श्रीपाद जेव्हा लक्ष्मीला घरातून हाकलतो त्यावेळेस घाईने पेटी मागे टाकलेले सोन्याचे कांडे लक्ष्मीला का न्यावेसे वाटत नाही?

6) आणि श्रीपादला लक्ष्मी सावत्र आई म्हणुन नकोय पण तिच्यामुळे घरात आलेल्या सोन्याच्या लगडेचा व्यावहारिक स्वार्थ तो लहान असूनही ने कसा उमगतो?

7)लेखकाने कथेचा सर्व फोकस लक्ष्मीवर का ठेवलाय?

8)आणि ज्या वेळेस घरात राहण्याचा काही पर्याय उरला नाही त्यावेळेस लेखकाला/लक्ष्मीला कपिलेश्वरच का आठवला?

असे सर्व प्रश्न अनुत्तरीत राहतात. कथेत कुठे याचा संदर्भ मिळत नाही. लक्ष्मीला कपिलेश्वरी जाण्याशिवाय दुसरा पर्याय का उरत नाही? ती तर संसारासाठी सर्व कष्ट उपसत आहेच.

तिथे ती स्वतःलाच का दोष देते? ती तिथे पोहोचते आणि गळून गेल्या प्रमाणे बसून राहते. अतिश्रमाने दमलेली झोपून जाते आणि जेव्हा जाग येते तेव्हा तीला भुकेची जाणीव झाली. त्या वेळेला तिच्या समोर एक वेगळे विश्व उभे राहिलं. एक म्हातारी येऊन तिला म्हणाली "आलीस बाई, येणार होतीस तू ,आम्ही तुझीच वाट पाहतोय. बोल आता तुला काय पाहिजे. त्या वेळेस तहान,भूक, झोप याची तिला अनावर इच्छा झाली, पण स्त्री सुलभ इच्छेने तिने विचारले " माझी सवत, तिला पहायचे आहे." अग तू नंतर भेटशील तिला, पाहशील तिला. गंगु जोगतीण च्या रूपात ती तुला भेटलीच होती की. भेटेलच तुला येथे. येथील आपले विश्व वेगळं आहे चल आणि आणि लक्ष्मी हिरव्या शेवाळयाच्या पाण्याखाली शांतपणे प्रवेश करते झाली

कथा संपते, पण प्रश्न उरतात. लक्ष्मीच्या आयुष्याची इति कर्तव्यता म्हणजे केशव भटांच्या संसारात ती स्वतः कायम उपाशी तपाशी राहून सोबत लक्ष्मी ( सोने) आणण्याकरता आलेली होती काय?

लक्ष्मीच्या सवतीला जोगवा न घेता तांदूळ देण्याचे व आघोरी उपाययोजना सांगण्यात सवती चा काय फायदा होता?

केशव भट मेला का नाही, शुद्धीवर आला का, श्रीपादन सोन्याचा वापर काय केला? जे आयुष्य जगण्याकरता हे सर्व लक्ष्मीने केले त्याचे तिला स्वतःला काय फळ मिळाले?

मिळाले तर ते असे का मिळाले?

तिचे प्राक्तन तिच्या नियतीचा असा उरफाटा खेळ तिच्याच नशिबी का येतो?

येवढे सारे प्रश्न वाचकांच्या करता सोडून जी.ए. लेखक म्हणुन कथा पूर्ण करतात पण लक्ष्मीच्या व्यथा सोडून जातात. जाता जाता जी. ए. एक म्हण खरी करून जातात. नाव लक्ष्मी बाई, हाती कथलाचा वाळा.

या व्यतिरिक्तही आणखीन काही पैलूंवर वाचक प्रकाश टाकू शकतीलच.

..........

- - SANJEEV sargaonkar, Kothrud: चौकटी बाहेरची लक्ष्मी व वाचक याला अनुसरून कथेचे विवेचन आहे. जाणकारांनी यावर भाष्य करावे म्हणजे कथेचे वेगळे पैलू असतील तर लक्षात येतील व चर्चा करण्यास वाव मिळेल.

- - सुनीळ सामंत : या आठही प्रश्नांना नियतीच्या दृष्टीकोनातून किंवा आधाराने उत्तर काय देता येईल ते सांगाल? एक एक करून.

[ - -भारतसिंग पाटील सर: जीए हे पाप, पुण्य, सत्य, इ. यांच्या अंतिमत्वाच्या शोधातील यात्रिक आहेत. तेव्हा लौकिक जीवनात धन... म्हणजे लक्ष्मी हे अंतिम श्रेयस असू शकत नाही, त्यातील वैयर्थ त्यांच्या नायक-नायिका यांना उमजून येते, म्हणून ते या लौकिक जीवनाचा अस्तित्ववादी जाणिवेतून शेवट करून घेत आपल्या जीवनाला काही एक अर्थ देऊ पाहतात.

- -भारतसिंग पाटील सर: राहता राहिले लक्ष्मीची सवत, तिचा मुलगा इ. हे लौकिक व अलौकिक जीवनातले संदर्भ आहेत....

- - Madhav Puranik Tilak Road Pune: कथा : लक्ष्मी, आस्वादक - माधव पुराणिक

औ) केव्हाही टाचेखाली दाबावी अशी वाटणारी बाई - केसूभट ( पुरूषप्रधान वर्चस्वाची हिंसक भावना)

क) ... कसली कृतघ्न माणसे आहात तुम्ही? ... की जनावर आहात? ( नात्यातील स्वार्थाचा कळस, माणुसकीशून्यता)

ख) 'ओठ फाकवून एखादा साप बोलत असल्याप्रमाणे दिसणाऱ्या श्रीपादच्या तोंडाकडे पाहताच तिला एकदम भीती वाटली.' ( भावनांचे रौद्र रूप)

ग) श्रीपाद ओठ दाबून उठून जात असे ( मूक संवादातला अव्यक्त अंगार, तिरस्कार)

घ) (कृष्णीने हात झटकला) आता मात्र पूर्ण झिडकारली गेल्या प्रमाणे लक्ष्मी अगदी निर्जीव झाली.

- - Madhav Puranik Tilak Road Pune: कथा : लक्ष्मी, आस्वादक - माधव पुराणिक

औ) केव्हाही टाचेखाली दाबावी अशी वाटणारी बाई - केसूभट ( पुरूषप्रधान वर्चस्वाची हिंसक भावना)

क) ... कसली कृतघ्न माणसे आहात तुम्ही? ... की जनावर आहात? ( नात्यातील स्वार्थाचा कळस, माणुसकीशून्यता)

ख) 'ओठ फाकवून एखादा साप बोलत असल्याप्रमाणे दिसणाऱ्या श्रीपादच्या तोंडाकडे पाहताच तिला एकदम भीती वाटली.' ( भावनांचे रौद्र रूप)

ग) श्रीपाद ओठ दाबून उठून जात असे ( मूक संवादातला अव्यक्त अंगार, तिरस्कार)

घ) (कृष्णीने हात झटकला) आता मात्र पूर्ण झिडकारली गेल्या प्रमाणे लक्ष्मी अगदी निर्जीव झाली. भोवतालचे सर्व एकदम परके झाले .( एकाकीपणा,तुटलेपणा, चैतन्यहीनता ,)

च) ती विषण्ण ही झाली. या माणसांचे खरे चेहरे कधीतरी मनातून पुसून टाकता येतील का ? ( सत्य समजल्यावर शून्य झालेली नाती)

छ) श्रीपादने तिला घरातून पुसूनच टाकले होते (अस्तित्वच नष्ट करणे)

ज)नवरा निदान दोन शब्द तरी प्रेमळ बोलेल असे तिला फार वाटले होतै. ( नात्यातील पराकोटीचा कोरडेपणा)

झ) माहेरची आईची एकुलती आठवण सोन्याचे फूल नाहीसे झाले. ( मायेचा सुखद भूतकाळ नष्ट होणे )

ट) श्रीपाद तिच्यासाठी एखादा तुकडा कोठेतरी सोप्यात ठेवीत असे . ( तुच्छता, उपेक्षा,वंचना)

ठ) स्वतः:भीक मागितल्याप्रमाणे लक्ष्मी शरमून गेली. ( लाज, आत्मकरूणा, क्षुद्र वाटणे)

ड) आतापर्यंत घर असलेल्या भिंती मातीचे केवळ ढिगारे झाले ( घराचा मृत्यू, जगणेच उध्वस्त होणे)

ढ) रिकाम्या, एकाकी कपिलेश्वराच्या देवळाच्या पंजात सापडणे ( नियतीला मूक, असहाय बळी जाणे)

ण) लक्ष्मीने श्रीपादला समजावून सांगण्याची झाझात केली होती.( मुलांच्या बाबतीत अपयश)

त) श्रीपाद - ' मी तुझा जीव घेईन.चालती हो. ( अमानुष क्रौर्य)

थ) लक्ष्मी - घर व माणसे गेल्यावर तर ही असता - नसताची निर्णय न झाल्यामुळे न उमटलेली आतड्याची एक तिडीक - एवढेच ( गूढ अनोळखी, अपुरी अस्पष्ट खिन्न जाणीव)

द) लक्ष्मीला भ्रमिष्टासारखे वाटू लागले. तिला भयाण क्षण आठवले.( जगण्यावरचे नियंत्रण गेले. )

ध) तिच्यात विषारी आग पेटल्याप्रमाणे झाले व लक्ष्मी नि:संग झाली ( लग्नानंतरच्या प्रेमाच्या उबेचे रूपांतर द्वेषाच्या वणव्यात झाले. ती अंगसंग सोडून,साथसंगत सोडून , सांगाती सोडून क्षणात नि:संग झाली.)

- - Madhav Puranik Tilak Road Pune: कथा : लक्ष्मी, आस्वादक - माधव पुराणिक

कथा : लक्ष्मी,

आस्वादक - माधव पुराणिक ( पीएचडी भारतीय तत्त्वज्ञान )

परिसर भेट - कपिलेश्वर व कुंड (बेळगाव) मी प्रत्यक्ष पाहिलेले आहे.

'नकारात्मक वास्तवाचा अटळ शेवट
लक्ष्मीने धैर्याने, सातत्याने, निर्णायकपणे
नियतीशी दिलेली तेजस्वी झुंज '

१ कथानायिका लक्ष्मीच्या बिजवर केसू(केशव)भटाबरोबरच्या लग्नाला सुमारे १० वर्षे झाली असावीत.

२ लग्नाचा प्रारंभिक काळ -लक्ष्मीच्या व्यक्तीमत्वाचा या काळात रतिसुखामुळे व मातृत्वसुखामुळे विकास झाला असावा. रांधा-वाढा,चूल व मूल यांच्यासह पुरुषप्रधानतेच्या बोलण्याच्या - वागण्याच्या नियमांचे लक्ष्मी काटेकोर

पालन करत होती. लक्ष्मी , आपल्या व सवतीच्या मुलांवर माया करून, त्यांना वाढविण्यासाठी, स्वैंपाकीण म्हणून काम करून पैसा मिळवित होती. केसूभटाच्या 'लग्न' संस्थेकडून असलेल्या समाजमान्य सर्व अपेक्षा पूर्ण करत होती. लक्ष्मी काबाडकष्ट करित होती आणि गरिबीचे चटके निमूटपणे सहन करित होती.

३ नंतरचा काळ - या काळात घर अन्नानदशेकडे जाउ लागले.

लक्ष्मी व केसूभट, लक्ष्मी व मुले यांचे नातेसंबंध विसंवादी, अबोल, तुटक होऊ लागले. या सर्वांची परस्परांबद्दल जी मते, पूर्वग्रह, आकलन होते ते मुख्यत: अविवेकी (irrational) , पूर्व ग्रहावर, मतांवर, आकलनावर आधारित होते.

४ या पार्श्वभूमीवर जी एं ची कथा सुरू होते.कथेचा भौतिक /शारीरिक काळ ( २१साव्या दिवसाच्या करकरीत सांजेपासून (७ नंतर बाहेर सुवासिनीचे पाऊल टाकायला लावणाऱ्या प्राणक्षणापासून) ते मध्यरात्रीपर्यंत ( १२ पर्यंत) असावा. पण लक्ष्मीच्या मनात भावनिक काळ आठवणरूपाने एक महिना असावा. ( २१ दिवस अघोरी व्रत सांगणारी ' गंगा जोगतीण' ( पवित्र नदीचे नाव पण बट काढणे यासारख्या स्त्री विरोधी रूढीमुळे 'घरा' बाहेर जगणारी व त्याआधीचे साधारण ९ दिवस).

५ कथेचे मुख्य सूत्र 'सर्व पात्रांच्या अस्वास्थ्यकारक / नकारात्मक वास्तव भावनांचा अटळ मूलभूत अस्तित्वाच्या नकाराकडे प्रवास 'आहे. मनाच्या सूक्ष्म , अमूर्त , शक्तीशाली लहरींचा विनाशी मानसिक भावनांकडे प्रवाह सतत चालूआहे. या सर्वांचा शेवटी प्रत्यक्ष शारीरिक मृत्यूकडचा प्रवास आहे. याचा शेवट नायिका लक्ष्मी सावली नसलेल्या, काळ्याशार , थंडगार 'पारलौकिक' वाटणाऱ्या पाण्यात पाऊल टाकताच होतो. याकरिता जी ए यांनी शारीरिक - मानसिक - आत्मिक प्रतिमा - प्रतिके - मूळ आकार वापरले आहेत. ही साखळी खालीलप्रमाणे आहे -

६ या कथेत आनंद, सुख,. समाधान, प्रेम या सकारात्मक व जगण्याचे बळ वाढविणाऱ्या, नातेसंबंधातील गुंतागुंतीचे प्रश्न सोडविण्यासाठी उर्जा देणाऱ्या भावना कमी होत जातात.त्याऐवजी १ राग (Anger), २ भीती(Fear), ३ चिंता (Anxiety), ४ विषण्णता (depression), ५ लाज ( Shame, humiliation ), ६ अपराधी भावना ( guilt) , ७ तिरस्कार (disgust, contempt, aversion) ८ आत्मकरूणा ( Self-pity ) या भावना वाढत जातात.

७ उदाहरणे अ) ....तिने एक हताश नि: श्वास सोडला व नशीब आपले म्हणत कपाळाला हात लावला. ( कथेची सुरुवात नियतीशरणतेपासून)

आ) समोर भात नसला तर काचेवर टक्के उडतील अशा अभद्र शिव्या त्याच्या तोंडून बाहेर पडत. ( अमंगलतेची परिसीमा - निर्जीव काचेला ही लागतील असे ध्वनिचे बाण )

इ) आणखी एक तास झाला कि पाटावर पठाण होउन बसेल. ( जणू बायकोकडून सुग्रास अन्न दोन्ही वेळा वेळेवर वसूल केल्याखेरीज ,'तिच्याशी लग्न केले' या उपकाराचे कर्ज फिटणार नाही.)

ई) वाटीतील अर्धे तांदूळ तिने परत डब्यात टाकले ( नवऱ्याची प्रचंड भीती)

उ) उंदराने कुरतडलेले भोक गुडघ्यावर येत होते. ( लक्ष्मीला कपड्यांसाठी छोटे कपाटही नसणे हे तिचे उंदिर येणाऱ्या भगदाडाच्या घरातील नगण्य स्थान दाखविते )

ऊ) रात्रभर भुकेची स्वप्ने पडावीत असे आपण काय केले आहे ? ( आत्मकरूणा)

ए)असली सगळी माणसे माझ्या वाट्याला का आली ? - केसूभट ( बायको विषयी घृणा)

ऐ) आखडलेला, गाठ मारून बंद केल्याप्रमाणे दिसणारा श्रीपादचा चेहरा पाहून लक्ष्मीचे शब्द तसेच राहिले.( नात्यातील मूक भयानकता)

ओ) तेव्हा हताशपणे तिने नरसूला थप्पड दिली. कृष्णीने गजग्यांचा खेळच सोडून दिला ( वात्सल्याचे क्रोधात रूपांतर - बालहट्ट पुरविण्यात असमर्थता - भीषण दारिद्र्यामुळे)

औ) केव्हाही टाचेखाली दाबावी अशी वाटणारी बाई - केसूभट

८ या सर्व जीवनक्षयाच्या,उदासीन जगण्याच्या, उत्साह मंदावण्याच्या, ऊर्जा विरून जाण्याच्या, शरीर- मन उमलण्याऐवजी सुकून जाण्याच्या, भावनासरोवर कोरडे पडण्याच्या, नात्याबद्दलच्या आशेचे सर्व धागे तुटून जाण्याच्या पृथक प्रवाही प्रतिमा आहेत.

त्या हळूहळू एका विनाशकारी, विलयाच्या, शून्याच्या, अंधाराच्या एककेंद्री प्रतिकात विलीन होतात.

मग शेवटी शारीरिक अस्तित्व नाहीसे होण्याच्या, मानसिक रितेपणा जाणविण्याच्या क्षणाकडे अटळपणे जातात.

लक्ष्मी मरण पावते. ज्या गर्भाशयाच्या जलमय अंधारातून ती जन्माला आली होती तेथेच पृथ्वीमातेच्या उदरात ती प्रवेश करते. येताना जशी कोणत्याही भावना घेउन येत नाही .तशीच जाताना भावना पूर्ण रित्या करून जाते. माणसाचे मन सोडून जाते. तिचे सुख-दु:ख क्षणभंगुरतेत नाहीसे होते.

९ जी एक या कथेत लक्ष्मीच्या जगण्यातून,वरिल प्रतिमांमधून त्यांना आकलन झालेल्या जीवनाच्या एकाकीपणाचे, तुटलेपणाचे, असहायतेचे, निरर्थकतेचे, क्षणभंगुरतेचे, नियततीच्या सार्वभौम अमानुष सामर्थ्याचे विलक्षण प्रभावी वर्णन करतात. म्हणून मला ही कथा फार आवडली.

१० ऐहिक प्रयत्न संपल्यावर निराश होऊन लक्ष्मी पारलौकिक / अघोरी उपायाने वळते. त्यापूर्वी ती सातत्याने, धैर्याने, निश्चयाने, जे प्रयत्न , नियतीचा बदलण्याचे, करते ते प्रभावी वाटतात. या कथेत जी ए नी प्रथमच प्रयत्नांना नियतीइतकेच महत्त्व दिले आहे. हे मला वैशिष्ट्यपूर्ण वाटले.

लक्ष्मीच्या जीवनातील - स्त्री घ्या जगातील एकाकीपणा, पुरुष प्रधान व्यवस्थेतील / लग्नसंस्थेतील अन्याय, सत्तावर्चस्वातील अमानुषता, , कुटुंबातील तिच्या श्रमांचे भयंकर शोषण इ गोष्टी जी एं नी करूणेच्या स्पर्शाने रंगविलेल्या आहेत्.

११ जीवनात तर्कशुद्धतेला, कार्यकारणभावाला मर्यादा आहेत. यादृष्टीने लक्ष्मी कथेतील घटनाक्रमाकडे व पात्र योजनेकडे पहावे. तसेच अजगर,/ देउळ/ कुंड/ व्रत इ गोष्टींकडे पहावे असे वाटते. कारण या मानवी शक्ती व वैश्विक शक्ती ला जोडणाऱ्या अतार्किक, वैयक्तिक अनुभवातून जाणवणाऱ्या गोष्टी आहेत.

- - Deelip Bade: अठराविश्वे दारिद्रय" हा मानवी जिवनाला निसर्गाने दिलेला शाप आहे.80%पेक्षा जास्त मानवजात अन्न-वस्त्र-निवारा-रोजगार-शिक्षण-आरोग्य यां गरजांच्या पुर्तीसाठी अहोरात्र संघर्ष करत आहे.या संघर्षावर भविष्यात मानव कधी मात करू शकेल अशी अजिबात शक्यता दिसत नाही.लक्ष्मी" शोषित,पण संघर्षशील स्त्रिचे प्रतिनीधीत्व करणे.कष्टाचे पर्याय ती वापरते.कुटूंबाला दोन वेळेच पोटभर अन्न मिळावे म्हणुन तिचा चाललेला आटापिटा अपयशी ठरतो.तेंव्हा अशा प्रसंगी काही माणसे परिस्थितीला शरण जातात. देव-व्रत-वैकल्य अशा उपायांनी परिस्थीती बदलण्याचा प्रयत्न करतात.पण असे उपाय कोणतीच समस्या सोडवत नाहीत.ऊलट समस्या वाढवतात.याचाच परिणाम म्हणुन कुटूंबातील सर्वांचे मानसिक,-शारिरीक स्वास्थ प्रभावित होते.दारिद्र्य मिटवण्यासाठी अजगराची ऊपासना"हा ऊपाय जगात कोठेच वापरला जात नाही.मात्र परिस्थीतीशी संघर्ष करणे जेंव्हा अशक्य होते तेंव्हा घरातील कर्ती माणस हतबल होऊन आत्महत्या करतात.सवतीने जिथे आत्महत्या केली तिथेच लक्ष्मी

आत्महत्या करते.कपिलेश्वराच्या तलावात जेंव्हा लक्ष्मी आत्महत्या करते या वेळी तेथे पुर्वी आत्महत्या केलेल्यांचे एक जग तयार झालेले आहे.ही एक परंपरा आहे.असह्य कष्ट-आत्महत्या-दारिद्र.म्हातारी लक्श्मीला "तुला भेटणारी सर्व माणसे जिवंतच असतात,असे तुला वाटते होय" हे वाक्य मला "व्यत्यास"म्हणुन आवडले.

यतीन गुळवणी: माधवसरांनी तर्कशुद्ध पृथ:करण वाचून कथास्वादात भर पडली. कथेतील सूक्ष्म पापुद्रे समजले. कडवट घोट पटकन गीळायची सवय होती. पण ते घोट

सावकाश व्यवस्थित आस्वाद घेत पचवायचा मार्ग समजला. मनापासून धन्यवाद!

SANJEEV sargaonkar, Kothrud: माधव राव, कथेचे सर्वांगाने केलेला विश्लेषक आस्वाद हा खूपच अभ्यासपूर्वक लिहिलेला लेख आहे. कथेचे 4,5 वेळा वाचन करून ही मला हे शक्य होणार नाहीत येवढे बारकावे तुम्ही शोधून त्यावर लिहिणे हे कौतुकास्पदच आहे. मला भावली ती तुमची ओघवती लेखन शैली आणि लक्ष्मी चे अपरोक्ष दाखविलेले मनोगत. एक सुंदर बौद्धिक लेख तुम्ही आम्हाला वाचावयास दिला म्हणुन तुमचे पुन्हा एकदा अभिनंदन. लिहिते रहा, आनंद देत रहा या शुभेच्छा सह. आपला, संजीव सावरगांवकर.

विलास वाघोलीकर : ब ऱ्याच काळानंतर आपले मूलाग्राही विश्लेषण वाचायला मिळाले. धन्यवाद . लक्ष्मी, एका गरीबीतून गरीबीकडे प्रवास करणाऱ्या स्त्रीचा जीवन मार्ग आपण थोडक्यात मुद्देसूदपणे दाखवला आहे. घरातील व्यक्ती शेवटी अंतिमतः वर्तनात स्वतंत्र असतात . त्या स्वभाव, स्वार्थ , भागधेयाप्रमाणे वागतात . त्या लेखकालाही आश्चर्य वाटेल, अशा वागतात . तेव्हा जर तर असा विचार करून कथा न वाचता, जशी दाखवली तशी पाहणे आस्वादासाठी चांगले

आहे . आपण कथेचा योग्य आस्वाद घेतला आहे. जवळजवळ प्रत्येक वाक्याची फोड करून त्यावर प्रकाश टाकला आहे .हेही वेळ देणारे काम आपण केले . असेच लिहावे ही अपेक्षा व शुभेच्छा . विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत : सर, आपले मनःपुर्वक स्वागत. तुमच्या व्यस्त कामातून वेळ काढून तुम्ही हे इतके सखोल विवेचन केल्याबद्दल आपले आभार.

माझ्या या कथेबद्दलच्या सर्वात गहन प्रश्नाला उत्तर मिळाले. ही कथा सामान्य लोकांची आहे (दारिद्र्य, व्यक्तींमधील दुरावा, सावत्रपणा, दुसरेपणा, स्त्रीचे दुय्यमत्व, स्वार्थ इत्यादी) की दृष्टांतकथा (अजगर, सवत, मृत्योत्तर जीवन, सोन्याचे कांड ) हा तो प्रश्न होता. जीएंच्या एकूण कथांमधे ही कथा या दृष्टीने मला वेगळी वाटली. (पाण्माय, अंजन सारखी). याचे अगदी सांगोपांग उत्तर तुमच्या विवेचनातून मिळाले.

जीए महान लेखक खरेच. त्यांच्या कथांतील बारकावे समजण्यासाठी या ग्रुपवरील मंडळींचे मार्गदर्शन मिळणेही तेवढेच महत्वाचे आहे .

खालील एक चित्र - क्रेडीट मंजु श्री मोरे दुसरे चित्र ( पायऱ्यांचे ) विलास वाघोलीकर

लक्ष्मी कथा पूर्ण

---

# 'विदूषक' कथा-- ( पुस्तक काजळमाया )

जी. ए. कुलकर्णी यांची 'विदूषक' कथा-- ( पुस्तक काजळमाया )

विवेचक - व्ही एस वाघोलीकर



भाग। - कथानकाचे विवेचन - कथनक मोठे आहे . व्ही एस वाघोलीकर यांनी छंद म्हणून काढलेल्या चित्रांच्या सहाय्याने हे विवेचन करत आहे .

*१).चित्र5--रक्ताक्षी मंदिर व गोपूर-- सर्व घटना ज्या परिसरात घडतात, ते गोपूर असलेले भव्य रक्ताक्षी मंदिर या चित्रात आहे. येथे राजसभेचे आयोजन केले असून रिकामे सिंहासन ठेवले आहे. सम्राटाच्या निधनानंतर दुसरा सम्राट ठरविण्यासाठी राजसभा भरत आहे . त्यामध्ये धर्मगुरू, अमात्य, पदाधीकारी, सरदार व प्रजाजन येतात . येणाऱ्या स्पर्धकांनी काही कठीण परीक्षा - दिव्ये - उत्तीर्ण केल्यावर तो सम्राट होणार असतो .

कथेतील महत्वाची पात्रे -

२).चित्र क्र.7-- विदूषक-- सभेत मनोरंजन करताना , तत्वज्ञानाची टीकाटिप्पणी करणे, हे विदूषकाचे कार्य आहे. निम्मा काळा, निम्मा पांढरा वेष असून चेहऱ्यावर विनोदी रंग आहेत. देवतेने आयुधे घेतल्याप्रमाणे, एका हातात, तेल वात नसलेला दिवा, दुसऱ्या हातात जिव्हा(टोल) नसलेली घंटा आहे. याबाबतचे विचार तो सांगतो--" मी सत्याचा शोध घेत आहे. त्यासाठी दिवा आहे. व सत्य शोधल्यावर ती सुवार्ता सांगण्यासाठी घंटा आहे.. पण मला आतापर्यंत सत्याचा शोध लागला नाही, तसेच आताही सत्य सापडणार नाही...."

येथील'सत्य', हे 'आग्रहाचे सत्य'नाही. विज्ञानाचे घटित सत्य नाही. तर उपलब्ध ज्ञानाच्या आधारे भविष्यात हेच घडेल, असे त्या क्षणी, त्या माणसाला जे वाटते असे ,पण ( प्राणघातक ) 'सत्य'आहे. अपूर्ण ज्ञानाच्या आधारे, अटळ एकाकी प्राणघातक निर्णय घ्यावा लागतो, त्या अस्तित्ववादाची पार्श्वभूमी येथे आहे.याचे *स्पष्टीकरण* नंतर चंचलेशी झालेल्या संवादातून मिळते.

नंतरच्या विदूषकाच्या संवादात ,संस्कृत सुभाषिते आहेत, पंचतंत्र आहे.

3)चित्र क्र8--चंचला--ही अमात्य कन्या असून , विजयराज या एका स्पर्धकावर जीवापाड प्रेम करते.त्याला दिलेल्या दिव्यांमधून, तो वाचावा म्हणून तिच्यापरीने सर्व प्रयत्न करते.पण धर्मगुरूंनी सांगितलेल्या, दिव्यात त्याची हत्या होते. नंतर वनात विदूषकाशी भेटल्यानंतर( आर्फियसप्रमाणे) होणारा संवाद मूळातून वाचण्याचा आहे. त्यात 'जीएंचा नियतीवाद' स्पष्ट झाला आहे.

चित्रात, चंचला पूर्ण शोकाकुल आहे.

चंचलेचे प्रेम एकनिष्ठ, जीवापाड आहे. आर्फियस युरिडिसीसाठी म्रुत्यूच्या देवाकडे जातो. येथे चंचला प्राणत्याग करते. हा प्राणत्याग कथेतील योगायोग नाही.

* 4).चित्र क्र.9-- धर्मगुरु--हा धर्मगुरू आहे, पण आता पदसिध्द सम्राट आहे . त्यामुळे आता तो सत्ताधीश आहे. रत्नजडित कमंडलू घेतलेला आहे. रेशमी वस्त्रे आहेत. बोटांत रत्नमुद्रा आहेत. भोवती सेविका आहेत. त्याला म्याकव्हेलीची पार्श्वभूमी आहे.

त्याने तीन वर्षे सम्राट पद मिळवले. तो सत्ताकारणात तज्ञ आहे.ध्रुवशीलेसारखी बुध्दीमान प्रिया त्याच्या कडे आहे.जनतेचे मत वळवण्यासाठी धर्मसत्ता आहे. पण त्यालाही 'निष्ठा' मिळत नाही.व नियतीची लीला कथेनंतरही चालू रहाते. असे हे क्रमांक9 चे चित्र आहे.

* 5).चित्र क्र. 10--ध्रुवशीला-- मंदिरात सेविका, पण सालंकृत, धर्मगुरुला सामील,अशी सत्ताधारी ,प्रिया, सत्तेच्या बाजूला राहणारी, म्याकव्हेलीची शिष्या आहे. ती धर्मगुरुला हार घालते,असे चित्र आहे. ती व डोंब हे वासनागंठित आहेत.

* 6).चित्र क्र.11--डोंब-- शक्तीमान, पण धर्मगुरुने सांगीतल्यावर आसूड मारणारा, "एका पायाचे सामर्थ्य हवे असेल तर हातात ल़ोहदंड "असणारा सेवक आहे. पण ध्रुवशीलेची निष्ठा त्याला मिळते,असे विलक्षण बळकट, आसक्तीने भरलेले शरीर त्याच्याकडे आहे.

*"*

दिव्ये - अभयराजांची -

I ) कारागृहाच्या तीन खोल्या सिंह ,मगर , सुरक्षित मार्ग - ( चंचला सिंहाला गुंगीचे पदार्थ देते . त्यामुळे त्या मार्गाने येवून विजयराज सुरक्षित रहातो . दुसऱ्या मार्गाने आला असता तर चंचलेच्या हाती काही नव्हते ) या दिव्यात खोल्यांचे मार्ग एका खोलीतून दुसऱ्या खोलीत का जातो हे वाचकाला कळत नाही . साक्षेपी वाचकांनी या दरवाजांच्या सापळयाचे स्पष्टीकरण करावे .

2 ) दोन रथ - एक चांगला, एक मद्य पाजलेला घोडा असतो - परंतु एका सारथ्याला पूर्वी घोडयाने जायबंदी केले होते म्हणून तो भयभीत होता . म्हणजे योगायोगाने विजयराज या दिव्यातून वाचला

विजयराजांची दिव्ये -

। ) तीन कलश त्या पैकी दोन सुरक्षित . एकात सर्प आहे असे सांगीतले जाते - प्रत्यक्षात विदूषकाने तीनही कलशांत कमल देठ ठेवले .

2 ) दोन फळे एक विषपूर्ण आहे असे सांगीतले जाते. प्रत्यक्षात दोन्ही विषपूर्ण होती .

*''''''

* 6).चित्र क्र.3--वज्राचार्य व दोन फळे--सभागृहात रिकामे राजसिंहासन आहे. तेथे, अभयराजांचे मार्गदर्शक,वज्राचार्य आहेत. विदूषक एकाच प्रकारची दोन फळे समोर ठेवतो, व अभयराजांनी करायचे 'दिव्य 'सांगतो.

तो म्हणतो,"..परंतु यांतील एक फळ पूर्ण विषमय आहे. आपण त्यांतील एक भक्षण करावे."....महाभारतात द्यूतावर सर्वस्व 'पणा'ला लावले जाते. या कथेतील दिव्यांचा प्रकार तसाच आहे. कथेला महाभारताची पार्श्वभूमी आहे.या चित्रात वज्राचार्य विचार करत आहेत. एका फळावर दातांच्या खाण्याच्या खुणा आहेत. वज्राचार्य तेच फळ निवडतो. ते फळ खाल्यावर अभयराजांचा तेथेच म्रुत्यु होतो. विदूषक लगेच दोन्ही ताटल्या उचलून नेतो....

* 7)चित्र क्र.4--अभयराज--पूर्ण विषारी फळ खाल्ल्यावर मिनिटात अभयराजाचा म्रुत्यु होतो.ते हे चित्र आहे. खरे तर, विदूषकाने दोन्ही फळे विषपूर्ण केली असतात... येथे कौटिल्याची पार्श्वभूमी आहे.

8).चित्र क्र.2--उपमंदिर-- नंतरच्या शेवटच्या दिव्यात विजयराजाचा शिरच्छेद उपमंदिरात होतो. तो हा परिसर आहे .दोन उपमंदिरे असतात. त्यांच्या जलवाहिन्यांची वेगळी रचना असते. दोन्ही उपमंदिरे वापरात नसल्याने, जलवाहिन्या रिकाम्या असतात.

९)चित्र क्रमांक--विजयराज--कथेत शेवटी, उपमंदिरात प्रवेश करून, राजमुकुट हातात घेत असतानाच,आतील लपलेला मारेकरी, अचानक विजयराजाचा शिरच्छेद करतो....दुसऱ्या उपमंदिरातही राजमुकुट व बंदिस्त

केलेला,(आधी मार्गदर्शक असलेला,) विदूषक असतो. विजयराजाच्या शिरच्छेदानंतर विदूषकाला सोडले जाते. हे दिव्य धर्मगुरुने तयार केले असते . त्यात कोणत्याही मंदिरात गेल्यावर विजयराजाचा शिरच्छेद होणार हे तो ठरवतो . व तसे प्रत्यक्ष करतो .

नंतर चंचला व विदूषक यांची भेट होते . त्यामध्ये संभाषण होवून दिव्यातील गुंतागुंत एकमेकांना सांगीतली जाते . त्यातही कथेचे सार व जीवनाचे सार सांगीतले जाते. विदूषकाचा बुद्धी - ज्ञान अभिमान नष्ट होतो . चंचले ची जीवन इच्छा जावून ती आत्महत्या करते .

ही दिव्ये झाल्यावर धर्मगुरू 3 वर्षांसाठी सम्राट होतो . उपवनात ध्रुवशीला हार घालून त्याचे अभिनंदन करते . तेव्हा त्यांचे संभाषण होते . विजयराज मरणारच होता हे तेव्हा वाचकांना 'कळते .

नंतर सर्व गेल्यावर ध्रुवशीला व डोंब भेटतात . प्रत्यक्षात ध्रुवशीला व डोंब सत्ताधारी असतात असे त्यांच्या भेटीवरून वाचकाला कळते व येथे विदूषक कथेचे महानाट्य संपते .

-----------+

भाग २ - कथेतील मतितार्थाचे विवेचन

कथेतील सांस्कृतिक संदर्भ

====================

I) या कथेची भाषा, प्रतिमा, सांस्कृतिक संदर्भ, कथानकातील धक्के, या सर्वांसह ,आपण गोपुरांच्या भव्य, भरभराटीच्या प्राचीन नगरीत जातो. माननीय अशोक पाटील यांनी कथेतील वातावरणाचे नेमके वर्णन पूर्वी केले आहे. तेथे,

सम्राटाची निवड करण्यासाठी भरलेल्या राजसभेत आपणच उपस्थित आहोत, असे वाटते. राजसभेत अनेक वर्षे, अंतर्बाह्य सराईतपणे वावरणारा विदूषक व इतर सभाजन भेटतात. या नगरीतील कथा, नेटाने वाचणारा वाचक धुंद होतो.कथानक माहीत असूनही पुन्हा वाचतो.

2) ही कथा म्हणजे, सांस्कृतिक संचिताचे महाकाव्य आहे .कथेत काही पाश्चिमात्य संस्कृतीचे संदर्भ आहेत. या सर्वांचा थोडक्यात आढावा येथे घेतला आहे.

ए) कथेमागे महाभारताची दाट पार्श्वभूमी आहे. युधिष्ठिर, दुर्योधन यांचे संदर्भ आहेत. यातील दिव्ये, ही बालकथेतील चमत्कार नाहीत.-- हे येथे ठळकपणे मांडावे वाटते. पौराणिक, ऐतिहासिक काळात असे दिव्य करण्याचे अनेक प्रसंग पाहायला मिळतात. महाभारतातील द्यूत हे कोणास अतार्किक वाटते . पण तो तत्कालिन दिव्याचा प्रकार होता . रामायणात चौदा वर्षे वनवास हे दिव्यच होते . त्यातून परत आल्यावर राजेपद मिळणार असते .

महाभारतातील द्यूतात , सर्वस्व व प्रियजन, 'पणाला' लावले जातात. व शकुनी, कुटिलपणे द्यूत जिंकतो.

या कथेतील *दिव्यांमध्ये* , प्राण व राजमुकुट असे 'पणाला' लावले जातात. पण शेवटी, धर्मगुरू, शब्दांचे मायाजल टाकून, इतरांचा नि:पात करून, जनतेच्या मान्यतेने राजमुकुट जिंकतो. त्या शब्दमायाजलाचा वास्तवातला अर्थ, विजयराज, विदूषक, व चंचलेलाही समजत नाही. शेवटी ध्रुवशीलाही ,"राजमुकुटापेक्षा श्रेष्ठ काय असते?",असा धूर्त-भोळेपणाचा प्रश्न विचारते.व धर्मगुरू,पुन्हा शब्दजालाचे उत्तर देऊन तिला गप्प करतो.

याप्रमाणे, महाभारताची पार्श्वभूमी असलेली ही कथा,'मेक बिलीव्ह' नाही, तर रोकड्या सत्ताकारणाची आहे.

बी)-या कथेला, विष्णू शर्मा यांच्या 'पंचतंत्र' कथेची पार्श्वभूमी आहे.-- *सर्व* --पध्दतींच्या-- सत्ताकारणाचा गाभा सांगणारी, 'हंस व कावळे' ही उपकथा दिली आहे.

सी)--कथेवर, उपनिषदांतील कथांची छाया आहे. 'जाबाली'उपनिषदात, शिष्याला चारशे गायी देऊन वनात पाठवले.तेथे तो राहिला, त्याने अनेकांशी संवाद केला. व हजार गायी झाल्यावर गौतम गुरूकडे परत आला. त्यामुळे, सत्यकाम जाबालीला ज्ञान मिळाले, अशी कथा आहे. या 'विदूषक' कथेतही गुरु, शिष्याची विलक्षण परीक्षा घेतो, अशी उपकथा आहे.

डी)--कथेत, रामायणाचा संदर्भ आहे. जीए लिहितात,"...नाव पंचकन्यांत येत नसेल. पण निदान वनवास, शिलावस्था असले भोग त्यांच्या वाट्याला येत नाहीत..."सीता, द्रौपदी, अहिल्या, यांचे भोग व्यथित करणारे आहेत.

ई)-- कथेत, कालीदास, बाणभट्ट आदींच्या संस्कृत साहित्याची पार्श्वभूमी आहे. विदूषकाचे राजसभेतील संभाषण चातुर्य, हे कालीदासाची आठवण करून देतात . तसेच ते संभाषण चातुर्य जीएंच्याच 'इस्किलार' कथेतील मद्यागारातील संभाषणांची आठवण करून देतात.कालीदास, बाणभट्ट यांच्या साहित्यातील प्रतिभाशाली भाषा अनेक ठिकाणी आहे. अर्थपूर्ण संस्कृत सुभाषितांची आठवण होते. जीए लिहितात,"सामर्थ्यशाली करतात तो धर्म, व कुटिल जी आचरतात, ती नीती..."

एफ)--शकुन, अपशकुन यांच्यावर विश्वास ठेवणारे लोक, सर्व कालखंडात असतात, व त्याबद्दल लिखाण सगळीकडे दिसत आले आहे. कथेत, गिधाडाचे येणे,

उपमंदिरांवरील चिन्हे, यांचे शकुन अर्थ सांगितले जातात. मात्र शेवटी चंचला, धर्मगुरू, अलगपणे हे शकुनांचे लिखाण खोडून टाकतात. पण सर्व समाजांत, शकुन,अपशकुन यांवर विश्वास ठेवणारे, असंख्य व प्रत्येक वेळी असतात, हे नाकारता येत नाही.

जी)--कथेला ,कौटिल्याच्या 'अर्थशास्त्र 'व म्याकव्हेलीच्या 'प्रिन्स'यांची पार्श्वभूमी आहे. जीए लिहितात,"राजसत्तेच्या प्राप्तीचा, योग्यता अथवा गुण, यांच्याशी फारसा संबंध नसतो..."

स्टालीनसारखी ,' राजसत्ता, धर्मसत्ता, दंडसत्ता, माध्यमसत्ता' ,अशी सर्वकषसत्ता , धर्मगुरुकडे असते.

एच)--अरिस्टाटलचे तर्कशास्त्र व एकूण तत्त्वज्ञानाचा अभ्यास, हे कथेत भरून राहिले आहे. काही वाक्ये, तर्काचे अगदी टोक दाखवतात. उदाहरणार्थ, "अत्यंत निरपेक्ष गुरूने आपली सारी विद्या, जरी शिष्याला दिली, तरी एक ज्ञानविशेष मात्र तो कधी देऊ शकत नाही. शिष्याला विद्याज्ञान करण्याचा जो अनुभव असतो, त्याचे ज्ञान मात्र शिष्याला कधी मिळत नाही..." किंवा, चंचला शेवटी विदूषकाला, त्याच्या ज्ञानाच्या मर्यादा दाखवते.तेव्हा तो हताश झाल्यावर, चंचला म्हणते,"पांडित्य अपुरे ठरले, म्हणून ते निष्फळ ठरत नाही."

आय)---शेक्सपिअरसारख्या प्रतिभावंतांना या कथेच्या पार्श्वभूमीवर स्थान आहे. शेक्सपिअरने म्हटले आहे--"आपली इच्छा व दैव विरुद्ध(दिशेला) जात असतात. आपले उपाय व्यर्थ होतात. आपले विचार आपले असतात. पण त्यांचे लक्ष्य आपले नसते."

तसेच शेक्सपिअरने म्हटले आहे,"जग ही रंगभूमी आहे. व माणसे त्यातील पात्रे आहेत. माणूस त्याच्या जीवनात अनेक भूमिका करत असतो..."

जे)--कथेला, ग्रीक 'आर्फियसची', व स्वतः जीएंच्या, 'आर्फियस' कथेची पार्श्वभूमी आहे. प्रेमाची दोन रूपे दाखवून,आर्फियसमधील 'युरिडिसी' चे वेगळेपण चंचलेच्या उदाहरणाने येथे स्पष्ट होते.

'आर्फियस'मध्ये, युरिडिसीच्या म्रुत्युनंतर, तिच्यावर जीवापाड प्रेम करणारा, आर्फियस,शेवटी, म्रुत्यूच्या देवाकडे जाण्याचे धाडस करतो.

या कथेत, विजयराजाचे अनाथ पूर्वायुष्य, व पराक्रम डोळयासमोर असलेली चंचला, विजयराजावर जीवापाड प्रेम करते,व ते प्रकट करते. त्याला 'दिव्यांतून' वाचविण्यासाठी अतोनात प्रयत्न करते.पण१)विजयराजाची हत्या होते.

2)विदूषकाकडून तिला कळते की, त्याचे, दुसऱ्या स्त्रीवर प्रेम होते. तिचे प्रेम निखळ असल्यामुळे, विजयराजाची मनातील प्रतिमा भंग होते, व तिला अनावर शोक होतो. ती म्हणते,"मला काहीही अधिक प्रिय नव्हते. विदूषक, एवढेच नाही, तर ही मी,माझी मलादेखील तेवढी प्रिय वाटत नाही.." व ती आत्मघात करते. चंचलेचा आत्मघात, हा योगायोग नाही तर, आर्फियसमध्ये दिसणाऱ्या प्रेमासारखे, दुसरे रूप आहे.

उलट,ध्रुवशीला, निर्ढावलेली आहे. ती सम्राज्ञीपद मिळविण्यासाठी, अभयराजाशी गांधर्व विवाह करते. पण अभयराजाच्या म्रुत्युनंतर अनेक घडामोडी झाल्यावर, गुप्त सम्राज्ञीपद मिळवण्यासाठी धर्मगुरुला हार घालते.व डोंबाचाही आधार घेते.

3 )जीएंचे मूलभूत प्रश्न - आकाशस्थ शक्तींना प्रश्न

===============

.विदूषक कथेत 'सत्य'शब्दाचा मुद्दा आहे. त्याचे खाली विवेचन करता येईल.

'सत्य' शब्द

=========

*'सत्य'* शब्द--विदूषक कथा महत्त्वाची आहे. कारण त्या कथेत 'सत्य' शब्द उपस्थित केला आहे. जीएंनी, कथेशेवटी, आकाशस्थ शक्तीच्या संदर्भात, व स्थळ-काळ-माणूस यांच्या संदर्भात,'सत्य'शब्द स्पष्ट केला आहे. त्याचा येथे आढावा घेता येईल-

ए)-- एखादा नेता त्याला सोयीस्कर विचार इतरांवर प्रचाराने थोपवतो . स्वतःसाठी मात्र जे योग्य असते, तसे तो नेता वागतो. हे एखाद्या *नेत्याच्या* आग्रहाचे सत्य, किंवा  सत्याचा आग्रह असे असते .

- उदाहरणार्थन विदूषक मधील हंस काक उपकथा पाहता येईल .'हंस'कथेत हंसाचे म्हणणे, कावळे कोलाहल करून बंद करतात. त्याप्रमाणे, हे नेत्याच्या 'आग्रहाचे सत्य' हे बिंबवले गेले. नियम पाळून, बुध्दीबळ खेळायचा,असे गोड बोलून सांगितले जाते. पण नंतर, धर्मगुरुच्या शब्दजालाप्रमाणे, तेच नियम गाडले जातात. त्यावेळीही कोलाहल करून ,धर्मगुरुप्रमाणे जनतेला भुलवले जाते.  म्हणून हे 'आभासी' सत्य असते.

बी-- जीएंनी, 'माणसे अरभाट आणि चिल्लर' या पुस्तकात पान 127वर 'सत्याचा' उल्लेख केला आहे. तो *नेत्याच्या* आग्रहाच्या सत्याचा उल्लेख आहे. ते म्हणतात-"सत्याचा नेहमी जय होतो, आज ना उद्या.."हे वाक्य कधीच खोटे ठरवता येत नाही. कारण, खरी मेख आहे, 'आज ना उद्या',या शब्दांत. सत्याच्या

विजयाची आशाळभूतपणे वाट पाहणाऱ्या माणसाची मातीदेखील नष्ट होते. व तो 'सत्याच्या ' विजय - पराजयापलिकडे गेलेला असतो."

सी)--भूतकाळातील 'सत्य', शब्द, *इतिहास* म्हणजे सत्य .-- माणूस, भूतकाळात घडलेले 'सत्य',शोधत असतो.जीएंनी,'माणसे, अरभाट आणि चिल्लर' पुस्तकात,इतिहासाच्या स्वरुपाबद्दल लिहिले आहे. इतिहासातील घटनांवर, आताच्या माणसाची भावमुद्रा असते. या कथेत चंचला म्हणते,"..चालत असताना त्यात पाणी साठावे,व मागे वळून पाहताना त्यात चंद्राचे किंचित प्रतिबिंब दिसते, तसे मला सत्य दिसते.." यावरुन भूतकाळातील सत्य, हे वर्तमानातील रोकडे सत्य नसते . त्यावरही इतिहास सांगणाऱ्याची विचारमुद्रा असते . ते प्रतिबिंबासारखे भावमुद्रेचे सत्य असते. व तेही,'किंचित प्रतिबिंब' असते. इतिहास सांगणाऱ्याला सर्व भूतकालीन इतिहास न कळाल्याने तो अजाणता अंशतः इतिहास सांगतो . तो प्रामाणिक असला तरी असे होते . इतिहास सांगणारा अप्रामाणिक असला तर तो इतिहासात असलेल्या त्या घडामोडींचा विपर्यास करतो .

डी)-- घटिते -- घटिते म्हणजे, *वैज्ञानिक* 'सत्य'. शिलाखंड पाण्यात बुडतात, हे उदाहरण घटिताचे आहे. ती माणसासाठी महत्त्वाची असतात. यावर चंचला म्हणते,"..पण त्यांच्यावर माझ्या भोगाची, हर्षाची मुद्रा नाही. म्हणून ही घटिते म्हणजे माझी सत्ये नव्हेत..." प्रयोगशाळेत मिळालेले 'घटित',माणसाच्या हातात पडल्यानंतर, तो ते घटित कसे *वापरतो* यावर हर्षाची मुद्रा होते,यावर माणसाचे जीवन ठरते. अनेक शोध माणसाच्या भोगमुद्रेने विनाशकारी ठरतात, असा याचा अर्थ आहे .

ई)-- *रूपकात्मक*, रूपकावर आधारित 'सत्य'--ही कथा *ऐतिहासिक* काळात घडते . तेव्हा आता च्या काळात वापरले जाणारे, गणितावर आधारित

वैज्ञानिक सत्य फार थोडे असे . पण भविष्यात काय होईल याचा आधार असलेला अंदाज म्हणजे सत्य तर शोधले पाहिजे . म्हणून तेव्हा रुपकात्मक सत्य जास्त वापरले जायचे . अर्थात त्या काळाच्या संदर्भात ते चूक म्हणता येत नाही .

कथेच्या सुरुवातीच्या भागात, विदूषक, रुपकांच्या सहाय्याने, बुध्दीचा वापर करून, कथानकात पुढे घडण्याच्या घटनांचे 'सत्य'शोधत असतो. येथे'सत्य'शब्द, रुपकात्मक सत्याचा आहे. माणूस, सर्वसाधारणपणे, भविष्यात घडण्याच्या घटनांचे 'सत्य',शोधत असतो. एका वस्तूतील माहिती, दुसऱ्या वस्तूत परावर्तित करताना, रुपकांचा आधार घेतला जातो. कथेत विदूषक रुपकांचा बराच आधार घेतो.

उदाहरणार्थ, I ) शांत समुद्रात हिंस्त्र जलचर असतात . त्या प्रमाणे चंच लेने शांत वेष परिधान केला असला तरी ती मनातून धगधगलेली आहे .

2 ) शब्दांच्या अर्थाचे परिणाम होतात . त्यामुळे ध्रुवशीला नावावरून तिला शांत स्वभाव मिळाला असेल .

3 ) गिधाड पहिल्या शिखरावर बसले आहे पण त्याची नजर दुसऱ्या शिखरावर आहे . त्याची अशुभ नजर तेथे आहे.

4 ) ज्ञानी शांत चिंतन करतो तसा हिम खंड जलाचे शांत रूप आहे.

याद्रुष्टीने कथेतील, विदूषकाची ही वाक्ये पाहता येतील--

--बाह्य स्वरुपावरुन ,अंतर सत्याचा कयास बांधण्यात गफलत होते.-- ज्ञानाच्या विविध चिन्हांकडे सूक्ष्म ध्यान असावे लागते.

--सत्य हे अंशाअंशाने प्रकट होते.--संपूर्ण सत्य पाहण्याचे भाग्य, माणसाच्या दोन नेत्रांना कधीही लाभणार नाही .

.--एक सत्य खंडांपेक्षा ,बुध्दीने साधित दोन खंड जास्त सत्य असतात .

.--संकुचित सत्य, हे विस्तृत सत्यात सामावलेले असते, किंवा त्याच्याशी विसंगत तरी असते.--सूक्ष्म विचारांचे परिश्रम वाचावेत, म्हणून आपले समाधान होईल, असा आशय माणूस शोधत असतो .

.--प्रसंगी सत्य स्पष्टपणे न येता, मायावी रूप धारण करते. म्हणून मायाजलात सापडू नये .

.--मायावी स्वरूपात आल्यानंतर कधी सत्य दैदिप्यमान होते.--याप्रमाणे, भविष्यात घडणारे सत्य शोधण्याचे निश्चित नियम नसतात. ते बुद्धीने, प्रज्ञेने तपासावे लागतात . म्हणून तेथे योग्य मार्गदर्शकाची, गुरुची उपस्थिती आवश्यक असते.

-----परंतु कथेशेवटी, चंचला , या रूपकात्मक सत्याच्या *मर्यादा* सांगते. . कथेत विदूषक मोठ्या प्रमाणात रूपकात्मक सत्य वापर तो . उदाहरणार्थ, रथाच्या दिव्यात . दारू पाजलेल्या अश्वां चा सारथी हा अस्वस्थ असणार . असे विदूषक सांगतो . प्रत्यक्षात सारथ्यांना घोड्यांच्या स्थितीची माहिती नसते . जुगारात रात्र घालवल्याने एक सारथी अस्वस्थ दिसतो .किंवा पाहिल्या व्यूहाचा दिव्यात गिधाड हे अनिष्ट ठिकाणी, मृत प्राण्यापाशी न बसता थोडे दूर बसते . प्रत्यक्षात चंचलेने पैसे देवून सिंहाला गुंगीत ठेवले होते .अनेक संस्कृत सुभाषिते रूपकात्मक सत्ये असतात .

एफ)--कथेच्या शेवटच्या भागात, चंचला व विदूषक यांच्या संवादातून, *भविष्यातील* सत्य', म्हणजेच 'सत्य' शब्दाचे विश्लेषण होते.

१.प्रत्यक्षात, उपलब्ध ज्ञानाच्या साहाय्याने, माणसाला, दरक्षणी, अटळ, एकाकी व ( कधीकधी प्राणघातक ) असे निर्णय घ्यावे लागतात.("कारण, म्रुत्यू दरक्षणी ,हजार दिशांतून माणसावर घाला घालण्याचा प्रयत्न करत असतो")

२)असा अटळ,एकाकी, निर्णय, त्या माणसाला,त्या क्षणी, त्या स्थळी, 'सत्य'वाटत असतो.पण ते 'सत्य', सतत बदलणारे आहे, याकडे त्याचे दुर्लक्ष होते.

याची उदाहरणे कथेत आहेत. अभयराजाची हत्या, विजयराजाने विदूषकाला मार्गदर्शक म्हणून दूर करणे, विजयराजाची हत्या, विदूषक-चंचलेला ,धर्मगुरुचे शब्दजाल न कळणे,चंचलेचा आत्मघात, धर्मगुरुला ध्रुवशीलेची निष्ठा न मिळणे...या सर्व प्रसंगांत माणसाने अटळ निर्णय घेतला, तरी सत्य बदलणारे असते ,हे अधोरेखित होते.

म्हणून, हा अस्तित्ववाद असला तरी,तो,जीएंचा 'सुधारित अस्तित्ववाद' आहे. त्या बरोबर, जीएंच्या 'सुधारित नियतीवादाचा' विचार करावा लागतो.

जी)--काळाच्या अनंत लांबीत , माणसाला काळाचा मर्यादित तुकडा मिळतो.त्यामुळे, त्या मर्यादित काळातील , प्रतिभावान ज्ञानही अपुरे असते. त्यामुळे, त्या माणसाला सर्व स्वकर्तृत्वाने करता येईल असे वाटत असले तरी, व्यापक द्रुष्टीने नियतीचा *अटळ* घटक कार्यरत असतो.त्या माणसाला मात्र नियती ,अकल्पनिय वाटते.

एच)म्हणून, व्यापक द्रुष्टीने, नियती अकल्पनिय असते, म्हणून अटळ असते. नियती कोठून घाला घालेल, ते कळत नाही.

जीवनात एखादा *परिस्थितीव्यूह* तयार होतो . तो माणसे, निसर्ग अशा घटकांनी तयार होतो . पण त्या परिस्थितीव्यूहाचे परिणाम संबंधित व्यक्तीला भयावह होतात . त्यामुळे त्याच्या दृष्टीने परिस्थितीव्यूह हा संभवनीयतेने परिणाम करणारा न होता, *अटळपणे* परिणाम करणारा असतो . यासाठी खालील उदाहरणे पाहता येतील--

अभयराज विदूषकाच्या दिव्यात अडकतो.धर्मगुरुच्या दिव्यात विजयराज अडकतो. जनतेला हे कळत नाही की, दोन्ही मंदिरांत मुकुट व मारेकरी असतात.

धर्मगुरुला ध्रुवशीलेचा निष्ठेतील बदल कळत नाही. डोंबाला राजमुकुटाची आज्ञा पाळत रहावे लागते . त्याला कोण सम्राट बदलला. हे कळत नाही.. व 'विदूषक'कथा पुढे चालू राहते...

आणखी एक उदाहरण देता येईल . एका अगदी लहान गावात विषारी साप चावून एक माणूस o मरतो . गावातील विषारी सापांची संख्या, माणसांची संख्या पाहून संभवनीयतेचा अंक / अंदाज काढता येईल . या परिस्थितीव्यूहात संभवनीयता असल्याने नियतीचा भाग नाही असेही, मॅक्रोलेव्हल macro level वर म्हणता येईल . पण त्या कुटुंबीयाच्या दृष्टीने ती दुर्दैवी घटना 100 टक्के नशीब / नियती होते . या दृष्टीने ललित कलाकृतीत नियतीचे विधान येणे हे चूक म्हणता येत नाही .

-आय).हा दगडी ,घट्ट नियतीवाद नाही. तर 'सुधारित नियतीवाद 'आहे. माणसाला अटळपणे निर्णय घ्यावे लागता त .पण ते अकल्पनिय नियतीच्या, परिस्थिती व्यूहाच्या चौकटीत घ्यावे लागतात . तो परिस्थिती व्यूह मोठ्या प्रमाणात त्या माणसाने केलेला नसतो. म्हणजे या विचारात अस्तित्ववाद आहे व नियतीवादही आहे. पण त्यांमध्ये काही अटींचा बदल आहे .सुधारित अस्तित्ववाद व सुधारित नियतीवाद, यांचे संयुग, म्हणजे, 'जीएंचा नियतीवाद' म्हणता येईल. व त्याद्वारे, विदूषक कथेत, 'सत्य'शब्दाचा हा अर्थ सांगितला आहे.

भरतवाक्यांचे *परिच्छेद*

=================

जे).शेवटी, विदूषक व चंचला, यांमधील संवाद, ही भरतवाक्यांची वाक्ये आहेत. ती खाली देत आहे--

।)चंचला म्हणाली, " मी ज्ञानाच्या उपासनेत शरीर झिजवले नाही, की तत्वज्ञानाच्या काठिण्याचा अनुभव घेतला नाही. सत्य हे खंडशः येत राहते, की मायावी स्वरुपात दिसते, की एखाद्या दिव्य दर्शनाप्रमाणे सरळ प्रकट होते, याची मला काहीच कल्पना नाही. मी वर्तमानाच्या क्षणिक निरंतर लहरीवर जगणारी एक यःकश्चित युवती आहे. भविष्यकालाचे विविध, तलम तरंग माझ्यातून संक्रांत होतात, आणि भूतकाळात विरुन जातात, आणि मग मला माझे सत्य, त्या भूतकाळात दिसते, भविष्यकाळात नव्हे. चालत असता पावलांची खूण उमटून त्यात पाणी साचावे , आणि मागे वळून पाहताना, त्यात चंद्राचे किंचित प्रतिबिंब दिसावे, तसं मला माझे सत्य दिसते. हे सत्य माझच, माझ्यापुरतेच असते, कारण त्यावर माझ्या जीवनाची रक्तमुद्रा असते. त्याचं दान करता येत नाही, की इतरांकडून त्याचा स्वीकार करता येत नाही. प्रत्येकाने आपापलं सत्य स्वतःच्या रक्ताच्या स्पंदनावर पारखून घ्यावे लागते. ज्या सत्याची देवाणघेवाण होवू शकते, किंवा ज्याबाबत विविध प्रकृतींच्या जनांचे एकमत होते, ती सत्ये क्षुद्रमोलाची असतात, किंवा अप्रस्तुत, निर्जीव घटिते तरी असतात. वारा वाहतो, व्रुक्षांना पाने येतात, शिलाखंड पाण्यात बुडतात. ही निव्वळ घटिते आहेत. त्यांवर माझ्या भ़ोगांची, हर्षाची मुद्रा नाही. म्हणून ती घटिते म्हणजे माझी सत्ये नव्हेत, हे एवढेच अद्याप माहित असलेली मी एक अज्ञ आहे....."

2). चंचला म्हणते," धनुष्यातून शर सोडणे, एवढेच आपल्या हाती असते. पण एकदा त्याचा प्रवास सुरू झाला की, त्याच्या लक्ष्यापर्यंत त्याला पोहचवण्याचे सामर्थ्य मात्र आपल्याला लाभले नाही. त्यातही नियतीच्या अदृश्य उच्छश्वासांनी, त्याचा गतीमार्गही अनेकदा दुष्ट होऊन जातो .ही तर जीवनाची एक प्रतिज्ञाच आहे.आणि एकदा जीवनात पदार्पण केल्यानंतर, त्याबद्दल विलाप करण्यात अर्थ नाही..."

या सर्व विवेचनाने वाचक मान्य करतो की, प्रतिभावंत लेखक, जी. ए. कुलकर्णी ,यांनी लिहिलेली, 'विदूषक' कथा मराठीतील अनमोल हिरा आहे.

---

🙏💐💐💐💐💐💐💐💐💐🙏
धन्यवाद . - विलास वाघोलीकर

🙏💐💐💐💐💐💐💐🙏

विदूषक कथेतील महत्वाची थीम व त्यावर थोडक्यात विश्लेषण, आपण उतमरित्या मांडले आहे. धन्यवाद . ही व इतर कथांमध्ये जीएंनी *जाणीवपूर्वक* नियती चा विचार घेतला आहे . त्यांच्या पत्रव्यवहारात त्याचे संदर्भ आहेत . सर्वसाधारण सुशिक्षीत माणसे नियती, नशीब म्हटले की नकारात्मकता दाखवतात . त्यांच्या डोळ्यासमोर "असेल माझा हरी ...". येते . पण जीएंनी सर्व आटोकाट प्रयत्न केल्यावर फळ मिळाले नाही हा परिस्थिती व्यूह घेतला असतो, याकडे लक्ष दिले पाहिजे . विदूषक कथेतील इतर थिमवर आवडेल तसे इतर वाचकांनी लिहावे ही विनंती . गुड डे . विलास वाघोलीवर

--

- - अलका तडकलकर : 🏵️ *विदूषक*

*पुस्तकः काजळमाया*

पान क्रमांक *243 ते 278*

..............................................

विवेचन: डॉ. अलका तडकलकर

.................................j.......

ही कथा पस्तीस पानांची एक दीर्घ कथा आहे.कथानक वाचकाना इतिहास कालीन संस्कृतीत फिरवून आणते. पानागणिक उत्कंठावर्धक प्रसंग ,प्रत्येक वाक्यात

बुद्धीला मिळणारे वेगळे वळण व उत्तरार्धात अनेक रहस्यमयी गुपिते अशा अनेक आयामाची परिपूर्ण ही जागतिक दर्जाची कथा आहे.

*कथासार*

. ..या कथेत सर्व घटना ज्या परिसरात घडतात, ते गोपूर असलेले भव्य रक्ताक्षी मंदिर असते. तेथे राजसभेचे आयोजन करतात . रिकामे सिंहासन ठेवले असते. कारण राज्याच्या सम्राटाच्या निधनानंतर ( तो घात धर्मगुरुने केला होता )दुसरा सम्राट ठरविण्यासाठी राजसभा भरते. त्यामध्ये धर्मगुरू, अमात्य, पदाधिकारी, सरदार व प्रजाजन येतात . येणाऱ्या स्पर्धकांनी काही कठीण परीक्षा - दिव्ये - उत्तीर्ण केल्यावर तो सम्राट होणार असतो . त्या स्पर्धकांमध्ये अभयराज एका परराज्याचा राजपुत्र असतो . तर विजयराज दुसऱ्या राज्याचा राजपुत्र असतो . त्याच्या पित्याचा पराभव व मृत्यू झाला होता . म्हणजे,विजयराज अनाथ, दलहिन, संपत्तीहिन होता .

तो हे साम्राज्य प्राप्त करू इच्छित होता. त्यासाठी तो अनेक दिव्य पार पाडायला तयार होता. सध्या तरी त्या राज्याची धुरा धर्मगुरूकडे होती आणि त्यांनी नव्या सम्राटाच्या निवडीसाठी राजसभेचे आयोजन केले होते.

राजसभादालन अर्धवर्तुळाकार होती.तिथे सर्व आमात्य ,राज्यातील वनराजाचे प्रमुख ,धीवरप्रमुख,अश्वसमूह प्रमुख,इत्यादीं आणि , मांडलिक, नगरवासिय महिला पुरूष असे सर्व जण उपस्थित आहेत.थोडया वेळात एक विदूषक गाढवावर बसून येतो.त्याच्या गळयात दोर गुंडाळलेली असते जिच्या एका टोकाला दिवा व दुसऱ्या टोकाला बिन जिभेची घंटा बांधलेली असते.विदूषकाचा पोषाख (नेहमीच हास्यास्पद) अर्धा काळा अर्धा पांढरा पट्ट्यापट्ट्याचा असते.त्याचा हा अवतार बघून सभेत हास्य पसरते. पण विदूषक बुध्दीमान असतो त्यामुळे त्याला बृहस्पती म्हणून संबोधले जात असते.

हास्यविनोद झाल्यावर आणि स्वतःच्या विचित्र अवताराबद्दल बोलून झाल्यावर मग विदूषक एक कहाणी सांगतो. हंस व कावळ्याची.त्या कथेचे सार असते की हक्कांसाठी लढणारे आणि हक्क हिरावून घेणारे दोघेही वेळ आल्यावरच स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करून जातात.या कथेत हंस द्वयी व खारूताई याचा मृत्यू होतो तर कावळे मानससरोवर काबीज करतात.या कथेतून मनोरंजनाबरोबर मोठे तत्वज्ञान विदूषकाला मांडायचे असते.जे सर्वांवर प्रभाव पाडणारे ठरते.

तितक्यात धर्मचार्यांचे आगमन होते. ते सभेच्या मध्यभागी उंचीवरील आसनावर स्थानापन्न होतात त्याचे यथायोग्य स्वागत होते आणि ते सभेस उद्देशून बोलतात की आजच्या राजसभेचे आयोजन हे या राज्याचे रिक्त असणाऱ्या सम्राटपदावर नियुक्ती करण्यासाठी अनेक दिव्यातून (अनेक राजपुत्रानी ज्यात सहभाग घेऊन पराभूत झालेले असतात) विजयी झालेल्या दोन वीर अभयराज व विजयराज या दोघांपैकी एकाची निवड करण्यासाठी या सभेचे आयोजन केले आहे. सभेपुढे त्या दोघांनी एकमेकांना दोन दोन दिव्य पार करण्यास सांगावीत जो यात *यशस्वी तोच या राज्याचा उत्तराधिकारी म्हणून घोषित करण्यात येईल* यावेळेत अभयराजला मार्गदर्शक असतात पण विजयराज विदूषकाला आपला मार्गदर्शक म्हणून निवड करतो.

अभयराज पहिल्यांदा दिव्य सांगतो राजसभादालन बाहेरच्या कडेकोट अशा तुरुंगात तीन दारे आहेत .त्यावर तसे अंकही लिहले आहेत. एका प्रवेशद्वारात आत गेल्यावर हिंस्र प्राणी दिसेल, दुसऱ्या द्वारातून जलचर प्राणी व तिसरा मोकळा मार्ग आहे .कोणत्या ही एका दरवाजातून जाऊन सुखरूप बाहेर पडून दाखवण्याचे हे दिव्य करावे. असे सांगतो. मग तिथे उपस्थित असलेल्या चंचला (प्रमुखअमात्यकन्या) व ध्रुवशीला (दासीकन्या) या दोन सुस्वरूप तरूण कन्या विजयराजला तिलक लावून कौल सांगतात (आताच्याभाषेत अवघड कोडे सोडवण्यास जशी हिन्ट दिली जाते) त्यामुळे योग्य निर्णय घेऊन यशस्वी व्हावे हा उद्देश असतो. विजयराज विदूषकास बरोबर घेऊन त्या कडेकोट वाड्याकडे जातो पहिल्या प्रवेशद्वारावर विदूषकाला एक

गिधाड दिसते तो मनाशी काही अडकले बांधून त्याच दरवाजातून विजयराजला जाण्यास सांगतो आणि विजयराज या दिव्यातून यशस्वीरित्या बाहेर पडतो मग विजयराज अभयराजला आपले दिव्य पार करण्यास सांगतो सभेत एका टेबलवर तीन करंडक ठेवलेत ज्यावेळी एकात पाणी व दुसऱ्यात विषारी सर्प आहेत बाजूला असलेले घटिकापात्र यातील एका करंडकात बुडवून भरायचे.खरेतर तिन्ही मध्ये पाणीच असते सर्पाऐवजी कमलपुष्पाचे देठ विदूषकाने ठेवलेले असते. अभयराज हे दिव्य पार पाडतो.आनंदी होतो.मग पुन्हा एक दिव्य विजयराज पार करतो आणि दुसऱ्या दिव्याच्या वेळेस विदूषक दुष्ट चाल खेळत विषारी फळ अभयराज ला खाण्यास लावतो .अभयराजचा मृत्यू होतो.आता विजयराज हाच सम्राटपदासाठी उरतो.

तेव्हा धर्मगुरू विजयराजला सम्राटपद प्राप्तीसाठी शेवटचे दिव्य करायला सांगतात.

बाहेर दोन एकसारखी मंदीरे आहेत त्यातील एका मंदिरात विजयराजच्या अत्यंत प्रिय अशा व्यक्तीस बंदिस्त करण्यात येईल , पण तो कोणतीही सूचना आतून विजयराजला देणार नाही ,दिल्यास मृत्यू होईल.तसेच एका मंदिरात राजमुकूट मिळेल तर दुसऱ्या मंदिरात राजमुकुटा पेक्षा अधिक काही.

विजयराज आपली अत्यंत प्रिय व्यक्ती म्हणून विदूषकाची निवड करतो.इथे विदूषकास यमयातना होतात.जयाचे हित चिंतावे त्यानेच मृत्यूचा मार्ग दाखविला (वास्तविक पाहता विजयराजची प्रेयसी जनमानसात उपस्थितअसते पण तिचे तो नाव का घेईल).विजयराजने अभयराज च्या मृत्युनंतर विदूषकाची खेळी माहिती झाली तेव्हा तो सावध होऊन विदूषकालाच आपला सम्राटपदाचा शत्रू मानला व कपटभावनेने विदूषक मंदिरात बंदिस्त करण्यास सांगीतले.असे जरी झाले तरी विदूषकाने बंदिस्त होऊनही विजयराजला श्वासोच्छ्वासाद्वारे मुकूट त्याच्याच मंदिरात आहे हे सांगतो.विजयराज दोन्ही मंदिराचे निरीक्षण करत प्रदक्षिणा घालतो ज्या त विदूषक बंदिस्त असतो तिथे त्याचे चालणे मंदावते ही परंतू बुद्धीभ्रम झालेला

विजयराज मायाजालात अडकतो व अशुभ चिन्हांकित अशाच मंदिराची निवड करीत मृत्यूच्या दारात जातो.

राजसभा विसर्जित होते.बघणारे शून्य मनाने निघून जातात.

सुटका झालेला विदूषक अत्यंत वाईट मनःस्थितीत जंगलाची वाट धरतो. तिथे एका झाडाखाली हतबल व हतबुद्ध होऊन विचार करत असता चंचला येते व विदूषकाला दूषण देत आता तरी तुला आनंद वाटतो का तुझा शिष्यच मेल्यावर तुझ्या बुध्दीमत्तेचा काय उपयोग? तो म्हणतो उलट तुलाच आनंद व्हायला हवा. तुझ्या प्रेमाला त्याने अव्हेरले होते तेव्हापासून तूच त्याचा काटा कसा निघेल हे पाहत होतीस.यावर चंचला विदूषकासमोर अनेक गुपिते सांगते.

1 विदूषक हा पंडित विष्णू शर्मा असून त्याचे राज दरबारी झालेला अपमान व त्यानंतर त्याने आरण्यक केलेला विदूषकी पेहराव

2 दासीकन्या ध्रुवशीला आणि अभयराज यांचा झालेला गांधर्व विवाह

3 ध्रुवशीला ने विजयराजला दिलेले मृत्यूच्या दिशेला जाणारे इशारे

4 स्वतः विजयराजला कसे विजयी होता येईल यासाठीच्या गुप्त योजना

हे सांगून विजयराजच्या(तिचा सर्वस्व असलेला) मृत्युनंतर अत्यंत विव्हळ होत स्वतःच्या हाताने गळयात सुरा खुपसून विदूषकासमोरच आत्महत्या करते.

विदूषक सवःचे प्राणाच्या भीतीने पळून जाऊ लागतो तर समोर वाटिका धर्मगुरू व ध्रुवशीला एकमेकाच्या मिठीत दिसतात.दोघेही खुशीत दिसतातधर्मगुरूने (कावळयाचा जातीचा) या कटकारस्थानात ध्रुवशीलेला हाताशी धरल्याचे विदूषकाला समजून येते.विषण्ण मनाने अंगावरचे कपडे फेकून देतो. त्याला त्याच्या बुध्दीमत्तेचा अहंकार गळून पडतो.मिळालेले अपयशाने ग्लानी येते.मग धर्मगुरू निघून गेल्यावर तोही हे साम्राज्य सोडून जाण्याच्या विचारात पावले टाकत असताना पुन्हा थोड्या अंतरावर ध्रुवशीला व डोंब पुन्हा एकमेकाच्या मिठीत. प्रेमाच्या गोष्टी

करत असल्याचे दिसते. म्हणजे ध्रुवशीला आणि डोंब यांनी कारस्थान रचले.त्यात धर्मगुरूही अडकले आणि खरे राजपुत्र साम्राज्य पात्र असूनही मृत्यूमुखी पडले.

अति क्षुद्र व्यक्ती (कावळे) नी कट करावा आणि हंसानी (बुध्दीवान, शौर्यवान व राजस यांनी) प्राणाचे मोल द्यावेत असे राजकारणातली परिस्थिती या कथेतून प्रकटते.

........................................

वाक्यात वाक्यातील निर्देश ,प्रसंगाचे चित्रण आणि शेवटी सत्याचे रहस्यमयी उकल या गोष्टी एक चित्रपट पाहिल्यावर जसे स्मरणात राहील अगदी तसे वाटते

धन्यवाद. 🙏

[ - - SANJEEV sargaonkar, Kothrud: राजसत्ता विरुद्ध धर्मसत्ता यातील द्वंद्व व त्यात जाणारे मानव बळी, वैयक्तिक विषय लालसा, सत्ताधीश यांचे गूढ वक्तव्य याचे एकत्रीकरण म्हणजे ही कथा. विस्तृत विवेचन खूप मोठे होऊ शकेल. =Jayashree Jangle: मला या कथेचे सूत्र 'गुलाम'19/01, 10:33] GA Prmi कथेशी जुळणारे वाटले.

सत्य कधीही एका क्षणात पूर्णदर्शन देत नाही. ते अंशाअंशानेच प्रकट होते. म्हणजेच जे पूर्णज्ञानी समजले जातात, तो त्यांचा आणि इतरांचा भ्रम असतो. जेव्हा पूर्णसत्य कळते तेव्हा त्याची सावली भूतकाळात दूरपर्यंत पसरली असल्याचे आणि नियतीने/काळाने आपल्याला (विदूषकासारखे) हास्यास्पद बनवून फुकाच नाचवल्याचे कळल्याने साहजिकच वैफल्य येते.

इस्किलारमध्येही शेवटी असंच आहे थोडंफार.

- - गौरी देशपांडे : मला वाटते , ह्या उपकथानकात जीएनी लोकशाही च्या मर्यादा रुपकातून दाखवल्या आहेत. लोकशाही म्हणजे संख्येचा खेळ आहे...गुणवत्ता, बुद्धिमत्ता वगैरे सगळ्या गोष्टी संख्येपुढे व्यर्थ आहेत...हाच गर्भितार्थ इथे अपेक्षित आहे.

- ॅ-- तुलना करणे योग्य होणार नाही. परंतु करायचीस तर मी जीएनची तुलना व्यासांची करीन. एका मोठ्या गोष्टीत अनेक छोट्या छोट्या गोष्टी रंगत असतात .प्रत्येक वेळेला वाचलं की नवनव्या काहीतरी सापडतात आणि अक्षरशः अजून सुद्धा मंत्रमुग्ध होऊन जातं.. इतक्या वर्षांनी आणि इतके वेळा वाचून सुद्धा

- - 1 सुनीळ सामंत : विदूषक ही कथा मानवी प्रयत्न आणि नियती या दोहोंचे महत्व सांगणारी कथा आहे असे मला वाटते. इस्किलार मधे "आपण सर्व त्या नियतीच्या हातची बाहुली आहोत" ही भावना या कथेत नाही. यातले अत्यंत महत्वाचे वाक्य -(माझ्या मते)- ...आणखी एक विशेष म्हणजे जीवनाशी द्युत केळताना ***अनेकदा*** नियती ***देखिल*** गुप्तपणे अक्षदान टाकत असत्च. याची पूर्ण जाणीव असल्याखेरिज जीवन सुसह्य होणारच नाही.

या वाक्यातईल अनेकदा आणि देखील हे शब्द मी अशासाठी ठळक केले आहेत की जीए या कथेत त्याऐवजी फ़क्त आणि च हे वापरू शकले असते. पण नियती कधी ना कधी प्रयत्नांसमोर हार मानते (किंवा प्रयत्नांनी नियतीवर मात करता येते) असा सुप्त संदेश या वाक्यात मला दिसला.

- - विलास वाघोलीकर : विदूषक कथेतील महत्वाची थीम व त्यावर थोडक्यात विश्लेषण, आपण उतमरित्या मांडले आहे. धन्यवाद . ही व इतर कथांमध्ये जीएंनी ***जाणीवपूर्वक*** नियती चा विचार घेतला आहे . त्यांच्या पत्रव्यवहारात त्याचे संदर्भ आहेत . सर्वसाधारण सुशिक्षीत माणसे नियती, नशीब म्हटले की नकारात्मकता दाखवतात . त्यांच्या डोळ्यासमोर "असेल माझा हरी ...". येते . पण

जीएंनी सर्व आटोकाट प्रयत्न केल्यावर फळ मिळाले नाही , असा परिस्थिती व्यूह घेतला असतो, याकडे लक्ष दिले पाहिजे .

--- SANJEEV sargaonkar, Kothrud: कथा:विदूषक कथासंग्रह: काजळ माया आस्वादक: संजीव सावरगांवकर. 23-01-2023. 1)असे म्हणतात की प्रत्येक पाच मैला वरती पाण्याची चव बदलते तर प्रत्येक 12 मैलावर बोलीभाषा बदलते. थोडक्यात असे की बदल हा अपरिहार्य असतो. बदल मग तो राजकारणातील असो, लोकशाहीतील असो, धर्मातील असो किंवा राज सत्ते बाबत असो तो नेहेमीच अनिवार्य असतो. नैसर्गिक तत्त्वांनी स्वभाविकपणे झालेला बदल सामान्य माणूस असे बदल विना तक्रार स्वीकारतो. पण असामान्य माणसे सत्ता अभिलाषा बाळगणारी माणसे त्यांना पाहिजे तसा बदल घडवून आणतात. मग तो बदल समाज मनातील असो, राज्य पादाक्रांत करण्याचा असो किंवा समाजाच्या अघोषित चांगल्या कारणांच्या करता असो. भल्या burya करता असो तो प्राप्त करण्यासाठी कोणत्याही स्तराला जाऊन ही माणसे साम, दाम, दंड, भेद अथवा गरज पडली तर हत्या करून, भाषणे करून, सत्ता देवी आपल्या पदरात पाडून घेतात. सत्ता उपभोगणे हेच एक सत्य आहे हे मर्म लक्षात ठेवून विदूषकासारखे प्यादे वापरून ती सत्ता लोकशाही पद्धतीने हस्तगत करण्याची गोष्ट म्हणजे ही विदूषक कथा आहे. 2)कथेतील अतार्किक घटना इतक्या त्वरेने घडत असतात की वाचकाला संभ्रम पडतो की खरच पुढे काय घडणार आहे आणि वाचक मग भयकथेतील किंवा रहस्यमय चित्रपटातील प्रत्येक हालचाल, प्रत्यक्ष शब्द, त्याचा उच्चार, त्याचा कथेवर होणारा परिणाम व अंतिम सत्य काय असेल याचा शोध घेण्याच्या प्रवासाच्या प्रवाहात कथेमध्ये प्रवाहपतित होतो. 3) ही कथा, सत्य, सत्याचे प्रकार, निष्ठा, भय, उदात्त विचार, लोकशाहीची क्रूर हत्या करण्यासाठी शब्द खेळ, सत्ता प्राप्तीच्या सोपानावरती प्रतिष्ठित राजकुमारांच्या हत्या, धर्म गुरूची इच्छापूर्ती अशा विषयावर फिरते. विदूषक, विष्णूशर्मा, एक अपमानित पंडित, वाक चातुर्य असणारा

बुद्धीवादी, राजसभेत अवहेलना झालेला व पत्नीच्या व्यभिचार मुळे मनो व्यथित असलेला, स्वार्था करता व स्वतःला दुसऱ्यांदा राज्यात अमात्यपद मिळावे म्हणून chadm वेश पांघरून, गलिच्छ राजकारणात स्वतःहून पाय ठेवणारा असा आहे. तो एक गर्विष्ठ, शब्द जंजाळ आयुष्य जगणाऱ्या बुद्धीनिष्ठ माणूस म्हणुन त्याच्या माध्यमातून ही कथा प्रवास करते. आपण नेहेमी जाणतो त्याप्रमाणे विदूषक हा फक्त मनोरंजनाच्या करता वापरलेला एक वेशधारी राजाचा नगण्य भाट माणूस असायचा. राज दरबारात विनोद व मानसिक भार हलका करण्याकरता वापरला जाणारा प्राणी. पण कथे मध्ये तोच विदूषक मात्र महत्वाकांक्षी दाखवलेला आहे. त्याला प्यादे म्हणून धर्मसत्ता व राजसत्ता कसे वापरून घेतात त्याची ही गोष्ट आहे. 4)विदूषक कायम सत्याच्या मागे व दरवेळेस विदारक होत गेलेले, अंशतः कळलेले सत्याला पूर्ण सत्य मानून, स्वतःच्या आत्म मग्न विचारात स्वतःचीच पाठ थोपटून घेण्याचे भान मनात ठेवत त्याची चाललेली चाल म्हणजे विदूषक विष्णूशर्मा. 5) धो. वि. देशपांडे विदुषक बाबत लिहितात की विदूषक नेहमी वदंताचा ऐकतो, त्याला सत्य आवडत नाही. कारण वदंता सुंदर असते, ती नित्य नवे नवे रूपे घेत असते उलट सत्य स्थिर आणि म्हणूनच जड असते. जगात जडा मध्ये कधीच परिवर्तन शक्य होत नाही. म्हणून त्या अर्थाने सत्य एकदा कळले म्हणजे ते कायमचे बोकांडी बसते. विदूषका ला सत्य आवडत नाही ते यामुळेच. मग तो शब्दजाल पसरत जातो, त्यातच स्वतः गुंतत जातो. एक फुकाचा भ्रम निर्माण करून सत्य झाकायचे प्रयत्न करतो. त्यालाच म्हणतात पर्यायोक्ति. त्यामुळे विदूषक या कथेचे प्रतीक म्हणजे काय ते तर ते म्हणजे शर्करा अवगुंठन केलेले संशयी वागणे. सर्व कथा भर सगळेजण स्वतःवरती झाकण घालत आहेत तर विदूषक मात्र ती झाकणे वर करकरून सत्य शोधतो आहे व त्या फटीतून जे दिसेल, जेवढे दिसेल, त्याला चक्क सत्य समजून विजयराजसह खुद्द स्वतःची वंचना करून घेतो. त्याला स्वतःला स्वसंरक्षणाच्या संदर्भात सध्याचे होणारी ज्ञान किंवा अज्ञान हे पूर्ण असंगत आहे हे अंततः आतून जाणवत असतं. 6) या कथेत एकमेकांबाबतचे सूड आहेत, वैर आहे, कुटील पणा आहे, संघर्ष आहे, बुद्धिबळ आहे, बुद्धिभ्रम आहे, शब्दांचा उगीचच केलेला खेळ आहे, शब्दछल

आहेत, घटना आहेत, नियती आहे, मानवी कृती आहे, संकेत आहेत, विधीलिखिते आहेत, बहुरंगी स्त्री चरित्र आहे, काय नाही या कथेमध्ये. त्यामुळे मानवाच्या मागील इतिहासातून एक ठाम निष्कर्ष ही कथा वाचून निश्चितच काढता येतो तो म्हणजे प्रत्येक मानवी कृत्या मागे, ते परोपकारी असो किंवा हिंसक असो, स्वेच्छेने केलेले असो किंवा बळजबरीने केलेले असो, आक्रमणासाठी किंवा स्वसंरक्षणासाठी केलेले असो, तीव्र इच्छा असलेले असो किंवा थंड डोक्याने आखणी करून केलेले असो, असे ते कृत्य, एका मोठ्या व्यापक घटनेचा किंवा क्रूर कारस्थानाचा अविभाज्य व घटक असते व असे कोणतेही कृत्य कधीही दुर्लक्ष करण्यासारखे कधीच नसते. त्याचा परिणाम कोणत्या ना कोणत्या स्वरूपाने नक्कीच जाणवतो. मग तो परिणाम म्हणजे ती भीती असो, भय असो, मृत्यूक्षण असो, किंवा जीवन श्वास असो . 7)सत्य या एका शब्दावर व सत्ताप्राप्तीची विधाने अशी या कथेतील जीएन ने लिहिलेली वाक्य वाचत गेलो तर त्यांनी केवढा सखोल विचार त्यांनी केला आहे हे प्रकर्षाने जाणवते. या कथेत आलेली सत्या बाबतची काही वाक्ये मी अभ्यासाकरता उद्धृत करतोय. a)मी फक्त vadantach ऐकत असतो. सत्य नाही. एकदा काहीतरी ते सत्य झाले की ते स्थिर, जड आणि चैतन्य हीन होते. b) प्रति पक्षाला चांगली समजेल अशी भाषा वापरण्याचे सामर्थ्यां नसेल तर शहाण्याने त्या ठिकाणी सत्यही खपवायला कधीही जाऊ नये. C) तात्पर्याचे खरे कौतुक ते हेच की त्याचा मूळ कथेशी संबंध असलाच पाहिजे असा काही दंडक नाही. D) राजकारणात धर्मराज वस्त्रहरण करून सत्य स्वरूप दाखवण्याचा प्रयत्न करतात तर सत्ताधारी दुःशासन भरजरी वस्त्रे टाकून डोळे दिपवून स्वतःची लाज राखतात. E) राज्य व्यवहारात एकनिष्ठा समूळ नाशासाठी कारणीभूत होते. या व्यवहारी जगात आपले निष्ठा यशानुयायी ठेवण्यात नेहेमी हित असते. F) राजसत्तेचा एक विशेष आहे व त्यामुळे सर्व जणांना तिचे अमर्यादा आकर्षण असते तिच्या प्राप्तीचा, योग्यता अथवा गुण, याच्याशी फारसा संबंध नसतो म्हणून ती पूर्णपणे आपल्या देखील आवाक्यात आहे असे प्रत्येकाला वाटत असतं. त्यासाठीच राजसत्तेची स्पर्धा असताना प्रत्येक पंक्तीत आपले एक पान मांडून ठेवावे लागते. G) नाहीतर सामर्थ्यशाली करतात

तो धर्म आणि कुटील जी आचरतात ती नीती हीच स्थिती असते दुर्बलांना त्यांच्या वाटेला राहिले राहता राहिले ते तत्त्वज्ञान. H) संपूर्ण सत्य पाहण्याचे भाग्य मानवाच्या दोन नेत्राना कधीही लाभणार नाही. कारण आपल्या मार्गात सत्य हे अंशतः प्रकट होत असते. म्हणून मानवाला सत्याचे. विविध अंश एकत्रित करता येतील. विविध खंड बुद्धीच्या साहाय्याने एकत्र सांधता येतील. व एका खंडा पेक्षा दोन साधित खंड जास्त सत्य असतात पण पूर्ण सत्य नसतात. I) सत्य इतक्या सहजतेने प्राप्त होत नाही सत्य दिसते ते अंशा अंशाने नव्हे तर ते अनेकदा सूक्ष्म सूचक चिन्ह धारण करून येतं आणि त्याचा अर्थ लावणे हे बुद्धीचा कर्तव्य आहे. J) विजयाच्या क्षणीच सावध न होण्याचा शाप बहुसंख्य मानवांना असतो उलट द्यानी माणसे यशाने जास्त सावध होत जातात. K) ज्याला इंद्राणी मिळवायची आहे त्याने पातीव्रत्याच्या कल्पना मानू नयेत ज्याला राजसत्ता हवी आहे त्याने धर्म कर्माची क्षिति ठेवू नये. L) जीवनात प्रत्येकास कधी ना कधी तरी चिरंतन स्वरूपाचा निर्णय घ्यावा लागतो आणि अशा क्षणी प्रत्येक व्यक्ती सदैव एकाकीच असते. M) मानवाच्या जीवनात संपूर्ण सत्य कधी दर्शन देत नाही, ते अंशा अंशाने सूक्ष्मलक्षणांनी दृश्यमान होत होतं , ते पाहण्याची प्रखर बुद्धी मात्र हवी. N) सत्य काही वेळा फार मायावी स्वरूपात प्रकट होतं, सारे सूर्यप्रकाशासारखे स्वच्छ वाटतं त्याचवेळी सावध राहण्याचा क्षण असतो. M) सत्य खंडशहा दृश्यमान होते. अनेकदा ते मायावी असते हे खरे, परंतु मायावी दर्शन देऊन मानवाला वंचित केल्यावर तिथे अनेकदा सरळ दैदीप्यमान स्वरूपातही प्रकट होते. N) आभास व सत्य यातील विरोध ओळखणे हा खरा ज्ञानमार्ग आहे. या ठिकाणी सत्य सरळ स्पष्ट होते. O ) भविष्यकाळाचे विविध, तलम तरंग माझ्या मधून संक्रांत होतात आणि भूतकाळात मिळून जातात आणि मग मला माझे सत्य भूतकाळात दिसते. भविष्यकाळात नाही. P) ज्या सत्यांची देवाण-घेवाण होऊ शकते किंवा ज्यांच्या बाबत विविध प्रकृतींच्या जणांचे एकमत होते ती सत्य क्षुद्र मोलाची असतात किंवा अप्रस्तुत निर्जीव घटित तरी असतात. Q) आपल्या जीवनात नियतीची गुप्त क्रीडा असते. 8)धो वी. देशपांडे विदूषकाचे सत्याचे ज्ञान

याबाबत लिहितात की या सर्व कथानका मध्ये जेव्हा सत्ता दंड धर्मगुरूंच्या स्वाधीन होतो त्यावेळेस शत तुकडे असलेले विदूषकाचे सत्य उघडे पडते. त्याला अमात्य पद मिळणार नसते . पुढील तीन वर्ष तो पुन्हा रिकामा असणार असतो. त्यात त्याच्या आयुष्याची वाढवते ती चंचला. ती पहिल्यांदाच व पहिल्याच फटक्यात त्याला नावाने अशी ओळखून त्याचा पूर्व इतिहास, विदूषकाच्या आयुष्याचे, सत्य सरळ कथन करते. हरू लागलेला विदूषक आपल्या बुद्धी पंडिताने, सत्य, सत्याचे दर्शन, त्याचे अंश दर्शन, पूर्ण सत्याचे आकलन, यावर भाष्य करत राहतो. जे सत्य तो सांगू इच्छित होता ते सत्य तरी काय होते ? ते अंतिम सत्य नव्हते, शाश्वत सत्य नव्हते, चिरंतन सत्य तर नव्हतेच नव्हते. ते एक साधे व्यावहारिक सत्य होते. स्वार्थ साधणारे, पण पद न मिळालेले सत्य होते. अभय राज विजयराज यांचा कपटाने घडवून आणलेला मृत्यू, धर्मगुरूंचे बाह्य आवरणाचे सत्य होते. ते स्वार्थी सत्य होते. संपूर्ण सत्य होते. पण विदूषक यातील एकही सत्यापाशी पोहोचू शकला नाही हे एक त्रिकाला बाधित सत्य होते.     9) सत्याचे आयुष्य हे कायम भूतकाळातच असते. या कथेत पहा ना दिव्य वज्राचार्यांनी सांगायचे, त्या दिव्यांची चिन्हे चंचला किंवा ध्रुवशीला दाखवणार, या चिन्हांच्या वरून सत्य मात्र विदूषकाने शोधायचं का तर त्याला अमात्य पद मिळावे म्हणून. कोणाकडून तर, भविष्यातील होणाऱ्या राजाचा अमात्य म्हणून. विदूषक सत्य शोधू शकतच नाही कारण तसा शोध अशक्यच आहे. तत्वतः व कथेतील प्रत्येक दिव्यांच्या पायरीवरती विदूषकाच्या त्या क्षणाच्या वर्तमानामध्ये सत्याला अस्तित्वच नाहीये. भविष्यात जे घडणारे आहे ते घडल्यानंतरच सत्याचा जन्म होत असतो. त्यामुळे सत्य काय असेल याचा अंदाज करणे, कयास करणे, एवढेच विदूषक च्या हातात होते. अंदाज जिंकला तर उल्हास व आनंद, हरला तर निष्कारण निष्फळ शब्दाची करामत कारण तोपर्यंत घटना, मृत्यू घडून गेलेला असतो. विदूषक ही बुद्धिबळावरचे प्यादेच आहे. कोणाचा तरी सपोर्ट आहे म्हणून खेळी खेळण्याचा जोम त्याच्याकडे आहे. सपोर्ट गेला की तो गलितगात्र होतो .     10) विदूषकाला सत्याचा खालील गुणधर्म, तो स्वतः पंडित असूनही माहिती नाही. सत्य हा शब्द "अस" ह्या धातूपासून तयार होतो. "अस" म्हणजे

असणे. जे आहे ते सत्य. जे नव्हते व नाही त्ये सत्य नाही. आज अनागत असलेले, माहीत नसलेले, उद्या भविष्यात जे घडणार आहे त्याला सत्य म्हणत नाहीत. ते भविष्य म्हणूनच ओळखले जाते. अतीत व वर्तमान या दोन कालबंधनात बद्ध असणे हा या सत्याचा सहज गुण आहे. चंचला सत्य जाणते व सांगते. "मला माझे सत्य त्या भूतकाळात दिसते" ती पुढे हे ही म्हणते प्रत्येकाने आपापले सत्य स्वतःच्या रक्ताच्या स्पंदनावर पारखून घ्यावे लागतेच. तसे ते पारखून घ्यावे ही लागते हे चंचलाचे सत्यभाष्य म्हणजे अस्तित्ववादी का अस्तेतावादी अशा ज्ञान मीमांसा चा अर्क होय. ही अशी नजर ठेवली की प्रत्येक सत्य प्रत्यक्ष (perspetual) व अनुमानित ( inferential) अशा सत्याच्या मर्यादा स्पष्ट होतात. मात्र विदूषकाला त्याला जाणवलेला सत्यांचा नेमक्या त्याच मर्यादा दिसत नाहीत व ते सहाजिकच आहे. पांडित्यगर्भ, स्वार्थलोलूप आणि स्वार्थी अशा त्याच्या डोळयांना हा नजारा नजरेसमोर येतच नाही. त्याला ते दिसतही नाही, पाहता पण येत नाही. 11) धो. वी. देशपांडे विदूषकाला आणखीन एक आयाम देतात. राजकारणी खेळी खेळणारा खेळीया म्हणून. अभय राज व विजयराज त्यांच्या समोर अगदी दोघे ही, दोन मोहरे आहेत. धर्मगुरू, राजगुरू, विदूषक हे जसे सांगतील त्याप्रमाणे मागेपुढे होणे हे त्यांचे काम आहे. पटाच्या एका बाजूला हे धर्मगुरू आहेत तर दुसरीकडे बसलाय विदुषक. विदूषक एक ठक असेल तर धर्मगुरू महाठक आहेत. म्हणजे स्वार्थी कुटीलतेचा निखालस महा अर्क आहे. विदूषक त्याच्या स्वार्थाकरता बुद्धी वापरतो पण शेवटी तो असहाय्य होऊन हरतो कारण त्याला इतर कोणाचे पाठबळच नसते. आणि त्याचा कोणावरती विश्वासही नसतो. गुरूच्या कडे धर्माचा कमांडलु तर होताच पण तो अडकवायला राजदंडाची खुंटी पण त्यांच्याकडे होती, त्यांना ती हवी पण होती. या सर्वांचा संयोग म्हणजे सर्वाधिकार म्हणूनच धर्मगुरू कपटनीतीने पण सर्व जनतेच्या साक्षीने अगदी विदूषकाच्या साक्षीनेही विजयराज व अभय राज यांचा काटा काढतात. इकडे विदूषकाला वीर वर्मा याने केलेली अवहेलना सलत होती. त्यामुळे पुन्हा प्रतिष्ठा मिळण्याच्या आमिषाने, अमात्य पदाच्या आशेने कोणावर तो विश्वास ठेवत नाही. त्याला राग येतो . त्याचे निराकरण करणारी त्याची बुद्धी म्हणून स्वतःच्या

बुद्धीवर भिस्त ठेवून तो चाली खेळत असतो. मानवी इतिहास हेच सांगतो की ज्याचा कोणावरती विश्वास नसतो त्याचा स्वतःवर अतिविश्वास असतो. अर्थातच अति तेथे माती या न्यायाने विदूषकाच्या पदरी पडतो तो पराभव. अगदी सर्वांगाने, अगदी सर्वार्थाने. 12 ) या कथेमध्ये विदूषक, धर्मगुरू, चंचला,ध्रुवशीला व डोंब ही प्रमुख पात्रे आहेत. त्यातील सुखी कोण आहे किंवा झाले? ते सुद्धा वैर भावना ठेऊन , सूड भावना ठेवून. अंतिम ध्येय प्राप्त झाले तर ते सुख कसे काय ?असा कार्य कारण भाव कथेत नाही, नसावा. अर्थातच सर्वात सुखी धर्मगुरू तीन वर्ष धर्म व राजसत्ता , याचा ध्रुवशिले बरोबर शरीर सुखाची सोय करून ठेवून, लोकशाही पद्धतीने अनेर्बंध सत्ता मिळवलेली आहे. ध्रुवशीलेला सम्राज्ञपद नाही, एवढे सोडलं तर ध्रुवशीला सर्वार्थाने सुखी. तिचे डोंबा वरती प्रेम त्यामुळे डोंबालाही अनपेक्षित लाभ. ध्रुवशिलेला झाला तसा त्यालाही स्त्री फुकटच मिळाली. नियतीने हे दान या तिघांना कोणत्या निकषावरती दिले आहे याबाबत जे लेखक म्हणून जी.ए. मौन आहेत. उरले ते विदूषक व चंचला आहेत. यातील चंचलने त्याचे गर्वहरण केले परंतु चंचलने तिच्या शब्दांनी विदूषकाचा बुद्धी गर्वही नष्ट केला. विदूषकाने त्याच्या शब्दांनी तिच्या मनातले विजय राजा वरचे प्रेमाच्या प्रतिमेचा भंग केला. एकूण दोघेही रिकामेच राहिले. रिकामी राहिली ती चंचला, जगण्यास काही कारण उरले नाही म्हणून चंचलने आत्मघात केला. विदूषक त्यामुळे चक्रावून गेला, सैरभैर होत रानात भटकत राहिला. अनपेक्षित पणे त्याला ध्रुवशीला उत्कटपणे डोंबाकडे धावत जाताना दिसली तो आश्चर्यचकित झाला आणि ध्रुवशीला डोंबाशी एकरूप झाली. 13 ) देशपांडे यांच्या म्हणण्याप्रमाणे कथेला अजून खूप पदर आहेत अगदी कांद्याच्या साला प्रमाणे एका मागोमाग एक साल काढली तर कांदा अभंग राहतो. तसेच तत्व त्या कथेवर लिहावे तेवढे कमीच आहे अर्था मागून अर्थ काढले तरी नवे पापुद्रे, नवे अर्थ सुचत राहतात राहतील. पहिला स्तर निखळ मनोरंजनाचा असेल. कथा कोणीही वाचावी समजली ठीक नाही समजले तरी ठीक. बाजूला ठेवून दिली .दुसरा स्तर राजकारणाचा, त्याचे फक्त हिमनगाचे टोक दाखवलेले कथेचे मध्ये आहे. तिसरी पातळी सत्यासत्यविवेक ज्याचा उहापोह थोडा विस्तारित वर केलेला आहे.

लिहिण्याचा मनापासुन प्रयत्न केला आहे. चौथा स्तर जीवनाचे तत्त्वज्ञान व नियतीचा खेळ. याव्यतिरिक्त आणखीन काही पदर असतीलही ते पदर जाणकार वाचक निश्चित शोधून काढतील आणि विदूषक कथा आणखीन एका वेगळ्या आयामाने आपल्याला समजू शकेल. ............. ..... लेखन सीमा. 23.01.2023. कोथरूड. पुणे. संजीव सावरगांवकर.

- - सुनीळ सामंत : संजीवजींनी विदूषक या कथेतील मला न उमगलेले अनेक धागे शोधले. आधी ते मांडतो.

सत्ता उपभोगणे हेच एक सत्य आहे हे मर्म लक्षात ठेवून *विदूषकासारखे प्यादे* वापरून ती सत्ता लोकशाही पद्धतीने हस्तगत करण्याची गोष्ट म्हणजे ही विदूषक कथा आहे.

*अतार्किक घटना*

विदूषक, विष्णूशर्मा, एक अपमानित पंडित, वाक चातुर्य असणारा बुद्धीवादी, राजसभेत अवहेलना झालेला व पत्नीच्या व्यभिचार मुळे मनो व्यथित असलेला, स्वार्था करता व स्वतःला दुसऱ्यांदा राज्यात अमात्यपद मिळावे म्हणून छद्मवेश पांघरून, *गलिच्छ राजकारणात स्वतःहून पाय ठेवणारा* असा आहे. तो एक *गर्विष्ठ, शब्द जंजाळ आयुष्य जगणाऱ्या बुद्धीनिष्ठ माणूस*

विदूषका ला सत्य आवडत नाही (धोंवि)

हे सर्व विचार करून पुन्हा एकदा कथा वेगळ्या प्रकाशात वाचावी लागेल.

संजीवजी यांचे मनापासून आभार.

- - अलका तडकलकर : राजेशाही जीवनाचे आकर्षण माणसाच्या स्वभावात आहे ते कसे मिळवता येईल याकडे सर्व प्रकारची माणसे प्रयत्नशील असतात irrespective of profession .

यात ज्याचे दैव बलवत्तर तोच कसाही असो .त्याला ते मिळणारच

- - SANJEEV sargaonkar, Kothrud: संपूर्ण कथेवर विदुषक याची छाया आहे. त्याचे अस्तित्व कथे मध्ये सर्व स्पर्शाने आहे. त्याला वेगळा काढा कथेतून, मग कथा एकदम विस्कळित होऊन जाईल. तो आहे म्हणुनच कथेची वीण एकदम घट्ट आहे. मी ही केंद्रस्थानी धर्मगुरू किंवा चंचला किंवा इतर ठेऊन कल्पना केली, पण मग कथा पूर्णतः बदलली असती. ते जी. ए. साहित्य झालेच नसते. बुडणाऱ्या माणसालाच फक्त श्वासाची किम्मत लवकर कळते त्याप्रमाणे गेलेले अमात्य पद हे त्याचा survival करता अत्यंत जरुरीचे असते. ते त्याला मिळत नाही. स्वतः पुरते *सत्य* शोधतो त्यावेळेस त्याला इतर *सत्ये* कळतात व त्याच्या पराभवाची कारणे ही कळतात. म्हणुन विदुषक केंद्रस्थानी आहे, असण्याची कथेची गरजच आहे.

- - SANJEEV sargaonkar, Kothrud: आता डोंब. दूत कथे मधे डोंब ही अत्यंत प्रमुख वैशिष्ट्य पूर्ण कथानक नायक आहे. डोंब हा त्या काळात सर्वात खालील कुळातील व समाज सोपान मध्ये निकृष्ठ दर्जाचा नागरिक , ज्याला भावना नाहीत पण कर्तव्य चुकत नाही. अशी व्यक्ति. या विदुषक कथेत डोंब फक्त पाया पडण्यास दाखविला आहे. नंतर त्याचा प्रवेश शेवटी आहे. या कथेत त्याचा वापर *"पूर्ण पुरुष "* म्हणुनच केला आहे. त्यात स्त्री त्याच्याकडे आकृष्ट होते. तो अपेक्षा हीन आहे. त्याही पेक्षा महत्वाचे अपेक्षाभंग विदुषक याचा तर अनपेक्षित स्त्री लाभ डोंब याचा. म्हणुन विदुषक जास्त व्यथित आहे. डोंब न्यूट्रल दिसतोच.

- -mahesh aphale: नाही,या कथेत तरी तसे नाहीय असे माझे मत

जी एं नी फार पूर्वीच सांगून ठेवलेय की माझी कोणतीही कथा खऱ्या अर्थाने समजून घ्यायची असेल तर स्वतःला त्या कथेच्या केंद्रस्थानी कल्पावे लागेल

आणि मी या ग्रुपवर या चर्चेत मागेच नमूद केले होते की

ही कथा वाचता वाचता आपण सर्वजण आपोआप "विदूषक"होऊन जातो(आणि हा चक्रव्यूह जी एं नी जरी रचला असला तरीही ही कथा लिहिल्यावर न जाणो खुद्द जी एं नाही याच हताश भावनेने ग्रासले असेल

कुशल जाळे विणून झाल्यावर कोळयाला तिथून नेहमीच सहजपणे निसटता येतेच असे नाही,किमान भक्ष्य स्वाहा करण्यासाठी त्याला तिथेच जाळयात जावे लागते,या अर्थाने कोळयाचे जाळे हा त्याचा तुरुंगच

कोणत्याही विदूषकाला हा अटळ प्रवास करावा लागतो,आणि म्हणूनच

विदूषक हेच केंद्रस्थान

- - विलास वाघोलीकर : आपण प्रतिभाशाली, लक्षात रहावे असे विवेचन केले आहे . अर्थात जीएंची ही उत्तुंग कथा आहे. त्याचे विवेचन तसे हवे .आपले अभिनंदन व धन्यवाद .

- कथेत विदूषक हे पात्र सुरुवातीपासून शेवटपर्यंत आहे. विदूषक हा हाडामासाचा ,महत्वाकांक्षा असलेला पण अगदी दुर्जन नाही, असा माणूस दाखवला आहे. स्पर्धा राजपदासाठी आहे. त्यात कुटिलता, दगाच असणार हे त्याला माहित होते .पण विजयराजाने त्याची बुद्धी पाहून त्याला मार्गदर्शक म्हणून निवडले . तो काही स्वतः होवून मार्गदर्शक झाला नाही . पण त्याच्यात निष्ठा ,सद्गुण असल्यामुळेच, त्याने विजयराज यशस्वी होईल असे प्रयत्न केले . पण त्याच्या बुद्धीची ही मर्यादा होती की, धर्मगुरूच स्पर्धक होवून कुटिलता वापरेल हे त्याला ( व शेवटपर्यंत वाचकाला ) कळाले नाही .

- धर्मगुरू, ध्रुवशीला ही काळी, कुटील पात्रे आहेत . या सर्व पात्रांचा परिस्थिती व्यूह, बुध्दीबळाचा खेळ जीएंनी दाखवला आहे . त्या खेळात नियती गुप्तपणे कार्यरत असते . अगदी धर्म गुरु बद्दलही नियती आहे . हे जीएंनी दाखवले

आहे . धर्मगुरू, ध्रुवशीला यांनी आत्मा विकला आहे, ते ( अगदी आपापसातही ) पूर्ण कुटिल झाले आहेत. म्हणून ते रूढार्थाने यशस्वी होतात . हा अंतस्थ प्रवाह जीएंनी मौन बाळगून सांगीतला आहे . विदूषक कथा , एकूण कुटिलता पुढेही चालू राहते, हे दाखविण्यात ही कथा यशस्वी झाली आहे . धन्यवाद . विलास वाघोलीक

2 ) सर्व पात्रांचा परिस्थिती व्यूह, बुध्दीबळाचा खेळ जीएंनी दाखवला आहे . त्या खेळात नियती गुप्तपणे कार्यरत असते . अगदी धर्म गुरुबद्दलही .ध्रुवशीला डोंबाची खरी प्रेमिका होते हे दाखवून धर्मगुरूही नियती पासून सुटलेला नाही . हे जीएंनी दाखवले आहे . म्हणून कथेत डोंबाला महत्व आहे . विदूषक सुरुवातीला डोंबाला नमस्कार करतो . धर्मगुरूपेक्षाही डोंब यशस्वी होतो . जिच्या मुठीत सत्ताधीश आहे, ती धुवशीला असते पण तिच डोंबाला अंकित आहे . विलास वाघोलीकर

- - Vishweshwar Nandedkar: हा सर्वात महत्वाचा प्रश्न आसू शकतो. विदूषकाचे सोंग नक्कीच सर्व राज दरबारी यांची दिशाभूल करण्यासाठीच आहे हे तर उघडच आहे. पण विजयराज त्यांना निवडतो म्हणजे त्यांचा मूळ उद्देश भावी सम्राटाला मदत करून अमात्यपड मिळवण्याचा तरी नक्की नाही. अर्थात त्यांचा उद्देश हा नक्कीच स्वतः साठी काहीतरी या राज्यातून मिळवायचे हा आहे, त्या अर्थाने ते स्वार्थी म्हणता येईल , पण तो कपटी म्हणता येईल इतका श्रुड नक्कीच आहे , त्याने अभयराज च काटा क्या पद्धतीने काढला त्या वरून उघड आहे. त्याचे तर्कशास्त्र पण नक्कीच उत्तम आहे , नक्कीच गर्विष्ठ पण आहे , चांचलेला नावावरून ती स्वभावाने चंचल आहे असे मोठ्या विश्वासाने ठरवणे येथे त्याच्या हुशारी पेक्षा थोडे मुरखपणाकडे वळणारे विचार आसेल म्हणावे लागते. चंचला त्याच्या बुद्धीचा भ्रम जेव्हा दूर करते तेव्हा आपली बुद्धी आपण समजतो तेवढी तेज नाही हे पण तो समजून जातो .

जी ए म्हणतात त्याप्रमाणे वाचक या कथे स्वतः ला विदूषकाचे पत्रात ठेवतो तेव्हा त्याला जी ए बहुतेक हे सांगत आसवेत की तुम्ही नेहमीच स्वतचे मूळ स्वरूप लपवून वेगळा मुखवटा वापरून जगत आसता. आणि स्वतला आती हुशार समजत आसता , आणि तर्कशास्त्र मध्ये खूप हुशार आहात असे ही मानता, पण प्रत्यक्ष परिस्थीत कशी वेगळीच आसते आणि अनेकदा तुम्ही कसे चुकीचे ठरता , हे बहुतेक ठसठशीत पणे दाखवून देतात.

-----

- - Rajesh Unavane: विदूषक*

*‘देशभक्ती हा बदमाशांचा शेवटचा अड्डा असतो’* असे सॅम्युल जॉनसन ने १७७५ साली म्हटले होते. बेनॉर्ड शॉने यात थोडासा बदल केला १५० वर्षानंतर. त्याने म्हटले, *‘राजकारण हा बदमाशांचा शेवटचा अड्डा असतो.’* आणि गंमत म्हणजे..., आजतागायत जगातील कोणत्याही राज कारण्याने या विधानावर आक्षेप घेतलेला नाही, हे विशेष.

तर सांगण्याचा मुद्दा असा की, ‘विदूषक’ कथेतील पात्रे या दोन्ही वाक्यात चपखल बसतात. सत्ता संघर्ष होण्यासाठी कमीतकमी दोन गट असावे लागतात.

कथेतील दोन गट म्हणजे --- १) धर्मगुरू, ध्रुवशीला व डोंब. २) विदूषक, विजयराज व चंचला

यातील पहिला गट तात्पुरता सत्तेवर आला आहे. साहजिकच तो शक्तिमान आहे. त्यास दैवयोगाने मिळालेली ही सत्ता सोडायची नाहीए.

दुसरा गट आपल्यावर झालेल्या अन्यायाचा बदला घेणेसाठी निर्माण झाला आहे. प्रत्येकावर झालेला अन्याय वेगवेगळा आहे. तो जरी वेगवेगळा असला तरी सत्ता हस्तगत केल्याशिवाय तो अन्याय दूर होणार नाही. त्यामूळे ‘‘सत्ता मिळवणे व सूड घेणे’ हा एकच समान उद्देश या गटातील तिघांकडे आहे.

*या दोन गटातील हा संघर्ष कावळा व हंस या कथेतून सुरवातीसच प्रतिभावान जीए विशद करतात.*

कावळयांचा गट लोकशाहीचा आधार घेतो. कारण यांची संख्या जास्त आहे. मूळ विदूषक कथेतील इतर पात्रे – सेनानायक, कोषाधिपती, कविराज, नौदलनायक इत्यादी हे सत्ताधारी पहिल्या गटाशी कसा लाळघोटेपणा करतात हे जीएंनी सुरवातीलाच शब्दबद्ध केले आहे. ते विदूषकाची टर उडवत असतात.

कावळया -हंसाच्या कथेमध्ये अन्यायकारक मतदान केले जाते. नंतर हंसानाही मारून कावळे सर्वसत्ताधीश होतात.

थोडक्यात, लोकशाहीचा मार्ग अनुसरून राजेशाही (किंवा हुकुमशाही) सुरू होते. या दोन्ही शाहीत विरोधक नसतात. असले तर नष्ट केले जातात. हंसाप्रमाणे. *विदूषक कथेतही हेच घडते.*

(याठिकाणी Winston Churchill यांचे एक सुप्रसिद्ध वाक्य आठवते— *"जगामध्ये लोकशाही ही सर्वात ठिसूळ राज्यपद्धती आहे. पण यांहून दुसरी चांगली राज्यपद्धती अस्तित्त्वात नाही."*)

कथेतील विदुषक हे पात्र महत्त्वाचे आहे. तो पंडित आहे. गुरुकडे अध्ययन केलेला आहे. गुरु अनुग्रह देताना म्हणतात, "वत्सा, *जा आणि ज्ञानी हो.* तुला कोणत्याही परंपराजड गुरुकुलात प्रवेश मिळणार नाही आणि कोणताही आचार्य तुला दीक्षा देणार नाही, असा मी तुला आशीर्वाद देतो."

तू ज्ञानी झाला आहेस असे गुरुदेव म्हणत नाहीत. तू इथून जा व ज्ञानी हो असे ते सांगतात. म्हणून हा विदूषक ज्ञानी नसून पंडित आहे. अहंकाराला अजून तो जिंकू शकलेला नाही.(ज्ञानी व पंडितातील मुलभूत फरक)

त्याचे पांडित्य कथेमध्ये तो सतत दाखवत असतो. आपण जणूकाही 'ज्ञानी' झालो आहोत या भ्रमात तो आहे. अहंकाराचा वारा अजून त्याच्या अंगात आहे. स्वत: ज्ञानी असल्याची गैरसमजूत त्याची झाली आहे , त्यामूळे वाचाळपणे पांडित्य

सतत दाखवणारा तो एक "विदूषक" झाला आहे. म्हणून कथेमध्ये जीए त्यास 'विदूषक' संबोधतात. *अमात्यपदाची आशा बाळगणारा, मृत्युला घाबरणारा, तरीही स्वत:ला ज्ञानी समजणारा एक अहंकारी. म्हणून तो एक 'विदूषक'.*

पण या पंडितास कथेमध्ये 'विदूषक' या नावाने कोणी बोलावत नाहीत. (कारण कशासही, कोणालाही त्याच्या खऱ्या रोखठोक नावाने बोलवायचे नाही ही दिवंगत पुण्यश्लोकाची आज्ञा)

'बृहस्पती' (सेनानायक व कोषाधिपती यांनी केलेला उल्लेख), 'बुद्धीभास्कर' (दुर्गाधिकाऱ्याने मारलेली हाक), 'पंडितराज' (अभयराज व विजयराजने केलेला उल्लेख). पण त्याला 'विदूषक' असे नावानिशी हाक मारली जाते ती प्रथम विजयराजकडून. *विजयराज म्हणतो, "अशा स्थितीत नि:पक्षपाती मार्गदर्शन होईल ते दोघांकडूनच : रक्ताशी देवीकडून अथवा विदूषकाकडून"* विजयराजने हा आज्ञाभंगच केलेला आहे. पण ते दोघेही आता सत्ता काबिज करणेसाठी उतावीळ आहेत. सोबत विजयराजच्या प्रेयसीची -चंचलेची साथ आहे.

शेवटी या सत्तासंघर्षात कावळे विजयी झाले आहेत. स्वत:ला ज्ञानी समजणारा अहंकारी विदूषक, मृत्युच्या भयाने कापणारा हा पंडित साहजिकच पराभूत झालेला आहे. त्याचे वर्णन जीए यांनी शेवटी केले आहे. अंगातील वस्त्रे फेकून देणे, केस विस्कटणे, माती चेहेऱ्यास फासणे, वगैरे..

'सिंहासन' कादंबरीमध्ये श्री.अरुण साधू यांनी निर्मिलेला व श्री.जब्बार पटेल यांनी चित्रबद्ध केलेला पत्रकार दिनू टिपणीस याची लिहितालिहिता आठवण झाली.

जगाच्या व भारतीय इतिहासात सत्ता संपादनासाठी असे संघर्ष सातत्याने घडत आलेले आहेत. जीए आपल्या प्रतिभाशक्तीने हा संघर्ष कथेतून समर्थपणे उभा करतात. तो वाचताना आपण भारावून जातो. ही कथा कितीवेळा वाचली माहीत नाही. पण अजूनही प्रत्येकवेळी कथा वाचताना नवीन काहीतरी हाताशी लागते.

*जीएंच्या बहुतेक सर्व कथांच्या बाबतीत असे नेहमीच घडते.* पण विदूषक, स्वामी. इस्किलार सारख्या कथांची गोष्टच वेगळी आहे. ही हीरे-माणके आहेत.

त्यातील विदूषक या कथेचा आस्वाद घेताना माझ्या अल्पमतीस ही कथा जशी समजली तशी सांगण्याचा, लिहिण्याचा हा ग्रुपमधील माझा छोटासा प्रयत्न. या कथेवरील वरील सर्व मान्यवरांची अभ्यासपूर्ण विवेचने वाचून मला लिहिण्याची स्फूर्ति मिळाली. त्यासाठी सर्व मान्यवरांचे आभार. 🙏

- -Vishweshwar Nandedkar: छान संदर्भासह विवेचन . तरी मला नेहमी वाटायचे कथेमध्ये कावळा आणि हांसाची कथा सांगण्याचे जी ए यांचे काय प्रयोजन आसेल . त्या दृष्टीने कथा वाचायची होती. या दृष्टीने कोणी सदस्य आजुन प्रकाश टाकू शकेल का

- - Deelip Bade पद्धती सर्वात ठिसुळ राज्यपद्धती आहे.हे हंस व कावळे यांच्या सत्तासंघर्षात सिद्ध होते.

- - Jayashree Jangle: खूपच चांगले विवेचन.
पण तरीही एक शंका आहे.
ध्रुवशीलेने डोंबाची निवड करण्याचे कारण काय असावे?

- - विलास वाघोलीकर : त्याचे कारण फ्रॉईडने सांगीतलेला ' इड' असू शकेल

- - सुनीळ सामंत : राजेशजी, अनेक दिवसांच्या खंडानंतर आपण विदूषक च्या निमिताने चर्चेत सामिल झालात त्यासाठी आभार. यावेळीही आपण वेगळ्या

अंगाने चर्चा पुढे नेली आहे. यातील तुमच्या मुद्द्यांवरून मला अचानक एका गोष्टीकडे लक्ष गेले. ती म्हणजे "खार". हंस आणि कावळे तर समजले. पण खार कोण? विदूषक?

तुम्ही पांडित्य आणिज्ञान यांतला फ़रक फ़ार उत्तम प्रकारे दाखवला आहे.

विदूषकाला मिळालेली विविध संबोधने हेही तुमच्यामुळे लक्षात आले. खरेच की. त्याला कोणीच विदूषक म्हणत नाही.

तुम्ही दिलेले सिंहास, चर्चिल यांचे संदर्भ भावले. खुपच चपखल.

- - विलास वाघोलीकर : खरोखर जीएंनी त्या उपकथेत 'खार ' हे पात्र जाणीवपूर्वक योजिले आहे. . . खार सशक्त नसते . सर्व घटना पाहणारी तटस्थ असते . घटनांचे सार समजणारी ,बुद्धीमान, असते . म्हणून ती प्रसंगांचे सार काढते. पण तिलाही प्राण जपण्याचा विवेक - राजकारण कळत नाही . त्यामुळे ती कावळयांच्या चोचीच्या झुंडीत बुद्धीचे शब्द बोलते व प्राण गमावून बसते. दोन बैलांच्या झुंडीत बेडूक ही गोष्ट वेगळ्या संदर्भात आहे. ही हंस -काक कथा एका नाटकाची होवू शकेल. धन्यवाद . विलास वाघोलीकर

- - Rajesh Unavane: आपल्या या प्रश्नाचे उत्तर शोधताना डोंब या संपूर्ण पात्रावर लिहिणे आवश्यक आहे, असे वाटते.

*डोंब* --

मूळ कथेमध्ये डोंबाचा उल्लेख दोनदाच आलेला आहे. *डोंब बाबत या ग्रुपवर संजीवसर व वाघोलीकर सर यांनी छान लिहिलेले आहे. ते वाचनीय व डोंब समजण्यास मदत करते.*

*ध्रुवशिलेने डोंबाची निवड केली यास एकच प्रमुख कारण आहे.*

डोंब हा या कथेत धर्मगुरुचा निष्ठावंत सेवक आहे. शरीराने बलवान, रांगडा आहे. धर्मगुरुच्या आज्ञा पाळणे ही त्याची या साम्राज्यात असलेली एकमेव भूमिका. मग ती आज्ञा एखाद्याचा जीव घेण्याची का असेना तो तिची अंमलबजावणी करणार. ती आज्ञा योग्य की अयोग्य याच्याशी त्याला काही देणघेण नाही. *त्यामूळेच त्याचे आगमन होताच विदुषक त्याचेसमोर लोटांगण घालतो.* त्यात अतिनम्रता आहे.

त्याचा आवाज लीन आहे. *आणि त्याच्याकडे त्याने अभय मागितले आहे.* त्याची ही कृती प्रजानन व इतरांसाठी हास्य निर्माण करते. डोंब ही लज्जित होतो. पण *विदूषकाच्या या लोटांगणात एक गर्भित अर्थ दडलेला आहे.*

*--राजकीय नेत्यास नेहमीच अशा आडदांड, आज्ञाधारक लोकांची गरज असते. सत्ता/खुर्ची टिकवण्यासाठी एखाद्याचा जीव घ्यायची वेळ आली तर हे लोक उपयोगी असतात. याची अनेक उदाहरणं आहेत. त्याविषयी येथे लिहिणे योग्य नाही.* विदुषक डोंब कडे सुरवतीसच अभय मागतो, ही कृति म्हणूनच महत्वाची आहे.

आता अशा माणसाची ध्रुवशिलेने निवड करावी याचे एकमेव कारण *'जीव वाचवणे'* हेच आहे.

कारण पहिल्या दिव्यातच *विजयराजचा मृत्यु झाला नाही, हे धर्मगुरुला आवडलेले नाही.*

दुसऱ्या दिव्यात प्रतीके देण्यासाठी त्याने *ध्रुवशीला व चंचला यांची हकालपट्टी* केलेली आहे. ध्रुवशीलेसाठी ही धोक्याची घंटा आहे. तिला याची जाणीव झालेली आहे. जीव वाचवायचा असेल तर त्यासाठीच ती आपलं शरीर धर्मगुरूप्रमाणेच डोंबाच्या हवाली ती करते. *जीव वाचवणे हे एकच मुख्य कारण या तिच्या कृतिमागे आहे.*

मूळात ती एक वारंगणा आहे. पण तसा तिचा उल्लेख जीएंनी कथेत कोठेही केलेला नाही. तिचे जीवन कसे आहे याचा उल्लेख विदूषकाच्या तोंडी त्यांनी स्पष्ट केलेला आहे. तिला विवाहाचा अधिकार नाही. पण अभयराजशी तिने गांधर्व विवाह केलेला आहे. धर्मगुरुला हे माहित आहे की नाही याचा उल्लेख कथेत नाही. पण धर्मगुरुच्या दृष्टीने हा राजद्रोह आहे हे निश्चित. या कारणाबरोबरच दिव्यात प्रतिके देताना झालेली हकालपट्टी यामुळे ध्रुवशीला मनातून घाबरलेली आहे. भविष्यात तिचा मृत्यु (हत्या) अटळ आहे.

जीव वाचवण्यासाठी काळ्याकभिन्न, कुरूप डोंबाला आपला शरीर देण्याशिवाय आता तिच्याकडे पर्याय नाही.

शारीरिक वासना यांमध्ये दिसत नाही. डोंबासारखे देखणे पुरुष साम्राज्यात असणारच. पण *धर्मगुरुशी त्यांची जवळीक नसेल* तर त्यांना ती कशाला जवळ करेल?

अर्थात आपल्या या अतिशय चांगल्या प्रश्नाचे उत्तर काय असावे याचा माझ्या कडून झालेला हा एक प्रयत्न. तो कितपत योग्य आहे माहित नाही. मला जे वाटले, ते लिहिले आहे.

डोंब हे पात्र मला महत्त्वाचे वाटते. खरे तर कथेतील प्रत्येक पात्र महत्त्वाचे आहे. एकेका पात्रास ओळखणे व कथा समजावून घेणे हे या ग्रुपमूळे शक्य झाले आहे. हा ग्रुप तयार करणारे सुनीलजी व वाघोलीकर सर यांना मनापासून धन्यवाद देतो. कारण त्यांच्यामुळेच जीएंच्या कथांचे अनेक पैलू समजण्यास मदत झाली आहे.

- -भारतसिंग पाटील सर: डोंबचा उल्लेख विदूषक कथेत जरी केवळ दोनदा असला तरी ते अतिशय महत्त्वाचे पात्र आहे. कारण माझ्या मते विदूषक कथा ही दूत कथेची साखळी कथा आहे. तेव्हा विदूषक कथेतील डोंबाची महत्ता दूत कथेतील डोंबाच्या मृत्यूचा निरोप तातडीने मार्गी लावण्यासाठी दूताला सम्राटाने तातडीने पाठवणे यातून दिसून येते. तसेच धृवशीला ही देवदासी प्रमाणे रक्तांशी मंदिराची दासी आहे. सबब सत्ताधारीला सेवा प्रदान करणे हे तिचे क्रमप्राप्त कर्तव्य आहे. मग आता विदूषक कथेतील खरा सत्ताधीश कोण? धर्मगुरू का डोंब ? ज्या अर्थी धृवशीला डोंबाच्या शीळेसरशी त्यांच्याजवळ जाते त्या अर्थी धर्मगुरू नव्हे तर डोंब सत्ताधीश आहे..... धर्मगुरू केवळ मुखवटा आहे....

...दूत आणि विदूषक या दोन्ही कथांवर मी गेल्या दोन वर्षांपासून काम करतो आहे...या वर्षी अखेर त्यावर माझे पुस्तक अपेक्षित आहे....

..... डॉ. भरतसिंग पाटील

- - Vishweshwar Nandedkar: . डोंब ची शिळ ऐकल्याबरोबर ती ओळखून ती उत्कंठेने त्याच्या कडे जाते याचा अर्थच तिचे संबंध जुनेच आहेत हे दिसून येते

- -भारतसिंग पाटील सर: आणि ही डोंबाची पाॅवर विदूषकाला समजल्यामुळेच तो आपली विदूषकाची वस्त्रे काढून तोंडाला माती फासतो....!!!!

- - Rajesh Unavane: विश्वेश्वरजी नमस्कार,

ध्रुवशीला व डोंब या दोन पात्रामधील संबंध जुने आहेत यात दुमत असण्याचे, होण्याचे कारण नाही. ते सर्वांनाच मान्य आहे.

*मात्र 'शारीरिक आकर्षण' हा मुद्दा डोंबा बाबत ठीक आहे.*

कारण ध्रुवशिलेचे सौंदर्य.

तिची लालसा विदूषक पण बाळगतो. धर्मगुरूची तर ती सेवाच करते. तिचे तेच जीवन आहे. या वारांगनेस डोंबाचे शारीरिक आकर्षण असण्याची शक्यता फार कमी आहे. धर्मगुरु, डोंब, अभयराज यांचेशी ही वारांगना संबंध ठेऊन आहे, *ते सत्तेचा तिलाही मोह आहे म्हणून.*

अभयराज (तिचा गंधर्व-पति) हा जिंकला तर साम्राज्याचा प्रमुख होणार, म्हणजे धर्मगुरुच्या सत्तास्थानास तो धक्का देणार. हा धर्मगुरुचा सत्तेतील एक प्रतिस्पर्धी आहे. तो जिंकला तर ही गांधर्व पत्नी पण सत्तेची वाटेकरी होणार.

पण दिवंगत पुण्यश्लोक यांच्या इच्छेप्रमाणे या दोन सत्तेतील प्रतिस्पर्धकांना दिव्य करण्यास लावून, हा सर्वसत्ताधीश धर्मगुरू त्यांना जीवे मारण्याचा घाट घालतो. आणि त्यात तो यशस्वी होतो.

*या कार्यात दोघांनाही मदत करणाऱ्यास हा सर्वसत्ताधीश धर्मगुरू जिवंत ठेवण्याची शक्यताच नाही.*

या कथेत हे मदत करणारे ध्रुवशीला व चंचला आहेत. विदूषकही आहे.

विदूषकाला मारण्याचा प्रयत्न फसलेला आहे. चंचलेने स्वत:च जीवन संपवले आहे कारण आपण आता जिवंत राहणार नाही याची तीला जाणीव झालेली आहे. प्रियकराचा मृत्यु व त्याचा विरहही यास कारणीभूत आहे.

राहिली ध्रुवशीला. राजसभा संपल्यानंतर व धर्मगुरुची भेट झाल्यावर जुन्या संबंध असलेल्या डोंबाकडे ती जाणार हे निश्चित. शीळ ऐकून ती धावत जाते. त्यामध्ये आकर्षण पेक्षा ' डोंबा, मला आता वाचव' हीच भावना प्रबळ आहे.

अर्थात मतमतांतरे चर्चेत राहणारच..त्यातच चर्चेची मजा व आनंद असतो..!

🙏

- - Deelip Badhye: सौंदर्याच्या जोरावर अनेक स्त्रिया सत्तेजवळ जायचा प्रयत्न करतात.पण येथे अस्तिव टिकवण्यासाठी सौंदर्य, दुय्यम-काहीशा ओबडधोबड पण शक्तीचा आसरा घेते.अस्तिवापुढे वासना-सत्तेची धुंदी पराभुत होते.

- - Deelip Badhye: शिवाय सत्तेला असे अनेक नावडते डोंब नाईलाजाने सांभाळावे लागतात.कारण सत्तेची सर्व पापे यांचा डोंब साक्षीदार असतो.

- - Deelip Badhye: कथेत धर्मगुरू डोंबाची मर्जी सांभाळतात.धर्मगुरू हा मुखवटाच.रशियाचे विद्यमान व अमेरिकेचे माजी प्रमुख मात्र डोंबांचे महामेरू शोभतात.तेथे अधुनिक डोंब जर आपल्या नायकास घाबरत असतील तर नायक किती खोल असतील?

- - - Rajesh Unavane: *कावळे-हंस कथा व धर्मगुरू*

मूळ कथेतील ‘कावळा-हंस’ ही एक उपकथा. या उपकथेमध्ये कावळयांचा नेता त्यांच्यातीलच एक शक्तिशाली कावळा आहे. त्याने कृष्णद्वीपात जाऊन न्याय व राजनीतीचा प्रगाढ अभ्यास केलेला आहे.. मिळवलेल्या ज्ञानाने तो इतरांपेक्षा शक्तिशाली झाला आहे. *म्हणून तो कावळयांचा नेता आहे.*

‘विदूषक’ ही मूळकथा. तीत *साम्राज्याचा नेता-- दैवयोगाने झालेला धर्मगुरू आहे.*

तो दिवंगत पुण्यश्लोकांचा एकनिष्ठ सेवक आहे. साहजिकच हे सामर्थ्यशाली साम्राज्य उभे करण्यासाठी पुण्यश्लोकांबरोबर त्याने एकनिष्ठपणे आयुष्य वेचले आहे. त्याच्या एकनिष्ठतेमूळे पुण्यश्लोकांनी साम्राज्याची धुरा मरण्यापूर्वी त्याच्या हाती दिली आहे. *विश्वासाने. पण तात्पुरती.* (सद्ययुगातील जणू काळजीवाहू सरकाराप्रमाणे).

आपल्यानंतर होणारा सम्राट हा “धैर्यशील, उदारमन, बुद्धिमान व धर्माचरणी” असावा, ही पुण्यश्लोक यांची मरण्या- पूर्वीची इच्छा. त्यासाठी दिव्यं मांडून सम्राटाची निवड करण्याची धर्मगुरूला त्यांची मृत्यूपूर्वीची ‘आज्ञा’ आहे.

ही आज्ञा आपण पाळत आहोत असे जनतेसमोर दाखवणे धर्मगुरुला त्यामूळे *क्रमप्राप्त* झाले आहे.

*राजेशाही असली तरी लोकशाहीला मी मान देत आहे, याचा देखावा त्याला जनतेसमोर उभा करायचाय.* या देखाव्यातून स्वत:ची सम्राटपदाची *‘अंतरीची अभिलाषा’* त्याला पूर्ण करायची आहे. त्यात जे आडवे येतील, त्यांचा त्याला काटा काढावयाचा आहे. ती सगळी दिव्ये पार करून अंतिम दिव्यापर्यन्त पोहोचलेल्यासही धर्मगुरू जीवे मारणार आहे. तेही जनताजनार्दनासमोर. खरे तर, *लोकशाहीचा मार्गावर आपण चालत असल्याचे चित्र जनतेला दाखवत, त्याला सम्राट पद कायमस्वरूपी भोगायचे आहे.*

*आता पर्याय उरलेला नाही.* ‘मीच सम्राट होणे शिवाय' गत्यंतर नाही.

हाच पर्याय जनतेला आता स्वीकारावा लागेल. *"नाईलाजाने मलाच सम्राट घोषित करावें लागत आहे" असे जनतेच्या मनात बिंबवण्याचा हा धर्मगुरुचा कुटील डाव आहे.*

पुण्यश्लोकांची ‘तो सम्राट व्हावा ही इच्छा नसली तरी, जनतेला आता ते स्वीकारावे लागणार आहे.’ याचे अंतरीचे बौद्धिक भान त्यास आहे.

*सम्राट होण्याची ‘अंतरीची सुप्त अभिलाषा’ त्याला पूर्ण करायची असलेने, मुरब्बी व खुनशी राजकारण्या- प्रमाणे रचलेल्या कुटील डावात धर्मगुरु कथेमध्ये यशस्वी होतो.*

*आणि हाच.. जीएंच्या ‘विदूषक’ या कथेचा मुख्य विषय आहे.*

*आदरणीय जीए* यांनी *ज्या पद्धतीने हा विषय कथेतून सादर केला आहे* ते वाचून, त्यांना सलाम करत एवढेच म्हणावेसे वाटते, "मान गए उस्ताद, आपको..!” 🙏 👍

कावळयांच्या नेत्याप्रमाणे राजनीती-न्याय इत्यादीचे ज्ञान धर्मगुरुने कुठल्याही कार्यशाळेत जाऊन घेतलेले नाही. ते त्यास अनुभवाने प्राप्त झाले आहे. पण *तो सम्राट होण्याच्या लायकीचा नाही,* याची दिवंगत पुण्यश्लोकांना पूर्ण जाणीव होती. सम्राटपदासाठी लागणारे सर्व गुण त्याच्यापाशी नाहीत व उलट तो काहीसा दुर्गुणी आहे. पापचारण करणारा. ( उदा. ध्रुवशीला-संबंध हा त्यापैकी एक)

अन्यथा निपुत्रिक पुण्यश्लोकांनी त्यालाच मरण्यापूर्वी सम्राट केले असते. शिवाय त्याचे वय झाले आहे.

“ऐन तारुण्यातच आमच्यावर ही महान धुरा पडली” हे जनतेसमोर भाषण करताना तो म्हणतो खरा. पण प्रधान अमात्य ते वाक्य ऐकून खाकरतो. (

ते खाकरणे ऐकून धर्मगुरू त्याच्याकडे रोखून पहातो. ती नजर *धर्मगुरुची दहशत* दाखवते. कारण अमात्य लगेच नम्रपणे माफी मागतो, पण ती मागताना *आपली दृष्टी धर्मगुरूवर तशीच ठेवतो.* जणू “चूक झाली, दया कर” हेच त्या कृतीतून जीए दाखवतात.

थोडक्यात, *कावळयांचा नेता हा कृष्णद्वीपात जाऊन न्याय व राजनीतीचा प्रगाढ अभ्यासाने शक्तिशाली कावळा झाला म्हणून कावळयांचा नेता झाला.* तर ...

*राजनीतीतील अनुभवाने परिपक्व झालेल्या धर्मगुरूला सम्राटपद नशिबाने प्राप्त झाले आहे व ते त्यास काहीही झाले तरी सोडावयाचे नाही.*

*‘राजकारणात सर्वोच्च पद प्राप्त करून सर्वशक्तिमान होण्याची प्रत्येक* *राजकारण्याची अंतरीच्या गूढगर्भि सुप्त इच्छा असते, व ती पूर्ण होण्यासाठी संधीची तो वाट पहात असतो’.आणि ती मिळताच... ‘साम-दाम-दंड-नीती-भेद याचा निर्लज्ज व निगरगट्टपणे तो राजकरणी वापर करतो’. त्या राजकारण्यांचा हा धर्मगुरू 'अर्क' आहे.*

त्यामूळे उपकथेत ज्ञानाने शक्तिशाली झालेला नेता एक *‘कावळाच’* आहे, तर मूळ कथेतील दैवयोगाने साम्राज्याचा नेता-सम्राट झालेला धर्मगुरू हा एक *“डोमकावळा”* आहे.

*यशस्वी राजकारण्यांचे एक वैशिष्टय़ असते. असे धुरंधर राजकारणी पोटातले ओठावर कधीही आणत नाही.*

*उलट मी किती प्रामाणिक, देशभक्त, जनतेची सेवा करणारा आहे, मी किती निस्वार्थी आहे याचेच चित्र जनतेसमोर तो उभे करत असतो.* याचा अनुभव इतिहासातून वर्तमानापर्यंत आपण घेत आहोत.

*मूळ कथेतील कावळ्यांचा नेता व धर्मगुरु यांची भाषणे वाचल्यावर याची प्रचिती येते. उक्ती आणि कृती यामध्ये हे राजकारणी किती तफावत ठेवतात हेच जीएना या भाषणातून/ संवादातून सुचवायचे आहे.*

कावळा *'आपले मन संस्कारित असल्याचे'* घोषित करत *मानस सरोवर बळकावून न्याय-नीतीची भाषा करतो.* तर ...

धर्मगुरु हा *'सत्तेचा आपल्याला काडीचाही मोह नाही'* असे सतत जनतेच्या मनात बिंबवत, सम्राट-पदास कोणी योग्य ठरू नये यासाठी योग्यता असलेल्या दोघांचीही हत्या करतो. व त्यात मदत करणाऱ्या विदूषकाचीही हत्या करण्याचा घाट घालतो.

 *राजकारण वाईट नसते पण सत्तेची नशा फार वाईट असते. घृणास्पद असते.*

जो सत्ता चालवतो, हुकूम देतो, ज्याच्या आज्ञेचे राज्यात सर्वजण पालन करतात, तोच *‘सत्ताधीश’* असतो.

त्यामूळे *धर्मगुरू हाच विदूषक कथेतील सत्ताधीश आहे.*

डोंब शरीराने ताकदवान, शक्तिशाली असेल. पण सत्ता संपादनासाठी आवश्यक असलेली धूर्त-कावेबाज बुद्धी त्याच्याजवळ नाही. कथेत धर्मगुरूची आज्ञा पाळणारा डोंब एका पाळीव कुत्र्यासारखाच दाखवला आहे. *असे डोंब सत्तेसाठी बहुतेक राजकारणी पाळतात. त्यासाठी त्यांच्या सर्व गरजाची ते पूर्तता करतात.* मग हे कुत्रे मालकाच्या आज्ञा आयुष्यभर पाळत बसते. मालकाच्या इच्छेनुसार कधी भुंकते. कधी चावते. कधी गुरूगुरते. त्यास माहित असते ती फक्त मालकाची आज्ञा. ते मालकाचे स्थान प्राप्त करण्याचा प्रयत्न करीत नाही. आज्ञा पालन न केल्यास पेकाटात कशी लाथ बसते याचा त्याला चांगला अनुभव दिलेला असतो. कथेतील डोंब त्याचेच प्रतिक आहे. तो शक्तिमान असला तरी सम्राट होऊच शकत नाही. अस्तु. 🙏

मराठी साहित्यक्षेत्रात अनेक मोठमोठे साहित्यकार आजतागायत झाले आहेत. काहींना तर ‘साहित्यसम्राट’ ‘ वगैरेसारखी अनेक बिरुदे मिळाली. हे सर्व थोर साहित्यिक होते. त्यांच्याविषयी आपल्या मनी सदैव आदरच राहील. काहीजणांपुढे तर नतमस्तक व्हाव अशी त्यांची साहित्यसंपदा आहे. त्यांच्या लिखाणाने सर्वसामान्य वाचकांचे जीवन समृद्ध केले आहे. *त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करून आदरणीय जीएंना* सांगावेसे वाटते,

*‘‘आदरणीय जीए, या मातृभूमीत व मातृभाषेत आपली म्हणावी तशी कदर केली गेली नाही. अर्थात आपणास तशी अभिलाषाही नव्हती. उलट कधीकधी आपल्या वाटेला वंचनाच आली. यावर झाले-गेले गंगेला मिळाले असे आपण निश्चितपणे म्हणणार याची खात्री आहे.*

*अशा अविस्मरणीय कथा लिहिण्यासाठी कशाप्रकारची 'मनोभूमि व मातृभाषा' असावी याचे वैभवशाली दर्शन आपण आम्हांस घडवलेत.*

*म्हणूनच साहित्यिकांच्या मांदियाळीत आपण केवळ उस्ताद नाही आहात. तर *‘उस्तादों के उस्ताद’* आहात. *चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स...!* 👍 👌

*या जन्मशताब्दी वर्षात आपल्या चिरकाल, चिरंजीवी अशा साहित्यावर चर्चा करण्यासाठी, आपल्या कथांनी भारावून गेलेले वाचक एक ग्रुप बनवून आपल्या कथांचा पुनश्च आस्वाद घेतात, कथा पुन्हा पुन्हा वाचतात, त्यावर चर्चा करतात, विचारांची देवाणघेवाण करतात. यातच सर्वकाही आले आहे. असे भाग्य इतर कोणत्याही साहित्यिकाच्या वाट्यास आजवर आलेले नाही.*

*आपणास शतशत कोटी प्रणाम....!*

🙏 🙏 🙏 🙏 🙏 🙏 🙏

[

प्रमोद तेंब्रे [ पूर्वी लिहिलेले )

विदूषक ही एकच कथा जी ए नी लिहिली असती तरी मराठी कथेच्या विचारकाला त्यांना टाळता आले नसते . मानवी आशा, आकांक्षा आणि अंतिमत: अटळ असे नियतीचे वर्चस्व याचे प्रत्ययकारी चित्रण जी ए ज्या सहजतेने करतात, असे तेच फक्त करू शकतात. विदूषक ही मराठीतीलच नव्हे तर जागतिक साहित्य

पसाऱ्यातील एक अजोड अशी कथा आहे. ना सी फडके ह्यांनी लघुकथेचे उकल निरगाठ ,असे जे निकष प्रतिपादले आहेत त्या निकषांना ही कथा अगदी तंतोतंत उतरते ;म्हणून काही ही कथा अजोड आहे असे नाही . ह्या कथेची सुरवात ,मध्य आणि अखेर ही त्या कथेनेच ठरवलेली आहेत . जी ए आपले बोट धरून आपल्याला फक्त नेत असतात. कदाचित ह्या कथेनेच त्यांना बोट धरून नेले असेल. ही कथा वाचून होताच आपण एका सुन्न अशा मनस्थितीत जातो . साऱ्या मनाचे रणांगण झालेले असते ; रण संपल्यानंतरचे रणांगण! विष्णुशर्मा हा ह्या कथेत आपणा समोर येतो तो विदूषक म्हणून. मानवी बुद्धी ही कशी तोकडी असते आणि त्याने कितीही बढाया मारल्या तरी माणूस हा अटळ अशा नियतीचा नुसताच गुलाम नाही तर ते त्याचे एकमेव भागधेय आहे.हे विदूषक अधोरेखित करते . इथे निवडीचेच नव्हे तर कसलेच स्वातंत्र्य नाही. ह्या बाहुल्या निर्माण कोण करतो, चालवतो कोण आणि झोडपतो कोण , आणि कशासाठी हे ही कळायचे स्वातंत्र्य नाही. मग माझा मार्ग व प्रवास मी निवडला, ही फुकाची अरेरावी भाषा किती फोल असते हे कळते. तेव्हा विदूषक राख फासून परागंदा होतो खरा पण तो त्याचा निर्णय की ते त्याचे अटळ भागधेय, ह्या ठिकाणी कथा संपते खरी, पण ती तिथे सुरू होते आपल्या मनात.

6)पण इथे परत आपण विदूषक ह्या कथे कडे वळूया. आजच्या व कालच्या समाजाचे,परिस्थितीचे इतके अचूक वर्णन आपणास आढळते ते विदूषकाच्या अनेक संभाषणातून. (द भि वरील टीका काजळमाया ह्या कथा संग्रहा वर लिहिताना करतात, म्हणून ही कथा घेतो.) उदा. “एखाद्या त्रैलोक्यसुंदरी कडे पाहताना ती आपल्या मर्यादेपलिकडची आहे,हे एखाद्या मूढालादेखील समजते. आणि म्हणूनच एखादी पण्यांगना ती केवळ प्राप्त असते म्हणून जास्त मोहक वाटते.त्यासाठी राज्यसत्तेची स्पर्धा असता प्रत्येक पंक्तीस आपल एक पान मांडून ठेवावं लागत.अंगठा कुठ दाबावा याचा विसर पडू न देता सगळी बोट सर्वत्र स्पर्शून ठेवावी लागतात” “क्षुद्रांनी थोरांशी केलेला अतिपरिचय मानहानिकारक होतो,तर थोरांचा अनाहूत अतिस्पर्श तापदायक ठरतो.छायेचे संरक्षण न सोडता सूर्याच्या प्रखर

वैभवाचा आदर करावा” “एकदा काहीतरी सत्य झाल की ते स्थिर,जड,चैत्यन्यहीन होत,तर वदंताही सदैव नवनवोन्मेषशालिनी असते” हे वाचत असताना जी ए हे किती सार्वकालिक आहेत हे लक्षात येते. व त्यांच्या लेखनाला सामाजिकतेचा जाणिवेचा स्पर्श नाही असे म्हणणे धाडसाचे ठरेल.

- - विलास वाघोलीकर -माननीयांनी उत्तम विवेचन केले आहे . त्यांनी बरेचसे मुद्दे स्पष्ट केले . त्यांना धन्यवाद देतो. विदूषक कथा कांद्याच्या पापुद्र्या प्रमाणे आहे. एक पापुद्रा काढला तरी खाली रहातोच . दोन मुद्यांबद्दल मला जे जाणवले ते मांडत आहे . चूभू दे घे . आधीच्या सम्राटांचा घात धर्मगुरूनी केला . ते धर्मगुरुंचे पिता होते . आता धर्मगुरू तरुण आहेत .                    . . "आज या साम्राज्याचा अधिपती निवडण्याचं परम कर्तव्य आपणांस निष्ठेनं व निःपक्षपातीपणानं पार पाडायचं आहे. वास्तविक हे कर्तव्य आमच्या

स्वर्गीय पितृदेवांनी केलं असतं, तर आम्हांला हर्ष झाला असता. परंतु एखाद्या पाषाणहृदयी

शर्विलकाप्रमाणं मृत्यूनं त्यांचे प्राण अकस्मात हरण केले व ऐन तारुण्यातच आमच्यावर ही महान घुरा पडली - "

प्रधान अमात्यांच्या कंठात काही तरी क्षुब्ध घडले व त्यांना कंठोद्रेकाचा थोडा ताप झाला. त्या आवाजामुळे धर्मगुरूच्या बोलण्यात व्यत्यय आला. त्यांनी प्रधान अमात्यांकडे रोखून पाहिले. 'क्षमस्व गुरुदेव, ' प्रधान अमात्यांनी नम्रपणे म्हटले; पण दृष्टी मात्र, धर्म-गुरूवर तशीच रोखून ठेवली. अखेर धर्मगुरू नमले व मध्यंतरी काही घडलेच नाही अशा

तर्हेने ते पुढे म्हणाले, ... ..

* यावरून असे दिसते की । )पूर्वीच्या सम्राटांचे अकस्मात निधन झाले . 2 ) अमात्यांच्या कंठो द्रेकावरून त्यांना मृत्यू कारणाची खरी गोष्ट माहित आहे . अंतर्भृत आहे की धर्मगुरूनी आधीच्या सम्राटांना मारले .2 ) धर्मगुरू तरुण असतानाच ते

अंतरिम सम्राटपदावर आले .     ..." ही अशी एक मोहलता आहे की, जी कसलीही आर्द्रता नसतानाच मुक्तपणे वृद्धिंगत

होते. या साठी मी पितृनिष्ठा मानली नाही, ती एका यःकश्चित अकिंचन, राज्यहीन, बलहीन, दल्हीन राजकुमाराच्या बाबतीत मानीन हे केवळ अशक्य आहे. त्यानं कोणत्याही मंदिरात प्रवेश केला असता तरी त्याचा शिरच्छेद झाला असता ...."

* मी पितृ निष्ठा मानली नाही . म्हणजे आधीचे सम्राट धर्मगुरूंचे पिता होते . व निष्ठा न ठेवता धर्मगुरूंनी आधीच्या सम्राटांना मारले .

[02/02, 12:54] विलास वाघोलीकर : चंचलेच्या आत्मघातासंबंधी - विदूषकाकडून तिला कळते की, त्याचे, दुसऱ्या स्त्रीवर प्रेम होते. तिचे प्रेम निखळ असल्यामुळे, विजयराजाची मनातील प्रतिमा भंग होते, व तिला अनावर शोक होतो. ती म्हणते,"मला काहीही अधिक प्रिय नव्हते. विदूषक, एवढेच नाही, तर ही मी,माझी मलादेखील तेवढी प्रिय वाटत नाही.." व ती आत्मघात करते. चंचलेचा आत्मघात, हा योगायोग नाही तर, आर्फियसमध्ये दिसणाऱ्या प्रेमासारखे, दुसरे रूप आहे.

[02/02, 13:00] विलास वाघोलीकर : धर्मगुरू व आधीच्या सम्राटाचा घात - आधीचा सम्राट असताना मुलाने धर्मगुरू हे सत्तेचे पद मिळवले. नंतर अंतरिम सम्राटपद मिळवून तो सर्व शक्तीमान झाला असे दाखवले आहे . धर्मगुरू व स्पर्धक राजपुत्र यांच्यातील कट्टर लढाई दाखवून सत्तेचे अक्राळविक्राळ रूप लेखकाने दाखवले आहे . धर्मगुरू दाखवून अंतरिम सम्राटपदाची तरतूद दाखवली आहे . असे लेखकाचे स्वातंत्र्य असल्यामुळे कथेतील टोकाची सत्ता स्पर्धा दाखवता आली . - विलास वाघोलीकर

[02/02, 14:31] G A Gr RetdDSpolice Vishweshwar Nandedkar: धन्यवाद सर दोघानाही. माझ्या समजातून काही निसटले का या साठी प्रश्न प्रपंच केला होता. माझ्या शंका दूर केल्याबद्दल दोघानाही धन्यवाद

कथा 'विदूषक '-  ( काजळमाया)

विवेचक- डॉ माधव पुराणिक

१ सर्व पात्रांच्या जगण्यातील  सात सूरांमागील अस्तित्वाचा मूळ शोकात्म सूर - कथेची सुरुवात, स्वरूप व शेवट

२ राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक नातेसंबंधांची भयावह हास्यास्पदता

३ बुध्दीच्या मर्यादांमुळे अर्थशून्यतेने वेढलेले जग

४ अस्तित्ववादातील सत्य संकल्पना

५ 'विदूषक'मधील प्रतिमा सृष्टी

१ जगण्यातील  सात सूरांमागील अस्तित्वाचा शोकात्म सूर
कथेचे सुरुवात, शेवट व स्वरूप

अ) कथेची सुरुवात व शेवट

-जी एं घ्या अनेक कथात नायक काहीतरी अप्राप्य, अलौकिक, यांच्या शोधात  असतो व शेवटी त्याचा ते अद्वितीय मिळविण्याच्या  क्षणी किंवा त्याचा अनुभव घेतल्यानंतर मृत्यू त्याला वेटाळतो .तसा या कथेत ही जी एं नी सुरुवात व शेवट अत्यंत कलात्मक केला आहे -

' ध्रुवशीला ( धुंद वासना) समीप येताच डोंबाने (मृत्यूने) तिला आपल्या बलवान सावळ्या हातांनी वेटाळले  (सापासारखे , सावळ्या कृष्णशक्तीने)आणि मग ती दोघे वृक्षांच्या ( निसर्गाच्या  )निबिड (अनाकलनीय ) हिरव्या (तारूण्याच्या )अंधारात  ( निराशेत, अटळपणे )विरून गेली.' ( आधी अलौकिक स्वर्गसुखाचा क्षणभंगुर कालातीत अनुभव घेऊन शारीरिक जाणिवेतून नाहीशी झाली )

डोंबाचे अंधारासारखे वर्णन पहा -

'एखाद्या वन्य घनदाट छाये प्रमाणे समोर डोंब उभा होता'

' द्रोण मेघाप्रमाणे काळाकभिन्न दिसणारा डोंब'

त्या अगोदरच्या अलौकिक क्षणाचे वर्णन जी एं नी अत्यंत रसमय  - विश्वातल्या नाद व जीवाच्या सर्व संवेदनांसह  ( रस,रंग, ध्वनी,स्पर्श,शब्द )-केले आहे.

' त्वरित गतीने आल्यामुळे तिच्या तारुण्यरेषा कंपित होत होत्या तिच्या वक्षस्थलावर जणू वासना तप्त झाल्याप्रमाणे भासणारा रक्तमणी होता आणि जणू

त्याची दाहकता क्षणभरच सुसह्य असल्याप्रमाणे प्रकाशकण स्पर्श करताच परावर्तित होत होते '

जणू दैवी शक्तीच तरूण सुंदर जीवातून एक  वेगाने  नादमय सूर काढत होती.पाहता पाहता तो जीव रक्तमण्यासारखा देहातून व सुवर्णाच्या पुतळीसारखा मनातून तप्त झाला.हृदयात शुध्द वासनेचा दिव्य मणी प्रकाशला. त्याचे  तेज एवढे होते की  बाहेरील प्रकाशकिरण त्याला क्षणभरच स्पर्श करू शकत होते.'

असेच वर्णन जी ए करतात-

'लवलवणाऱ्या कलिकेप्रमाणे ध्रुवशीला धर्मगुरूंना सन्मुख झाली'

सुरवात पण राजकुमारांच्या दिव्याच्या प्रसंगाने होते. येथे राजकुमार ही (मानवातील  अत्यंत कमी असे धैर्यवान, झपाटलेले,जिज्ञासू जीव आहेत जे) अप्राप्याचा शोध घेत हंसध्वज रक्ताक्षी मंदिरापर्यंत आले आहेत.हे मंदिर नियतीच्या शक्तीचे प्रतिक आहे.

असाच शेवट इतर अनेक कथांतून दिसतो. जसे कथा अनंत, लक्ष्मी, अखेरचा दिवस अस्तिस्तोत्र  ( निसर्ग हेच मंदिर), अहम ( धबधबा हेच मंदिर), अंजन ( स्मशानभूमीची हेच शक्ती स्थान ),इस्किलार इ.

येथे सर्वच मुख्य पात्रे काहीतरी अप्राप्य शोधत आहेत. जसे-

चंचला  सफल प्रेमातून इच्छापूर्ती. राजकुमार असाध्य सत्तेच्या आकांक्षातून इच्छापूर्ती.विदूषक बुध्दीच्या तर्कशास्त्रातून अमात्यपद, ध्रुवशीला  व इतर देहसुखातून इच्छापूर्ती.या सर्वांच्या संकल्पांवर नियती घणाघाती आघात सतत करत असते.

आ) 'विदूषक'कथेचे स्वरुप -

१)राजकीय सत्ता संघर्षावर आधारित या कथेत जी एं नी वरील सर्व सहज प्रेरणांचा अत्यंत प्रतिभाशाली व नाट्यमय आविष्कार केलेला आहे .

सत्य या संकल्पनेचे मूलभूत व अस्तित्ववादी विश्लेषण या कथेचा गाभा आहे. तसेच बुध्दीची  सत्य आकलन करण्याची मर्यादा अनेक रोमांचक, रसरशीत, उत्कंठावर्धक व रहस्यमय घटनांमधून अतिशय सुंदर कलात्मकतेने दाखविली आहे.

यामुळे अस्तित्ववादाचे स्वरूप ठसठशीत झाले आहे.

२) यातील हंस-हंसी व कावळे यांची कथा म्हणजे अस्तित्ववादाच्या मूलभूत तत्त्वाचे सुंदर रूपक आहे.

मानसरोवर म्हणजे माणसाचे जाणीव-नेणीवयुक्त मन.हे शुध्द अस्तित्वाचे - ज्ञानाचे- इच्छा शक्तीचे- अमर्याद शक्तीचे निर्देशक आहे.

याउलट अगणित कावळे हे या शुध्दतेत जे क्षणोक्षणी माणूस जेव्हा राजकीय, सामाजिक इ. भूमिका घेतो व या शुध्दतेत प्रसंगाप्रमाणे काम ( शारीरिक/ मानसिक आकर्षण/ प्रेम), लोभ ( सत्ता,पद,इ),मद, मत्सर, द्वेष, गर्व , क्रोध इ. अशुद्ध विकार मिसळतात त्याचे प्रतीक आहे. तेव्हा अस्तित्व अधिक दु:खमय, एकाकी व अर्थशून्य होते.

मनाच्या चैतन्यरूपी सरोवरात मूळात शुध्दता असते पण या सर्वांमुळे अस्तित्वाचे महत्त्व कमी होते व माणूस राजकीय इ संदर्भांत हरवून जातो

जी ए लिहितात - 'रक्ताक्षी देवीच्या मंिदिरावर ( सम्राटांच्या हत्येनंतर धर्मगुरूंनी फडकावलेला)हंसध्वज होता'

इ) राजकीय व सामाजिक नातेसंबंध जीवनात आवश्यक आहेतच पण जी एं ना यादृष्टीने कमी निर्णायक वाटतात.

आतापर्यंतच्या चर्चेत या नातेसंबंधाची सांगोपांग, रसग्रहणात्मक चर्चा झालेली आहे.

ई) सर्व पात्रांचे शोकात्म जीवन व मृत्यू

अ) विदूषक - बुध्दी खचत जाऊन मृतवत,मूढगती होतो

आ) चंचला - कठोर सत्य समजल्यावर , प्रियकराच्या वधानंतर आत्महत्या करते.

इ) अभयराज व विजयराज दगाफटका झाल्यावर मारले जातात. विजयराजपासून त्याची प्रेयसी दुरावली जाते

ई) ध्रुवशीला सगळ्यांची फसवणूक करत जगते

उ) धर्मगुरू पितृहत्येच्या काळ्या छायेखाली अनैतिक जगतो

ऊ) सुरवातीपासून एकेका दिल्यापासून संभाव्य मृत्यूचे वर्णन होत मरणाची छाया गडद होत जाते . प्रत्यक्षात अभयराजचा ,विजयराजचा व चंचलेचा मृत्यू यांचे वर्णन,विदुषकाच्या स्वप्नाचा ( अमात्यपदाच्या इच्छेचा) नाश, चंचलेच्या प्रेमाची अखेर असे उदास,भकास भावनिक विनाश होत असतातच.

उ )'विदूषक'कथेचे मुख्य प्रमेय (उपमेय)

१ मानवी अस्तित्व हे अजस्त्र विश्वात अर्थशून्य,विसंगत, दु:खमय, एकाकी व भयव्याकुळ करणारे आहे.

२ सर्व रूपात 'मानवाचे अस्तित्व' हेच रूप महत्त्वाचे आहे.

३ माणसाचे अस्तित्व हे खालील सहजप्रेरणांतून व्यक्त होते -

अ) सुख -वस्तूपासून वा व्यक्तीपासून सुखाची इच्छा

आ) दु:ख - ज्या वस्तूपासून वा व्यक्तिपासून दु:ख होते, द्वेष वाटतो ती नको वाटते

इ) जिज्ञासा - काही तरी नवीन समजावे अशी इच्छा

ई) कृतीशीलता - काहीतरी करण्याची इच्छा

उ) स्मृती/ आठवणींमुळे उत्पन्न होणारा खेद

ऊ) भय - भविष्यातील संकटाबद्दलची कातरता, व्याकुळता, चिंता,काळजी

ए) अतृप्ती - कितीही व कितीदाही विषयांचा ( स्त्री, सत्ता, संपत्ती, समाजातील स्थान - राजा, अमात्य इ ) उपभोग घेतला तरी तृप्ती न होणे

४ नंतर माणसाची १ राजकीय,२ सामाजिक, ३ सांस्कृतिक ४ कौटुंबिक ५ शैक्षणिक ६ निसर्गाशी संबंधित ७ अध्यात्मिक/ अपार्थिव रूपे येतात ( सात सूरांची सरगम, सात रंगांचे इंद्रधनुष्य, अनेक सूत्रांचा वाद्यमेळ( orchestra ), अनेक अंशात्मक सत्ये )

५ राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक नातेसंबंध भयावह व हास्यास्पद असतात.पण यातूनच व्यक्तीला अधूनमधून भावसाफल्याचा व अंशात्मक सत्याचा अनुभव येतो

६ मानवी अस्तित्वावर नियती या सर्वव्यापी, अनाकलनीय शक्तीचा निर्णायक प्रभाव आहे.

ऊ) विदूषक कथेतील प्रतिमान (उपमान)

या ३५ पानी दीर्घकथेतील मुख्य व्यक्ती ( विदूषक, चंचला, ध्रुव शीला, धर्मगुरू, अभयराज, विजयराज, डोंब) या व्यक्ती रेखांतून,घटनांतून,भाष्यातून या सहज प्रेरणा प्रामुख्याने राजकीय व सामाजिक नातेसंबंधातून व्यक्त होतात. पण या पृष्ठभागाखाली असलेल्या अस्तित्वाच्या मूळ प्रेरणा जाणवतात

ए ) जगण्याच्या मूलभूत प्रश्नांना जी एं नी वरील मुख्य पात्रांच्या जीवनरेखाटनांतून खालीलप्रमाणे उत्तर दिले आहे असे वाटते -

प्रश्न - व्यक्तीच्या सुखदु:खांचा / यशापयशाचा / जगण्यामरण्याचा अर्थ काय आहे?

उत्तर - १) यश-अपयश आणि सुखदुःख - मानवी कर्तृत्व व संस्कृती यांचा व्यक्तीच्या जीवनावर विशेष परिणाम होत नाही. व्यक्ती व व्यक्ती तसेच व व्यक्ती व कुटुंब यांच्या संबंधांवर परंपरांची/ विचारांची / भावनांची गूढ, सूक्ष्म, सामर्थ्यशाली शक्ती ( नियती) निर्णायक प्रभाव टाकते.

म्हणजे यशापयश व सुखदुःख हे जीवनात अर्थशून्य व विसंगत आहेत.

२) जगण्यामरण्याचा अर्थ - या दोन्ही माणसाच्या हातात नाहीत. पण सगळ्याच अनुभवांच्या क्षणभंगुरतेमुळे व मृत्यू घ्या अटळतेमुळे जीवन एकाकी, अर्थशून्य,व दु:खमय आहे

२ नातेसंबंधातील भयावह हास्यास्पदता

अ) धर्मगुरू (धर्माची शिकवण देत असूनही) अर्चना दासीकन्या ध्रुवशीलेची अभिलाषा बाळगतो.

तीच ध्रुवशीला राजकुमार अभयराजाशी गांधर्व विवाह करते.

शेवटी तोंडाने शीळ घालताच ' कंपित तारूण्य रेषांनी त्याला त्वरित भिडते'

आ) धर्मगुरू अनीतीने पित्याच्या हत्येशी संबंधित असूनही नीतीवर प्रवचन देतो

इ) विदूषक व धर्मगुरू दिव्यांच्या वेळेला असत्याने ( कपटाने) वागतात.

ई) अभयराज स्वार्थाकरीता अमात्यकन्या चंचलेच्या प्रेमाचा बळी देतो व विदुषकाचा आधी फायदा घेऊन मग दिव्यात त्याचा वध व्हावा अशी इच्छा बाळगतो

उ) धर्मगुरू स्वार्थाकरीता ( सम्राट वधानंतर (१२ राजपुत्रांचा वध होईल असशी गुप्त योजना करतात.( आधी १० मरतात,मग अभयराज व विजयराज) . यानंतर घोडे उधळल्यावर ६ घोडे व ६ सारथी उगाचच मरतात. मला जी एं च्या "तुती" कथेची आठवण झाली. त्या कथेत ही कितीतरी स्त्रिया विहिरीत आत्महत्या करतात व प्राणी मरतात.

ऊ)' सेना नायकांच्या प्रणयिनी शुक्लपक्ष कृष्ण पक्षाप्रमाणे नियमित बदलत'

शेवटी' तुती' कथेप्रमाणे 'विदूषक ' मध्ये अमात्यकन्या चंचला ही ,तिचा नि:स्वार्थी प्रेम असलेला अत्यंत प्रिय पण ( नियती मुळे) अप्राप्य राज्यहीन विजयराज मृत्यू पावल्यावर, आत्महत्या करते(मानवी मृत्यू नंबर २१)

नियतीचे सार्वभौमत्व सांगताना चंचला म्हणते -

'जीवनाशी द्यूत खेळताना अनेकदा नियती देखील गुप्तपणे अक्षदान टाकत असतेच याची पूर्ण जाणीव असल्याखेरीज जीवन सुसह्य होणारच नाही!'

विदूषकाचा बौध्दिक व भावनिक मृत्यू होतो ( 'पिशाचबाधा झाल्याप्रमाणे तो केस विस्कटून टाकतो, कपडे फाडतो, ओंजळभर माती चेहेऱ्यावर  माखून घेतो ,पराभूत, अवमानित, मूढगतीने निघून जातो')

३ जीवन आकलनाच्या बुध्दीच्या मर्यादा

१ विदूषक  वेळोवेळी निर्णायक घटनांची त्याला आलेल्या  मर्यादित ( पण त्याच्या मते परिपूर्ण) अनुभवावरून स्वतः ची एक तर्कशास्त्रीय निर्णय पध्दती तयार करतो. त्यात काही वेळा यश मिळाल्याने विदूषकाला स्वतः च्या बुध्दीबद्दल खोटा भ्रम निर्माण होतो.

शेवटी तो भ्रम नाहीसा होतो . येथे जी एंनी जीवनातील योगायोगाचे/ अपघाती घटनांचे महत्त्वाचे स्थान दाखविले आहे.

२ 'विदुषकाला' जेव्हा ध्रुवशीलेचे (स्त्रीचे )आकर्षण असते .( 'वस्त्रातून रेखीव डौलाने उमटलेल्या तिच्या गौर यौवनाकडे पाहताना विदूषकाचे मन देखील लालसेने क्षणभर धुंद झाले.'

' ...शस्त्राच्या स्पर्शाने त्यास पुन्हा एकदा त्या वस्त्राने स्पर्शलेल्या तिच्या तारुण्योन्नत शरीराची जाणीव झाली' 'तेवढ्यात त्याने खाली पडलेली सुरंगीची दोन फुले उचलली')

तेव्हा बुध्दी तर्कहीन होते .कारण  पत्नीच्या अनीतीमान वर्तनाचा त्याला अनुभव होता ( 'त्याचवेळी आपल्या पत्नीने एका शूद्र सेवकाच्या संगतीत केलेला द्रोह आपल्याला ज्ञात झाला ' -चंचला )

शिवाय विदूषक ही गुरूदेवांना सांगतो की 'तू दोन पायांचा द्रोह हवा असेल तर स्त्रीचा स्वीकार करावा'

तो दंडाधिकाऱ्यांना सांगतो ' कथेच तात्पर्य हे स्त्रीच्या कटी वरील बालकासारखं असतं. ते तिचंच अपत्य असलं पाहिजे असं नाही'

अशी स्त्रीची चंचलता ( कथेतील विदूषकापुरती) माहीतअसतानाही तो तर्कशास्त्री,स्थिरबुध्दी विदूषक ,बुध्दीशी विसंगत अशी शरीर व मनाच्या पातळीवर,स्त्री अभिलाषा ठेवतो.

४ अस्तित्ववादातील सत्य संकल्पना

अ) 'विदूषक' मधील सत्यसंकल्पना

१) स्वसंरक्षणाच्या संदर्भात सत्याचं ज्ञान अज्ञान या गोष्टी पूर्णपणे असंगत आहेत

२) बाह्य स्वरूपावरून आंतर सत्तेचा कयास राहणं हा आम्हा पुरुषांचा प्राचीन काळापासून चालत आलेला बुद्धी प्रमाद आहे.

३) आपल्या मार्गात सत्य हे अंशा अंशाला प्रकट होत असत

ते प्रसंगी चिन्ह युक्त असतं तेवढेच नाही काही प्रसंगी ते स्पष्टपणे न येता मायावी रूप धारण करत.

४) विशाल सत्याचा लाभ झाला की संकुचित सत्याचा त्याग करावाच लागतो कारण हे संकुचित सत्य त्या विस्तृत सत्यात सामावलेलं तरी असतं किंवा त्याच्याशी विसंगत तरी असतं

५) सत्य दिसतं ते अंशाअंशानेच नव्हे तर ते अनेकदा सूक्ष्म सूचक चिन्ह धारण करून येतं आणि त्याचा अर्थ लावणे हे बुद्धीच कर्तव्य आहे

५) ( चंचला आत्महत्येपूर्वी सांगते ) ' प्रत्येकाने आपापले सत्य स्वतःच्या रक्ताच्या स्पंदनावर पारखून घ्यावं लागतं ज्या सत्यांशी देवाण-घेवाण होऊ शकते किंवा ज्याबाबत विविध प्रकृतीच्या जणांचं एकमत होतं ती सत्य शूद्र मोलाची असतात किंवा अप्रस्तुत निर्जीव घटिते तरी असतात '

६) जीवनात प्रत्येकास कधी ना कधी कसलातरी चिरंतन स्वरूपाचा निर्णय घ्यावा लागतो आणि अशा क्षणी प्रत्येक व्यक्ती सदैव एकाकीच असते.

आ) अस्तित्ववादातील सत्य संकल्पना

यात व्यक्तीच्या जीवनात आत्यंतिक व टोकाची परिस्थिती अधूनमधून वा एखाद्या ध्येयपूर्तीसाठीच्या अथक प्रयत्नातून उत्पन्न होते. हे स्वतःच्या इच्छापूर्तीचे सतत प्रयत्न हेच सत्य असतात. कारण ते व्यक्तीच्या भूतकाळातून वर्तमानकाळातील सातत्य राखतात . व्यक्ती मनाच्या, बुध्दीच्या मदतीने रोज इतरांबरोबरच्या नातेसंबंधातून, परिस्थिती व वस्तुस्थिती यांच्या अस्तित्ववादी आकलनातून ( स्वतःला जाणवलेल्या भावनांतून)आपली आकांक्षा पूर्ण करण्यासाठी अविरत प्रयत्न करते.

'विदूषक' कथेत अशा परिस्थितीत माणूस ( अभयराज, विजयराज, चंचला, ध्रुवशीला, धर्मगुरू, विदूषक) कसा वागतो यांचे चित्रण आहे. ही सर्व पात्रे नंतर वेगळ्या दृष्टिकोनातून स्वतः कडे, जगाकडे पाहतात. या परिस्थितीत नेहेमीचे तर्क, व्यावहारिक कार्यकारणभाव नाहीसे होतात.

चंचलेला व विदूषकाला हा अस्तित्ववादी अपूर्व व विलक्षण अनुभव आलेला आहे.

विदूषक आपली बुद्धीवादी जीवनभूमिकाच बदलतो तर चंचला धैर्याने मृत्यूशरणता स्वीकारते.

पण याला सामोरे जाताना प्रत्येकजण एकाकीच असतो व नियतीने त्याला अटळपणे दिलेल्या उपजत स्वभाव व गुणांच्या मर्यादित वारशामुळे भयव्याकुळ व उदास होतो.

जी एंना हा सात सूरांमागचा व्यथित सूर ऐकू येतो.

५ 'विदूषक'मधील प्रतिमा सृष्टी

अ)ऐंद्रिय संवेदनांच्या प्रतिमा

१) आरशावर मंद अशी आर्द्रता दिसावी तशी भीषण स्मृती मुळे भीतीची छाया सभेवर पसरली

आ)निसर्ग व प्राणी विश्वाशी संबंधित प्रतिमा

१) शुभ्र कंदामधून केशर पुष्प उमलल्याप्रमाणे दिसणारा सुवर्ण रंगाचा हंस ध्वज

२) त्यांची मुद्रा दवाने भिजलेल्या रानशेणीप्रमाणे झाली

त्यांचे डोळे जगात हाडे थोडी दगडफार असा साक्षात्कार झालेल्या वृद्ध कुत्र्याच्या डोळयांप्रमाणे ओलसर ,उदास झाले

( सेनानायकाचे वर्णन,जेव्हा त्यांना आपल्या अनेक प्रणयिनींच्या प्रतआरणएचई आठवण येते)

३) ' आभाळातून एक गिधाड घिरट्या घालत शांतपणे पहिल्या शिखरस्तंभावर उतरले व मान आवळून स्तब्ध पणे स्थिर झाले '

येथे गिधाड हे सर्व पात्रांच्या मनातील क्रौर्याचे, मोहाचे, लोहाचे अमानवी पणाचे प्रतिक आहे.

समारोप

जीएं नी या दीर्घ कथेतून सर्वांना येणाऱ्या अनुभवातून जीवनाचा राजकीय व सामाजिक अंगाबरोबरच मूळ अस्तित्वावादी आकलनाचा अनुपम, अद्वितीय, असाधारण, अत्यंत प्रतिभाशाली ललित , कलात्मक शोध घेतलेला आहे यामुळेच 'विदूषक' ही माझी खूप आवडती कथा आहे

डॉ  माधव पुराणिक

भ्रमणध्वनी - ९६२३४४२२२१

# - 'रंगरेखा- मत्स्यकन्या'

जीए कुलकर्णी यांची कथा - 'रंगरेखा- मत्स्यकन्या', व त्याबद्दल चित्रे

लेखक- व्हीएस वाघोलीकर

=========================================

*भाग एक-सुरुवातीचे विवेचन-*




======================

ए. जीए कुलकर्णी यांच्या,'पारवा' पुस्तकातील, 'मत्स्यकन्या' ही मिथक कथा आहे. साहित्यात,'गलीव्हर ट्राव्हल' ही एक मिथक कथा आहे, पण तरीही ती कथा

जगभर सर्वांना संपूर्ण वाचावी वाटते, आणि त्यातील मतितार्थ आजही उपयोगी वाटतो.

*माणूस, कल्पनेने विलक्षण महत्वाकांक्षा ठेवून कथा रचतो.आताच्या विज्ञानकथांतही माणसांच्या महत्वाकांक्षा प्रतिबिंबित होतात.विमानाच्या शोधापूर्वी, जगभर ,माणसाला पंख लावून उडता येईल आशा लोककथा होत्या. त्या तेव्हा अकल्पनीयच वाटत होत्या. मत्स्यकन्या असेल व ती किनाऱ्यावर येवू शकेल, ही लोककथा कल्पनेची भरारी वाटते.अशा प्रकारे, 'मत्स्यकन्या' कथा,महत्त्वाची आहे.

जीए ,शब्दप्रभू आहेत. कवींच्या शब्दांत बोलणारे आहेत. त्यामुळे, कथेतील कथानकाला,काव्याचे रूप मिळाले आहे. त्याचप्रमाणे, कथेतील,सार-अंशही, खूप व्यापक - विचार करायला लावणारा- आहे.

*या कथेत, अनेक पैलू, आहेत. उदाहरणार्थ, जीवनात येणारे सुख,असमाधान; दु:ख; भेट-विरह-प्रेमबंधन; कला व तिचे जीवनावर परिणाम; अमरता व ज्ञान मिळण्याची प्रक्रिया, क्षणभंगुरता, देवस्वरूप ज्ञानी व्रुध्दावर नियतीच्या रूपाने मर्यादा , नियतीची लीला,असे हिऱ्यासारखे लखलखीत पैलू या कथेत आहेत. म्हणून ही मिथक कथा महत्वाची वाटते.

बी.वाचकांनी मूळ कथा वाचली असेल, तर त्यांच्या संदर्भासाठी, व इतरांनी मूळ कथा वाचावी, अशी विनंती करून, खाली कथेचा सारांश देत आहे.

*तसेच, क्रमांकासह चार चित्रे, व पाचवे मोझाक चित्र हे सर्व दिले आहे.खाली चित्रांबद्दलही विवेचन दिले आहे. व्हीएस वाघोलीकर, हौशी चित्रकार आहेत. त्यामुळे चित्रांतील त्रुटी माझ्या आहेत.

सी.मत्स्यकन्या, या मिथक कथेचा इतिहास -

-----------------------------------

मत्स्यकन्या, ही मिथककथा, 2000 वर्षांपासून जगभर वेगवेगळ्या रीतीने सांगितली गेली. डेन्मार्क मध्ये, मत्स्यकन्येचे शिल्प असून, तशा अमेरिकेत13 ठिकाणी प्रतिकृती आहेत. त्यामुळे ही मिथक कथा,म्हणूनही गंभीरपणे घ्यावी लागते.

लोककथांचे महत्त्व- अशा लोककथा जगात लोकप्रिय आहेत, याचे कारण, माणूस व इतर जीव, यांमध्ये चैतन्य आहे, भावना आहेत, ही श्रद्धा अस्तित्वात आहे.असंख्य माणसांची अशी श्रद्धा,खूप ठिकाणी ,हजारो वर्षे चालत आली आहे. म्हणून अशा लोककथांचे माणसांच्या,समूह -जाणीव-नेणिव मधील स्थानही महत्त्वाचे ठरते.

* निव्वळ शिडांच्या गलबतांतून माणसांनी,मोठ्या प्रयत्नाने-व अभंग श्रद्धेने मोठे प्रवास केले, हा इतिहास आहे.त्यामुळे ही श्रद्धा तयार झाली. 'मत्स्यकन्या' ,अनेक खालील ़लोककथांत मानली गेली आहे--

1.हिंदू संस्क्रुतीत नागकन्या, जलपरी या कल्पना आहेत.नागपंचमीच्या कहाणीत नागकन्या असते.शिळासप्तमीच्या कहाणीत जलकन्या पाण्यात राहून मदत करतात. तसेच हयग्रीव, मत्स्यावतार, नरसिंह अवतार, अशा प्रकारे, इतर जीवांत चैतन्य असते,ही श्रद्धा आहे. कंबोडिया मध्ये, रामायणात मत्सकन्येला लंकेची संरक्षिका मानले आहे.

2.असेरीयन संस्क्रुतीत एका देवतेने प्रिय व्यक्तीचा वध केला. मग शरमेने ती मत्स्यकन्या झाली.

3.इंग्लंडमध्ये. zennor भागातील कथेप्रमाणे मत्स्यकन्या, किनाऱ्यावरील संगीत ऐकते.

4.ग्रीक कथेप्रमाणे,अलेक्झांडरची बहीण, मत्स्यकन्या होते. येणाऱ्या खलाशांना विचारते,"अलेक्झांडर जिवंत आहे का?" त्यांनी" हो", म्हटले तरच, त्यांना पुढे सोडते.

5 .फिलीपाईन्समध्ये समुद्राची राणी, मत्स्यकन्या असते.ती किनाऱ्यावरील पुरुषाशी विवाह करून, राज्य करते.

6.मेसेपोटियन,रशियन, चीनी, कोरियन, जपानी, आफ्रिकन इ. ़लोककथांत मत्स्यकन्या आहेत.

7. वार्सात मत्स्यकन्या, ही शहराची संरक्षक मानली जाते.

8. आस्ट्रियामधील किल्ल्यावर मत्स्यकन्यांचे पुतळे संरक्षक म्हणून उभे आहेत.अशा प्रकारे, अनेक देशांमध्ये मत्स्यकन्येच्या प्राचीन मूर्ती सापडल्या आहेत.

डी.जीएंची 'मत्स्यकन्या'कथा- जीएंॅनी,

-----------------------

आर्फियस,कांचनम्रुग इत्यादी त्यांच्या कथांप्रमाणे,मत्स्यकन्येला वेगळ्या प्रतिभेने व्यक्त केले आहे .त्या कथांप्रमाणे, ही कथा, कल्पित उत्तरार्ध -apocrypha- आहे.या कथेकडे आस्वादक भूमिकेतून, पाहिले जावे.त्या द्रुष्टीने ही काव्यमय शब्दांतील,आकाशस्थ शक्तींचा मतितार्थ असलेली, कथा आहे.

कथेतील शेवटचा भरतवाक्यांचा परिच्छेद तर, जीएंची कविता वाटते.तो परिच्छेद खाली दिला आहे.

भाग दोन-- कथेचा सारांश--

==================

ई.या कथेतील मत्स्यकन्या तरुण असते. पण तिच्या शरीरावरील खवले, तिला असमाधान देतात. ते खवले जावून, तिला पाचूच्या बेटावर चालत जायचे असते. पण उपाय सापडत नाही. तेव्हा ती, समुद्राच्या तळाशी सतत फिरणाऱ्या, अनंत आयुष्याच्या, ज्ञानी, व्रुध्द पुरुषाला उपाय विचारते. तो सांगतो,"तुझ्या जीवनात दु:ख आले,की हे खवले जातील."

मत्स्यकन्या म्हणते,"दु:ख म्हणजे काय?तुमच्याकडचे थोडे दु:ख मला द्या. तो ज्ञानी म्हणतो,मी दु:ख पाहिले आहे. पण मला ते ,अनुभवासह, दुसऱ्यास देता येत नाही.तो म्हणतो,

"दु:ख मिळवता येत नाही. ते यावे लागते."

----------------------------------

*चित्र क्रमांक1मध्ये, हा प्रसंग दाखवला

-----------------------------------------

आहे.या चित्रामध्ये, खोल समुद्रात शहर बुडाले आहे,असे दाखवले आहे. समुद्राचा तळ दिसत आहे. असे वातावरण दाखवले आहे.व्रुध्द व मत्स्यकन्या यांचा संवाद होत आहे,असे चित्रात दाखवले आहे.

एफ. समुद्र---सर्व कथेत ,समुद्र हा फक्त पार्श्वभूमी म्हणून येत नाही. तर कथेत समुद्र, हा , एक आकाशस्थ शक्ती,म्हणून येतो.

कथेत समुद्र ,सर्व तऱ्हेने, म्हणजे, रंग,आवाज, स्पर्श; लाटांची, प्रवाहांची हालचाल करणारा , जवळून लांबून दिसणारा असा, जाणवत

राहतो.जीएंच्या,'इस्किलार','अस्तिस्तोत्र' इत्यादी कथांमध्ये समुद्र येतो.मात्र 'मत्स्यकन्या 'या कथेत समुद्र भरून राहिला आहे.

कथेत पुढे अशाच घटना घडतात. अनेक दिवसांनंतर, एक तरुण किनाऱ्यावर दररोज संध्याकाळी येवून सुमधूर पावा वाजवतो. मत्स्यकन्या समुद्रातच थांबून ते संगीत ऐकत रहाते व म्हणते,"तुझे संगीत मला ऐकावेसे वाटते."

चित्र क्रमांक2मध्ये, हा वरील प्रसंग दाखवला आहे.

---------------------------------------

तो म्हणतो,"मी स्वप्नात एक तरुणी पाहिली व मी तिच्या शोधात आहे..... ती साधी होती.तिचे ओठ थरथरत होते. डोळयांच्या कडा ओल्या होत्या...मला स्वप्नव्यक्ती मिळत नाही. ते दु:ख माझ्या संगीतात आहे."

मत्स्यकन्या म्हणाली,"तुझ्या संगीतातील थोडे दु:ख मला दे.म्हणजे माझे खवल्याचे अंग जाईल."

तरुण म्हणाला,"दु:ख असे मिळत नाही ,ते यावे लागते"

----------------------------------------------

काही दिवसांनंतर, एके संध्याकाळी पावा कमरेला खोचून, त्याने मत्स्यकन्येचा निरोप घेण्याचे ठरवले व त्यांच्यामध्ये संवाद झाला.

तो संवाद भरतवाक्यांचा आहे व खाली दिला आहे.*

तो थोडे पुढे जात असतो. तो परत भेटणार नाही, हे कळाल्यावर, मत्स्यकन्या काकुळतीने म्हणाली,"मला ने..मला ने.."

*चित्र क्रमांक3 मध्ये, हा वरील प्रसंग दाखवला आहे.

------------------------------------------

त्या आवाजाने त्याने मागे वळून पाहिले. तिला विरहाचे दु:ख झाले होते. व शरीरावरील खवले जावून, तेथे रडवेली तरुणी, म्हणजे त्याची स्वप्नव्यक्ती उभी होती.त्याने मान्य केले,"तूच माझी स्वप्नव्यक्ती आहेस.व तू मला येथे भेटलीस."त्याने, आठवणीच्या पाकळया गोळा करून, त्यांचा गुच्छ केला. तो तिच्या डोक्यावरील, केसांमध्ये घातला, व ती दोघे एकत्र दूर गेली.

*चित्र क्रमांक4 मध्ये हा वरील प्रसंग, क्लोजअपमध्ये

-------------------------------------- दाखवला आहे. ती ,विरहाचे दु:ख सहन करत, रडवेली झालेली दिसत आहे. त्याला मात्र, स्वप्नव्यक्ती भेटल्याचा आनंद झाला आहे. मागे समुद्र असून, मत्स्यकन्या वाळूत पावले टाकून आली आहे.

चित्र क्रमांक 5 मध्ये, सर्व चित्रांचे मोझाक चित्र आहे. बाणांनी घटनाक्रम दाखवला असून, पार्श्वभूमीवर समुद्रातील वस्तू आहेत.

--------------------------------------

भाग तीन--कथेचे पैलू-

==============

जी.संगीत व कलेची शक्ती-संगीत

--------------------

व कलेतून, मनातील भावना, प्रखरपणे व्यक्त करता येतात. जीएंनी ,'आर्फियस', 'गीतपाखरू' अशा कथांत ही कलेची शक्ती दाखवली आहे. येथेही संगीताचा दोनदा उल्लेख आहे. संगीताचे वर्णन जीएंनी कवीवृत्तीने शब्दांत पकडले आहे.--

जी-1.मत्स्यकन्येने समुद्राचे संगीत ऐकलेले असते. त्या संगीताने,समुद्रातील रत्ने, चांदण्याप्रमाणे झळाळू लागतात. समुद्राच्या संगीताने, प्रुथ्वी कंपित होते. वाऱ्याच्या संगीतामुळे समुद्रभूमीचा थरकाप होतो.

जी2--परंतु प्रवाशाचे संगीत, मत्स्यकन्येला दररोज ऐकावेसे वाटते. त्या संगीतात, रात्रीची सघनता,हिवाळी वाऱ्याची थंडगार धार,ओल्या वाळूची आर्द्रता; स्वप्नव्यक्तीचे तरल रंगातील वस्त्र, स्वप्नव्यक्तीच्या स्म्रुतीच्या पाकळया, असे सर्व असल्याने, ते संगीत उत्कट होत असते. स्वप्नव्यक्ती मिळत नाही, हे दु:ख ,त्याच्या संगीतात होते. त्या संगीतामुळे तिचे अंग मोहरून गेले.

असे कलेचे, संगीताचे रुप; कथेतील शब्दकलेतून, स्पष्टपणे येते.हा या कथेचा महत्त्वाचा पैलू आहे.

एच.असमाधान व दु:ख---जीएंच्या बऱ्याच कथां ंमध्ये

--------------------

काहीतरी महत्त्वाचा पैलू सांगितलेला असतो.उदाहरणार्थ, विदूषक कथा, सत्य पैलू सांगते,आर्फियस कथा, म्रुत्यु व ज्ञानाचे पैलू सांगते,असे बऱ्याच कथांमध्ये महत्वाचे पैलू असतात. 'मत्स्यकन्या'कथेत, इतर पैलूंबरोबर,' दु:ख'हा पैलू घेतला आहे. माणसाच्या जीवनात, असमाधान असते.व्यवहारातही ते दिसते. मत्स्यकन्येच्या, मनात, तिच्या शरीरावरील खवल्यांचे असमाधान होते.पाचूच्या बेटावर चालता येत नाही, हे असमाधान तिला होत असते.

*पण ते असमाधान होते. दु:ख नव्हते. तिचे जीवन चालू होते.

मग, असमाधानातून दु:ख कसे येते, असा प्रश्न पडू शकतो.एखाद्या व्यक्तीचे मन,एखाद्या वेळी, दुसऱ्या व्यक्तीच्या दु:खाशी अतीवपणे जोडले जाते.त्याला सहसंवेदना होते. तेव्हा त्या पहिल्या व्यक्तीला दु:ख होते.

*जर दुसऱ्या व्यक्तीशी सहसंवेदना झाली नाही, तर ती पहिली व्यक्ती, निर्विकार राहते.कथेच्या पहिल्या भागात असे दाखवले आहे. ओहटीने मुले गेल्यावर आई किनाऱ्यावर उभी असते. पण तेव्हा मत्स्यकन्या, निर्विकार राहते...किंवा गलबत बुडताना माणसे आक्रोश करतात. तेव्हा मत्स्यकन्येला दु:ख होत नाही,उलट त्यांच्या हावभावांची गंमत वाटते.

पण कथेच्या नंतरच्या भागात मात्र, संगीतकाराचे दु:ख तिला उत्कटतेने जाणवते. व तो प्रवासी कायमचा दूर जाताना तिला  दु:ख  होते, तिच्या डोळ्यांतून पाणी येते.

आय. नियती---व्यक्तीत दु:खाची सहसंवेदना जागृत होणे, ही नियतीची लीला आहे--हे जीए सांगतात.'भेट'कथेत, सिध्दार्थला इतरांचे दु:ख जाणवले.'विदूषक'मध्ये, चंचलेला दु:ख झाले,जाणवले.'मत्स्यकन्या'मध्ये, व्रुध्दपुरुष, हा ज्ञानी, अमर,सगळीकडे जाणारा,  देवासारखा ,आहे. पण त्यालाही मत्स्यकन्या, कधी दु:खी होवून,ती मुक्त होईल, हे कळत नाही. म्हणून तो अगदी शेवटी, फेनपुष्पे उधळतो.तो तिचा पालक वाटतो.'आर्फियस'मध्येही, देव, नियतीच्या आधिन असतो.व नियतीची लीला दिसते.

जे.भेट, विरह व  प्रेमबंधन-- मत्स्यकन्या

----------------------

असमाधानी असते. पण तरुणाच्या संगीताने तिला दु:खाची उत्कटता समजते.व त्यांची भेट होते.

पण, एक दिवस, प्रवासी संभाषण करून ,स्वप्नव्यक्तीच्या शोधासाठी दुसरीकडे जायला निघतो. तो पुढे जात असतानाचा विरहाचा क्षण असतो.तो तिच्या दु:खाचा व मुक्तीचा क्षण असतो.

प्रवासी , स्वप्नव्यक्तीमध्ये जोडीदार पाहतो. ती जोडीदार व्यक्ती, सहसंवेदना साधणारी;त्याच्याबरोबर, कोणत्याही प्रदेशात,परिस्थितीत राहणारी,हवी असते. व तो अशा स्वप्नव्यक्तीच्या शोधात असतो.मत्स्यकन्या तशी रडवेली व्यक्ती होवून चालत आल्यावर,प्रेमबंधन होते.........हे कथेतील सूचित आहे की, नंतरही असमाधान चालू राहते..

के.ज्ञान व दु:खाचे ज्ञान---अमर,सगळीकडे

--------------------

फिरणाऱ्या व्रुध्दाला ,दु:खाचे ज्ञान असते. पण त्याचा अनुभव तो दुसऱ्यास देवू शकत नाही. जीएंनी हे अनेक कथांत दाखवले आहे, की ज्ञान मिळणे पुरेसे नसते, ते वरदान नसते. कारण तो माणूस,त्याचे ज्ञान अनुभवासह दुसऱ्यास देवू शकत नाही. उदाहरण,'अनंत','इस्किलार'..'आर्फियस'मध्ये दाखवले आहे की, पूर्ण ज्ञान हे नक्षत्र नसून, प्रक्रिया आहे. देवालाही त्या प्रक्रियेतून जावे लागते.

मत्स्यकन्येला विरहाच्या प्रक्रियेतून गेल्यावर, दु:खाचे ज्ञान मिळते व खवले जातात. व्रुध्द पुरुष तोपर्यंत थांबला, कारण ज्ञान मिळण्याचा क्षण, नियतीने ठरवलेला असतो.

एल.या कथेत, व्रुध्द पुरुष,'आर्फियस'मधील देवासारखा वाटतो.तो अमर आहे. सर्व संचारी आहे, पण अलिप्त आहे.नियतीने ठरवलेला क्षण तो बदलू शकत नाही.

एम्.क्षणभंगुरता-- माणसाची, जीवअस्तित्वाची

---------------

क्षणभंगुरता, ही या कथेत भरतवाक्यांच्या खालील परिच्छेदातून ,शब्दप्रभू जीएं ंनी सांगितली आहे.

स्वप्नव्यक्तीच्या पुढील शोधासाठी, संगितकार प्रवासी मत्स्यकन्येला सांगतो,की आता तो नव्या प्रदेशात जाणार आहे. तेव्हा ती म्हणते,"मला तुझ्याबरोबर ने.मला लाटांवर तरंगायची सवय आहे. "

तेव्हा तो प्रवासी तिला म्हणतो--

"....मी येथून जाणार आहे. निळया

टेकड्यांपलिकडे, सोनचाफ्याच्या प्रदेशा गोपुरांच्या प्रदेशात, व देवदाऱ्यांच्या छायेत. माझा प्रवास असाच चालायचा.आम्ही माणसे दिवसाच्या क्षणिक लाटेवर

जगतो.पण आमची लाट, आमचा दिवस

वेगळा.दोन प्रेमाच्या छायेत आमच्या

प्रवासाची सुरुवात होते खरी,पण

प्रत्येकाने आपला प्रवास एकट्याने

करायचा असतो.आणि त्याचा शेवट होतो, तो अगदी एकाकी, अलिप्त कोपऱ्यात. आमचा

दिवस निराळा. त्याच्या डोळयात संध्याकाळी अश्रू असतील का ओठावर हसू असेल, हे सकाळी

सांगता येत नाही. दर क्षणी आयुष्याचा एकेक मणी कायमचा तुटून जातो. तारुण्यावर सारखे

वार्धक्याचे वारूळ जमत असते.प्रत्येकाला म्रुत्यूची छाया चिकटलेली असते. आमचा आनंदही दुःखाच्या ओल्या पावलांनी हिंडतअसतो.माझ्या जगात तू राहू शकणार नाहीस. मत्स्यकन्ये, मी जातो.."

एन्.याप्रमाणे, 'मत्स्यकन्या',ही मिथक कथा आहे. पण ही कथा, अनेक महत्त्वाचे पैलू उलगडते.म्हणून, जीए कुलकर्णी यांच्या श्रेष्ठ कथांपैकी ही कथा आहे.

विनंती- वाचकांनी ही कथा मूळातून वाचावी ही विनंती.

मत्स्यकन्या चर्चा पूर्ण

# काली

काली कथा - लेखक जीए कुलकर्णी . विवेचक - व्हीएस वाघोलीकर

। )जी ए कुलकर्णी यांनी, त्यांच्या कथांमध्ये जन्म व म्रुत्यूचे भान ठेवत, जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण केले.

2 ) 'मृत्यू' हा विषय अनेक लेखकांनी हाताळला आहे. रामदासांचे मृत्यूवरील पद्य प्रसिद्ध आहे. उदाहरणार्थ-

मृत्य न म्हणे हा सावध । मृत्य न म्हणे हा सिद्ध ।
मृत्य न म्हणे वैद्य प्रसिद्ध । पंचाक्षरी ॥ २५॥
......
मृत्य न म्हणे हा स्वाधेन । मृत्य न म्हणे हा पराधेन ।
सकळ जीवांस प्राशन । मृत्युचि करी ॥ ३१॥
......
मृत्याभेणें पळों जातां । तरी मृत्य सोडिना सर्वथा ।
मृत्यास न ये चुकवितां । कांहीं केल्या ॥ ३८॥

3 )जी एंनी त्यांच्या अनेक कथांत हा विषय हाताळला आहे. निरोप (पारवा), कळसूत्र,
गुलाम, दूत, रत्न, विदूषक (काजळमाया), ऑर्फियस, स्वामी (पिंगळावेळ), एका देवाचा मृत्यू, पाणमाय (सांजशकून), राधी ( हिरवे रावे ) इत्यादी अनेक कथांत,

मृत्यूची कारणे, वेदना, मृत्यू नंतरचे परिणाम - यांवर त्यांनी लिहिले आहे. पण 'काली' (सांजशकुन) ही कथा पूर्णपणे मृत्यूवर आहे. म्हणून त्यांच्या मृत्यूवरील चिंतनात ही कथा महत्वाची आहे.

4)'काली' ही कथा वाचकाने शेवटपर्यंत वाचावी, अशी आहे. एखाद्या नदीत, अनेक उपनद्यांचे प्रवाह वाहून येत मिळत असतात . त्या उपनद्यांत वेगवेगळे रंग असतात. त्याप्रमाणे या कथेत अनेक रंग आहेत.

- 5 )कथेतील पहिला प्रवाह, दैनंदिन, वास्तविक घटना दाखवतो. प्रवासी गाडीतून उतरून, चालत, टेकडीवरील कालीच्या देवळात जातो व तेथे त्याचा कालीच्या खड्गाने मृत्यू होतो. हा पहिला प्रवाह आहे.

दुसरा प्रवाह, प्रतिकांचा आहे. निर्मनुष्य खेडे, आठवणी, स्फटिकांची भिंत, अशी प्रतिके आहेत.

तिसरा प्रवाह संकेतांचा आहे. प्रवाशाचा मृत्यू होणार आहे, असे संकेत सुरुवातीपासून दिले आहेत. गाडीतून ढकलला जातो. खेड्यात मागीलवेळी बातम्या सांगणारी वृद्ध माणसे होती, जाताना धाप लागते, प्रवासी स्फटिक भिंतीतून आत जातो, हे संकेत आहेत.

चौथ्या प्रवाहात जी ए सारतत्वे सांगत आहेत. प्रवासी कालीसमोर प्रार्थना करतो, मूर्ती लहान लहान, दूर होत जाते, नंतर मूर्ती अदृश्य होते , मग भव्य होते, व खड्गाने शिर धडावेगळे होते, यातून जी एंचे मृत्यूचिंतन कळते.

हे चारही प्रवाह सरमिसळीचे होतात. ते वाचकाला शोधावे लागतात. कालिदास कवीने म्हटले आहे, "हजारो दिशांनी सतत हल्ला करत असलेला, मृत्यू झाल्यावर ,हा जीव, गेल्या क्षणी जिवंत होता हेच मोठे आश्चर्य आहे". किंवा "तुमच्या

सर्वात जवळ नेहमी कोण असते, या यक्षप्रश्नाचे उत्तर "मृत्यू" असे आहे." ज्या जीवाला काही काळाचे जीवन लाभले व जाणीव मिळाली , अशा जीवाची ही कथा आहे.म्हणून, ही तुमची, आमची कथा आहे. या कथेत इतर मृत्युप्रकार वगळले आहेत, हे लक्षात घ्यावे.

6)आता कथा कशी वळणावळणाने जाते, हे पाहू. त्यामध्ये जीएंच्या वाक्यानंतर ......* अशी खूण करून माझे मत मी मांडले आहे.

प्रवासी थोडासा ढकलल्याप्रमाणे गाडीतून उतरतो ...* त्याला आजारपण येते. त्याला निर्जन, बालपणीचे खेडे लागते.

... ***खेडे निर्जन आहे, तो समाजापासून तुटतो. त्यांची बातमी तो इतरांना सांगू शकणार नाही. त्या खेडयात घरांना छपरे नाही. हाक मारणारे कोणी नाही. चूल विझली आहे. ...*** तो निसर्गात उघडा पडला आहे. ज्ञानेंद्रिये विझत आहेत. तो टेकडी चढतो व त्याला धाप लागते ... *शरीर जर्जर झाले आहे व तो मृत्यूकडे जात आहे.

तो कालीच्या निर्मनुष्य देवळात जातो ...* मृत्यूकडे आता जवळ जात आहे.तेथे कालीची रक्तवर्ण, खड्गधारी, भव्य मूर्ती असते ...* मृत्यू सर्वव्यापी, भव्य, अनिर्वचनीय आहे. शरीरातील रक्ताशी संबंधित आहे. त्याचे रक्त कमी होणार आहे. मूर्तीचे दर्शन होते, म्हणजे सर्वव्यापी मृत्यूची जवळून जाणीव होते.

यानंतर याआधी दुसऱ्या प्रवाहात सांगितलेली प्रतिके आता जास्त स्पष्ट होत आहेत. प्रवासी व काली, यांमध्ये पारदर्शक, कठीण स्फटिकाची भिंत असते ...* अटळ मृत्यू दिसतो.
पण त्याची येण्याची वेळ कळत नाही, कारण स्फटिक कठीण आहे.

प्रवासी कालीची प्रार्थना करतो .... *आपल्याला मृत्यू येणार हे त्याला विचाराने कळते. प्रार्थनेत पूर्वी घडलेल्या प्रसंगाचे वर्णन आहे. एक जरी वासना राहिली तरी स्फटिक भिंती पासून तोबाहेर फेकला गेला ....* शरीर, मन, परिस्थिती, या तिन्हीमध्ये, एकत्रितपणे जीवनाची अनुकूल इच्छा राहिली, की तो जीव तडफडणाऱ्या माशाप्रमाणे, परत जीवनात येणार असतो. .. ..* शरीर चांगले राहिले तर - तो जिवंत राहील . शरीर चांगले पण मन कोमात गेले तरी तो जिवंत आहे . परिस्थिती म्हणजे सपोर्टिंग सिस्टिमही चांगली असली तरी तो जिवंत राहील . जीवनात तिन्ही एकत्रितपणे असले पाहिजे ...ते विभक्त होवू लागले, तर मग मृत्यूची प्रक्रिया सुरु होते.

येथील प्रार्थना हा चौथ्या प्रवाहाचा भाग आहे. मृत्यू अनासाये मिळावा अशी प्रवासी (व्यर्थ) प्रार्थना करत आहे. कारण ही प्रार्थना कठीण स्फटिकावर पडत आहे,

यावेळी हा श्लोक आठवतो-

अनासायेन मरणम्, विना दैन्येन जीवनम्|

देहांते तव सानिध्यम्, देहि मे परमेश्वरम् |

(अर्थ- हे ईश्वरा, मला सहज मृत्यू येवू दे, जीवनात दैन्याचे, परावलंबत्व नको, मृत्यूसमिप येईल, तेव्हा मला तुझे स्मरण असो. हे वरदान तू प्रसन्न होवून द्यावे)

आता यावेळी मात्र प्रवाश्याचा हात स्फटिकातून जातो, व शरीरही जाते ... *शरीर संपत आले आहे,मन विझत आले आहे. मागील भिंत कठीण झाली ...* हे शेवटचे आजारपण आहे. तो जीवनात परत जाणार नाही.

पण स्फटिकातून आत गेल्यावर काली मूर्ती लहान लहान होत जाते ...* मृत्यू केव्हा येणार , केव्हा प्रत्यक्ष घाला घालणार, हे मृत्यूशय्येवरही जीवाला कळत नाही. श्वासामागून श्वास जातात, व बेशुद्ध होवून जीवाला मृत्यूची वाट पहावी लागते.

आता कालीची मूर्ती अदृश्य होते व फक्त चौथरा दिसतो ... ***शरीर व मन विरत जाते. भ्रम होतो. मूर्ती म्हणजे मृत्यू, अदृश्य झाला, या गर्वाने प्रवासी अगदी अस्पष्टपणे बडबडतो व वेड्या हालचाली करतो . त्याचे बडबडणे जवळच्यालाही ,कान जवळ नेवूनही कळत नाही . . . ....*** जाणीव, मन हेलपाटत असते. माझ्या मनाने मृत्यू आला ,असा विचार, म्हणजे विझण्यापूर्वी ज्योत मोठी होण्यासारखा गर्व येतो.

त्यावेळी काली मूर्ती भव्य होते, व खड्गाने शिर धडावेगळे करते ... *अनिर्वचनीय, भव्य, सर्वव्यापी मृत्यू येतो व क्षणाच्या सूक्ष्म काळखंडात घाला घालतो, व सर्व संपते.

काली धड बाजूला टाकते ...* कालौघात मृत्यू हाच सत्यक्षण असतो व शरीराचे शव होते.पुन्हा काली खड़्ग धारण करून उभी राहते व एकटक पाहत राहते ....* या कथेत मृत्यूला व्यक्तिरूप दिले आहे, व एकटक पाहते, म्हणजे सर्व काळात मृत्यू आहे.

अनेक उपप्रवाह मिसळले जावून ,कथेचा एक प्रवाह होण्याची पद्धत , जीएंच्या अनेक कथांत आढळते. यादृष्टीने जी एंच्या रत्न. ठिपका, निरोप, या कथा पाहता येतील.

7)शब्दप्रभू जीए कुलकर्णी--- नेहमीप्रमाणे जीएंनी नेमके शब्द वापरून कथेत वातावरण तयार केले आहे. उदाहरणार्थ, "कालीच्या देवळात हवा ओलसर होती व फरशीवर उभे राहिले की पावलांभोवती पादुका उमटत. एका कोपऱ्यात कोठूनतरी

येणाऱ्या झऱ्याचे पाणी गोमुखातून खालच्या कुंडात पडत होते व शीतल नाद गुहेच्या नाडीप्रमाणे अविरत ऐकू येत होता". अशा अनेक दृष्टीने पाहिल्यावर, प्रतिभावान जीएंची "काली" कथा म्हणजे अगणित पैलूंचा हिरा वाटतो. धन्यवाद.विलास वाघोलीकर

-------------

सरजी, आपण महत्वाचा मुद्दा मांडला आहे त्याबद्दल खूप आभार . माझ्या विचाराने खाली लिहित आहे - I ) माणसाला ( जीवाला ) जिवंत राहण्याची सहजप्रवृत्ती आहे . म्हणून माणूस बर्फाळ प्रदेशात तसेच वाळवंटात रहात असतो . 2 ) या सहजप्रवृत्तीत मन घटक महत्वाचा आहे. उदाहरणार्थ, माणूस कड्यावरून उडी मारायला मनाने घाबरतो . 3 ) शरीर घटक महत्वाचा आहे. माणूस वाळवंटात ,पाण्याचे ओआसिस शोधायला धडपडत चालतो . 4 ) परिस्थितीचा घटक महत्वाचा आहे." डॉक्टर, मला वाचवा "असे पेशंट सांगतो .व परवडतील ती औषधे घेतो . 5 ) हे तिन्ही घटक एकत्र असले, तर अस्तित्व टिकते. म्हणून ही ओलांडायला कठीण अशी भिंत आहे . 6 ) पण ही भिंत पारदर्शक आहे . माणसाला कळते की, दरक्षणी मृत्यू घाला घालायाता तयार आहे . 7 ) ही परिस्थिती दाखवणारी स्फटिकाची कठीण पण पारदर्शक भिंत, जी एंच्या प्रतिभेने तयार केली आहे. तिन्हीतील एक घटक कमी झाला की मृत्यूची प्रक्रिया सुरु होते . व स्फटिकातून हात आत जातो . धन्यवाद . - विलास वाघोलीकर

- --

सुनीळ सामंत : सर, खुपच छान विवेचन. मला पहिल्या वाचनात ही कथा सामान्य आणि विस्कळित वाटली होती. नंतर नंतर त्यातल्या काही गोष्टी जाणवत गेल्या. पण आता तुम्ही प्रकाशाचा झोतच टाकला आहे. आता पुन्हा वाचणे आले. नवीन प्रकाशविलासात. धन्यवाद.

Vishweshwar Nandedkar: परफेक्ट विवेचन 👌👌 🙏🙏

वैभव कुलकर्णी : विलासजी 🙏, सर्व बाजुनी विचार करता तुम्ही ! तुमचे विवेचन खुप प्रगल्भ आहे,परीपुर्ण आहे. जीएंची मृत्यु ही संकलपना अनैक ठिकाणी अनेक स्वरुपात वाचायला मिळते. मला वाटते आपण वर लिहल्या प्रमाणेच जीएंनी एके ठिकाणी .....मत्यु माझा माग काढत येत असण्या पेक्षा मीच त्याला आपणहून सामोरे जाईन .एव्हडे एक मानचिन्ह माझ्यापाशी राहील......

किंवा माणसे आरभाट आणि चिल्लर मधे —आणि तू असास यावास ,नव्हे असाच ये (इथे मृत्युस जीएं सिगरेटच्या कश मधुनच येण्यास सुचवतात ) काली ही खुप प्रतिकातत्मक असावी. काली ही एक शक्ती आहे ,खुप प्रचंड शक्ती आहे.

कालीचे स्वरूपही भीतीदायक आहे ...हातात मुंडके, रक्ताळलेली जीभ , लाल डोळे ....संपुर्ण काळी प्रतिमा !

जीएंना गुढतेचे खुप आकर्षण होतेच ,गुढता त्यांनी मानवी जीवनात शोधली !

काली कथेतील नायक संसारीक पाश तोडत चालला आहे तरी त्याला काली स्विकारत नाही.....आईचे आतडे पायात घुटमळले अशा वाक्यातुन जीए न टाळता येणारे जीवनाचे अमुक्तपण दर्शवीतात .......

Madhav Puranik: काली : सांजशकुन :विवेचक डॉक्टर माधव पुराणिक स.तर - भारतीय तत्वज्ञान

१ काल किंवा महाकाल किंवा कालभैरव किंवा शिव आणि काली किंवा महाकाली किंवा आदिमाया किंवा शिवपत्नी ही एकाच तत्वाची शिवशक्तीची दोन रूपे आहेत

२ काली आपल्या ठिकाणी कालाचे ( उत्पत्ती, स्थिती आणि लय, सत्व, रज आणि तम गुण) एकत्रीकरण करते

३ नायकाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे शाश्वत आनंदाची प्राप्ती करणे त्याकरता क्षणिक मोहांचा ( 'आसक्तीचा एक धागा') त्याग आवश्यक आहे.

४ नायक उर्फ काली (क्षणिक शक्ती ही अंशात्मक अनंत शक्ती)

- त्यामुळे स्वतःतील मोहपुरुषाचे 'मुंडके तोडून एका हाती धरतो" ५ नायक उर्फ काली -नायकाच्या शिरातून रक्त बिंदू ठिबकतात / 'खड्गातून एक धार रेषा झाली होती' -हे नायकाच्या अखंड क्रियाशक्तचे (शारीरिक ,मानसिक क्रियांचे) द्योतक आहे

६ नायक उर्फ काली - हा स्मशानात ( निर्जन, उंच, एकाकी मंदिर ) उभा असतो. त्याच्या हृदयातील (स्मशानातील) सर्व भावनांची राखरांगोळी झालेली असते. (कौटुंबिक ,आदिम सामाजिक इत्यादी भावना).नायकाचे कौटुंबिक संबंध नाहीसे झालेले असतात. ( बायकामुलांचे बंध, फराळाचा डबा इत्यादी). त्याचे सामाजिक संबंध नष्ट झालेले असतात. ( उजाड खेडी, ढासळलेली घरे, बाल मित्राचा न ऐकू येणारा आवाज ),मृत्यूकडे जाणारा मानवी समाज,( एक एक नाहीसे होणारे वृद्ध), प्राणीजीवनाचा नाश झालेला असतो (पांढरे बैल असलेली गाडी, गोठे इत्यादी)

७ नायक उर्फ काली - स्वतःचे हात सोडून स्वतःच्या कमरेभोवती मेखला म्हणून बांधतो म्हणजे तो आपली सर्व कर्मबंधने तोडतो .तो निर्जीव होतो .त्याचे शब्दात, अक्षरांत, ध्वनित, शक्तीत रूपांतर होते .त्याच्या सर्व क्रिया, हालचाली जिवंतपणाच्या निशाणी संपतात.

८ नायक उर्फ काली - कालीच्या गळयात पन्नास अक्षरांची किंवा शक्तींशी मुंडमाला आहे. या शाश्वत शक्ती आहेत. त्या शब्दब्रह्माचे रुप तर नायका�

Madhav Puranik: शब्दब्रह्माचे रुप तर नायकाचे मुंडके या पन्नास शक्तींचा क्षणिक आविष्कार आहे. दुसरा नायक ( अटळपणे, ठरल्याप्रमाणे) मृत्यू पावला की आधीचा आपला नायक ( क्षणिक शक्ती) मूळ शक्तीत विलीन होणार. हेच (५० अक्षरशक्ती) सृष्टीचे बीज आहे या पन्नास शक्तींमधून नवीन नायकांचा जन्म होतो .हे शक्तिचक्र शाश्वत शक्तींकडून क्षणिक शक्तीकडे( जी एं च्या नायकांचा जन्म होतो - मृत्यचे रहस्य कथेतून सोडविण्यासाठी) फिरते. मग परत आपले आयुष्य परत मृत्यूमार्गाने शाश्वत शक्तींकडे असे आहे .

९ नायकाला हे रहस्य कधीच समजणार नसते . जीएंच्या अनेक कथांतून घडते अगदी तसे येथे घडते उदाहरणार्थ अनंताचे मंदिर, इस्किलार,अहम इ.) (क्षणिक विजय मग पराजय, शेवटी भीषण मृत्यू- शिरच्छेद, कडेलोट, दुहेरी विषबाधा, स्मशानात भूताखेतांच्या सानिध्यात, महाभ्रम,महाविस्मृती इ. ) कारण क्षणिक मर्यादित शक्तींनी( मन, गर्व , अहंकार, ईष्या, वासना इ) शाश्वत अमर्यादित शक्ती होणे म्हणजेच जीएंना जाणलेले मृत्यूचे सत्य असावे .

१० काली तीन प्रकारची आहे. जेव्हा उत्पत्ती कार्य असते तेव्हा ती रक्तवर्णी असते.तेव्हा स्थिती कार्य असते तेव्हा ती गौरवर्णी असते. आणि जेव्हा संहार कार्य असते तेव्हा काळी असते. मंदिरात नायकाची काली चकचकीत काळया पाषाणाची मूर्ती असते.नायकाचा अटळ संहार हेच कथेतल्या कालीचे कार्य आहे .

११ जी एं च्या नायकांचे ध्येय आहे कि 'कालीच्या मूर्तीजवळ स्फटिक भिंत पार करून मृत्यूवर विजय मिळवणे '.

त्या काली,ने कालीमूर्तीने नायकाचे आयुष्य ग्रासले आहे व संपवत आणले आहे. तो काल त्याचा संहार करत आलेला आहे .मृत्यू म्हणजेच आत्मिक, सामाजिक, भावनिक ,बौद्धिक, शारीरिक इ. शक्तींचा सतत विषयाकडे चाललेला अनादी प्रवास.

१२ नायकाचा भूतकाळ ,वर्तमानकाळ भविष्यकाळ ( फक्त नायकाच्या मनातच हे ३ काळ आहेत.) या तीन प्रकारांनी काली त्याचे संपूर्ण आयुष्य संपवत आहे . नायकाला अखंड कालीचे रहस्य उलगडायचे आहे .तिची शक्ती अनंत आहे. पण जी एं चे सर्व नायक त्यांच्या कुवतीप्रमाणे (हेच त्यांचे अस्तित्ववादी सत्य किंवा नियती) हे रहस्यभेद करण्याचा प्रयत्न निष्ठेने, आवेशाने व सातत्याने करतात .पण हा प्रयत्न एकाच प्रकारे भावनेच्या एका अटळ लाटेवर स्वार होऊन, उतारवयात, स्वतःचा अनुभव प्रमाण मागून करताना दिसतात त्याचा शेवट कड्यावरून उडी मारून मृत्यू होतो

१३ हे जीएंना मृत्यूचे बसलेले कलात्मक, भावनात्मक, भाषिक ,प्रतिभावान ,जिवंत सुखदुःखांच्या सामान्य दैनंदिन जीवन जगणाऱ्या नायकांच्या वास्तव-अवास्तव

माध्यमातून केलेले आकलन आहे .तेच आणि तसेच इतर कथांमधून ही दिसते
डॉ माधव पुराणिक
वैभव कुलकर्णी : सुनालजी , विलासजी.....,

आपल्या सर्वांचे कथेतील मुर्ती समोरील स्फटीका विषयी काय मत आहे ?
Pradeep Kulkarni: परत एकदा मला जे उमगलंय ते. पारदर्शक स्फटीक..एक रूपक आहे. काल्पनिक अडसर आहे जो,पलीकडील पाहाण्यासाठी भासत नाही. पण पलीकडे जायच असेल तर जाणवतो. सामान्य व्यक्ती अनंत, सर्वोच्च शक्तीला आपापल्या स्फटिकरूपी भिंगातून पाहात असतात. जे आणि जसं दिसतं, तसंच अनुभवत असतात. जरी आरपार दिसत असलं तरी प्रत्यक्षात हा अडसर तर असतोच. ज्यावेळी विलीन होण्याची वेळ येते, तेव्हा हा अडसर दूर होत असतो. अशी रूपक जी.ए नी "कांचनमृग" तसेच "यात्रीक" कथेत वेगळया पद्धतीने वापरलीत. मला कल्पना आहे, तुम्हा दिग्गजांच्या चर्चेत सामील होण्याचा प्रयत्न, अन तोही अशा कथा लेखकांच्या कथा, मंत्रमुग्ध, भारलेल्या मनःस्थितीत वाचायची. कुणासोबत चर्चा करावी तर मोजकी दोघ तिघेच असायची. चुकलं असेल तर.. तुम्हा सर्वांची तसेच जी.ए ची माफी मागतो...
Vishweshwar Nandedkar: अगदी जवळ पोहोचले आहेत. तरी पण काहीतर राहून जात आहे

सुनीळ सामंत : माधव सर, माझ्या विनंतीला मान देऊन, आपल्या मोठ्या प्रोजेक्टमधून वेळ काढून, ही पोस्ट लिहिल्याबद्दल मी व्यक्तिशः आपला अत्यंत आभारी आहे.

आपण या कथेतील नायकच बदलून टाकला. आणि मानवा ऐवजी काली नायक केली. खरेच आहे म्हणा. या नजरेतून, स्फटिकाच्या दुसऱ्या बाजूने कथा पहाणे एक वेगळाच रंग दाखवते. तुम्ही या कथेतील प्रत्येक प्रतिकाचे वेगवेगळे पैलू दाखवत कथेला एका वेगळयाच उंचीवर नेले आहे. कालीचीही तीन रुपे दाखवली आहेत.

जीएंच्या प्रतिभेतून निर्माण होणाऱ्या आविष्कारांना तुमच्या नजरेतून पाहिल्याशिवाय स्पष्टता येत नाही. कृपया लिहा.

[22/04, 06:13] G A Premi  सुनीळ सामंत : मला ही कथा आत्मघाताची कथा वाटते. आणि स्फटिकक्षण हा निर्णयाचा क्षण आहे. तो म्हटले तर अतिसय सोपा, इतर क्षणांसारखाच एक क्षण, पण तो ओलांडणे ही जवळपास अशक्य गोष्ट आहे. पाशांचा विचार येताच ते असक्य होऊन बसते.

"* सुनीळ सामंत : काली- जी ए कुलकर्णी- सांजशकुन

''सांजशकुन'च्या सुरुवातीच्या कथांपैकी 'काली ' ही एक. १९७३ ची. सांजशकुन हा अस्तिस्तोत्र आणि अहम यांच्यामधला प्रवास आहे. अस्तिस्तोत्र म्हणजे शून्यवाद, आपल्या अस्तित्वाला काडीचीही किंमत नाही याची जाणीव; तर अहम म्हणजे काळ आणि विश्वाच्या या विराट विस्तारातही आपला स्वतःचा असा ठसा उमटवून जाण्याच्या मानवाच्या जिजिविषेचा उद्‌गार. काली ही त्यातल्या पहिल्या बाजूची कथा. पण थोडी पुढची. इथे त्याला आपल्या नगण्यतेची आणि क्षणभंगुरतेची जाणीव स्पष्ट आहे तरीही त्याची मृत्यूला वाकुल्या दाखवण्याची जिद्द अजून जिरलेली नाही. तो स्वतःहून मृत्यूकडे चालून आला आहे. जीवनाची लालसा, मृत्यूची भिती, आपल्यांना सोडून जाण्याची हुरहुर यांच्यात आणि मृत्यूचे जाणिवपूर्वक दर्शन घेण्यात मधेच एक अदृश्य स्फटिकक्षण असतो, तो ओलांडण्याचा त्याचा प्रयत्न आहे.

आपण जिवंत आहोत की मेलेलो आहोत याची जगाला फ़ारशी फ़िकिर नसते. त्याची नोंद घेणारे दोन चार म्हातारे असतात आणि त्यांच्या मरणाची नोंद घेणारा तर कोणीच नसतो. तेव्हा आपल्या जगण्यामरण्याची क्षिती बाळगणारे केवळ

आपणच याचे ज्ञान त्याला झालेले आहे. आणि म्हणूनच तो निःशंक मनाने त्या स्फटिक क्षणापाशी आलेला आहे. पण तो खरेच निःशंक नाही कारण स्फटिकाला हात लावण्याच्या क्षणी त्याला “आपलेही आयुष्य मोडून चुरगाळलेल्या झुडुपाप्रमाणे केविलवाण्या कुरुप तऱ्हेने संपेल’ की काय अशी शंका आहे. हा आत्महत्येचा विचार असावा का? ही कथा इच्छामरणाबद्दल, आत्मघाताबद्दल आहे का? अनेकदा या विचाराशी येऊन तो परत फ़िरला. गेल्यावेळी तो त्या स्फटिकाच्या पलिकडे जवळजवळ गेलाच होता, पण अचानक मुलांची आठवण आली आणि तो स्फटिक अभेद्य झाला.
त्या स्फटिकाची दुसरी बाजू मुलायम आणि वज्रासारखी होती यातून जीएंना काय सुचवायचे असावे? मुलायम म्हणजे आरामशीर, सुखदायी, सोडू नये अशी. आणि वज्रासारखी म्हणजे कठोर, सोडायचे म्हटले तरी अभेद्य, माघारी जायचा विचार आला तरी अशक्य अशी.

त्यानंतर जेव्हा तो मूर्तीकडे सरकतो तेव्हा तीही मागे सरकते आणि लहान लहान होत जाते. पण तो त्याचा भ्रम असावा. त्या भ्रमात तो जे बडबडतो ते अज्ञानच. मृत्यूवर विजय मिळवल्याचे त्याचे समाधान देखिल अज्ञानच.
कारण मृत्यू आहे तिथेच आणि तितकाच बलवान आहे. तो त्याला संपवून त्याच्या धडामधे प्रकाशाचा, ज्ञानाचा, पलिता रोवून जगाला आपले श्रेष्ठत्व सांगतो आहे. त्याचे डोळे अनिमिष आणि निर्विकार आहेत. निमिषासाठीही तो आपले डोळे झाकून घेत नाही. त्याचा यज्ञ अव्याहत आहे. निरंतर आहे. मानव दुर्बल आहे त्याच्यासमोर.
जीएंच्या अस्तिस्तोत्राच्या शोधाचा हा एक टप्पा म्हणून ही कथा महत्त्वाची आहे.
विशाखा आपटे : स्फटिकाची भिंत हे purity चं प्रतीक असेल का? भिंतीमधून काली च्या प्रतिमेकडे जाताना सर्व विकार -राग लोभ मद मत्सर मागे सोडून जावं लागणार आहे... कारण ही भिंत पारदर्शक आहे हिला कोणताच रंग नाही.

Rajesh Unavane: ***‘काली’ कथेवरील मान्यवरांची चिंतनात्मक प्रतिक्रिया वाचून, कथा समजून घेण्यास खूपच मदत झाली. सर्वांचे मनापासून धन्यवाद.**

या प्रतिक्रिया वाचून आपणही काही मत व्यक्त करावे असे वाटू लागले. पण धीर होत नव्हता. कारण काही भाष्य या कथेवर करावे इतकी पात्रता आपली नसल्याची जाणीव या कथेतून व त्यावरील सर्व मान्यवरांच्या बहुमूल्य प्रतिक्रिया वाचून झाली.

आपणामुळे सर्वांमूळे ‘काली’ कथा जशी समजली तो अर्थ शब्दबद्ध करण्याचा हा छोटासा प्रयत्न. तो चुकीचाही असू शकेल, याबद्दल क्षमा असावी.

१) गाडीतून ढकलून देणे, म्हणजे जीवनाचा प्रवास संपलेला आहे. ***जीवाचे मृत्युकडे प्रस्थान सुरू झाले आहे. ही 'रूपकात्मक' अशी खास जीए यांची शैली..!***

२) जगातील असंख्य जीव जन्मास येऊन निघूनही जातात. गावापासून काली मातेची गुहा जवळ आहे. पण गावकऱ्यांना (मानवी जीवास) जीवनाचा शेवट तिच्या चरणी करावा याचे भान नाही. (किंवा ते ज्ञान नाही.) सगळे असेच हा देह सोडून गेलेत. जे जगात सर्वत्र मानवी जीवाबाबत घडून येते. ***ते निर्मनुष्य गाव त्याचे प्रतीक/रुपक आहे.***

३) नायकाला ते ज्ञान आहे. मागील वेळेस तो बोचके ( ***ते मोहाचे बोचके आहे. जीए त्या बोचक्यात काय आहे? हे कथेत सांगत नाहीत. ते एक रुपक आहे.*** ) घेऊन आला होता. तो स्फटिकाच्या जवळजवळ पलीकडे गेला होता. पण ऐनवेळी त्यास मुलांची/बायकोची, तिच्या फराळाच्या डब्याची आठवण झाली. प्रपंच मनातून गेलेला नाही, मोह झाला. पलीकडे गेलेला तो परत अलीकडे

आला. *“**स्फटिक” हे मायेचे “रुपक” आहे.*** ***‘माया’ शेवटपर्यंत पाठ सोडत नाही, मुक्तीचा रस्ता दाखवत नाही, हे जीए येथे दर्शवतात.*** पराभव झाल्याने नायक तो स्वीकारून पुन्हा ‘काली’ कडे आलेला आहे. कथा पुन्हा येथून सुरू झाली आहे.

४)यावेळेस बोचके नाही. “आता सोबत घेऊन हिंडावे असे काही राहिलेच नाही.(कथेतील वाक्य)”. पण स्वत:च्या घरापाशी तो थांबतो. आठवणी जाग्या होतात. बालमित्राच्या घरापाशी आल्यावर त्याचीही सय येते. गावातील जिवाभावाची माणसे त्यास आठवतात. याचा अर्थ ***तो ‘मोह’ अजून शिल्लक आहे. अंतरंगातले ते ‘मोहमायेचे’ बोचके अजून सोबत आहे.*** पण ते सर्व टाळून नायक पुढे जातो. तो आप्त-स्वकीयांचा ***मोह बाजूला सारतो.***

५) आता पूर्ण मुक्त झाल्याची भावना तो कालीच्या प्रार्थनेत व्यक्त करतो. पण... “मृत्यूपूढे सन्मुख झालो एवढेच एक मानचिन्ह माझ्यापाशी राहू दे(कथेतील वाक्य).”, असे देवीस म्हणतो. ***अजूनही इच्छा राहिली आहे, हे जीए येथे दर्शवतात.***

४) नायकाने “माये” वर बऱ्यापैकी मात केलेली आहे. त्यामूळे मायेचे रुपक असलेली स्फटिकाची भिंत त्यास आपसूक प्रवेश देते. नायक आनंदित होतो. सावकाश कालीच्या मूर्तीकडे येऊ लागतो. ते पाहून मूर्ती मागे सरकते, भव्यता जाऊन हातभर उंच होते, नंतर अंतर्धान पावते. मूर्तीचा चबुतरा रिकामा होतो. ***देवाने भक्तासाठी त्याची जागा रिकामी केली आहे. मनुष्याचा देव होऊ लागलेला आहे. याचे ते रूपकात्मक चित्र जीए रंगवतात.***

५) आता मृत्यूची भीती संपली आहे. सामर्थ्यशाली शक्तीने शरीर भरून गेलय. नायक मोठ्याने हसतो( ***आणि येथेच फसतो.---जीए सलाम***). तेव्हा त्याचे जीएनी कथेत लिहिलेले स्वगत वाचण्यासारखे. ते अप्रतिम आहे.

*मृत्यूवरील विजयाचा उन्माद, तो गर्व, तो अहंकार जागृत होतो.* आणि काली प्रकट होते. ती "मुक्ती" त्यास देत नाही. ते देवपण देत नाही. कारण शरीराचा, मी पणाचा, मृत्यु वरील विजयाचा ---- तो अहंकार अजूनही शिल्लक आहे. काली त्याचे धड फरफटत नेते. ते ही कोपऱ्यात. आधीचे धड बाजूला सारून त्यावर ते ठेवते. पलिता ठेवते.

६) कालीने चबुतरा नायकासाठी रिकामा केला होता. अंतीम क्षणी अजूनही शिल्लक राहिलेल्या अहंकाराने त्याचा बळी घेतला.

हे जर घडले नसते तर..,

नायकाची जागा कालीच्या चबुतऱ्यावर होती. कालीने ती रिकामी केली होती. तो देवत्वास पोहोचला होता. कालीच्या जागेवर बसू शकत होता. माणसाचा देव झाला असता. पण अजूनही गर्व, तो विजयाचा अचानक जागृत झालेला अहंकार यामुळे नायकास सामान्य माणसाप्रमाणे वेदनेचा मृत्यु देऊन 'काली' परत चबुतऱ्यावर *स्फटिकातून (म्हणजे---'मायेच्या पडद्यातून') अनिमिष ('इच्छा रहित'), निर्विकार ('विकाररहित') डोळ्यांनी पहात उभी राहिली !*

----०००--

जीए देवावर विश्वास ठेवत होते की नाही, स्वत: पूजापाठ करीत होते की नाही याविषयी अनभिज्ञ आहे. पण ते एक आध्यात्मिक ज्ञानयोगी असल्याचे या कथेतून लक्षात येते. ते ज्ञान त्यांनी प्रयत्नपूर्वक आत्मसात केले असावे. गुरु शिवाय. असे वाटते. आणि..

***ते ज्ञान रुपकात्मक, प्रतीकात्मक रित्या सांगण्याची त्यांची शैली लाजबाब..!***

***जीए आपण जिथे असाल तिथे आपणास प्रणाम, दंडवत !***

सुनीळ सामंत : राजेशजी,
विलासजी आणि माधव सरांच्या विवेचनाच्या आधारे मी कथा माझ्या परीने समजून घ्यायचा प्रयत्न केला पण त्यात अनेक फटी राहिल्या. त्या logically सुटतच नव्हत्या. तुमच्या अतिशय point to point टिपणाने माझ्या त्या शंका दूर झाल्या. (उदा. चौथरा मिळणे व नंतर न मिळणे). त्याच बरोबर काही जागा दुर्लक्षितही जाल्या होत्या (बसमधून ढकलून दिले) त्याही आपण ध्यानात आणून दिल्या. तुमचे मनापासून आभार मानतो.

Madhav Puranik: काली -सांजशकुन -विवेचन -डॉ माधव पुराणिक
प्रतीक : स्फटिकाची भिंत = मन
१ गाभाऱ्याच्या चौकटीवर भासणारी स्फटिकाची भिंत ही कालीकडे जाणाऱ्यांची निवड करते द्वारपालाचे काम करते .
२ मनाच्या म्हणजे मर्त्य जगाच्या संपर्काने अशुद्ध, अपारदर्शक असलेल्यांना परत मर्त्य जगात पाठविते.काली देवतेच्या संपर्कात येऊ देत नाही. नायकाच्या मनात मुलांच्या बायकोच्या, फराळाच्या आठवणींनी आसक्ती म्हणजे अशुध्दता निर्माण झाली व तो परत आला .अशुद्धता म्हणजे दुसऱ्यांबद्दल च्या इच्छेमुळे उत्पन्न होणारे काल्पनिक अडसर ( संदर्भ- नामकाका ). इच्छेचा प्रवास संकल्प- कल्पना -विचार- भावना- कृती- परिणाम या अस्वच्छ चक्रात होत राहतो .
३ स्फटिक हा स्वतःचा रंग दाखवत नाही. पलीकडे असलेल्या मनाचे रंग दाखवतो .आसक्ती इ. चे रंग नायक स्वतःच पाहतो व परत येतो. दुसऱ्या वेळेला, त्या क्षणाला नायक स्फटिका समोर रंगहीन म्हणजे मानवी मनात काहीही मर्त्य, मर्यादित उमटत नाही असा होतो व पुढे जातो.
४ स्फटिक म्हणजे मन .ते शुद्ध झाले -विश्वातून, जगातून माणसांतून ,स्वतःच्या मनातून येणाऱ्या प्रतिमांना शुद्ध रूपात पाहू लागले तर मन स्वतःच स्फटिक होते

व स्वत:ला ओलांडते.
५ मनाची शक्तीच स्फटिक रूप होऊन मनाच्या पलीकडच्या गूढ, अज्ञात, रोमांचक ,भीतीदायक ,तारणहार ,जीवनाला अर्थ देणाऱ्या कालीकडे - अमनाकडे किंवा ऊन्मनाकडे किंवा मना पलीकडच्या जाणिवेत नेते.
६ नायक प्रथम चार भिंतीत राहतो व त्यात येणारे किंचित पारदर्शक शक्ती अनुभवतो करण बायको (वासना) मुले, धन (आसक्ती)त्याला मनाला अपारदर्शक करतात .मग तो गुहे खालच्या गावात 'उध्वस्त घर', 'उघडी भिंत 'जेथे वरून प्रकाश उतरतो तेथे तो नायकाचे मन अधिक स्फटिकमय अधिक पारदर्शक होते.
७ नंतर मंदिरात एका कोपऱ्यात झऱ्याचे स्फटिकवत पाणी तो पाहतो व जवळजवळ पारदर्शी होतो त्याच्या मनात शब्द येतात, विचार येतात, भावना उमटतात पण त्या शुद्ध स्फटिकवत असतात .जसे माझे तुझ्यावर प्रेम आहे यातील फक्त 'प्रेम आहे 'एवढी शुद्ध भावना उरते . प्रेम सर्वांवर अमर्याद, अनंत ,निर्मल ,निर्विकार इत्यादी असते.
८ पण स्फटिकाची भिंत ओलांडल्यावर ही प्रत्येक क्षणाला नायक स्फटिक वृत्ती टिकवू शकत नाही. ( अस्तित्ववादी क्षणिकता व निवडीतील मर्यादा ).नंतर त्याला वाटते की मी देहहीन असलो तरी मनाने काली आहे व कालीचा वा मृत्यूचा पराभव करून रिकाम्या चबुतऱ्यावर उभा राहणार आहे. परत मनाच्या विजय -पराजय, गर्व , ईर्ष्या या अहमच्या प्रदेशात येतो .(मी काली आहे ).आता मूळ जाणिवेचे व देहाचे( मानवी मनाच्या मर्यादेचे ) बंध सुटल्याने तो नाश पावतो. स्वतःचाच शिरच्छेद स्वतः करतो. मनच मनाच्या मर्यादा कायम ओलांडू शकत नाही .
९ काली साकार अनुभव देते. हळूहळू निराकार अनुभव देते. पण नायकाला तो अनुभव घेता येत नाही. कारण त्याने आपल्या स्मृतीत सर्व विकार तसेच 'दडपून' ,'क्षीण करून' बीजरूपाने ठेवलेले असतात. निर्बीज ,दग्ध केलेले नसतात. त्यामुळे अनुकूल संधी (काली नसणे, इतर बंधने नसणे) मिळताच (जसे' मी अनासक्त आहे 'म्हणणारे संधी मिळताच स्त्री संबंधी आसक्ती दाखवितात) त्याप्रमाणे

नायकाचा नेहेमीच दारुण पराभव होतो.
१० जरी नायक देहाबद्दल विजयाची भावना दाखवितो तरी जीवनभर देहाने दहा इंद्रिये आणि मनात निर्माण केलेल्या आसक्तीच्या भावनांवर विजय मिळू शकत नाही .
११ मनातच स्फटिकाची भिंत असते व प्रत्येक क्षणी शुद्धतेची व अशुद्धतेची - अस्तित्ववादी निवड- प्रत्येकाला करावी लागते. ती निवड, तो मार्ग किती अवघड असतो हे प्रत्येकाला जाणवत असते.
१२ स्फटिकाची भिंत - कालीचे, कालाचे अनंततेचे प्रतीक असल्याने तिला नाव ,आकार गुण नसतात . ही फक्त 'असते' .नायकाने 'अहम' विसरून 'अस्तीस्तोत्र' म्हणणे अत्यावश्यकच नव्हे तर अपरिहार्य असते ,( जर जगण्याचा अर्थ शोधायचा असेल तर)
१३ स्फटिकाच्या भिंतीपलीकडच्या गाभाऱ्यात म्हणजे गर्भगृहात ,जेथे सगळयांचा जन्म होतो ,(काल ,काली, झऱ्याचे पाणी )जायचे असेल तर स्वतःच्या जगण्याच्या मानवी खुणा पुसाव्या लागतात .
१४ गाभाऱ्याची चौकट -स्फटिकभिंत हे पृथ्वीचे प्रतीक आहे. पृथ्वीवरच्या माणसाच्या मनाचे प्रतिक आहे. पृथ्वीकडून आत

१५ कोणत्याही क्षणी मनाच्या अनुभवाच्या तीन अवस्था असतात. त्या मनाच्या वेगाने एकमेकात जात असतात.
एक- मनाचे सुख- दुसरे हवे असणे
दोन -मनाचे दुःख - दुसरे नको असणे
तीन -मन सुखदुःखाच्या पलीकडे जाणे

नायक स्फटिका ची भिंत ओलांडून -सुखदुःखाचे अनुभव घेऊन -पलीकडे उभा आहे .पण तो अवस्था एक -सुख व अवस्था दोन -दुःख यात परत येतो मग

वीरश्रीयुक्त गर्जना करतो की 'मी काली आहे 'व काळाच्या गर्भगृहात बीज होतो. पुन्हा जी एं च्या या कथेचा नायक होण्यासाठी .

डॉ माधव पुराणिक ] +91 89992 55195: वा, खूप सुंदर स्पष्टीकरण!

स्फटिक = मन मनाचे विश्लेषण

Rajesh Unavane: धन्यवाद सर
अजूनही खूप फटी राहिल्या आहेत असे वाटते.

विशेषत: आपण उल्लेख केलेली बस मधून ढकलून देण्याची घटना. --- "मृत्यूपुढे येऊन त्याला सन्मुख झालो एवढेच एक मानचिन्ह माझ्यापाशी राहू दे--", अशी अपेक्षा काली पुढे व्यक्त करणारा तो..गाडीच्या दारात उभा असताना स्वतःहून गाडीतून उतरत नाही. कोणी तरी ढकलून दिल्याने तो अवघडत उतरतोय. तेव्हा रागाने तो, "गाडी नीट थांबवायला काय झाले? मी पुढे जाणारच नव्हतो. मला येथेच उतरायचे होते" असे स्वतःशी म्हणतो.
या प्रसंगातून --पहिल्या परिच्छेदातच जीए त्याचा पराभव होणार हे सूचित करतात--असे वाटते.
मृत्यूला सामोरे जातांना तो गाडीतून ढकलला जाणे व त्याचा त्यास राग येणे..म्हणजे, अजूनही जीवन-इच्छा शाबूत आहे, देहाचे भान सुटलेले नाही..असेच जीए ना सुचवायचे आहे, असे वाटते.

दुसरी घटना आरशा समोरची आहे. आरशात त्यास मूर्तीचा रिकामा चबुतरा दिसतो. पण स्वतःचा चेहरा त्यास दिसत नाही. हात हलवूनही आरशात प्रतिबिंब दिसत नाही. तेव्हाच तो भयभीत होतो. ---येथेच dnyaneshwar माऊलींची आठवण येते.."दर्पणी पाहता रूप न दिसे हो आपुले" ही ओळ जीए गद्यातून सांगतात असे समजायला हरकत नाही. ...कारण जीएना Dnyaneshwari अत्यंत प्रिय होती, असे कोठेतरी वाचल्याचे स्मरते.

[+91 94228 04052: बहुआयामी बहु प्रमेय जि. ए. तोडच नाही. सुनीळ सामंत : काली ही कूटकथा आहे का? कूटकथा आणि गूढकथा यांत फ़रक हा की गूढकथेमधे लेखक गूढाची उकल करून वाचकाला स्तिमित आणि तरीही शांत करतो. कूटकथेमधे लेखक कोडे घालतो आणि वाचकाला त्याचे उत्तर शोधायला काही क्ल्यू देतो. पण वाचकावर त्याचे खरे नेमके उत्तर शोधायची जबाबदारी असते. जीएंची ही किंवा अनेक कथा या कूटकथेसारख्या वाटल्या तरी त्या तशा नाहीत. कारण कूटकथेला एकच एक नेमके उत्तर असते. पण मला या ग्रुपवर चर्चा करताना असे ज्ञान झाले म्हणता येईल की जीएंच्या कथेचे उत्तर वाचक आपापल्या मगदूराप्रमाणे शोधू सकतो आणि त्यात आनंद घेऊ शकतो. पाश्चात्य तत्त्वज्ञानाचे अभ्यासक त्यात existentialism शोधतात. भारतीय तत्त्वज्ञानाचे अभ्यासक त्यातून कालीच्या मार्गे ब्रह्म माया तत्त्वज्ञानाचा आस्वाद घेऊ शकतात. या दोहोंचा अभ्यास नसलेला माझ्यासारखा माणुसही त्यातून काहीतरी शोधतो आणि आनंद घेतो. प्रत्येकाचे उत्तर वेगवेगळे असते आणि त्याच्यापुरते ते बरोबरच असते. म्हणून हिला कूटकथा न म्हणता जीए कथाच म्हणावे. यापुधे जर कोणी अशा कथा लिहिल्या तर तो जीएकथालेखक म्हणावा असे मला वाटते.

श्रीकांतजींनी सुचवलेला बहुप्रमेयीकथा हा शब्द आवडला बुवा. '

Madhav Puranik: https://youtu.be/png-x1Grrsk

[00:25, 27/03/2023] Madhav Puranik: कथा काली - लेखक जी ए कुलकर्णी - दृकश्राव्य सादरीकरण . माझा हा पहिलाच प्रयोग / प्रयत्न आहे. पहिलेच पाऊल आहे.तुम्हाला आवडेल अशी आशा आहे.

डॉ माधव पुराणिक

विलास वाघोलीकर:

https://m.facebook.com/story.php?story_fbid=pfbid02cVd9t7CHQtsAzpqKBb2LyTjbskrbE4XMSoeNScVZck3PbRW9d5u4kbMuQiKrTNeql&id=100006706124472&mibextid=Nif5oz

[13:26, 27/03/2023] विलास वाघोलीकर: काली कथेचे अभिवाचन छान झाले आहे. मा . सुनीळजींची परवानगी गृहित धरून येथे माझा काली कथेवरील लेखाची लिंक माहितीसाठी देत आहे . धन्यवाद . विलास वाघोलीकर

----

# स्वामी- कथासंग्रह- पिंगळावेळ

#जीए_ #ए _# कुलकर्णी यांची #'स्वामी' कथा व चित्रे

लेखक--व्हीएस वाघोलीकर

💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐



स्वामी' कथा ( पुस्तक पिंगळावेळ) ,सहस्त्र दलांच्या कमळाप्रमाणे आहे. ही कथा ,त्यांच्या श्रेष्ठ कथांपैकी एक, अशी वाटते. या कथेला त्या तोलाची समिक्षा कधीतरी कोणाकडून तरी मिळेल ,अशी आशा ठेवत आहे.

सोबत एक कोलाज देत आहे.कथा वाचून, प्रसंग निवडण्यासाठी चित्रे काढताना ,कथा कळत जाते, म्हणून विवेचनही देत आहे. व्हीएस वाघोलीकर, हौशी चित्रकार आहेत.

*भाग एक--कथानक व चित्रे--

=====================

कथेचा सारांश--ज्या वाचकांनी ही कथा आधी वाचली असेल त्यांच्यासाठी संदर्भ म्हणून, व सर्वांनी ही मूळ कथा वाचावी म्हणून, येथे कथानकाचा सारांश देत आहे.

1)चित्र क्रमांक1-कथानक--

एक अनामिक प्रवासी, आपले जन्मगाव पुन्हा पाहण्यासाठी खूप वर्षांनी,त्या आडगावी येतो.मुख्य रस्त्यापासून फाटा फुटल्यावर ते आडगाव असते. गाव बदललेले असते, तेथे कोणी ओळखीचे नसते. गावात फिरताना, मारुतीचे देऊळ तेवढे ओळखीचे असते. तो फिरत कातर संध्याकाळी बसथांब्यावर भरभर येतो,पण बस, लांबून ,त्याच्या डोळ्यासमोरून निघून जाते. सकाळपर्यंत बस नाही. गावात कोणी ओळखीचे नाही, अशी स्थिती येते.त्यावेळी त्याच्या मनात त्याचे कुटुंबीय हे, त्याच्या दूरगावी वाट पहात असतील ,असे येत असते.

त्या कातर अंधार पडायच्या वेळी, प्रवाशाला तेथे एक महंत भेटतो.महंत सांगतो, त्याची रात्री राहण्याची, जेवणाची सोय होईल. पण मठात भगवी कफनी घालावी लागेल. प्रवाशाकडे दुसरा मार्ग नसल्याने, तो महंताबरोबर जातो.

चित्र---या चित्र1मध्ये ही परिस्थिती दाखवली आहे.दूरगावी, प्रवाशाचे कुटुंब रहात असलेले घर , असते.तेथे मुले-बायको वाट पहात असतात.प्रवासी बस

पकडायला जातो. पण बस चुकते. रात्र पडायला लागलेली असते. चंद्रोदय झालेला असतो. अंधार पडत असतो.खूप वर्षांनंतर आल्यामुळे कोणी ओळखीचे नसते.लहान गावातील घरांची व देवळाचेही दार बंद असते.महंत हे पहात असतो.नंतर तो प्रवाशाशी गोड बोलून, प्रवाशाला त्याच्या बरोबर येण्यास राजी करतो.

*

2)चित्र क्रमांक2-कथानक-

महंत मठाचा प्रमुख आहे. मठ, स्वयंपूर्ण, शेती, वीज असलेला, अनेक साधक रहात असलेला, आहे.त्या मठाच्या नियमांप्रमाणे, मुंडण केलेल्या तीन शिष्यांनी नेहमी एकत्र रहायचे असते.

प्रवाशाला स्नान करता येते . चांदीच्या पात्रातून खाणे मिळते.श्रीमंती पाहुणचार होतो. आता प्रवाशाच्या मनावर श्रीमंती आदरातिथ्याचेही ओझे होते. प्रवासी सामान्य परिस्थितीतील सामान्य माणूस असतो.अगदी साध्या निवाऱ्याची अपेक्षा असलेल्या प्रवाशाला, एवढे श्रीमंती आदरातिथ्य अचानक मिळते. असा हा श्रीमंत महंत वाईट वागेल, असे प्रवाशासारख्या सामान्य माणसाला वाटत नाही. महंत त्याच्याशी गोड बोलतो. व सांगतो की,आधीच्या स्वामींचे निर्वाण झाले आहे. तुम्ही आमचे अतिथी आहात. अशा त्याच्या बोलण्याने, वेषभूषेमुळे, सेवकांच्या उपस्थितीमुळे प्रवाशाला महंत वाईट माणूस असेल असे वाटत नाही . उलट तो संभाषणात भाग घेतो .

चित्र2---मध्ये ही स्थिती दाखवली आहे.मठ बाहेरून तुरुंगासारखा बंदिस्त आहे.पण मठातील सभागृह राजेशाही असून प्रवासी चांदीच्या ताटातील फळे खात आहे. जवळ, महंत व तीन शिष्यांचा समूह आहे.

*

3)चित्र क्रमांक3-कथानक-

प्रवाशाचा फलाहार होतो.महंत त्याच्याशी गोड बोलतो. व सांगतो की,आधीच्या स्वामींचे निर्वाण झाले आहे. त्यांच्या आसनावर बसल्यावर, हात वर केल्यावर त्रिदल उगवते, व तो नवीन स्वामी असतो, अशी मठाची श्रद्धा आहे.

मग गोड बोलून, महंत प्रवाशाला मठ दाखवण्यासाठी ,मठात खाली खाली नेतो.

शेवटी विहीरीसारख्या पायऱ्या उतरवून , महंत त्याला कोठडीवजा खोलीत बसायला सांगतो. व प्रवासी त्या कोठडीवजा खोलीत बसला असताना, हात करून त्रिदल येते का हे पहात असताना ,महंत अचानक नकळत हातचलाखी करून बाहेरून दार लावून ते बंद करतो.मग प्रवाशाला सांगतो की ,तो प्रवाशीच आता स्वामी असून, त्याला आता येथेच रहावे लागणार आहे. त्याला जेवणखाण, वस्त्रे मिळतील. पण त्याला कोणताच अगदी माणसाच्या पावलांचाही आवाज ऐकू येणार नाही

तेव्हा त्या दोघांचा संवाद होतो. महंत दरवाजाबाहेर असतो. प्रवासी आत असतो.महंत, त्याला समाजातील एका माणसाचे नगण्य स्थान सांगतो. एका हुकूमशाहाची, बंदीबद्दलची क्षुद्रत्वाची भूमिका त्याच्या बोलण्यातून ठामपणे व्यक्त होते.

महंत निघून गेल्यानंतर ,प्रवाशाला प्रश्न पडतो की , आपण नसल्याने बाहेर खरेच काही फरक पडणार नाही, असे होईल का. विश्वातील आपले अस्तित्व इतके सहजपणे पुसले जावू शकते का,हा प्रश्न त्याला पडतो. हा प्रश्न अनेक सर्वकष राजवटींत पडलेला दिसतो. अशा राजवटीतील अनेकांनी छुपेपणाने त्यांचे साहित्य देशाबाहेर नेण्याचे प्रयत्न केले आहेत. तसेच हा प्रश्न अंतिमतः मानवजाती पुढील प्रश्न आहे.

चित्र क्रमांक3 मध्ये उपचित्रे आहेत. ती चित्रे कथेतील घटनाक्रम दाखवतात.

या चित्र 3ए) मध्ये हा ,सभागृहातील जेवणानंतरचा घटनाक्रम व मठाची खाली जाण्याची स्थिती दाखवली आहे.शेवटी महंतामुळे प्रवासी कोठडीत बंदिस्त झाला आहे.

*

3बी)चित्र क्रमांक3बी-कथानक--

नकार, मानसिक विरोध, व मग स्वीकार करून, स्वामी-प्रवासी जगत असताना, त्याला तेथील तीन सांगाडे दिसतात. एक सांगाडा, वर व्रुंदावनाखाली असतो.

एकूण, महंताने, गुन्हेगाराप्रमाणे ,प्रवाशाला मोहात पाडून, त्याला बळी करून जन्मभरचे बंदी केले असते.

असेच दिवस जातात. पण एके दिवशी अंदाजाने शोध घेतल्यावर, प्रवाशाला, आधीच्या एका स्वामीने लपवलेली डबी, त्यात एका कागदावरील पत्र, छोटा त्रिशूळ, व अफूची गोळी मिळते.

पत्र पेन्सिलने लिहिलेले असते.ते कोणाच्या तरी डायरीच्या पानावर लिहिलेले असते. त्यामुळे त्या पत्रात,बाळंतपण ते चार आण्याच्या विड्या असे शाईने लिहिलेले ,सामाजिक उल्लेख असतात.

तसेच आधीच्या स्वामीने , पेन्सीलने ते पत्र लिहून स्वतःबद्दलच्या घटना मांडून, छोट्या डबीत पुढील बंदीवान स्वामीसाठी अफूची गोळी ठेवलेली असते. अफू जवळ मिळाल्यानंतर आपल्याला कधीही जीवन संपवता येईल, या विचाराने प्रवाशाचे नंतरचे दिवस थोड्या सहजपणे जातात.

या चित्र क्रमांक 3बी)मध्ये प्रवाशाला ती चिठ्ठी व अफूची गोळी मिळते, हे दाखवले आहे.ते पत्र आधीच्या म्रुत्यू पावलेल्या बंद्याचे आहे, हे कवटीच्या चित्राने सूचित केले आहे.

*

3सी)--चित्र क्रमांक3सी--कथानक-

पुन्हा एक घटना घडते.बाथरूममध्ये अंकुर आलेला वेल दिसतो. प्रवासी तो वेल वाढू देतो.

शेवटी तो वेल, हवा आणणाऱ्या नळातून वाढू द्यायचा की नाही, याचा प्रवाशाला---अटळ, एकाकी---निर्णय घ्यावा लागतो. कारण वेल वाढल्यानंतर प्रवाशाला मिळणारी हवा बंद होणार असते. प्रवासी, तो वेल वाढू देण्याचा निर्णय घेतो.

काही दिवसांनी वेल वाढून, हवा येणे बंद होते, कोंदटपणा येतो. आपण जिवंत वेलाला मुक्तपणे वाढू दिले, या समाधानाने, प्रवासी अफूची गोळी घेतो.व त्याचा म्रुत्यू होतो.

या चित्र क्रमांक 3सी)मध्ये त्या कोठडीची रचना, अन्नाचे ताट पाठवण्याचा नळ,तेथे अन्नाचे ताट,हवेच्या नळात वाढू दिलेला वेल, निर्णय घेऊन, प्रवाशाने संपवलेले आयुष्य,'ओम्'शब्दाने जीवन पुढे चालू राहील, हे अनिर्वचनीय शक्तीचे प्रतिक, असे दाखवले आहे.

*

4)चित्र4--कथानक--

महंत ही व्यक्ती,सत्ताधारी आहे.मोठा राजेशाही मठ चालवणारा,सर्वेसर्वा आहे.तो गोड बोलणारा, आपले म्हणणे पटवून देणारा,पण गुन्हेगारी प्रव्रुत्तीचा आहे.

त्याने प्रवाशाला सांगितल्या वरून ,खूप पूर्वी हा महंत गडगंज श्रीमंत होता. त्यांनी खूप विचाराने हा सुसज्ज, वीज पाणी असलेला मठ बांधला.व नंतर तेथे'स्वामी' आणले. कारण, "आद्य स्वामींनी हवेच्या पुरवठ्याच्या नळांचा प्रश्न विचारला होता" असे महंताच्या संभाषणात उल्लेख आहे.

महंताच्या त्या संभाषणावर विश्वास ठेवला तर,त्याने यापूर्वी तीन'स्वामी' शोधले होते. पूर्वीचे 1)एक स्वामी बरेच वर्षे आजारी असलेले शेतकरी होते.2)दुसरे स्वामी गावोगावी जावून, अत्तरे विकणारे होते.3)तिसरे स्वामी गावोगावी जावून कीर्तने करणारे जटाधारी होते.4)आताचे चौथे स्वामी, म्हणजे कथानायक प्रवासी, हे

अचानक या गावी आलेले, कोणीही ओळखीचे नसलेले, पण शेवटची बस चुकलेले, संसारी असतात.समजा, हे सावज मिळाले नसते, तर सराईत गुन्हेगार महंताने, दुसरे सावज शोधले असते.व यापुढेही तो असे 'स्वामी'शोधेल.पण याक्षणी त्याचा पराभव झाला आहे.

या चित्र क्रमांक 4 मध्ये, महंताचे व्यक्तीचित्र , क्लोजअप पध्दतीने दाखवले आहे.

भाग दोन--विवेचन--

=========================================

या चित्रांतून घटनाक्रम दाखवला आहे. पण मूळ कथा वाचावी अशी मी विनंती करतो. कारण, त्यांमधून जीएंची प्रतिभा कळते.त्यासाठी काही मुद्द्यांवर विवेचन करत आहे.

ए)आयुष्यात दूरवर भटकंती केल्यानंतर, जन्म गावाच्या जवळ गेल्यावर तेथे जावेसे वाटणे, स्वाभाविक आहे. त्यात एक प्रतिकार्थही आहे.आपल्या जीवनप्रवाहाचे मूळ कसे होते, आपल्याला लहानपणी, कोणी ,कोठे,कसे वाढवले, हे बरेचसे विसरलेले असते. नंतर , पुढचा भटकंतीचा जीवनप्रवाह तेथूनच सुरू झाला,हे आठवत असते. म्हणून, संवेदनशील प्रवासी, जन्मगावी उतरला,व गावभर भटकला,हे साहजिकच आहे. लहानपण गेल्यावर माणसाला मोठेपणी रोजगारासाठी अनेक गावात भटकावे लागते . पण त्याला ते गाव आठवत असते . तेथे लहानपणीच्या आठवणी चिकटलेल्या असतात . योगायोगाने त्या भागात जवळ गेल्यावर

सहसा माणूस त्या गावी भेट दिल्याशिवाय रहात नाही . त्या छोट्या गावात इतर बदल झालेले नसतात . पण कोणीही ओळखीचे राहिलेले नसते . त्यामुळे हा अनुभव *योगायोगाचा* *नाही* , तर *वैशिष्टयपूर्ण* *पण* *साधारण* आहे .

बी)महंताच्या वेशभूषेवरुन व गोड बोलण्याने प्रवासी विश्वासाने महंताबरोबर जातो.कोणीतरी ,धार्मिक वेशभूषा केलेला, गोड बोलणारा, वरवर तर्काने मुद्दे मांडणारा, रात्रीसाठी चांगला सुरक्षित आसरा देत आहे,असे म्हटल्यावर,प्रवाशाने त्याच्यावर विश्वास ठेवणे साहजिक आहे.

प्रत्यक्षात प्रवाशाला अपेक्षेपेक्षा,अत्यंत श्रीमंती आदरातिथ्य अचानक मिळते. असा हा श्रीमंत महंत वाईट वागेल, असे प्रवाशासारख्या सामान्य माणसाला वाटत नाही. येथे महंत गुन्हेगारी प्रव्रुत्तीचा आहे. गुन्हेगारी माणसाचे येथे प्रभावी चित्रण केले आहे. या कथेचा हा महत्त्वाचा आयाम आहे.

महंत त्याला गोड बोलून, या मठाची स्थापना मूळ स्वामींनी कशी केली हे श्रध्दापूर्वक कथेमधून सविस्तर सांगत खाली नेतो.अशा श्रध्दास्थानी गेल्यावर, प्रश्न न विचारता माणूस,( येथे प्रवासी,) ते सर्व ऐकत जातो. अनेक संप्रदायांमध्ये त्या तीर्थ क्षेत्रावर गेल्यावर असे ऐकावे लागते. श्रीमंती असलेल्या मठाचे विभाग महंत दाखवत असतो. म्हणून महंताच्या गोड बोलण्यावर भुलून तो त्याच्यासोबत खाली खाली तळघरात जातो.

डी)प्रवासी कोठडीत बंदी होतो...महंताने त्याला संप्रदायाची श्रध्दा सांगितलेली असते. अनेक संप्रदायांत अनेक श्रद्धा असतात. उदाहरणार्थ, देवासमोर, निमूटपणे, संपूर्णपणे, जमिनीलगत, अक्षरशः *साष्टांग* *नमस्कार* केला पाहिजे, अशी काही संप्रदायांमध्ये श्रद्धा आहे. हे आपण *व्यवहारात* पहातो .त्यामुळे प्रवासी महंताने सांगितलेल्या श्रध्देप्रमाणे वागत जातो. हातचलाखी करून महंत त्याला कोठडीत बंद करतो. कारण महंताला, "स्वामी खाली आहेत. व त्यांची आज्ञा निमूटपणे स्वतः होवून पाळली पाहिजे" असे इतर शिष्यांना सांगायचे असते.

'हात वर केला की हातात बेलाचे पान येते 'अशा मिथककथा घेऊन धर्मसत्ता सुरू होते.मग काळ गेल्यावर त्या संप्रदायात अतिरेकी धर्मकांड सुरू होते. हा इतिहास आहे .

महंताला आधीच्या स्वामीचे निधन झाल्यावर दुसरा कैदी- 'स्वामी'- हवा असतो.तो तसा शोध घेत असतो.तो आमीष दाखवून बळी शोधतो. बळी आमीषाला भुलतो.व स्वत:हून सापळ्यात अडकतो. हा योगायोग नाही, हे लक्षात घेणे -- *महत्त्वाचे* , ---आहे. ते तर गुन्हेगारी घटनांमधील सत्य आहे. व कथेत ते धक्का देऊन दाखवले आहे.

सर्वकष राजवाटीचे स्वरूप-

ई)सर्वकष राजवटी ,कशा सत्ता राबवतात,यांचा नमुना कथेत आहे. अशा *सत्ता* , राजाच्या, सुलतानाच्या, राजकीय पक्षांच्या , इझमच्या ,गटशाहीच्या, लोकशाहीतील पळवाटांच्याही , असू शकतात. इतिहासात नाझी, माओची सत्ता, स्टालिनशाही, इत्यादी *असंख्य* उदाहरणे आहेत. आर्थिक सत्ता, भूमी ची मालकी, संचाराचे स्वातंत्र्य, रोजगाराची संधी, विज्ञानाच्या संशोधनावर नियंत्रण;जनमत बनवणे, शिक्षण, लष्कर, विचार विश्व, इत्यादी सर्वांना व्यापणारी , अशी ही सर्वकष राजवटीतील सत्ता असते.स्वातंत्र्याच्या मोबदल्यात जीवनमानाची स्वप्ने दाखवून, या राजवटी येतात.व मग स्वतःसाठी सर्व सत्ता भोगतात.याची इतिहासात अनेक उदाहरणे आहेत.

त्याप्रमाणे येथे महंताने निवारा व जेवण देवू केले, व प्रवाशाचे स्वातंत्र्य हिरावून घेतले. कोणतेही नाव न घेता फक्त संदर्भ देता येतात. कारण इतिहास असे अनेक संदर्भ दाखवतो.उदाहरणार्थ, "प्रत्येक कष्टकरी शेतकऱ्याला मालकीची जमीन, कामगाराला नक्की रोजगार व सैनिकांना शांतता"अशी घोषणा करून ,रशियात झारला पदच्युत केले.व नंतर मात्र, सामुदायिक शेती,बराकीचे कारखाने, व सैन्यात केजीबी यंत्रणा राबवली गेली.असो.

एफ) अशा सर्वकष राजवाटीतही आलेला,अस्तित्वाच्या दिव्यत्वाचा साक्षात्कार कथेत दाखवला आहे. खोल तळाशी वेलाचा अंकुर उगवतो, या आश्र्चर्याने प्रवासी दिग् मुढ होतो, व अभिवादन केल्याप्रमाणे वाकून पाहतो. अस्तित्व दिव्य आहे, ते जपले पाहिजे, त्याला अभिवादन केले पाहिजे, हा मूलभूत

अध्यात्मिक विचार या कथेत दाखवला आहे.तसेच शेवटच्या दिवशी मृत्यूला सामोरे जाताना.."प्रवाशाने भिंतीला नमस्कार केला" असे जीएंनी म्हटले आहे. अनिर्वचनीय परब्रम्हाची जाणीव करणारी अध्यात्मिकता येथे वाचकाला दिसते. त्यामध्ये नमस्काराचे किमान कर्म आहे.

एफ)महंत पोलादी दाराच्या बाहेरून संवाद करून हुकूमशहाची विचारप्रव्रुत्ती सांगतो.(रक्तमुखी कथेत सत्तेचा रस्ता हवा असणारा प्रवाशी याप्रकारचेच विचार करतो.)आपल्या नसण्यामुळे काहीच फरक पडणार नाही का, हा माणसाला ---मानवजातीला--पडलेला प्रश्न येथे दिला आहे.हा भाग मूळातून वाचण्यासारखा आहे.

महंत म्हणतो, "तू नसल्याने बाहेर फारसा फरक पडणार नाही.तू एक बुडबुडा आहेस...सत्ता ही सत्तेसाठी असते.आम्हाला कोणाला पतितपावन करायचे नाही...कवटीचे हास्य हा आयुष्याबद्दलचा माणसाचा अंतिम निर्णय होय.. आमची पोथी नाही. कारण लिहीणारी व्यक्ती नसली, जगातून गेली की शब्द बंदिस्त होतात.व अनुयायांच्या पायांमध्ये साखळदंड होतात."

जी)महंत कोठडीतून निघून गेल्यावर, प्रवासी, एकटा राहतो . तो माणसाच्या व मानवजातीच्या अस्तित्वाच्या मूलभूत मुद्द्यावर विचार करतो.."प्रवाशाला प्रश्न पडतो की , आपण नसल्याने बाहेर खरेच काही फरक पडणार नाही, असे होईल का." विश्वातील आपले अस्तित्व इतके सहजपणे पुसले जावू शकते का,असा प्रश्न त्याला पडतो. हा प्रश्न अनेक माणसांना सर्वकष राजवटींत पडलेला दिसतो. अशा राजवटीतील अनेकांनी छुपेपणाने त्यांचे साहित्य देशाबाहेर नेण्याचे प्रयत्न केले आहेत.

काही भारतीय तत्वज्ञान विचार येथे येतो.तेही वाचण्यासारखे आहे."राजाच्या अंगावर वस्त्र नाही. वस्त्रात राजा नाही. कारण, राजा व वस्त्र, दोन्ही मूळातच नाहीत."असे जीएंनी म्हटले आहे.

एच)मानवी व्यवहाराचे, समाजाचे छोटे रुप, कथेतील पत्राच्या परिच्छेदांतून दाखवले आहे. त्यामध्ये बाळंतपण, जन्म, बारसे, शाळेचे कपडे,आहेर, लग्न, गायचारा, मृत्यू व शेवटी एक आण्याच्या विड्या यांचा प्रतिकात्मक उल्लेख आहे.

आय) नियतीप्रमाणे विश्वाची अनाकलनीयता कथेत दाखवली आहे.पत्र वाचल्यावर प्रवाशाच्या मनात आलेले, विचार-चिंतन खूपच प्रभावी आहे. ते मुळातून वाचले पाहिजे. जीए म्हणतात,"..हजार गिजबीज रेषा, नेमक्या येवून मिळतात..का जवळ येवून दूर जातात.. ".. "आणि हा ग़ोलक आहे तरी कसला?..का तो कसला आहे, हे सांगता येत नाही, हेच अखेरचे खरे उत्तर...पूर्णात् पूर्णम् उदच्यते."

हा परिच्छेद, ऋग्वेदातील नासदीय सूक्ताची (नासदीय, म्हणजे न असद्,जे नाही त्याचा विचार) आठवण करून देतो.त्या सूक्तातही विश्व स्वरुपाचा विलक्षण विचार आहे.हे विश्व नव्हते, स्थळ,काळ,वस्तुमान-तारे-ऊर्जा-प्रकाश ,हे नव्हते, तेव्हा काय होते. असे प्रश्न पुढे ठेवून श्रद्धेच्या माध्यमातून, अनिर्वचनीय परब्रम्ह होते, असे म्हटले आहे. जीएंचा परिच्छेद वाचताना ते सूक्त आठवते.

जे) कथेतील स्वामीने पत्र मिळाल्यानंतर नायक ते पत्र वाचतो . गोळी जवळ असल्यामुळे त्याचे काही दिवस बरे गेले.पण वेल वाढला. व वेलाला वाढू देवून त्याने वेलासाठी स्वतःचा प्राण दिला. जीएंनी प्रतिभेने पुढील घटनांची साखळी करून त्या घटनांना वेगळा, विलक्षण आयाम दिला आहे.

के) माणूस व कॉस्मो -आकाशस्थ शक्ती- यांचे संबंध कथेत आहेत.अस्तित्ववादाप्रमाणे, प्रवासी शेवटी अटळ, एकाकी निर्णय घेतो.हा निर्णय , महत्त्वाचा, पण अटळ, एकाकी असतो.

प्रवासी, वर जाणाऱ्या वेलीसाठी स्वत: चे प्राण देण्याचा तो *निर्णय* घेतो.

हा निर्णय घेतला नसता तर, प्रवाशाला जगत राहण्याचा दुसरा निर्णय घ्यावा लागला आला असता.पण नियतीने त्याला बंदिस्त करून दाट छायेखाली ठेवले आहे. याची त्याला जाणीव आहे. नियतीच्या गडद सावटाखाली,मिळालेल्या परिस्थितीत, प्रवासी वेल वाढू देवून म्रुत्यू पत्करण्याचा ,'सुधारित' अस्तित्ववादी

निर्णय घेतो, असे वाटते.हा अस्तित्ववादाप्रमाणे अटळ, एकाकी, निर्णय घेणे भाग आहे. पण तो अनाकलनीय नियतीच्या सावटाखाली घ्यावा लागत असतो.

एल) प्रवासी साधारण जगातून ,एकाकी कोठडीत येवून ,शेवटी मृत्यू पावतो, यातून जीएंनी नियतीचे अनाकलनीय रूप दाखवले आहे.

एम) प्रवाशाला पत्र न मिळता नुसती अफूची गोळी मिळाली असती,व वेल वाढला नसता, तर त्या आधीच्या कीर्तनकार स्वामीप्रमाणे प्रवाशाने ,स्वत:ची विचारपूर्वक हत्या करून घेतली असती.शेवटी गोळी गिळून झोपतानाही प्रवासी विचार करतो,"आधीच्या स्वामीने गोळी दिली.आपण पुढे काही देवू शकत नाही. आपण इतरांच्या उपकाराने जगलो,व अशाच एका उपकाराने थांबून जात आहोत.. वेलाने वर जात आहोत. पण तेथे तरी माझे ऋण फेडता येईल का.."असत् बरोबरच्या लढाईतही 'जीवन-सत् 'चालू राहील, ही श्रद्धा येथे दिसते.

वेलासाठी प्राण देवून,प्रवाशाने,महंताला व इतरांना संदेश दिला आहे.

एन) वेल वाढत जातो , यात , माणसाच्या मुलाच्या वाढण्याची सूचकता वाटते. "वेल नळातून वाढल्यावर आपल्याला येथे काही हिरवे दिसणार नाही. त्याला वाटते, आपल्या दृष्टीआड देखील तो वेल वाढत जाईल." मूल वाढते व जगाच्या अंगणात जाऊन विकसित होते.

ओ) कथेच्या सुरूवातीला प्रवासी ,जन्मस्थळाकडून पुढे जातो.विश्वाच्या पोकळीत, आपल्या तयार होण्याऱ्या अस्तित्वाचा, शोध घेतो. कथेत शेवटी , विश्वाच्या पोकळीत जाणाऱ्या वेलामध्ये विलीन होतो. विश्व,-- जीवाचे अस्तित्व, --विश्व --हा अटळ प्रवासही येथे दाखवला आहे.जे अस्तित्वात असते, तेच जन्म घेते.व म्रुत्यूनंतर ते अस्तित्वाला जावून मिळते. ही जीवनातील श्रद्धा आहे.

पी) ..या कथेच्या 'स्वामी' नावाला अनेक आयाम आहेत. अनेक घटना घडतात. मग महंत प्रवाशाला 'स्वामी'बनवतो. मठातील इतर साधकांच्या द्रुष्टीने, खाली तळघरात कोणीतरी , कोणालाही दर्शन न देणारे, दिव्य, जिवंत 'स्वामी' रहात आहेत, हे निश्चित आहे. प्रवाशाचे साधे आयुष्य जावून तो स्वचिंतन करणारा,

'स्वामी'तयार होतो. वेलाला वाढू देवून, वेलासाठी स्वतःच्या म्रुत्यूचा विलक्षण निर्णय घेणारा, तो मानवजातीचा 'स्वामी'होतो. म्हणून शिर्षकापासून कथेचा अर्थ सुरू होतो.

क्यू) मृत्यू---- कथेत शेवटी प्रवाशाचा मृत्यू होतो. वेलीमुळे प्राणवायू बंद झाला आहे. आधीच्या 'स्वामी'ने ठेवलेली गोळी घेतली आहे. आता मृत्यू येणार, हे निश्चित आहे. मग प्रवाशी बिछान्यावर पडतो. तेव्हा प्रवाशाच्या प्राणावर मृत्यू घाला घालतो. ( वैज्ञानिक भाषेत शरीरयंत्रणा बंद पडत जाते.) त्या अद्वितीय काळाचे ,शब्दप्रभू जीएंनी केलेले वर्णन लक्षात घेण्यासारखे आहे." ...पडघमचा आवाज येवू लागला.त्याचबरोबर लाल प्रकाशात लाटा थरथरु लागल्या. ..दाट पंखांच्या सावलीसारख्या झोपेत तोदेखील शांत होऊन, सौम्य हसण्याखाली खालचे अंतिम हास्य तात्पुरते झाकून तो निश्चल झाला." मावळणाऱ्या सूर्याचे तेज कागदावर रेघा काढून पूर्ण सांगता येणार नाही. त्याप्रमाणे स्वमृत्यूच्या पोकळीचे वर्णन शब्दांमध्ये पकडणे अत्यंत अवघड आहे. जीएंनी तो ज्वालामुखी, खूप परिणामकारकपणे शब्दांमध्ये दाखवला आहे.

आर) या द्रुष्टीने कथेशेवटी कविता दिली आहे--

"त्याला वाटले,

तू असाच वर जा....

...."या साऱ्यात मला विशेष सुख आहे. कारण तुझे एक पान म्हणजे माझा एकेक श्वास आहे. म्हणून तू म्हणजे मीच स्वतः आहे. मी संपलो नाही तर मी केवळ बदललो आहे....

"मीच हिरव्या कारंजाप्रमाणे वर आलो आहे. हेदेखील इतरांना कळू दे.

म्हणून तू असाच वर जा..."

ही कविता मूळातून वाचावी ही विनंती.

एस)कितीही चिरडले तरी मानव, व मूलतः जीवअस्तित्व, तरारून उभारी घेते. प्रवासी वेलाच्या वाढीसाठी प्राण देतो, या एका पैलूतून हा महंतांच्या पराभव आहे.

"हा माणूस येथेदेखील जिद्दीने जगला.व आपणहून गेला.हा मेला किंवा संपला नाही. तो केवळ थांबला" हे लिहून, जीएंनी ,एका महत्त्वाच्या दृष्टीने महंताचा पराभव दाखवला आहे. यापुढे महंत कदाचित दुसरा कैदी शोधेल. पण या क्षणी तरी, महंताचा पराभव झाला आहे. महंताच्या बुद्धिमान, कडेकोट बंदोबस्ताला तडा गेला आहे.

असत् ने खूप बंदोबस्त केला, तरी त्यावर काळ प्रबळ ठरतो.कधी असत् जिंकते, कधी सत् जिंकते. नेहमी सत् जिंकते, असा भाबडेपणा जीए दाखवत नाही. असत् प्रबळ असते, हे लक्षात घेवूनच, सत्य असत् ची लढाई पुढेही चालू राहणार आहे, ही लढाई चालू ठेवली पाहिजे, असे या कथेचे भरतवाक्य आहे. ".. ते मूल भोवतालच्या अजस्त्र भिंती फोडून सूर्यप्रकाशाकडे येण्याची कधीतरी धडपड करणारे असेल." असे जीए म्हणतात.शब्दप्रभू जीए हे सर्व कलेतून व्यक्त करतात. म्हणून ते मराठीतील प्रतिभावंत आहेत.

.म्हणून'स्वामी'कथा ही , प्रतिभावंत जीए कुलकर्णी यांनी दिलेला अनमोल हिरा आहे.

==============================

Dilip Bade: स्वामी'ही उपाधी कर्माने सिद्ध होते.कर्मकाडांनी नाही.म्हणुन प्रवासी हाच खरा स्वामी ठरतो.

यतीन गुळवणी: मला सर्वात महत्वाचं वाटतं ते हे की, एका सामान्य माणसाला (तो सामान्य आहे हे पटवून) एकांतात कोंडून (त्यासाठी लागणारी पार्श्र्वभूमी तयार करून) त्याला विचार करायला लावून ते विचार वाचकांपर्यंत पोहोचवून त्यांना अंतर्मुख करण्यात जीएंनी कसब दाखवले आहे. अर्थ काढण्याचे काम वाचकांवर सोपवले आहे.

विलास वाघोलीकर :

. कोणत्याही कथेत कुठेतरी योगायोगाचा भाग असतो . तेथे वाचक थबकून असे झाले नसते तर काय असा विचार करतो . स्वामी कथेत । ) नायक लहानपणचे गाव पहायला उतरला . 2 ) त्याचा वेळ खर्च होवून बस चुकली . 3 ) महंत भेटला . त्याने मठ दाखवण्यासाठी अगदी तळघरातील कोठडीपाशी नेवून तेथे महंतांनी डांबून ठेवले हे प्रसंग योगायोगाचे आहेत ,असे वाटू शकते . मग त्या प्रश्नांचा योग्य शोध घेण्यासाठी वाचकाला संभवनीयतेचा विचार करता येतो .

। ) नायक संवेदनशील आहे हे पुरेशा प्रमाणात दाखवले आहे . संवेदनशील माणूस नसेल, रुक्ष व्यवहारी माणूस असेल, तर जुन्या गावी काय पहायचे असे त्याला वाटेल . आपला अनुभव आठवला तर पहावा . लहानपणचे गाव सोडून दहा गावे फिरली असली तर, ते आठवणीतले गाव पुन्हा पहावेसे वाटते . म्हणून संभवनीयतेने ते अशक्य नाही .

2 ) वेळ लागून बस चुकली हा योगायोगाचा - भाग आहे. आपण आपल्या गावात रस्त्यावर असतानाही वीज जाते . घरात नळाला पाणी येत नाही .शहरात ट्रफिक जाम होतो . अचानक गारांचा पाऊस येतो इ. आयुष्यात योगायोगाची उदाहरणे झालेली आठवतात .

3 ) महंत हा अत्यंत पाताळयंत्री गुन्हेगार आहे . तो शेकडो माणसांना हुकूमात ठेवणारा आहे. त्यामुळे या ना त्या प्रकारे बोलण्यातून तो प्रभावित करत जातो . तो गप्प बसत नाही . बोलून गुंगवतो . मठाची श्रीमंती, इतिहास, धर्मकथा, आधीच्या स्वामींची महायात्रा,108 दिवसांची अट, इत्यादी बोलत जातो . कथानायकावर अचानक, अनपेक्षित श्रीमंती पाहुणचार , मठाचा भव्य विस्तार इत्यादींचा परिणाम होतो हे संभवनीय आहे . सामान्य माणसावर अतिश्रीमंतीचा होणारा परिणाम वेगळा असतो . त्यातही एका क्षणी नायकाला खाली जावू नये असे वाटते असा कथेत उल्लेख आहे . धारवाड येथला एक मठ असाच गूढ बांधकामाचा आहे असे वडेरांच्या पुस्तकात आहे . त्यामुळे कथेतील प्रसंग संभवनीय वाटतात .

अलका तडकलकर : भूतकाळात फारसे गुंतून जाऊ नये .निदान घरातल्या कुटुंब प्रमुख व्यक्तीने. नाहीतर मग कुटुंबाबद्दल विचारही करायला मिळणार नाही अशी जीवघेणी वेळ त्यांच्यावर येते.

तरुणपणी,प्रौढपणी आठवणी येणे साहजिकच. पण नियोजन नसेल तर फरफट होते याचे भयानक चित्र इथे दिसते

विलास वाघोलीकर : आपल्या ग्रुपमधील यतिन गुळवणीजींनी म्हटल्याप्रमाणे,

एका सामान्य माणसाला एकांतात कोंडून ,त्यासाठी लागणारी पार्श्र्वभूमी तयार केली आहे. नंतर,त्याला विचार करायला लावून , ते विचार वाचकांपर्यंत पोहोचवताना त्यांना अंतर्मुख करण्यात जीएंनी कसब दाखवले आहे. अर्थ काढण्याचे काम वाचकांवर सोपवले आहे.

विलास वाघोलीकर : कथानायक हा सामान्य, भोळा वाटावा असा,पण सत्प्रवृत्त स्वभावाचा आहे . त्याच्यावर ही आपत्ती आली . पण पूर्वीचा कीर्तनकार स्वामीही फसला, असे कथेत दाखवले आहे . गुन्हेगार महंत अगदी बनेल आहे . त्याने चार माणसांना फसवले, अप्रत्यक्षपणे मारले . तो शेकडो माणसांवर हुकूमत गाजवतो . म्हणून स्वामीतली पात्रे असंभवनीय वाटत नाहीत .

Rajesh Unavane police:

विशेषतः इस्कीलार मधील स्वातंत्र्याचा या कथेच्या अनुषंगाने, समयोचित केलेला उल्लेख आवडला..!

स्वातंत्र्य, नियतीवाद याचबरोबर

जीए यांच्या अनेक कथा त्यांचे आध्यात्मिक ज्ञान किती परिपूर्ण हेच दर्शवतात..

भगवान शंकर हा विनाशाचे कार्य करणारा देव..तो अनेक कथेमध्ये डोकावतो...त्रिशूल, अर्धचंद्र, साप-नाग, इत्यादी त्याची प्रतीके अनेक जीए कथेत

असतात.... जीवन प्रवाहा मध्ये मृत्यु या अटळ वास्तवाचा विचार, व तशा घटना जीए यांच्या अनेक कथेमध्ये सातत्याने डोकावत राहतात...🙏

विलास वाघोलीकर : "जीएंची कथा- परिसर यात्रा " हे पुस्तक बऱ्याच वर्षांपूर्वी वाचले होते . त्यातील स्वामी कथेतील मठाचा शोध आठवत होता. कथेच्या वाचनासाठी आपण योग्य संदर्भ दिला आहे . चित्रे काढताना, सभागृह, दालने, पायऱ्या, कोठडी, स्वामींचा मृत्यू यांची कल्पना या लिखाणाने आली होती .

Manjiri Deshmukh: या कथेचा विचार करताना एक बाब लक्षात येते.

पूर्वापार म्हणजे मनुष्य जातीचा समाज म्हणून विकास होण्याच्या बिंदूपासूनचा इतिहास पहातो तेव्हा सत्तेने आजतागायत सर्वसामान्य माणसाला दडपून ठेवण्यासाठी निरनिराळी अस्त्रे वापरली. त्यातील एक अस्त्र म्हणजे सामान्य मनुष्याला आयतं देऊन (मुलभूत गरजा अन्न, वस्त्र) त्या मिळविण्यासाठीची त्याची प्रयत्नवादी वृत्ती, धडपड, व त्यांची पूर्तता करण्यातून त्याच्यातील पुढे जाण्याची, प्रगती करण्याची जिजीविषा व प्रेरणा निर्माणच होणार नाही व सत्तेला का?हा प्रश्न विचारून आवाहन देण्याची कुवत निर्माणच होणार नाही हा प्रयत्न जगाच्या इतिहासात सत्ताधीशांनी नेहमीच केलेला आपण पाहतो आणि आजच्या सत्ताकारणात देखील आपण अनुभवतो आहोत. पण सत्ता सदा सर्वकाळ सामान्यांना दडपून ठेऊ शकत नाही. कधीतरी स्वातंत्र्याचा वेल सर्वसामान्य माणसाच्या मनात रुजतो, फोफावतो, व समाजव्यवस्थेत अंतर्बाह्य परिवर्तनाच्या रुपाने इतिहासाला चकित करतो. मनुष्यातील स्वातंत्र्याची उर्मी ही सत्तेच्या दडपशाहीपेक्षा बलवान ठरते हे वेळोवळी झालेल्या सामाजिक, धार्मिक, व राजकीय क्रांतींमधून दिसून येत.

जी.एं.नी त्यांच्या कथांना दिलेली ही विविध परिमाणं पाहून मात्र सामान्य वाचक स्तिमित होऊन जी एंच्या कथा सांगण्याच्या असामान्य सामर्थ्याला नमन करतो.

Manjiri Deshmukh: आपण म्हणता ते अगदी बरोबर आहे. 👍

कोणत्याही भूमिकेचा झेंडा खांद्यावर वाहून नेण्याचा आव जी.एंची कथा आणत नाही. जी एंच्या कथांना सामाजिक, धार्मिक, आर्थिक, किंवा राजकीय कथा असा tag , ही परीमाणं गरजेनुसार कथावस्तू म्हणून येत असूनही लावता येत नाही. त्यांची कथा बंदिस्त रहात नाही. जी ए कथा कथा म्हणून दशांगुळे वरच रहाते. सार्वकालीक ठरते.

यतीन गुळवणी: जीएंना हाच अर्थ अभिप्रेत नसावा. आडवळणाने असा फारतर एक अर्थ असू शकतो. कारण महंताच्या सत्तेविरुद्ध जाणीवपूर्वक ही क्रांती नाही तर हा निसर्गाशी प्राण पणाला लावून

एकहाती लढा आहे.

'दोन अधिक दोन बरोबर चार' अशा सरळ सोप्या अर्थाची ही कथा नाही. त्यापेक्षा जास्त गहन अर्थ असावा असे मला वाटते.

Dilip Bade: अंतिम सत्य शोधण्याच्या प्रवासात व्यक्ती कधी कधी बंदिस्त होते.तरीसुद्धा संस्कारीत व्यक्तीत्व अस्तित्वाचा बळी देते.जगू द्या, याचा संदेश देते.

SANJEEV sargaonkar, Kothrud: कथा :स्वामी

कथासंग्रह: पिंगळावेळ दीपावली 1973

आस्वादक: संजीव सावरगांवकर .

*

अद्वैताचा पदन्यास मग, क्षितिजावर रंगून जाता |

अबोल ताना येतील काना, तना मनातून सुखावताना ||

नव्या हसऱ्या विश्वाकरिता, अनुभूतीची होऊन सरिता |

खोल खोल मग आत रहा,

तू पार्थिवात चैतन्याकरिता ||

कवी:अनामिक

गेले 40 वर्षे स्वामी वाचतोय, प्रत्येक वाचनाचा थरार वेगळा आहे. विचारांची अनुभूती वेगळी असते. वयोमानानुसार हळूहळू कथेकडे पाहण्याचा दृष्टिकोन सामान्य माणसाच्या आयुष्यात येणाऱ्या धारेपासून अध्यात्मिक विचारधारेपर्यंत पसरत गेलेला आहे.

मागील आठवडाभर *स्वामी* कथेवरील जीए प्रेमींची विवेचने, आस्वादक यांनी

लिहिलेले त्यांचे विचार, साहित्यशब्द आवर्तने वाचल्यानंतर अचानक जी.ए. ची कथापरिसर यात्रा या पुस्तकाची आठवण झाली. यार्दी वडेर यांनी अमाप कष्ट घेऊन जीए यांची ही स्वामी कथा कोणत्या परिसरात घडली तो लेख लिहिला आहे. त्यात त्यांनी फोटो ही दिलेले आहेत. तो परिसर, ती स्थळे खरोखरीच अस्तित्वात आहेत हे वाचून अंगावर रोमांच उठलेले आहेत. एखादी कथा, तिचा परिसर , जीए साहित्य वेड्या माणसांना काय काय करायला प्रवृत्त करते आहे व त्यातून हे साहित्य वेडे एक वेगळे समाधान प्राप्त करून घेतात. स्वामी विचारधारे सारखे ते समाधान वाटण्याची सुद्धा कायम तयारी ठेवतात. हा साहित्य वेल असाच पसरत राहो, वृद्धिंगत होत राहो या संकल्पनेचा विचार केला तर या वाचक प्रेमींचे कौतुक करावे असे वाटते. ...

आपले आयुष्य जगण्याची प्रक्रिया ही कथानायकाच्या पद्धती सारखीच आहे. सामान्य माणूस, सर्वसामान्य विचार, कोणाच्या आध्यात नाही, मध्यत नाही.साधे, बिन चवीचे सरळसोट आयुष्य व्यतीत करण्याच्या कल्पना मनात धरून ते सर धोपट चाललेले असते. जेव्हा केंव्हा आपल्या मनी वेगळा विचार मनात केव्हा तरी येतो, कोणतीतरी आठवण जागृत होते. आडवळणाच्या माळ्यावरील कोणत्यातरी वस्तूत जीव अडकलेला असतो. ती वस्तू नजरेसमोर येते. तिच्या आठवणींचा अल्बम उघडला जातो, थोडे आपण nostalgic होतो, त्या वस्तूला हाताळतो आणि नंतर विसरून जातो. परत आपल्या साधारण आयुष्य वाटेवर आपण चालायला लागतो. पण मग अचानक कधीतरी *एक न्यू नॉर्मल क्षण येतो* आणि आपण स्वामी कथेच्या

भूमिकेमध्ये शिरतो. ही अवस्था कोणाच्याही बाबतीमध्ये, केव्हाही घडू शकते. एखाद्याचे आयुष्यात अशी घटना घडते आणि *त्या घटनेची समज येण्याची उमज आलेली असेल तर त्या क्षणापासून,त्या अनुभवापासून तुम्ही बदलता. जगण्यात प्रायोरिटीज बदलतात आणि त्या बदलत्या अवस्थेमध्ये तुम्ही जो इच्छित वेल वाढू देता, त्याची जोपासना करता, वृद्धी होण्याकरता धडपडून जीव लावता तो क्षण तुमचा स्वामी होण्याचा असतो. ज्या क्षणी अशी ती अपेक्षित घटनेची मानसिक, शारिरीक पूर्तता होते तो क्षण तुमच्या अंतिम सुखाचा क्षण आपल्याला उपभोगायला मिळाला म्हणून ईश्वराचे तुम्ही आभारही मानता. *तुम्हीच स्वतः स्वामी होता*. मग त्याला आपण नाव देतो इतिकर्तव्यपूर्तता. तुमच्या आमच्यात भिनलेला हाच स्वामी जी.ए. यांनी शब्द बद्ध केलाय तुम्हाला एका वेगळया अनुभूतीला सामोरे जाण्याकरता. तो जिवंत अनुभव वाचून, कथा समजून घेण्याचा . कथेचे मध्ये नेहेमीप्रमाणे

कथा नायकाचे नाव नाही, गाव नाही, कुटुंबाचा ओझरता उल्लेख आहे, उण्यापूर या चाळीस किंवा जवळपास वय असलेला हा संसारी माणूस जेव्हा मठ तळघरातील निळ्या लाल अरुंद मार्गाने मठाच्या गर्भाशयात येऊन पडतो, गुरफटून अडकतो व तेंव्हा त्यास हे लक्षात येते की येथून आपला आता मात्र जन्म नाही, सुटका नाही. तेंव्हा पासून त्याच्या जीवाची घालमेल सुरू होते. ही भावना त्याचे मन कुरतडू लागते. त्या वेळेस, त्या क्षणी ज्या आठवणी त्याला येतात, त्याची तो नोंद घ्या म्हणतो. ज्या व्यक्ती आयुष्यात आल्या, त्यात मात्र तो मुद्दाम व्यक्तींची नावे सांगून टाकतो. ती म्हणजे बहीण अपर्णा मंदा देशपांडे व दातार भाऊ.

जी. ए. लेखक म्हणुन सांगतात की माझ्या आयुष्यात, पाहण्यात ज्या व्यक्ति आल्या त्या लेखणीचे वेळे उफाळून वर येतात आणि माझ्या कथेचे मध्ये त्यांना स्थान मिळते. अर्थात हे पाहणं आपल्या नजरेतून आणि तसा (या नावांचा संदर्भ पुढे कथेचे मध्ये कुठेही येत नाही. हे observation आपलं जाता जाता).

पूर्ण कथेत कथानायकाची बस चुकल्यापासून महंत भेटून *आता पुढे काय हि तर गाडी गेलीच की या वाक्याने सुरुवात करून ..........आता मी जातो, तेव्हा ही ( आपली)भेट शेवटचीच आहे. या वाक्यापर्यंतची साहित्य समृद्धी एकदम वेगळीच आहे. खास जी. ए. स्टाइल. वातावरण निर्मिती हळूहळू करत प्रथम अतिथी स्वागत, अतिथ्य, मठाची परिक्रमा, हळूहळू मठातील भ्रमंती करत तळघराकडे जाणे, प्रकाश व्यवस्था, वायुविजन, कफनी, मठाची श्रीमंती, भक्कम बांधकाम याची क्रमाक्रमाने माहिती होत किंवा घेत घेत कथानायक *स्वामी* म्हणून कसा बंदिस्त होतो हे ओघवत्या लेखन शैलीमध्ये लिहून जीएनी त्यांच्या वाचकाला खिळवून ठेवलं आहे. त्या चक्रात फिरवत फिरवत आपल्याला त्या क्षणापर्यंत आणून ठेवलेल आहे. वाचनाची ही अनुभूती म्हणजे जणू काही आपण स्वतः त्या जागी कल्पून वाचक आता पुढे काय होणार याचा विचार करू लागतो.

या स्वामी यांच्या तळघरातील ध्यान साधनेच्या खोलीपर्यंत जाताना महंतांची काही सूचक वाक्य कथेच्या पूर्वार्धापर्यंत आपल्याला घेऊन जातात.

1) कफनी तर तुम्हाला यापेक्षा चांगली मिळेल.

2) मठाचे कार्य स्वयंपूर्ण आहे. वीज आमची, पाणीपुरवठाही आमचाच.

3) तुम्ही आज येथे अतिथी आहात व अतिथीचे कोणतेही स्वागत कधी अति होऊ शकत नाही.

4) त्या सगळयांचीच (म्हणजे आलेले सर्व स्वामी) नावे नंतर *शिवचरण* अशी असतात.

5) स्वामीच तुमच्या रूपाने आले असतीलही कदाचित.

6) स्वामींचे ध्यान करण्याचे आसन खाली आहे त्यावर बसून अशा माणसाने हात वर केला तर त्याच्या बोटातून बेलाचे त्रिदल उगवते.

7) त्रिदल दल येईल ना येईल पण आता एक गोष्ट अनिवार्यपणे तुम्हाला *उमजली असेल* ती म्हणजे आता तुम्हीच या मठाचे स्वामी आहात.

यापुढे "तो" ऐवजी स्वामी/ आद्य स्वामी हेच नाम वापरून पुढील लेखन असेल.

स्वामींना हा असा अचानक झालेला आयुष्यातील बदल पचनी पडत नाही. महंतांशी बोलताना साम-दाम याचा वापर करून यातून सुटका मिळावी या प्रयत्नांवर पाणी पडते. आपले पूर्व आयुष्य आठवत कुठून या ठिकाणी पोहोचलो याची खंत निर्माण होते.पण आलेल्या प्रसंगाला धीराने तोंड द्यावे या सामान्य माणसासारखी विचार धारा ठेऊन हळूहळू त्यांची मानसिकता बदलत जाते. येणारे अन्न सुग्रास आहे. अन्नाची कधी अवहेलना केलेली नाही. दिनचर्येची तक्रार नाही. आलेला व असलेला बदल स्विकार करण्याचा कणखरपणा कथे मध्ये जाणवतो. या अशा क्षणांचे त्यांच्या मनातील विचार खालील शब्दात वर्णन करता येतील.

*खरंतर प्रत्येक माणसा पुढे असतो अंधार. जन्माच्या आधीचा वेगळा, म्हणजे गर्भाशयातील वास्तव्य. त्या नंतरचा वेगळा, अर्थातच हा पृथ्वीवरील आयुष्यातिल

लागेबांधे, कडू गोड अनुभवांचा, चढउतारांचा. एकदा का या अंधाराची सवय झाली की अंधारातही काही चाहूल लागते. मग कधी ती प्रकाश पहाटेची असते, कधी ती आत्म उन्नतीची असते, कधी स्वांत सुखाय असते,कधी आध्यात्मिक प्रगतीची असते. अंधारानंतर प्रकाश हा जगाचा नियम आहे. फक्त प्राप्त *स्वामी परिस्थितीत* त्याचा अंधार कालावधी बराच मोठा आहे. अनोळखी आहे . त्या क्षणी तरी शेवट अजून तरी नक्की माहीत नाही. पण स्वामीची आशा पल्लवीत करणारे विचार मात्र आहेत. सकारात्मक विचार आहेत. त्यांच्या मनीचे गुज *माधव ज्युलियन* यांच्या शब्दांमध्ये व्यक्त होतात.

*आलो मी एकला, जाणार एकला, एकांत येथिल का न साहे* ?

आता कथेच्या अंगाने जायचं म्हटलं तर कथा आता आसन, भोजन, झोप या सामान्य जगण्याच्या कार्यपद्धतीत आहे. हळूहळू गत आयुष्याच्या आठवणी विस्मृतीत जातात. लाल दिव्याच्या उजेडात दिवस रात्र संकल्पना विरलेल्या अवस्थेत आहे. आणि मनाची बुद्धीची चालना आता मृत्यू यावा, घडावा या

विचारधारेकडे चाललेली आहे. आडवे, उभे आणि मांडी मोडून घातलेली बैठक याच 3 अवस्था आहेत. आयुष्याच्या दांड्यावरील हाच एक त्रिशूल किंवा हात वरती केल्यावरती बोटातून त्रिदल उगवण्याचा हा एक क्षण.

त्रिशूल, त्रिदल यांचा रूपकात्मक वापर कथेत आहे. ब्रह्मा, विष्णू, महेश हे उत्पत्ती, विकास व नाश होणे याकरता असे हे रूपक नेहमी वापरले जाते. या कथेत ते चपखलपणे बसलेले आहे. स्वामी यांच्या या आपत्तीमधील उत्पत्ती म्हणजे मठ प्रवेश व स्वामी पदग्रहण स्वामींचा मानसिक बदल अनुभूती. व पुढे विकास करताना, स्वतःमधील ऊर्जेचा बदलाकरता वापर करून वेलाची वृद्धी, नव्या जीवनाची वाटचाल, आपल्याकडून दुसऱ्याला देण्याची वृत्ती, दुसऱ्याच्या विकासाकरता, वाढीकरता, समर्पण वृत्तीने सर्व ऊर्जा त्याकरता वापरणे. व शांतपणे स्वतः हून मृत्यू स्वीकारणे. खरे तर त्याची भीती न बाळगता उलट मृत्यूला आवाहन करून येण्यास सांगतात.

*ये मित्रा मृत्यू ये, मी भरून पावलो आहे, आयुष्य जगलो आहे, आता मी नाही तर या चरचरा मध्ये तूच भरून राहिलेला आहेस. माझ्यातील ऊर्जा मी या वेलाला देऊन एक वेगळे जीवन जगण्याची उर्मी ठेवून मृत्यूचा स्वीकार करण्यास तयार असलेला स्वामी तयार आहे. ये मृत्यू ये*.

मठातील तळघरातील मठी मध्ये वास्तव्य करीत असताना स्वामी विचार प्रकट करतात. *माझ्यातील मी शोधत शोधत अश्या एका वळणावरती मी येऊन ठेपलो आहे की आता मी नाही,हे परमात्मा आता तूच आहेस. जशी ऊर्जा नष्ट होत नाही, ती फक्त रूप बदलते या तत्त्वानुसार माझे अस्तित्व आता या हिरव्या पानांच्या करता आहे. त्यांचा श्वास हा माझा श्वास झालेला आहे*.

यापूर्वीचे जटाधारी स्वामी त्रिशूल पंथी कीर्तनकार होते. अफिंबाज असल्याने अफूची गोळी असलेले डबी, साक्या दिंड्या लिहिण्यासाठी पेन्सिल या गोष्टी त्यांच्या शरीराचाच भाग होत्या. त्याचा त्यांना उपयोग झाला. हवा खेळवण्याच्या पन्हाळयाच्या तोंडातून कधी वाळके पान येई, कधी गवताची काडी येई. ते

ठेवण्यातही थोडी आसक्ती होतीच. सूर्यप्रकाश आभाळ पाहून आलेली ती चिन्हे आहेत, निसर्ग वस्तू असल्याने तळघरातील या खोलीत त्यांना विशेष स्थान होते. ते जपून ठेवलेले होते. आणि एकदा तर अचानक कागदाचा एक गोळा उतरला. त्यावर पेन्सिलने लिहिलेला जटाधारी स्वामींचा इतिहास आद्य स्वामींना वाचता आला.

*आयुष्य कितीही निर्दय असलं तरी ते आपणाला चिरडू शकत नाही*. हा विचार जटाधार्याने आद्य स्वामींना दिलेला आहे. त्यात जटाधाऱ्याने नैसर्गिक मृत्यू स्वतः स्वीकारला आहे आणि स्वामींना तो पत्रलेखनातून जाणवून दिला आहे. त्यांचे मृत्यू स्वीकारण्याचे धारिष्ट्य हा त्यांचा नैसर्गिक मृत्यू असावा असे जाणवते. कारण ते स्वतः अफू घेणारे असूनही ती गोळी पूर्ण त्यांनी ठेवलेली होती. मृत्यू स्वीकारण्याकरता आणि त्या आधी सुद्धा त्यांनी कोणतेच मिशन, द्रष्टेपण त्यांनी जिवंत असताना ठेवलेले नव्हते. ...

याउलट *आद्य स्वामी* यांना त्याच ध्यान मंदिरात रोपट्याच्या रूपाने मोठा वेल होईपर्यंत जगण्याचे कारण मिळाले. आपली आयुष्यउर्जा वेल वाढवण्याकरता खर्ची घालताना, जीवाची, आयुष्याची परवा केली नाही. जीवन वेलाचे जीवन सार्थक होण्याकरता स्वतःला पणाला लावले व समाधान घेत मृत्यू स्वीकारला.

कठोपनिषदाचे तत्व समजावून घेऊन ते शांतपणे मृत्यूला सामोरे गेलेले आहेत. मृत्यूची भीती नसल्याने महंतावर, आश्रम व्यवस्थेवर आपण वेलीच्या रूपाने मात करू शकलो याचे आत्मिक समाधान घेतलेले आहे. मग प्रश्न पडतो की त्यातील पहिला क्षण कोणता होता ??

अफूच्या गोळीला शरण जाणे तो क्षण ?, का जटाधार्याने स्वामीला स्वतःच्या मृत्यू दाखवून वाचवले व सांगाड्याच्या रूपात दर्शन दिले तो क्षण ? का गोपीचंदाचे स्नान आटपून पावले कोरडे करण्यासाठी खाली वाकले असताना रानवेलीचे फांदीला पाच गोल पाने पाहिली होती तो क्षण? खोलात कुठे ते बीज उतरले व साऱ्याला तुच्छ लेखन हिरव्या नम्र डौलाने डोलत असणारा त्या पाच पानांच्या वेलीचा तो क्षण? *का कोणत्याही क्षणी ते खाली टाकता येईल असे जाणीव असले

की कोणतेही ओझे अवजड होत नाही हे त्याला जाणवले तो क्षण*?? यापैकी एका कोणत्यातरी क्षणाने आद्य स्वामींचे आयुष्य बदलून गेले एवढे निश्चित. त्यांना त्यानंतर उपरती झाली, उमज आली हे निश्चित.

*एखाद्या गोष्टीची माहिती असणं ही बाब वेगळी, उमज आणि ज्ञान असणे ही बाब वेगळी की नवीन जाण येणं हा तर दुर्मिळ क्षण असेल. भविष्य कशाकरता ? त्याचा उपयोग काय* त्याचे फलित काय? त्याची जाण आली की ती व्यक्ती अमृतानुभावाजवळ पोहोचली असे समजले जाते. *आद्य स्वामींच्या सद्य परिस्थितीत जगायला कारण मिळाले, ती वेलाची होऊ देणारी वृद्धी, वेलाचे आकाशाकडे झेपण्याची जी नैसर्गिक वृत्ती, त्याला आधार देण्याचे सहाय्य करण्याचे स्वामी म्हणून मी साधन आहे मला साध्य काय करायचे याची जाण येणं हीच आयुष्याची इथे कर्तव्यता आहे याचे हे अंतिम ज्ञान स्वामींना झालेले आहे. वेल फुलेल, फळेल, एक दिवस हा त्रिशूल तुटून पडेल अगदी आपल्या प्रमाणेच, आपण स्वतः फुले फळे निर्माण न करता मात्र वेलाला भविष्य दिले आहे. पण स्वामीला मात्र साधे वर्तमान ही नाही. ही अनुभूती येणे, त्याचा स्वीकार करणे, वेल सतत वाढत जाऊन वर जाईल हे खरे. पण ते घडेल ते स्वामींच्या स्वतःचा एक श्वास शोषण करून किंवा हे सारे उमगले तोच ज्ञानाचा क्षण होता. ( का?) स्वामी जगणार आहे की वेल वाढणार आहे. या घटनेचा विचार करताना स्वामींचा निश्चय नक्की झालेला होता. परिणीती काय आहे हे समजून-उमजून सुद्धा वेलाची वृद्धी होणं हीच आपली जीवन लालसा आहे हे समजण्याचा तो क्षण होता. कबीर म्हणायचे हे परमेश्वरा मी तुला शोधतोय, शोधतोय आणि ज्यावेळेस तू परमात्मा म्हणून मला उमगला, मिळाला, समजला,ते तूच असणार होतास. पण मी तेव्हा नव्हतो. तसाच अनुभूतीचा दिव्य क्षण प्राप्त करण्यासाठी बुद्धांनी आयुष्य वेचले होते ज्ञान प्राप्त झाले त्यावेळेस तो क्षण त्यांनी अनुभवला पण त्याचे ते वर्णन ते करू शकले नाहीत. अशीच समानधर्मा क्षणाची इच्छा स्वामींच्या मनी उमटली व त्या धुंदीत तो वेल वर जाण्याकरता ते त्यांचे हातून घडत जात होते. त्याची जाणीव म्हणजे त्यांचे आणखीन एक स्वगत

*पण हे सारे आपण न करता दुसरेच कोणीतरी करीत असून आपण सावलीप्रमाणे सारे केवळ पाहत आहोत असा जो अलिप्तपणा आलेला आहे तो क्षण कालावधी स्वामींचा आयुष्य धागा बनून गेला* आद्य स्वामी स्वच्छंद, साधा, सामान्य माणूस, होता तेव्हा त्याचे आकाश टिचभरच होतं. आठवणी ओंजळ भर होत्या. अंतरीचा दिवा, अंतरीची ज्योत त्यांची कधी पेटलेली नव्हती. त्याग माहिती नव्हता. तळघरात खाली जेव्हा ध्यान मंदिरात येणे झाले व जेंव्हा डोक्यावरील आकाश दिसेनासे झाले त्या नंतर त्यांना उमज आली व वेल वाढवण्याच्या ध्यासाला एवढे मोठे म्हणजे बाहेरील आकाश व अंतरीचा अवकाश एकत्र येऊन मृत्यूला सुद्धा मित्र बनवण्याची इच्छा ठेवून, वेल मात्र वाढू दे. हा व्योम पाहून स्वामी त्यात गेले, तेव्हाच त्यांनी परमात्मा दर्शन घेतले असे म्हणावेसे वाटते. उर्ध्व मूलअधशाखाम अश्वत्थम ....... असे भगवत् गीतेत म्हटले आहे . त्याची कथेत आठवण येते

सुनीळ सामंत :

सखोल,पायरी पायरीने, एक एक मुद्दा उलगडत, एक एक अस्तर सोलत सोलत तुम्ही कथेच्या अंतरात्म्याशी पोहोचलात. ही कथा वरवरच इतकी सुंदर आहे की ़त्या खाली डोकावण्याची इच्छाच होत नाही. ग्लानी येते. पण तुम्ही तो प्रवास घडवला. तुमचे एक एक वाक्य मौल्यवान आहे. एक एक पायरी आहे.

पण मग अचानक कधीतरी *एक न्यू नॉर्मल क्षण येतो*

कठोपनिषदाचे तत्व समजावून घेऊन ते शांतपणे मृत्यूला सामोरे गेलेले आहेत. मृत्यूची भीती नसल्याने महंतावर, आश्रम व्यवस्थेवर आपण वेलीच्या रूपाने मात करू शकलो याचे आत्मिक समाधान घेतलेले आहे. मग प्रश्न पडतो की त्यातील पहिला क्षण कोणता होता ??

कोणत्याही क्षणी ते खाली टाकता येईल असे जाणीव असले की कोणतेही ओझे अवजड होत नाही हे त्याला जाणवले तो क्षण?

वेलाचे आकाशाकडे झेपण्याची जी नैसर्गिक वृत्ती त्याला आधार देण्याचे सहाय्य करण्याचे स्वामी म्हणून मी साधन आहे मला साध्य काय करायचे याची जाण येणं हीच आयुष्याची इथे कर्तव्यता आहे याचे हे अंतिम ज्ञान स्वामींना झालेले आहे .

शांतपणे मृत्यूला समोर जाणारा स्वामी, जगावर सत्ता गाजवणारा महंताला पराभूत करून विश्वविजेते पद मिळवल्याच्या थाटात शांतपणे आयुष्य संपवतो.

तुमचा हा लेख वाचताना स्वामी वाचताना येणारी अनुभूती साक्षात आली. दंडवत.

सुनीळ सामंत : स्वामी ही विजयाची कथा आहे. जीएंच्या लेखनात (आणि सर्वसाधारण मनुष्याच्या आयुष्यातही) कायम दुःखान्त असते. पण ही कथा सुखान्तआहे.

विलास वाघोलीकर : अगदी वरच्या श्रेणीतील जीएंच्या कथांपैकी स्वामी ही कथा आहे . इतरत्र व या कथेतही जीएंनी संसार चित्रे रंगवली, मानवी जीवनातील गुन्हेगारी, स्वार्थीपणाचा काळा भाग दाखवला, काव्यमय चित्रपट रंगवले, तत्वज्ञानाची लेणी दाखवली, त्या सर्वांचा परिपाक म्हणजे स्वामी कथा आहे . आणि जीए त्यात इतके गुंतले की त्यांनी दुर्मीळ अशी स्वतःची कविता कथेत दिली . संजीवजींचे हे विवेचन छापील स्वरूपात येवून कायम स्वरूपी रहावे व शेकडो वाचकांनी वाचावे ही शुभेच्छा .

अद्वैत दर्शन येथे व्यवहाराच्या, वास्तवाच्या रुपात कथेत प्रकट होते. गीतेतील अश्वत्थ वृक्ष दिसतो . सत्व रज तम या त्रिशूळाचे संदर्भ येतात . इत्यादी . . . हे सर्व वाचताना आपल्या समिक्षेतील प्रतिभा जाणवते .

विलास वाघोलीकर : एका हुकूमशहाची जी गरज असते, तशी महंताची गरज आहे . त्यामुळे त्याच्या बोलण्यात सत्य -असत्य मिसळ आहे. त्याने सांगीतलेले सर्व सत्य असते तर नायक कोठडीत असताना महंताने कडी घालणे, हे असत्य कसे आले . पूर्ण असत्यही नाही . कारण तो मठाची आर्थिक बाजू सांगतो, ती वस्तुस्थिती

आहे . त्यामुळे श्रीमंतीचा गर्व असलेला, पण गुलाम माणसे हवी असणारा ( इस्किलार) धर्माचे आवरण धारण केलेला ( दूत, पातक, विदूषक इ . ) स्वार्थी, गुन्हेगार* (कसाब, बळी सारखा ) असा महंत आहे . असे मठ ,जगात सर्व धर्मांत आहेत. अमेरिकेत एका टेकडीवर ओशो यांचा आलीशान आश्रम होता .हे उदाहरण आहे . . . कथानायकाला स्वामी केल्यावर महंत व स्वामी यांचा संबंध मोजका येतो . - I )दररोज जेवणाचे ताट पाठवणे व रिकामे ताट परत घेणे . २ )कधी - काळी, जुने कपडे येणे व नवीन कपडे पाठवणे . 3 )ताटे आली नाहीत असे, समजा महिनाभर झाले तर खाली स्वामी मेले आहेत असे समजून त्याची खात्री करणे . त्यामुळे खाली वेल वाढला हे महंताला नंतरच कळणार . तो त्या हुकूमशहाला धक्का असणार . याशिवाय मला या कथेत आणखी काही विचारप्रवाह आहे असे वाटत नाही .

- vrushali datar कथेतील 'तो' हा सर्व सामान्य माणूस आहे. मोक्षप्राप्ती वगैरे अभिलाषा तो बाळगून नाही. बालपणीच्या गावाला भेट देण्याच्या सहजसुलभ ओढीने तो त्या ठिकाणी आला आहे. आणि बस चुकल्यामुळे व दुसरा काहीच पर्याय नसल्यामुळे योगायोगानेच महंताच्या जाळयात अडकला आहे. महंताने त्याला मंदिराखालच्या टिचभर जागेत बंदिस्त करून स्वामीत्व बहाल केले आहे. बाहेरच्या जगापासून तो तुटला आहे. थोडक्यात महंताने त्याच्यावर सक्तीची विरक्ती लादली आहे. महंताने लादलेले हे सक्तीचे वैराग्य प्रथम तो नाकारतो . अकांड तांडव करतो आणि शेवटी आता येथून सुटकेचा काहीच मार्ग नाही म्हटल्यावर निराश होतो. आधीच्या स्वामींचे सांगाडे पाहिल्यावर प्रथम घाबरतो .पण नंतर यातून सुटकेचा काहीच मार्ग नाही असं म्हटल्यावर नाईलाजाने परिस्थितीचा स्वीकार करतो. तो आधी होऊन गेलेल्या स्वामींच्या सांगाडयांची सोबत स्वीकारतो, तेथील एक रिकामी जागा नंतर कदाचित आपलीच असेल हे वास्तव स्वीकारतो, बाह्य जगापासून ताटातूट स्वीकारतो. तो मूळचाच आशावादी व सहजासहजी हार मानणारा नसावा. त्यामुळे दरवेळी चौकट उघडताना आज काहीतरी नवीन असेल ही आशा , उत्सुकता त्याच्या मनात असते.

- नाखुशीने का होईना ही परिस्थिती आता त्याने स्वीकारली आहे. तो व्यवस्थित जेवण करायला लागला आहे. शारीरिक स्वच्छता करायला लागला आहे . हळूहळू परिवार, मित्र, बाहेरील जग यापासून तो अलिप्त होत चालला आहे. आपला मृत्यू आता अटळ आहे हे वास्तव त्याने स्वीकारले आहे. मात्र मृत्यू कधी आणि कसा असेल याबाबत तो अजून अनभिज्ञ आहे.

- आधीच्या स्वामींची अफूची गोळी, त्रिशूल आणि चिट्ठी ज्यावेळेस त्याला मिळते त्यावेळी त्याला मृत्यूवर विजय मिळवल्यासारखे वाटते आणि तो काहीसा उल्हासित होतो. आता मरण कधी पत्करायचे हे महंताच्या हातात नसून त्याच्या हातात असते. त्याही स्थितीत त्याची लढावू वृत्ती अजून जागृत असते. आणि जर मरण पत्करायचेच आहे तर ते आपल्या इच्छेने पत्करायचे आणि आपण हरलो आहोत असे महंताला वाटू नये ,म्हणून स्वच्छ आंघोळ करून तयार होऊन मग तो मरणाला सामोरा जाणार असतो.

- सर्व सजीवांची प्रजोत्पादन ही नैसर्गिक प्रवृत्ती आहे. आपला वंश आपल्या मागे सुरू राहावा यासाठी सर्वच जण धडपडत असतात. प्रतिकूल परिस्थितीतही आपली पिल्ले वाचवायची धडपड ते करतात.मोगरा ,लिंब इत्यादी सारखी काही झाडे वाढवताना त्यांचे पाणी तोडतात अथवा पाण्याचा ताण देतात. आणि मग अशावेळी आणीबाणी ची परिस्थिती आहे आता आपण मरणार तर आपण आपली प्रजा वाढवली पाहिजे असे वाटून त्या झाडांना फुले फळे येतात! प्रत्येक सजीवाची वंश वृद्धी ही सहज प्रवृत्ती आहे. त्याचप्रमाणे मनुष्य प्राण्याला बुद्धीचे वरदान असल्यामुळे तो आपल्या वंशासाठी काही ना काही वारसा सुद्धा मागे ठेवून जातो. 'व्यक्त होणे' ही सुद्धा माणसाची सहज प्रवृत्ती आहे. त्यामुळे गुहेतल्या बंदिवासाच्या परिस्थितीत देखील आधीचा कोणी स्वामी कागदाचा तुकडा मिळाल्यावर मनातील भावना तेथे व्यक्त करतो. आपले जीवन संपवण्यासाठी अफूच्या गोळीचा उपयोग करतो .परंतु त्याचबरोबर आपल्यापुढे जो कोणी अशा परिस्थितीत सापडेल त्याला उपयोगी पडावे म्हणून उरलेली अफूची गोळी व्यवस्थित डब्यात घालून सापडेल अशा रीतीने लपवून ठेवतो.

- दगडाच्या फटीतून उगवलेले छोटेसे रोपटे पाहून मृत्यूला कवटाळण्यासाठी निघालेल्या विद्यमान स्वामींना आपल्यासारखाच कोणी *सजीव* येथे आहे व त्याला योग्य मार्गदर्शन केले नाही तर तो आपल्यासारखाच या गुहेत मरण पावेल असे वाटते . त्या झाडा विषयी त्यांना ममत्व वाटू लागते. रोज त्याची वाढ बघणे आणि हवेच्या पाईप मधून त्याला वरती मोकळया हवेत सूर्यप्रकाशाकडे जाणारी वाट दाखवणे हेच आता विद्यमान स्वामींच्या जीवनाचे ध्येय ठरते. झाडाच्या वाढीने आत येणाऱ्या हवेचा मार्ग बंद होऊ लागतो, आणि तसा तो बंद झाल्यावर आपले मरण नक्की हे मग स्वामींना कळून चुकते. तो वाढत जाणारा वेल एवढी एकच जीवनासक्ती स्वामींना उरली असते. आपली सुटका अशक्य असली तरी आपण वाढवलेल्या वेलाने मोकळे आभाळ आणि सूर्यप्रकाश पाहणे हा विद्यमान स्वामींनी महंतावर मिळवलेला एक प्रकारचा जयच असतो. आणि या विजयाच्या आनंदातच विद्यमान स्वामी शांतपणे मृत्यूला कवटाळतात.

- आधीच्या स्वामींप्रमाणे पुढील स्वामींसाठी आपण काहीच ठेवले नाही अशी खंत त्यांना वाटत असते . पण त्यांनी एका सजीवाला या अंधार कोठडीतून बाहेर काढून मोकळी हवा व स्वच्छ सूर्यप्रकाश देऊन नवजीवन दिले असते.

- SANJEEV sargaonkar, : तो, स्वामी आणि महंत

- *ज्ञान म्हणजे तुम्ही काय करु शकता याचे भान असणे आणि शहाणपण म्हणजे कधी काय करावे किंवा करु नये याचे ज्ञान असणे.* तो, सामान्य माणुस जेंव्हा मठाच्या जीवनचक्रात अडकतो तेव्हा त्याला असलेला, आलेला जीवनक्रम आचरणे प्राप्त असते. त्याला पर्याय नाहीच. तरीही त्यामधून त्याला वेल वाढविण्याचे अनपेक्षित साधन मिळते, आयुष्य जगायला अर्थ मिळतो. आणि म्हणुनच त्याच्यावर दुसऱ्याला काही देऊन आयुष्य जगण्याची तृप्ती मिळण्याची इच्छा होते. ती फलद्रुपही होते. वाल्याचा वाल्मिकी झाला म्हणजे काय झाले तर , मानवाचा त्याच्या आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आणि जगाला,मानव जातीला एक महाकाव्य, एक संस्कृति प्राप्त झाली. वाल्याचा वाल्मिकी होणे ही प्रक्रिया त्यांच्या स्वत :च्या बाबतीत एक घटना होती. ती स्वार्थी होती का पारमार्थिक होती, याची

जाणीव त्यांना त्या क्षणी नव्हतीच, नसेल . कारण वाटमारी सोडून देऊन दुसऱ्या उद्योगात शिरणे अवघडच होते. पण ते शहाणपण जेंव्हा प्राप्त झाले, त्याक्षणी बदल घडणे सुरू झाले. अगदी अशीच मानसिक प्रक्रिया *तो* मध्ये झाली, आणि स्वामी बनण्याची, तयार होण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्यातील बदल हा त्यांच्यातील आत्मभान जागृत करणारा होता. त्यावेळी त्याचे विचार आत्मकेंद्रित होते का? किंवा , देण्याच्या प्रक्रियेतील आनंदाचे होते " हे आपण वाचक जर त्या क्षणाच्या त्याच्या भूमिकेत शिरून तन्मयतेने पाहू शकलो, विचार करू शकलो, तर आपल्या भावना म्हणजे त्याच्याच भावना असतील का? याचे आपण कधीच ठोस उत्तर देऊ शकत नाही, देणे शक्य ही नाही. कथा वाचनातून त्याला स्वामी शिर्षक दिले आहे म्हणुन आपण त्या आयामात आजमावून पाहतो. आपण शिर्षक बदलून विचार करू या का? " वेल " हे एक शीर्षक, "जीवनरेखा" दुसरे. "तो आणि महंत" तिसरे, "ध्यानधारणा" चौथे. आता वाचक म्हणुन आपण काय विचार केला असता आउट ऑफ बॉक्स जाऊन. म्हणून, आपल्या वाचनाची विचार प्रणाली व समज पाहून *तो चे स्वामी होणे relative आहे, असेल असे वाटते* --------- दुसरी बाजू

- *दुसऱ्याचं भलं करायला कोणत्याही पदाची किंवा पैश्याची गरज नसते.*

- *फक्त मनात चांगली भावना लागते.* महंताचे मठ हेच आयुष्य आहे, ती त्यांची रक्तवाहिनी आहे. त्याच्याशिवाय त्यांना दुसरे विश्व नाहीये.त्यांच्या दृष्टीतून पहिले स्वामी मरण पावल्यावर 108 दिवसात येनकेन प्रकारे मठाला *स्वामी मिळणे महत्वाचे आहे* नाहीतरी मठाच्या पूर्व आयुष्यात महंत सोडले, तर स्वामी कोण व्यक्ति आहे याची माहिती असण्याचे कोणास कारणही नाही. त्यांच्या आयुष्यावर, मठात राहण्यासाठी त्यांचे काहीच अडत नाही, त्याचे कारण दिवाभीत आयुष्य जगण्याविषयी जी भीती त्यांना होती, ती या तुरुंगात - मठात नव्हती. स्वामी मिळाल्यानंतर मानसिक सोडवणुकीसाठी ,महंत हा जबाबदारी च्या जागी असलेला माणूस होता. स्वामी चे ध्यानमंदिरातील असणे, त्याचे अस्तित्व, आयुष्य, मठ प्रमुख असणे, सत्ता गाजवणे ही महंताची जगण्याची गरज होते. ते काही ऊर्जा स्थान नव्हते . तर बांडगूळ म्हणून जिवंत राहण्याचे स्वार्थी साधन आहे ,होते. म्हणुन साधने

उपलब्ध होती पण भावना चांगली नव्हती, स्वार्थी होती हेच म्हणावेसे वाटते. अशीही ही एक विचारधारा या कथेवर.

- विलास वाघोलीकर : मी काही ठळक मुद्दे पुन्हा मांडत असताना कदाचित द्विरुक्ती होईल . पण ते मुद्दे *पटल्यामुळे* पुन्हा मांडावेसे वाटत आहे .

- २ )माझ्या दृष्टीने कथेत खालील कॅरेक्टर्स आहेत -

- *महंत* - त्याच्या बोलण्यावर पूर्ण विश्वास ठेवता येणार नाही .इतके तो बेमालूम खरे - खोटे बोलतो . पण जर इतर पुरावे पाहिले, तर आढळते की अतिश्रीमंती असताना याने मठ बांधला . बाहेर जाता येणार नाही या अटीवर अनेकांना साधक - सेवक म्हणून घेतले . तीन सेवकांचे गट करून त्यांचे हात बांधले . त्यांच्याकडून शेतीची, इतर उत्पादक कामे करून घेतली . मठाचा , कडक बंदोबस्ताचा तुरुंग केला . हात वर केल्यावर बेलाची तीन पाने येतात, अशा गप्पा मारून त्याने बिचाऱ्या 'कथानायक -स्वामीला ' फसवले .

- *कथानायक* -स्वामी - हा सामान्य पण संवेदनशील संसारी माणूस आहे . हा नंतर स्वामी होतो . कथेत पाच स्वामी झाले असा संदर्भ आहे. म्हणून याला कथानायक - स्वामी हे बिरुद देता येईल .

- *पत्रलेखक* स्वामी. - हा जटाधारी कीर्तनकार होता . त्याला अफूचे व्यसन होते . तो जटेमध्ये, पेन्सिल, पूजेचा चांदीचा छोटा त्रिशूळ , अफूची गोळी, डबी असे ठेवत असे . त्यामुळे महंताने फसवून या कोठडीत आणल्यावरही या वस्तूंच्या सहाय्याने तो पत्र लिहितो . शेवटी पुढील स्वामीसाठी अफू डबीत ठेवून, स्वतःचे जीवन संपवतो .

- *वेल* - कथेत हा लक्षणीय घटक आहे . चार मजले खाली अंधाऱ्या कोठडीत वेल उगवतो . कथानायकाच्या सहाय्याने वाढून त्याला फुले -फळे - बीया येतात .पण दुसऱ्या दृष्टीने , वेलामुळे स्वामींना मिळणारी हवा बंद होते .

- ---

- 3 )या संक्षिप्त परिचयानंतर या कॅरेक्टर्सचा जास्त आढावा घेता येईल - - - - -

- 4 )कॅरेक्टर *महंत* -

- या कथेच्या संदर्भात श्रीमंत मठांची उदाहरणे सांगता येईल . अमेरिकेतील ओशोंचा आश्रम हे एक श्रीमंत ,स्वतःचे नियम असलेले संस्थान होते . अनेक संप्रदायांत असे बंदिस्त मठ असतात . ते एका बाजूला , जनतेपासून दूर असतात . त्यामध्ये अनेक माणसे गणवेशात रहात असतात .जोपर्यंत तेथे उघड हिंसा होत नाही तोपर्यंत शासनसंस्था - कायदा त्यांच्या कामकाजात लक्ष घालत नाही . त्यांची आर्थिक व्यवस्था, शहर प्रशासन, केंद्रिय प्रशासन याबद्दल बाहेर फार थोडी माहिती असते . अगदी थोड्या इतर लोकांच्या मदतीने बहुतेक एक माणूस असे मठ चालवत असतो . याची जगात अनेक उदाहरणे पहाता येतील .

- त्यामुळे कथेतील परिसर मान्य करता येईल .

- -कथेत महंत झालेल्या, एका अतिश्रीमंत माणसाने स्वयंपूर्ण असा मठ बांधून त्याला कडेकोट कुंपण घातले होते. त्या माणसाला आतल्या तुरुंगाच्या - मठाच्या जगात ,हुकुमशाही गाजवायची आहे . मग त्याने मठाचे नियम केले . (जीएंच्या प्रवासी कथेतील अंध शिकाऱ्याची येथे आठवण येते . )बाहेर जाण्यास बंदी असलेल्या साधक - माणसांना मठात प्रवेश दिला . प्रवेशावेळी त्याने त्यांची चौकशी केली नाही .

- -ती माणसे धडधाकट हवी . तर ती कष्ट करून जगू शकतील . या बंदी - साधकांच्या मनावर हुकुमत गाजवण्यासाठी एक स्वामी हवा . हा स्वामी जिवंत हवा . त्याची इच्छा फक्त महंतालाच कळेल अशी स्थिती हवी . तो स्वामी इतर कोणाला उपलब्ध नसावा .

- -अनेक संप्रदायांत 'साक्षात्कार' झाल्यावर त्या एकाच माणसाला ईश्वराकडून आदेश येतात . इतरांना येत नाहीत . मग त्या माणसाच्या आदेशाप्रमाणे, ईश्वराचा आदेश म्हणून, इतरांनी विनाअट वागायचे असते .महंत सांगतो की मला तळघरातील स्वामी आदेश देतो . मग अनुयायी निमूटपणे ते आदेश पाळतात .

- अशा सर्व अटींसाठी त्या स्वामी - माणसाला रहायला भक्कम कोठडी केली पाहीजे . त्याप्रमाणे ती कोठडी महंताने तयार केली होती .

- कथेतील संदर्भावरून आतापर्यंत, आद्य स्वामी व तीन नंतरचे स्वामी झाले ( एकूण 4 )असे महंत म्हणाला . नायकाला 3 सांगाडे दिसले व वृंदावनाखाली एक सांगाडा असा ( एकूण 4 ) सांगाड्यांचा हिशोब होतो . मठ बांधल्यानंतर आद्य स्वामी तेथे आले, असे महंताच्या विधानाचा अर्थ होतो. नळाने हवेचा पुरवठा कसा होतो असा प्रश्न त्यांनी महंताला विचारला, असे महंत म्हणतो . महंताची सर्व विधाने, वर्तनकृती सत्य असतील असे नाही . पण काही विधाने सत्य समजून हे निकर्ष काढता येतात .

- नायक कोठडीत असताना महंताने बाहेरून कडी घालून त्याला खोटेपणाने बंद केले . त्यामुळे आद्य स्वामीचा साक्षात्कार, तपश्चर्या करणे , भावी स्वामीने हात वर केल्यावर बेलाची त्रिदल पाने उगवून प्रचिती देणे - - - या सर्व स्वकल्पित कथा आहेत. तरी तो हे सर्व नायकाला सांगतो . कारण असे धार्मिक हुकूमशहा एक गोष्ट इतरांना हजारवेळा सांगत असतात . ते नायकाला सांगून महंताला त्याला गुंडाळायचे होते .

- - या तुरुंगात बंदी - स्वामी आणला पाहिजे . मिथ कथा तयार करून,फसवून महंताने स्वामी - बंदी आणले . भूकेची गरज असली व श्रीमंती पाहुणचार केला की माणूस मिंधा होतो . राजकारण्यांचे चेले असे मिंधे असतात .अशी आतापर्यंत 4 माणसे-स्वामी महंताला मिळाले. आताचा कथानायक हा पाचवा माणूस-स्वामी आहे.

- - 5 )खरा *धर्मविचार* व धर्मकांड - जीएंनी धर्मातील कर्मकांडाला विरोध करणारे, गुलामगीरी दाखवणारे विचार अनेक कथांत मांडले आहेत . उदा . पातक, विदूषक , यात्रिक , गोरीला, ( हुकूमशाही बद्दल - )प्रवासी मध्ये अंध शिकारी, इस्कीलारमध्ये गुलामाचा व्यापारी, रक्तमुखीमध्ये सत्तापिपासू इत्यादी . धर्माच्या आवरणाखाली काही वेळा सर्वकष हुकूमशाही येते . म्हणून अवाजवी कर्मकांडाला विरोध आहे . पण जीए खऱ्या आध्यात्मिक विचारांचे विश्लेषण करणारे आहेत . आकाशस्थ शक्तींचा विचार करणारे आहेत .जीए लिहितात - ( पान 3 6 ) - ....वस्त्रा चे उभे आडवे धागे एकेक काढून टाकायचे व मग जे उरते त्याचे चिंतन करायचे .

विरून जायला शेवटी मी असतच नाही . राजाच्या अंगावर वस्त्र नाही . वस्त्रात राजा नाही, कारण वस्त्र व राजा दोन्ही मूळात नाहीच ...

- - .... हजार गिजबिज रेषा . नेमक्या भेटतात की अगदी जवळून जावून न भेटता विरून जातात . . . हा गोलक आहे तरी कसला ? एका बाजू ला खडक वितळवणाऱ्या धगीने पेटलेला तर दुसया जागी अंगातले रक्त गोठवणारा .. शेवटी राहते तरी काय? पूर्णात् पूर्णम् उदच्यते । ... .

- . सजीवाचे अस्तित्व अनमोल आहे . ते वाचवले पाहीजे हा आध्यात्मिक विचार आहे. तसेच एका सजीवाचा मृत्यू झाला तरी दुसऱ्या सजीवाचा जन्म होवून त्याचा विकास होत असतो . हे एक प्रकारे सजीवाचे पुनर्जन्मत्व आहे

- . -हे आध्यात्मिक विचार या कथेत आहेत. धार्मिक माणसाला विचार करायला लावणारे करणारे गूढगर्भ असे या कथेत बरेच आहे . त्यामुळे खरा धार्मिक या कथेकडे आकृष्ट होईल

- 6 )*कथानायक* स्वामी -

- महंताला जिवंत माणूस, स्वामी म्हणून मिळतो., त्यात महंताच्या गुन्हेगारी कौशल्याचा भाग आहे . तसेच नायकाच्या दृष्टीने योगायोगाचा भाग आहे . त्यासाठी नायकाची संवेदनशीलता ( किंवा भोळेपणा म्हणा, ) कारणीभूत असते . कामासाठी परगावी जाताना आपले लहानपणीचे गाव जवळ आले म्हणून तेथे जाणे हे संवेदनशील माणसाला योग्य वाटेल . इतर अत्यंत व्यवहारी माणसांना, त्या गावात आता काय पहायचे ? म्हणून हा विचार भोळेपणाचा वाटेल . पण कथेतील नायक त्या गावात उतरला .

- - नायक संवेदनशील दाखवला आहे. या प्रसंगात तसे होते .नंतर, बंदिस्त झाल्यावर नायकाला ज्या आठवणी येतात त्याही त्याचा संवेदनशील स्वभाव दाखवणाऱ्या आहेत. उदाहरणार्थ,भावाला रेशमी सदरा घेवून देणे, बायकोला खड्याची अंगठी देणे, आजारी मित्राचा उपचार करणे, पंढरीला जाण्यासाठी सुताराला पाच रुपये देणे,कवडयाला ससाण्यापासून वाचवणे, मोगऱ्याचा वेल उभा करणे, मोठे वाचनालय पाहून भांबावून जाणे, बावळट साध्या पोषाखात कॉलेजमध्ये

गेल्यावर मुले चिडवतात, मग वाईट वाटणे . इत्यादी . या आठवणींच्या स्मरणातून, व लहानपणचे गाव पहाण्यातून कथानायक ( काही म्हणतील,नको इतका ) संवेदनशील आहे, असे दिसते .

- 7 )गुन्हेगाराने तयार केलेला *सापळा* -

- - नायकाची बस चुकते . महंत भेटतो . 108 दिवसांत तुरुंगात बंदीस्त करण्यासाठी,महंत हा सावज शोधतच असतो . तो श्रीमंत आहे . त्याला हटकणारे कोण असणार ? आयुष्यात योगायोगाच्या गोष्टी होत असतात . उदाहरणार्थ,बस चुकते, वीज जावून अंधार होतो . नळाला पाणी येत नाही . रस्त्यात ट्रॅफीक जाम होतो . इत्यादी . तसे येथे घडते .

- - अशा भुकेल्या नायकाला श्रीमंती पाहुणचार मिळाल्यावर, तो महंताच्या म्हणण्याप्रमाणे वागतो . हा गोड बोलणारा, धार्मीक वेषभूषा असलेला, अत्यंत श्रीमंत, इतक्या सेवकांचा मुख्य, आपल्याला अडचणीवेळी जेवणाची मदत करणारा माणूस फसवेल असे त्याला वाटत नाहीं . नायक महंताबरोबर मठात खाली खाली जातो, हा नायकाच्या सौजन्याचा भाग आहे . तसेच थोडे मिंधे होण्याचा भाग आहे . . जी ए लिहितात -"दोन्ही बाजूने आधार घेत खाली बुडत चालल्याप्रमाणे ( महंत ) नाहीसा होवू लागला . आता मात्र त्याला वाटले , आपल्याला हे जमायचे नाही आपल्याला नकोही आहे. पण महंताने खालून हाक मारताच अदृश्य दोरीने ओढल्याप्रमणे तो आत उतरला."

- - गाठ पडली ठकाशी .. असा हा महंत आहे . तो कडक नियम तयार करतो . गेटच्या दाराला कुलूप लावतो व किल्ली स्वतःकडे ठेवतो . मठाला वीजेच्या तारांचे कंपाऊंड घालतो . फक्त थोड्यांना खाली स्वामी आहेत . त्यांना जेवण दिले पाहीजे . या व्यवस्थेची माहिती असते . स्वामी मेल्यावर त्याची कोठडी साफ करायला एकच सेवक - साथीदार असतो . असा हा बनेल महंत आहे .

- 8 ) *कथानायक* - *स्वामी* *होण्याच्या* *घडामोडी* -

- प्रथम परिस्थितीला नकार देण्याचे विचार येतात . ते विचार कथानायक बाजूला सारतो . अन्नाचा अव्हेर करत नाही . अवघड ,अपुऱ्या जागेतील दिनचर्या स्वीकारतो .

- अफूची गोळी मिळल्यावर तो लगेच घेत नाही . वेल रुजलेला पाहिल्यावर त्याला तो चमत्कार वाटतो . सजीवाचे जीवन वाढले पाहीजे हा आध्यात्मिक विचार बळावतो. त्याची स्वजीवनाची अभिलाषा संपते . म्हणून तो वेलाकडे दुर्लक्ष करत नाही . उलट वेलाला वाढू देतो . त्याही पुढे वेलाला नळात सोडण्याचा अटळ , एकाकी निर्णय घेवून तो मरण पत्करून वेलाला वाढू देतो . अशा प्रकारे समर्पण करून तो स्वामी होतो .

- - -

- 9 ) *पत्रलेखक* - स्वामी -

- हा सुध्दा सामान्य माणसाचा ( कीर्तनकाराचा ) 'स्वामी' होतो . त्याला चुरगळलेला कागद सापडणे हा चमत्कार असतो . नंतर तो पत्र लिहितो . त्रिशुळाने घासून भिंतीवर, बाण दाखवतो व 'मी' असे लिहितो . हे आपले जीवित कार्य झाले या समाधानाने पुढील स्वामीसाठी गोळी ठेवतो व मृत्यू पत्करतो . यावेळी तो सामान्य माणसाचा (कीर्तनकाराचा ) स्वामी होतो . आयुष्य कितीही निर्दयी असले तरी ते आपल्याला चिरडू शकत नाही . हे दाखवतो .महंत सांगेल तोपर्यंत कोठडीत राहण्याऐवजी स्वतः होवून मृत्यू पत्करून तो महंताचा एक प्रकारे पराभव करतो .

- - -

- 10 )कथेतील घटक - *वेल* -

- कथेत वेल हा लक्षवेधक घटक आहे. जमीनीखाली चार मजल्यांखालील कोठडीत बी पडते, वेल रुजतो . हा चमत्कार होतो . वेलाला मूळ , खोड ,पाने , फुले ,फळे व बीयाही येतात . इतका तो वेल मोठा वाढतो . हवा येणार नाही हे कळूनही स्वामी वेल वाढू देतो. संत तुकाराम यांनी म्हटले आहे

- किल्ल्याचा तट, तेथे वाढे पिंपळवट ।

- त्यास पाणी कोण घाली रे, तो राम अम्हाला देतो रे। .

- एक विचार -

- स्वामीच्या मृत्यूनंतर महंताला कळेल . तो कोठडीत येईल . स्वामीने स्वतः वेल वाढू दिला हे पाहून त्याला तात्पुरता का होईना पराभव वाटेल . त्याने वेल काढून टाकला तरी वेलाच्या बीया सूर्यप्रकाशात विखुरलेल्या असतील .

- ॥ )पत्रलेखक -स्वामीला कागद मिळाला . कथानायक - स्वामीला वेल मिळाला. हे विश्वातले चमत्कार म्हटले पाहिजेत . अनिर्वचनीय विश्वाचे काही निर्णय निर्हेतुक असतात पण त्यांमुळे विश्व चालते . कथेमध्ये हासुद्धा पैलू आहे .

- धन्यवाद - विलास वाघोलीकर

- Rajesh Unavane police:

- जीए यांनी स्वामी कथा लिहिणेपूर्वी धारवाड येथील मठास भेट दिली होती. भेट देण्यापूर्वी त्यांनी कथेचा गोषवारा व्यवस्थित आखला असावा. तो कथेचा गोषवारा आद्य शंकराचार्य यांचे जीवन व त्यांनी स्थापन केलेल्या चार पीठावर (मठ) आधारीत असावा, हे स्वामी कथा वाचल्यावर जाणवते. आद्य शंकराचार्य यांचे जीवन, त्यांचे कार्य सर्वाना माहिती आहेच.

- आद्य शंकराचार्य हे केरळमध्ये जन्मले. वयाच्या 7 व्या वर्षी संन्यास घेऊन गुरूच्या शोधात निघाले. त्याकाळात नर्मदा नदीकाठी *ओंकारेश्वर* येथे आले. तेथे एका गुहेत अनेक वर्षापासून समाधिस्थ अवस्थेत असलेल्या आचार्य गोविंदपाद यांना त्यांनी आपले गुरु मानले.

- त्या दोघांच्या *पहिल्या भेटीची कथा* (‘तू कोण आहेस?’ व त्यावर छोट्या शंकराने दिलेले उत्तर) प्रसिद्ध व सुपरिचित आहे.

- *भगवान शंकरानी त्यांना दर्शन दिल्याची कथा सांगितली जाते. काशी येथे मनकर्णिका घाट आहे. तेथे भगवान शंकर यांनी दर्शन दिल्याची कथा आहे.*

- आद्य शंकराचार्य यांनी त्यानंतर भारतभ्रमण केले. त्यांनी एकूण *चार मठ/पीठ स्थापन* केले. *द्वारका मठ, जगन्नाथपुरी मठ, शृंगेरी मठ आणि ज्योतिर्मठ* अशी चार पीठे निर्माण केली. त्यांवर प्रत्येकी एक पीठासीन शंकराचार्य नेमून आचार्य परंपरा घालून दिली.

- याव्यतिरिक्त *बारा ज्योतिर्लिंगांची स्थापना* आद्य शंकराचार्य यांनी केली.

- त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. त्यांचे तत्त्वज्ञान हे *उपनिषद, ब्रह्मसूत्रे आणि गीता यांच्यावरील भाष्यांत* आढळते.

- हिंदू धार्मिक मान्यतेनुसार, *आदी शंकराचार्य यांना भगवान शंकराचा अवतार मानले जाते.*

- श्रीमद् आद्यशंकराचार्य हे *अद्वैत परंपरेचे प्रवर्तक* मानले जातात.

- त्यांचा *‘’विवेकचुडामणी’* हा एक महत्त्वाचा ग्रंथ आहे. या ग्रंथात गुरु आणि शिष्य यांच्यातील संवाद आहे. त्याद्वारे वेदांतातील सत्ये उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

- *उपनिषदे म्हणजे काय?* हजारो वर्षापूर्वी भारतामध्ये जीव-जगत, आत्मा-परमात्मा, ब्रह्म-माया तसेच त्या संबंधीचे इतर विषय यावर गंभीर चिंतन केले गेले. त्याची मीमांसा केली गेली. ती अनुभवाने सिद्ध झाली. तीच उपनिषदांमध्ये संकलित, एकत्रित केली गेली. त्यालाच *‘वेदान्त’* असेही म्हणतात.

- *भगवदगीता उपनिषदांचेच सार* आहे.

- आद्य शंकराचार्य यांनी गुरु-शिष्य परंपरेतून *हे सार, हे ज्ञान सर्वसामान्य लोकांना पोहोचावे यासाठी चार मठ स्थापन केले.

- *'ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या'* या तत्वज्ञानाची *सर्वसामान्य जनतेला माहिती व्हावी, आकलन व्हावे व त्याचा अनुभव तिने घ्यावा, ती अनुभूति त्यांनी घ्यावी* यासाठी *मठाच्या माध्यमातून* त्यांनी कार्य केले. वयाच्या 32 व्या वर्षी ते स्वर्गवासी झाले.

- संत ज्ञानेश्वर यांनी संस्कृत भाषेतील गीतेवरील टीकाग्रंथ ‘ज्ञानेश्वरी’ लिहिला तो मराठीत. त्यावेळच्या प्राकृत भाषेत लिहिण्याचे त्यांचे *प्रयोजन एकच होते. गीतेतील तत्वज्ञान सामान्य जनतेला समजावे.*

- हे कार्य संपताच अल्पवयातच ते समाधिस्थ झाले. त्या पूर्वी *विश्वाच्या कल्याणाचे पसायदान* त्यांनी गुरुकडे मागितले.

- जीए यांच्या ‘स्वामी’ कथेला वरील सर्व विभूतींचे कार्याची पार्श्वभूमी आहे.

- *जीए स्वत: एक उच्चकोटीचे आध्यात्मिक साधक होते, हे त्यांच्या कथा साहित्यावरून* लक्षात येते.

- तशी *प्रज्ञा* या अध्यात्मिक साधनेतूनच त्यांना प्राप्त झाली असणार, हे निश्चित. ते प्रतिभावान होतेच. या प्रज्ञेचा व प्रतिभेचा संयोग झाला. त्यास त्यांच्या चिंतनाची डूब मिळाली. या साधनेतूनच त्यांनी ही *साहित्यसेवा* केली. अशा कथांची आखणी व मांडणी हे खूप कष्टाचे काम असते. कधीकधी प्रसववेदनेसारखे.... निर्मिकास वेदना देणारे असते......!

- *‘स्वामी’ कथेला आद्य शंकराचार्य यांच्या जीवनकार्याची पार्श्वभूमी आहे, असे माझे वैयक्तिक मत आहे.*

- ही कथा *'ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या' या तत्वज्ञानावर आधारीत आहे.*

- *‘स्व’ चा शोध घेऊन ‘मी’ चा अंत करणे म्हणजे ‘स्वामी’ होणे.*

- या कथेतील ‘तो’ ला महंताने कोंडून ठेवले. तेथून निघून जाण्यापूर्वी महंताने त्याला मी जे काही तुला सांगणार आहे ते ध्यानात ठेव असे सांगून काही hints, हिंटस् दिलेल्या आहेत.

- जीए यांनी महंताच्या मुखातून जे तत्वज्ञान थोडक्यात मांडले आहे ते खरोखरच दाद देण्यासारखे आहे.

- Dilip Bade: भोवतालच्या माणसांना एकच मुंडी असती तर ती आनंदाने पिरगाळली असती.अमेरिकेत प्रत्येक कुटूंबात किमान एक तरी पिस्तुल -बंदुक असावी. मुंडी पिरगळण्याच्या तुलनेत अमेरिकेत होणार्या हत्त्या अल्पच म्हणाव्या लागतील.अमेरिकन समाज खुपच संयमी आणि विचारीच म्हणायला हवा.

- Rajesh Unavane : *माहितीस्तव---*

- *'स्वामी' कथे संदर्भात श्री आद्य शंकराचार्य रचित आत्मषटक येथे अर्थासहित देत आहे...!*🙏

- Unavane : *आत्मषट्क*

- श्री शंकराचार्य सद्गुरूच्या शोधात होते. तेव्हा नर्मदाकाठी राहणाऱ्या भगवत्पूज्यपाद श्री गोविंदयती यांच्याबद्दल त्यांना माहिती समजली. भगवत्पूज्यपाद

गोविंदयती हे नर्मदेकाठी एका गुहेत रहात. श्री शंकराचार्यांनी ती गुहा शोधून काढली. पण त्या गुहेचे दार अतिशय छोटे, अरुंद व निमुळते असे होते. त्या दारातून श्री शंकराचार्यांनी आत डोकावले. तेव्हा श्री गोविंदयतींनी गुहेतून तात्काळ विचारले,

- " तू कोण आहेस?"

- तेव्हा आचार्यांनी तात्काळ उत्तर दिले, *"चिदानंदरूप: शिवोऽहं शिवोऽहम्..!"*

- म्हणजेच –

- *'मी (देह,मन,बुद्धी,इत्यादी नसून) चिदानंदरूप मंगलमय परब्रह्मच आहे.'*

- तात्काळ सहा श्लोक रचून 'मी आत्माच आहे' असे उत्तर श्री शंकराचार्यांनी दिले.

- तेच हे *आत्मषट्क.*

- हे उत्तर ऐकून श्री गोविंदयतीं प्रसन्न झाले. त्यांनी आचार्यांना संन्यासदीक्षा दिली व उपदेश केला.

- -----ooooo----

- *आत्मषट्क*

- (अर्थासहित स्पष्टीकरण)

- प्रत्येक श्लोक व त्याचा *अर्थ :--*

- मनोबुद्ध्यहंकारचित्तानि नाहं |

- नच क्षोत्रजिव्हें न च प्राणनेत्रे |

- न च व्योमभूमी न तेजो न वायु:

- चिदानंदरूप: शिवोऽहं शिवोऽहम् ||१||

- *मी मन, बुद्धी, अहंकार, चित्त नाही, तसेच कान वा जीभ नाही, नाक वा डोळे नाही, आकाश वा भूमी नाही, तेज नाही, वायु नाही. मी चैतन्य व आनंदरूप शिव आहे.* (अंत:करणचतुष्टय, पंचज्ञानेंद्रिये वा पंचमहाभूते म्हणजे मी नाही.)

- न च प्राणसंज्ञो न वा पञ्चवायु:

- न वा सप्तधातुर्न वा पञ्चकोष |

- न वाक् पाणिपादौ न चोपस्थवायू

- चिदानंदरूप: शिवोऽहं शिवोऽहम् ||२||

- *ज्याला प्राण म्हणतात तो किंवा पंचप्राण म्हणजे मी नव्हे,सप्तधातु किंवा पंचकोष नव्हे, वाणी, हातपाय नव्हे, गुद, उपस्थ नव्हे, मी चैतन्य व आनंदरूप शिव आहे. मी शिवच आहे.*

- (प्राण, अपान, व्यान,उदान, समान हे पंचवायु अथवा पंचप्राण आहेत. सप्तधातू---रस, रक्त,मेद. मांस,अस्थि,मज्जा व शुक्र.

- पाचकोष किंवा पाच कर्मेंद्रिये म्हणजे अन्नमय, प्राणमय, मनोमय,विज्ञानमय व आनंदमय हे होत.)

- न मे द्वेषरागौ न मे लोभ मोहौ

- मदो नैव मे नैव मात्सर्यभाव: |

- न धर्मो न चार्थो न कामो न मोक्ष:

- चिदानंदरूप: शिवोऽहं शिवोऽहम् ||३||

- *मला रागद्वेष नाही, लोभमोह नाहीत, मद नाहीच, मत्सराचा भावही नाहीच, धर्म,अर्थ,काम आणि मोक्ष मला नकोच. मी चिदानंदरूप शिव आहे, मी शिवच आहे. (रागद्वेष म्हणजे आसक्ती अनि तिटकारा,यांच्यासह षड्रिपु आणि चार पुरुषार्थ म्हणजे मी नाही.)*

- न पुण्यं न पापं न सौख्यं न दु:खं

- न तीर्थं न मंत्रा न वेदा न यज्ञा: |

- अहं भोजनं नैव भोज्यं न भोक्ता

- चिदानंदरूप: शिवोऽहं शिवोऽहम् ||४||

- *मला पुण्य नाही, पाप नाही, सुख नाही दु:ख नाही, तीर्थ, मंत्र, वेद आणि यज्ञ यांची मला अपेक्षा नाही. खाण्याची क्रिया, खाद्यपदार्थ व खाणारा म्हणजे मी नाही. मी चिदानंदरूप शिव आहे, मी शिवच आहे. (द्वंद्वातीत,पावन करणाऱ्या गोष्टींची आवश्यकता नसलेला, त्रिपुटीरहित असा मी आहे.)*

- न मे मृत्युशङ्न्का न मे जातिभेद:

- पिता नैव मे नैव माता न जन्म |
- न बंधुर्न मित्रं गुरुनैव शिष्य:
- चिदानंदरूप: शिवोऽहं शिवोऽहम् ||५||
- *मला मृत्युभय नाही, जातिभेद नाही, मला पिताही नाही आणि माताही नाही, मला जन्मच नाही, मला नातेवाईक नाहीत, स्नेही नाहीत, गुरूही नाहीत, शिष्यही नाहीत. मी चिदानंदरूप शिव आहे, मी शिवच आहे.*
- अहं निर्विकल्पो निराकाररुपो
- विभूर्व्याप्य सर्वत्र सर्वेंद्रियाणि |
- सदा मे समत्वं न बंधो न मुक्ति:
- चिदानंदरूप: शिवोऽहं शिवोऽहम् ||६||
- *मी निर्विकल्प (ज्याला पर्याय नाही असा, एकमेवाद्वितीय) निराकार आहे. सर्व विश्वाला सर्वत्र सर्व इंद्रियांना मी व्यापून आहे. माझ्या ठिकाणी सदैव समत्व आहे. मला मुक्तीही नाही आणि बंधनही नाही. मी चैतन्यरूप, आनंदरूप शिव आहे. मी शिवच आहे.*
- 🙏

कथा स्वामी -( पिंगळावेळ १९७३, ३५ पानी

मानवी स्वातंत्र्य – अमूर्त संकल्पना

महंत, स्वामी आणि त्रिशूळ – मूर्त स्वरूप

चैतन्याचा अंतिम क्षणी अनुभव

१) कथा स्वामी -मुख्य संकल्पना

‘स्वामी’ व महंत ह शब्द या कथेत ४५ वेळा तर ‘मठ’ व ‘त्रिशूळ’शब्द १८ वेळा आलेले आहे. यावरून असे दिसते की मठ,स्वामी -महंत आणि त्रिशूळ या

संकल्पनांभोवती या कथेची उभारणी झाली आहे. कथेत मानवी स्वातंत्र्य हे सूत्र या तिन्ही संकल्पनांचा एकत्रित विचार करते. कथेत जरी राज्यकर्ता व जनता,शासक व शासित यांच्यातील सत्ता संबंधांचे वास्तववादी चित्रण असले तरी कथा त्यापलीकडच्या नैतिक व आत्मिक स्वातंत्र्याचा ही सर्वांगीण परामर्श घेते.

अ ) 'तो' चा 'स्वामी' कडे प्रवास

स्वामी -महंत, गुरु -शिष्य शिव-शक्ती , स्वातंत्र्य- पारतंत्र्य सत्ताधारी- सत्ता मानणारा, बंधन- मुक्ती या सर्व संकल्पना द्वंदात्मक आहेत. यातील एक संकल्पना किंवा तत्व दुसऱ्या तत्वाखेरीज अस्तित्वात येऊ शकत नाही ही दोन्ही तत्व परस्परपूरक ,परस्परांवर अवलंबून असणारी व एकत्रपणे विविध स्तरांवर कार्य करणारी आहेत.

चैतन्य ही कोणत्याही नातेसंबंधांपलीकडे. निवड-निर्णयापलीकडे केवल ( absolute) मुक्ती आहे. इच्छा ,निवड, निर्णय ,अपेक्षा, चिंता, विषाद, भय आणि यातना यांच्यापलीकडे हळूहळू , निश्चितपणे जाणे हीच मुक्ती.

वस्तूविश्वातील कोणताही राजकीय सामाजिक, धार्मिक वैज्ञानिक ,ऐहिक अनुभव मुक्तीचा अनुभव देत नाही. वस्तू म्हणजे व्यक्ती स्वतः सोडून इतर सर्व यात माणसे निसर्ग इत्यादी येतात. अस्तित्ववादी मुक्तपणा व्यक्तीला यातना व आनंद , सुख आणि दुःख यापलिकडील मूळ वासनेचा अनादी अनंत,अफाट व अपार असा अनुभव देतो.

व्यक्तीतले चैतन्य व त्याची नियती अद्वितीय आहेत. व्यक्तीमध्ये टोकाच्या परस्परविरोधी भावना,वर्तन, वृत्ती आहेत. व्यक्ती सज्जनआहे तशीच दुर्जन आहे. स्वतंत्र आहे तशीच बंधनात पण आहे. प्रेम व त्याग, कठोरता व कोमलपणा तिच्यात आहे. व्यक्तीची द्विधा अवस्था दु:खमय आहे.

आ)' स्वामी' संकल्पनेचा अर्थ

स्वामी हे या कथेचे शीर्षक आहे.स्वामी या कथेत स्वामी हा शब्द एकंदर ४५ वेळा आला आहे. याचाच अर्थ स्वामी ही या कथेतील केंद्रीय, एकमेव व मुख्य संकल्पना असून ती चढत्या श्रेणीने किंवा विविध रूपे घेऊन -एखाद्या वस्तूवर स्वामीत्व असणारा ,एखाद्या व्यक्तीवर स्वामित्व गाजवणारा, अनेक व्यक्तींवर स्वामित्व गाजवणारा, स्वतःच्या मनावर स्वामित्व गाजवणारा व शेवटी अनाकलनीय शक्तीच्या रूपात एकरूप होऊन जगावर स्वामित्व गाजवणाऱ्या शक्तीच रूपांतरित होणारा असे अर्थाचे पदर या कथेत आहेत.

स्वभाव म्हणजे वस्तूचा मूळ भाव. स्व म्हणजे चैतन्य आणि भाव म्हणजे अस्तित्व. स्वभाव म्हणजे चैतन्याचे अखंड अस्तित्व. स्वभाव माणसाला, तो सोडून इतर माणसांना , प्राण्यांना वनस्पतींना , पंचमहाभूते ,ग्रहनक्षत्रे,तारकापुंज यांनाही आहे. प्रत्येक व्यक्तीला येणाऱ्या अनुभवाप्रमाणे त्याचा स्वभाव ठरतो त्याची मते पूर्वग्रह, कल व वागण्याची पद्धत ठरते. या क्रियेत व्यक्तीच्या जन्मापूर्वीपासूनचे संचित, या जन्मात त्याला आलेला अनुभव ,इतरांचा त्याच्यावर झालेला परिणाम ,निसर्गाचा परिणाम या सर्व गोष्टी येतात. अशाप्रकारे जन्म आणि मृत्यू या दोन बिंदूंमध्ये प्रत्येक व्यक्तीचे अस्तित्व हे आसपासच्या अफाट ,विराट विश्वाचे किंचित प्रतीक ठरते भाग होते .हेच ते ‘पिंडी ते ब्रम्हांडी ‘तत्व. हे तत्व जर व्यक्तीला भासले , अनुभवता आले तर त्याला एकाकीपणा तुटलेपण, परात्मता, विसंगती,असहायता,अगतिकता इत्यादी भाव कमी होत जातात. मग आपल्यातील जीवशक्तीला, अहंकाराला वेगळेच परिमाण लाभते .ते विस्तारत जाते, अवकाशात पसरत जाते, आपल्याला स्थलकालातीत करत जाते.

शिवाच्या पाच शक्ती आहेत १ चित्शक्ती - तुर्यातीत अवस्था -प्रकाशरूप (consciousness) , चैतन्यरूप२ आनंदशक्ती -तुर्यावस्था-स्वातंत्र्यरुप (ananda-joy,blessedness)३ इच्छाशक्ती -सुषुप्ती अवस्था( इच्छा will, intention,desire energy of desire ) ४ ज्ञानशक्ती स्वप्न अवस्था knowledge ५ क्रियाशक्ती. जागृती अवस्था ( action )

या शक्ती प्रत्येक व्यक्तीस एकाच वेळेला कार्यरत असतात पण त्यातली एकच शक्ती प्रामुख्याने त्या त्या अवस्थेमध्ये कार्य करते. अशा रीतीने प्रत्येक व्यक्ती आपल्या मनात निर्माण झालेल्या इच्छा त्या त्या काळी पूर्ण करण्याचा प्रयत्न करत, शेवटी आपल्या अंतकाळाकडे अटळ क्षणांकडे जात असतो.

शक् म्हणजे समर्थ होणे असणे या धातूला क्तिन प्रत्यय लावल्यास शक्ती हे नाम तयार होते .कारण प्रत्येक वस्तूमध्ये कार्योत्पादनाला उपयोगी व कधीच त्या वस्तू पासून वेगळे न होणे अशा स्वरूपाचा जो विशिष्ट धर्म असतो त्याला शक्ती संबोधतात .उदाहरणार्थ अग्नी हा शक्तिमान व दाहकता ही त्याची शक्ती असते.

प्रत्येक भाव पदार्थातील अपृथक  शक्ती या अचिंतनिय आहेत .पदार्थातील या शक्ती त्याच्या कार्याद्वारेच दृश्यमान होतात. त्याच्या स्वरूपावरून होत नाहीत थोडक्यात सर्व भावांबरोबर राहणारी ती सूक्ष्म अवस्था आहे. शक्तीला ऱ्हास नाही, वृद्धी नाही .जेव्हा ती व्यक्त भावात प्रकट्ये तेव्हा ती नवीन वाटते जेव्हा अव्यक्त भागात जाते तेव्हा ती लुप्त पावते. शक्ती तत्त्वाचे अवलोकन केल्यास शक्ती ही एकाच वेळेला सृष्टी व प्रलय या दोन विपरीत गुणांनी युक्त आहे हे स्पष्ट होते. थोडक्यात, व्यक्तापासून अव्यक्त हा प्रवास सातत्याने सुरू असतो .जीवनाच्या विविध पायऱ्यांवर पुन्हा प्रवास चालूच राहतो. ‘स्वामी’ या कथेच्या प्रवासाचं वर्णन आहे.

स्वामी कथेच्या अखेरच्या पर्वात -त्याचे मरण व  वेलीचा जन्म यात ,तो प्रवासी उत्पत्ती व विनाश  यांचा अनुभव घेत  अंतिम क्षणी मुक्ततेचा अनुभव घेतो .

इ) ‘त्रिशूळ ‘ प्रतीकाचा अर्थ

या कथेत प्रथमच त्रिदल हा शैव संप्रदायातील महत्त्वाच्या संकल्पनेचा उल्लेख झालेला आहे. त्रिदल ( बेल) ,त्रिशूल ,त्रिशूळपंथी जटाधारी स्वामी ,शिवलिंग, शिवचरण,  इत्यादी शब्द कथेत पसरले आहेत

त्रिशूळ शब्द एकूण १८ वेळा या कथेत आलेला आहे. शैव संप्रदायात / तत्त्वज्ञानात त्रिशूळ संकल्पनेमध्ये (इच्छा, ज्ञान, क्रिया) ,( पशु ( मानव) ,पशुपती (शिव),

पाश(बंधने) ), (नर,शक्ती ,शिव), ( सत्व ,रज,तम – तिन्ही मिळून मूळ प्रकृति,माया ,शक्ती ,) (सत्.,चिद्, आनंद ) इ तत्वे येतात. विद्या- आविद्या ,दिवस-रात्र वेळकाळ ,पृथ्वी-आकाश, वृक्षलता,ऐहिक-पारलौकिक,शिव-शक्ती, सूर्य -सूर्यकिरण या एकरूप जोड्या आहेत .एकच शक्ती अनेक रूपा होते ज्ञानशक्ती, इच्छाशक्ती आणि क्रियाशक्ती या तीन प्रकारच्या दैवी शक्ती आहेत .सत् म्हणजे अखंड सत्ता.जे चिरंतन आहे ते सत्य.चिद् म्हणजे ज्ञानमयता. आनंद म्हणजे पूर्णता. दुःख व पूर्णतेचे असते.चैतन्य परिपूर्ण असल्याने दुःखनिरपेक्ष व आनंदमय असते.

वरील संकल्पनांमधील शक्तींमधील दोन शक्तींवर मात करून तिसरी शक्ती पूर्णतेकडे ,आनंदाकडे जात असते जसे पशु व पाश यांना दुर्बल करून माणूस शिव अवस्थेकडे जात असतो.

तसेच रज(क्रियाशीलता) व तमगुणांना दुर्बल करून सत्वगुण वाढीस लागतो .सात्विक बुद्धी प्रवृत्ती व निवृत्ती कार्य व अकार्य यांचा यथार्थ निर्णय घेऊ शकणारी असते तर तामस बुद्धी अधर्माला धर्म मानणारी, अनीतिला नीतिमान मानणारी, वाचकाला चांगले मानणारी असते.

२) स्वामी' – कथेतील प्रतिमा

३) आद्य स्वामी

अ) 'वृंदावन ही आद्य स्वामींची समाधी आहे.'

आ) आद्य स्वामींनी माझ्यावरील लोभामुळे मठाधीश ही जबाबदारी माझ्यावर टाकली इतकच. '

इ) 'सोन्याचांदी विषयी आसक्ती असू नये अशीच आमच्या आद्य स्वामींची शिकवण आहे.'

ई) आद्य स्वामींनी पोथ्या पुस्तकं वाचली नाहीत लिहिली नाहीत आणि लिहिली नाही कारण शब्द आणि विचार बंदिस्त झाली की ते मृत होतात.'

उ)	‘ आम्ही सर्वत्र हिंडतो, भेटतो व स्वामींच्या पुनर्वताराची चिन्ह कोठे आढळतात का हे पाहतो.’

ऊ)	आद्य स्वामींना श्रीशैल पर्वतापाशी साक्षात्कार झाला व एक शुभ्र जटाधारी ऋषी दिसला.’

ऊ ) ‘ही खूण असलेल्या गुहेत तू ध्यान कर म्हणजे तू ज्ञानी होशील.’ असे जटाधारी ऋषी म्हणाला

ए) ‘स्वामी असताना त्यांच्या ज्ञानपीठापर्यंत जाणं कोणालाच शक्य नव्हतं.’

आद्य स्वामींचे वरील वर्णन अस्पष्ट आहे. त्यांना साक्षात्कार झाला होता किंवा नाही याविषयी स्पष्टपणे कळत नाही. कारण त्यांनी त्याविषयी काहीही लिहून ठेवले नव्हते. आद्य स्वामींनी विरक्त होते त्यांचा मठाधीश महंत त्याबद्दल दुटप्पी भूमिका घेत होता. स्वामींच्या पीठापर्यंत फक्त महंतालाच जाता येत असल्याने तेथे येणारा दिव्य अनुभव याबद्दल इतर कोणीही काहीही सांगू शकत नव्हते. स्वामींच्या पुनर्वताराची चिन्हे व व स्वामी पदाचे अध्यात्मिक तेज यांचा काहीही संबंध दिसत नाही असे तीन स्वामींना ज्या प्रकारे निवडले त्यावरून स्पष्ट होते.

२) मठाचे नवे स्वामी -

अ)	‘१०८ दिवसांच्या आत नव्या स्वामींची प्रतिष्ठापना करणे मठाचे कर्तव्य आहे.

आ)	‘नंतरच्या स्वामींचे देखील वृंदावन हे विश्रांतिस्थान आहे.’

इ)	‘आता तुम्हीच या मठाचे नवे स्वामी आहात पूर्वीच्या स्वामी प्रमाणेच तुम्हाला आता उरलेलं सारं आयुष्य याच ठिकाणी घालवावे लागेल.’

ई)	‘प्रत्येक स्वामींना मृत्यूनंतर त्या वृंदावनाखाली पुरण्यात येतं व त्यावेळी आधीच्या स्वामींचे अवशेष येथे आणून जतन केले जातात.’

उ )’येथील स्वामींची महायात्रा होऊन तीन महिने झाले.’

उ) ‘ वृंदावनाखाली थोडे दिवस राहण्यापुरता आधीच्या स्वामींनी वरचा प्रवास केला पण पुन्हा ते परत आपल्या जागेवर आले होते आणि इतके दिवस मांसाच्या ओठाखाली दडवलेले हास्य आता मनमोकळेपणाने दाखवत होते.’

ए) ‘पण सध्या मठाचे स्वामी कोण, कुठे आहेत ?’

ऐ )’ एका स्वामींच्या मृत्यूनंतर शिष्यांपैकीच कोणीतरी स्वामी होत नाही का ?’

ओ )’ स्वामींनंतर शिष्यांपैकी कोणी स्वामी होत नाही .स्वामींना आपला उत्तराधिकारी देखील ठरवता येत नाही.’

औ)’स्वामी होण्यासाठी कडक तपश्चर्या कठोर ,वैराग्य इत्यादी हवच असे नाही.एक स्वामी शेतकरी होते.

क) ‘ असेच अकस्मात दर्शन देऊन आलेले तीन स्वामी झाले. ते सगळे येथेच आहेत तुझ्या शेजारी.’

ख) ‘ आद्य स्वामींच्या ध्यान करण्याचे आसन खाली आहे. त्यावर बसून अशा माणसांना हात वर केला तर त्याच्या बोटातून बेलाचं त्रिदल उगवतं.’

ग) ‘ मी स्वतः अमुक म्हणतो असं म्हटलं तर ती आज्ञा पालन करणार नाहीत असं नाही. पण स्वामींची आज्ञा आहे असं म्हटलं की माझ्या शब्दांना दैवी झळाळी येते. माझ्या शिवाय स्वामींजवळ कोणी जाऊ शकत नाही .अशी एखादी विभूती हाती असणे हे धर्माच्या बाबतीत अत्यंत जरूर व फायद्याच असतो.’

वरील महंताच्या वरील बोलण्यावरून असे स्पष्ट होते की नव्या स्वामीची निवड, त्याचे स्थान ,त्याचे उर्वरित आयुष्य हे सर्वस्वी महंताच्या आधीन होते व ही प्रक्रिया कमालीची अनितीमान, गुप्त व अंगावर शहारे आणणारी होती. पण महंताने त्याला या सर्व गोष्टींची स्पष्ट कल्पना दिली होती.

४)	‘त्रिशूळ ‘- कथेतील प्रतिमा

त्रिशूळ हा शब्दही या कथेत १८ वेळा आलेला आहे

‘मृत्यूच्या त्रिशूळाप्रमाणे दिसणारे तीन स्वामी शेजारीच असताना झोप येईल का?’ ‘ तीन सांगाड्यांचे रात्रंदिवस पसरलेले हसणे एवढेच.’ ‘त्याला ते तीनही सांगाडे आठवले.’

यम हा सूर्याचा मुलगा असून स्वतः प्रथम मरून दुसऱ्याला मृत्यूची वाट दाखवणारा हा देव मृत्यूचेप्रतीक मानला गेला आहे. याच यमाच्या डाव्या दोन हातात जळता त्रिशूळ आहे.

स्वामी या कथेत मृत्यूचा त्रिशूळ म्हणजेच हा यमाच्या हातात असलेला जळता त्रिशूळ. तसेच तीन स्वामींचे मांडीत मुडपून बसलेले सांगाडे म्हणजे या त्रिशूळाचे तीन भागच .येथे अत्यंत प्रभावीपणे मृत्यूचे साक्षात रूप वाचकांच्या समोर ‘याची देही याची डोळां’उभे केले आहे.

मी त्रिशूळपंथी दीक्षा घेतली होती .त्यामुळे त्रिशूळ पूजन, हातात त्रिशूळ धारण हा माझ्या जीवनाचा भाग होता. स्नानाच्या वेळी माझे कपडे, पडशी,त्रिशूळ सारं मागं ठेवावं लागलं.माझ्या पूजेचा त्रिशूळ पूजन, शिसपेनचा तुकडा आणि अफू या माझ्या आयुष्याच्या तीन रेषा या वस्तू डबीत ठेवून मी ती डबी जटांत ठेवीत असे.

मठ शैव संप्रदायाचा असावा व त्या मठाचा नवा स्वामी हा त्रिशूळपंथी असावा हा नियतीने घडवून आणलेला योगायोगच म्हणायला हवा. व्यावहारिक स्तरावर हा जटाधारी पूजेचा त्रिशूळ, पेन्सिल व अफू यांच्या रूपात जणू धर्म ,संस्कृती व कंटाळयावर मात करण्याची व्यसनाची सवय यांचा त्रिशूळ कायम जवळ ठेवत होता.

‘माझ्या पूजेचा त्रिशूळ माझ्यासाठी उलटी लेखणी होऊन राबला.’

‘ त्याने परत जाऊन पूजेचा त्रिशूळ आणला व फांदीभोवतालची जागा कोरायला सुरुवात केली.’

त्रिशूळ या धर्मप्रतिकाचा व्यावहारिक उपयोग अतिशय प्रत्ययकारी वर्णन केलेला आहे जो त्रिशूळ अमूर्त धर्माचे प्रतीक आहे तोच मूर्त कर्माचेही यशस्वी साधन, अमूर्त कल्पनांची लेखणी व योग्य शब्दांनी मार्गदर्शक होऊ शकतो.

‘ त्याने त्रिशूळ आणला व त्याचा उभा आधार घेत त्याने पानांना हलकेच उचलले व हलकेच पन्हाळ्यात सोडले .हा पूजेचा त्रिशूळ - त्याने अक्षरे लिहिण्याचा प्रयत्न केला. वेलासाठी सांदर मोठी केली. आणि आता वेलाचे जीवन मार्गी लागताना तो त्याचा आधार ठरला होता. वेल फुलेल,फळेल आणि मग एक दिवस वरच्या ओझ्याने हा त्रिशूळ जमिनीवर पडेल आपल्याप्रमाणेच .स्वतः फुले -फळे न निर्माण करताच !

त्रिशूळ हा जणू चैतन्यमय असून त्याने दुर्बल वेलाला आधार दिला, पानांना उचलले, दुसऱ्यांना मार्गदर्शक रेषा व अक्षरे अक्षरे लिहिण्याचा प्रयत्न केला. पण शेवटी त्रिशूळ त्याच्याप्रमाणेच काहीही स्वतःचे निर्माण न करता दुसऱ्यांकरता झिजून मातीत विरून गेला.

‘ आडवी उभे आणि मांडी मुडपून घातलेली बैठक .याच आता आपल्या तीन अवस्था. आयुष्याच्या दांड्यावरील हा एक त्रिशूळ !’

हे वर्णन अतिशय कलात्मक आहे कारण त्रिशूळ हा जणू निराकार जगण्यावरील साकार शरीराच्या तीन अवस्था.

५) विवेचनाचे भाग

अ ) तो बसची वाट पाहतो ते तो स्वामींच्या पीठावर बसतो.

ब) महंत व तो यांचा संवाद, महंत मठ, ,मनातले जीवन आद्य स्वामी,शेवटच्या क्षणांचे भाव – हे काव्यात्मक आकलन भाग १ते ८ यात आले आहे

क) त्यांचे प्रयत्न व मरणजाणीव

६)	अ ) तो बसची वाट पाहतो ते तो स्वामींच्या पीठावर बसतो.

‘पण बसमधून जात असता आदल्या स्टॉप वर त्याच्या मनात एक अनावर लहर निर्माण झाली. त्याला वाटले इतक्याजवळ आलो आहे मग का पाहून येऊ नये आपले गाव ? या भागाकडे शेकडो मैलांवरून आपण पुन्हा कधी येतो कुणास ठाऊक! ही कल्पना येतात वेड्याप्रमाणे प्रवास अर्धा तोडून तो उतरला व त्या खेड्यात गेला.’

असाच एक मानवजातीचा तुमच्या आमच्यासारखा प्रतिनिधी प्रवासी. अर्ध आयुष्य संपल्यानंतर प्रवासाला निघालेला आहे. प्रवास कदाचित अनोळखी ठिकाणचा, कदाचित एखादा असाध्य ध्येय साधण्याकरता जायच्या ठिकाणाचा.पण ,आपल्या जन्मगावाच्या जवळ येतात नियतीने जणू त्या प्रवाशाच्या मनात एक शक्तिमान लहर निर्माण केली व जणू. सांगितले की ‘तू येथेच उतर. तुला दुसरा कोणताही पर्याय नाही.’

मॅकडुगल या मानसशास्त्राच्या थोर अभ्यासकाने सांगितले आहे की मानवाच्या अठरा मूलभूत सहजप्रवृत्ती आहेत. त्यातली प्रवास ही एक सहजप्रवृत्ती आहे. जी ए कुलकर्णी यांच्या दृष्टांतकथांमध्ये नेहमीच त्यांचा कथानायक प्रवासाला निघतो . प्रवासामुळे त्याच्या ध्येयाकडे त्याला निश्चित पावले टाकता येतात.

ज्या स्थळी नायक या जगात अस्तित्वात आला ते स्थळ जवळ येताच नायकाच्या मनात त्या स्थळाविषयी व त्याच्या लहानपणच्या घालविलेल्या काळाविषयी, कुटुंबीयांविषयी जिज्ञासा जागृत झाली व तो तडकाफडकी खाली उतरला. जणू तो आपल्या गतआयुष्याचा, भूतकाळाचा आढावा घेणार होता आणि त्याला जे प्रश्न पडलेले होते त्यांच्या संदर्भात त्या आठवणी पाहणार होता जीएंच्या नायकाला जे प्रश्न नेहमी पडतात तेच प्रश्न त्याला पडले होते –

‘ मी कोण आहे? मी कुठून आलो? मी काय करणार आहे? माझ्या इच्छेचे मूळ कशात आहे? माझ्या इच्छेला स्वातंत्र्य आहे का? मी पूर्णपणे निर्णय घेऊ शकतो

का? निर्णयाच्या परिणामाची जबाबदारी कोणावर आहे? या सुखदुःखाच्या क्षणाक्षणांच्या हिंदोळयावर बसलेल्या माझ्या जीवाला शांती कधी मिळणार ? माझ्या आयुष्यात काही सुसंगत ,सुनियोजित हेतूपूर्वक घडते आहे का ? ‘

जिज्ञासूवृत्ती व ती पूर्ण करण्याकरता अथक ,झुंजार प्रयत्न ही कथा नायकाची ‘स्थिरवृत्तीस्वामिनी’ आहे. नायकाला त्याच्या जन्मग्रामात आलेला अनुभव अतिशय दुःखदायक व अनपेक्षित असतो .त्याला त्याच्या परिचितांपैकी कोणीच भेटत नाहीत. ते सर्व दुसऱ्या गावी गेलेले असतात किंवा स्वर्गवासी झालेले असतात .तो परिसरही त्याला ओळखत नाही. त्यामुळे नायकाला आपल्या जगण्यातल्या असंगतीची जाणीव होते.

‘त्यांना माझं नाव देखील माहित नाही. त्या ठिकाणी आपले काही उरलेच नाही त्या गावाने त्याला पूर्णपणे झिडकारले होते. त्याचे आडनाव माहीत असलेले देखील कोणी त्या ठिकाणी उरले नव्हते मग त्याला ओळखणारे तर दूरच.’

अंधारात, एकाकी ठिकाणी नायक उभा असताना व काळजीत असताना महंत त्याला आपल्या मठात रात्रभर मुक्काम करण्याचे आमंत्रण देतो. म्हणून त्याच्या रूपाने ,जणू नियतीच नायकाला सामोरी जाते व पर्यायहीन नायक त्याच्याबरोबर मठात जातो.

‘ त्याने समोर पाहिले. टेकडी केसाळ काटेरी कातड्याच्या श्वापदाप्रमाणे अंग टाकून बसल्यासारखी दिसत होती निलगिरीच्या झाडांचे उंच शुभ्र बुंधे जमिनीत रुतवलेल्या विशाल हाडांप्रमाणे दिसत होते.’

नायकाला त्या निर्जन, भयाण ,अंधारी परिसरात भीतीची तीव्र जाणीव झाली. पण नंतर पुढे गेल्यावर मठाची इमारत दिसताच त्याची भीती एकदम कमी झाली. कारण –

‘ झुडपांच्या झुबक्यांनी केसाळ वाटत असलेली आणखी एक टेकडी मागे घेऊन मठ उभा होता.’

नंतर नायकाला एकदम जणू पुढे होणाऱ्या आपल्या मृत्यूची पूर्वसूचना मिळाली. तो मठाकडे येऊ लागला व  त्याला  मठ कसा दिसला –‘मठ आता सर्पमणी घेऊन उभारलेल्या फण्यासारखा दिसत होता’

यमाचे पाश, मृत्यूचे दूतच जणू अंधारातून तरल आकृत्यांप्रमाणे त्याच्याकडे येत होते. तो भीतीने शहारला.

‘ झाडांच्या स्थिर गर्दी मधून तशीच कफनी घातलेल्या अनेक आकृती ,तीन-चार जणांच्या घोळक्याने येऊन मागोमाग चालू लागल्या होत्या.’

वृंदावनाचा काळा रंग ही मृत्यूसूचक आहे. ‘ते पुरुषभर उंच असून, चमकदार काळया रंगाचे होते.’ यात विरोधलय दिसते सिध्द पुरुष हे वृंदावनाखाली चिमूटभर राख होऊन जातात पण वृंदावन मात्र पुरुषभर उंचीचे कायम राहते.

नंतर महंत त्याला मठाकडे घेऊन जातो व मठाच्या रहस्यमय रचनेतून तो अंधारातून पुढे जात असतानाच अनेक काळया सावल्यांप्रमाणे असलेले, मुंडन केलेले शिष्य,जणू एखाद्याची  सम्राटपदावर प्रतिष्ठापना होत असताना मिरवणूक असते त्याप्रमाणे त्याच्या मागे येत होते.  त्या शेकडो शिवचरण आकृतींना माहीत होते की आज खाली भूगर्भात असलेल्या तळघरातील ध्यानकुटीमध्ये स्वामीपदाचा अदृश्य मुकुट या प्रवाशावर -नव्या स्वामींवर चढवण्यात येणार आहे.  तो प्रवासी परत पाहायला मिळणार नाही कारण तो नियतीच्या वधस्तंभावर अदृश्य होणार होता व नंतर वृंदावनाखाली विश्रांतीकरता अचल ,अचेतन स्वरूपात वर येणार होता. यापूर्वी अशाच तीन मिरवणुकांत त्यांनी याच पद्धतीने भाग घेतला होता

महंत त्याच्या प्रश्नांना उत्तरे देत होता पण त्याला पाहिजे तेवढीच, पाहिजे तशीच माहिती देत होता. प्रवाशाला हात धरून नियती जणू अंधारातल्या साम्राज्याकडे अंधारातले साम्राज्य दाखवत पुढे  नेत होती.

त्याच्या सन्मानार्थ मठात असलेली शाही स्नानाची व्यवस्था, भरजरी वस्त्रांची तरतूद, पंचपक्वानांची रेलचेल यामुळे प्रवासी अत्यंत प्रभावित झाला व त्याचे मत

महंताबद्दल सामाजिक संकेताप्रमाणे ,एका प्राचीन धर्म परंपरेचा प्रमुख म्हणून, प्रथमतःच अनुकूल होते . त्तो त्याच्याबरोबर गडद अंधारात अनोळखी मठात एक रात्र काढायला तयार झाला होता. ते मत आता अतिशय अनुकूल झाले. एका उद्दाम सत्ताधीशाचा कुटिल हेतू साध्य करण्याकरता टाकलेल्या सापळ्यात, गडद अंधाऱ्या रात्री मरणान्त अडकत चालला होता. याची त्याला अजिबात कल्पना नव्हती. मायेची गूढ शक्ती आता कार्यरत झाली होती.

तो मठ जणू एखाद्या सत्ताधीशाने आपल्या विरोधकांना किंवा आपल्यापेक्षा वेगळी मतं असणाऱ्या लोकांना तुरूगात डांबून ठेवण्याकरता जे भक्कम तुरुंग असतात त्याप्रमाणे बांधलेला होता.

‘ शेवटच्या दोघांनी ते अवजड दरवाजे नीट लावून पुन्हा बंद केले व तुळईसारखा अडणा ओढल्यावर बाहेरच्या जगापासून देठ खुडल्याप्रमाणे मठ एकदम अलिप्त झाला.’

‘ या कुंपणात झुडपामध्ये काटेरी तारा बसवल्या आहेत व त्यात रात्रंदिवस विजेचा प्रवाह आहे.आत  यायला हा एकच मार्ग आहे व त्याला देखील नेहमी कुलूपच असतं.’ महंत कठोर व निर्दयी तुरुंगाधिकाऱ्याप्रमाणे म्हणाला.

महंताच्या तात्विक बोलण्यात आणि व्यावहारिक वागण्यात कमालीची विसंगती होती.

‘ सोन्याचांदी विषयी आसक्ती असू नये अशीच आमच्या आद्य स्वामींची शिकवण आहे .पण मी त्यांच्या त्या भावनेला पोहोचलो नाही .माझी वैयक्तिक अनासक्तीची प्रौढी दाखविण्यासाठी मी समोर आलेले चांदीचे भांडं बाजूला सारण्याचा जाहीर पणा करणार नाही. ‘

गुरुदीक्षा घेतलेल्यांची संघटना संप्रदायात असते. गुरुपरंपरेमुळे संप्रदायात गुरुभक्तीचे महत्त्व ,निष्ठेचे महत्त्व खूप असते. तेथे ऐहिक भोगांपेक्षा नैतिक व आत्मिक गोष्टी मिळवण्यावर भर दिलेला असतो पण येथे महंताच्या मठात तर ऐहिक विलासांवरच

भर दिलेला आहे व इतर दोन गोष्टी तर काडीमात्र ही जाणवत नाहीत आणि महंतावर निष्ठाही जवळपास जुलमाने ,नाईलाजाने सर्व शिवचरण शिष्यांनी ठेवलेली दिसते.

महंताचं बोलणं प्रामाणिक आणि स्पष्ट असलं तरी त्यातून ऐहिक जीवनातील ऐषारामी  विलास लपू शकत नव्हते.

त्याच्या बोलण्यातील सत्य आणि असत्य याचं बेमालूम मिश्रण तो प्रवासी ओळखू शकला नाही.

‘ अनेक वर्षे इस्पितळात पडलेले एक स्वामी शेतकरी होते.  नंतर ते एक स्वामी पूर्वायुष्यात अत्तरे ,जानवी, गंगाजल, विकत हिंडणारे ( शिवपूजेचे साहित्य व धर्मप्रतिकांचा व्यापार करणारे  ,) होते तर एक स्वामी पायी रामेश्वर ,काशी यात्रेला निघालेले प्रचंड जटाधारी बैरागी  ( मुख्य  ज्योतिर्लिंगाची यात्रा करणारे मोक्षप्राप्तीसाठी देहदंड सोसून प्रयत्न करणारे) होते .  स्वामी कोणत्या स्वरूपात दर्शन देतील हे आम्हा अज्ञ अनुयायांना काय कळणार ?’  महंत आणि परत सूचकपणे त्याच्याकडे पहात म्हणाला.

स्वामी ओळखण्याची खूण सांगताना महंत म्हणाला,’  स्वामींच्या ध्यान करण्याच्या आसनावर बसून एखाद्या माणसाने हात वर केला तर त्याच्या बोटातून बेलाचे त्रिदल उगवतं.’

नंतर महंत त्याला मंदिराच्या रचनेविषयी सांगतो. तेव्हा सभोवार उभे असलेले शेकडो शिष्य निघून जातात. याचे दृकश्राव्य वर्णन जी ए यांनी प्रभावीपणे केले आहे .

‘इतका वेळ भोवताली स्तब्ध उभे असलेल्या पिवळसर आकृती हळूहळू समोरील अंधाऱ्या चौकटीत निघून गेल्या.’

त्यानंतर महंत त्याला आद्य स्वामींच्या साक्षात्काराची कथा गूढ व  अद्भुत कथा सांगतो आणि तपोमंदिराकडे घेऊन जातो. वळणा वळणाच्या पायऱ्या उतरताना

त्याचे चैतन्य जणू हळूहळू नाहीसे होत होते. आसपासचा परिसर विरून जात होता. जीए लिहितात-

‘ आता भोवतालचा प्रकाश एखादे वस्त्र झटकून घेतल्याप्रमाणे नाहीसा झाला. तेव्हा कोणीतरी आपल्याला हिरावून घेत पुढे पुढे ढकलत आहे असे त्याला वाटू लागले. त्याच्या मनात अनामिक भीती उत्पन्न झाली . तेथे शिरताना त्याच्या एका बाजूला सर्वत्र दार नसलेल्या अरुंद कोठ्या होत्या आणि तेथे शिरताना निळसर प्रकाश निर्जीव होऊन आत सरकत अंधारात मिसळला होता.’

शिष्यांमधील चैतन्य जड होऊन, अंधारमय होऊन त्या कोठ्यांमध्ये हरवून जात होते. शिष्यांच्या ध्यानचिंतनाला, विरक्त  भावाला कोणतीही अडचण येऊ नये म्हणून त्यांच्या सर्व वस्तू हिरावून घेण्यात आल्या होत्या.

‘ मी काय, इतर शिष्य काय ,चटई, अंगावरील वस्त्रं, जेवणाचं भांडं, याखेरीज कोणाची खाजगी मालमत्ता नाही.’

त्या शिष्यांकडे पाहताच त्याला सर्वनाशाची ,भीषणतेची, अंधारमयतेची तीव्र जाणीव झाली. जी ए लिहितात –

‘त्या प्रकाशात त्यांची वस्त्रे शेवाळ चढू लागल्याप्रमाणे हिरवट दिसू लागली होती आणि त्यावर त्यांची मुंडन केलेली मस्तके पाण्यातच कष्टाने वाढलेल्या फिकट विषारी कंदाप्रमाणे दिसत होती.’

## आद्य  स्वामी आणि महंत

### आद्य स्वामी

घरदार रे त्यागत | नातेसंबंध तोडत |

तीर्थक्षेत्री त्यां शोधत | आद्य स्वामी || १ ||

आदिनाथाच्या स्वप्नात | भूगर्भातील गुहेत |

ध्यान करी अविरत | आद्य स्वामी || २ ||

शिवलिंग गाभाऱ्यात | अंधारात धीर देत |

ज्ञानरूपी उजळत | आद्य स्वामी || ३ ||

आले ते मग परत | चिंतन ध्यानकुटीत |

तपोमंदिर रचत | आद्य स्वामी || ४ ||

बसत पद्मासनात | सिध्दी त्यांस मिळत |

बेल त्रिदल बोटांत | आद्य स्वामी || ५ ||

नको रे धनाची माया | नको रे  ओढाळ काया |

नको रे शब्दांची छाया | आद्य स्वामी || ६

साक्षात्काराचा तो क्षण | आता रिते माझे मन |

पेटले वासनारण | आद्य स्वामी || ७ ||

सुरू रे अंधारयात्रा | दुःखभोग  भेटे मित्रा |

शोधतसे गूढचित्रा | आद्य स्वामी || ८ ||

दिव्यत्व ते क्षणभर | दुःखओझे मणभर |

व्यथालयात बंदिस्त | आद्य स्वामी || ९ ||

नाही येत रे मरण | जगणे झाले भीषण |

एकटेपण सोसत | आद्य स्वामी || १० ||

महंत

नियतीचे गूढ स्मित | लक्ष्मीपती उपस्थित |
आद्य स्वामीस भेटत | तो महंत || १ ||

करूनी स्वामींची सेवा | विश्वास मिळवी देवा
समजू न देई कावा | तो महंत || २ ||

तुम्ही ज्ञानचंद्रकोर | मी भ्रमचित्त चकोर |
करेन जगी प्रसार | मी महंत || ३ ||

भोगले सर्व वैभव | नुरली आता ती हाव |
तुमची कृपा हा भाव | मी महंत ||.४ ||

करू नका मठाधीश | तुम्हीच हो माझे ईश |
शोधेन तो सत्ताधीश | मी महंत || . ५ ||

नाही अटी, नाही शर्ती | गतकाळ भग्न मूर्ती
करीन साधकभरती | मी महंत || ६ ||

बांधू अंधारकोठडी | येतील बायाबापडी |
देईन त्यां वस्त्र भांडी | मी महंत || ७ ||

करती काबाडकष्ट | नियम मान्य त्यां स्पष्ट |
नाही भुकेचे अरिष्ट | मी महंत || ८ ||

करतील ते मुंडन | नाही आज्ञेचे खंडन |
नको ते प्रवचन | तो महंत ||. ९ ||

बांधीन तिघांचे हात | एकमेकां मूक साथ |
नाही होई घातपात | मी महंत || १० ||
करतील ते चिंतन | का रे हे जन्ममरण |
होतील शिवचरण | मी महंत || ११ ||
अंधारात पळतील | मरण ते पावतील |
जाणती अंतिम सत्य | तो महंत ||.१२ ||
साक्षात्कारात ती वीज | म्हणे देहभावा नीज
तैसी कुंपणात वीज | तो महंत ||. १३ ||
हे तो अस्तित्वाचे देणे | नाही कुणाचे रे घेणे |
'आहे' 'नाही'त संपणे | तो महंत ||. २४ ||
सांभाळीन तव गूज | न पडे कोणा उमज |
मठप्रमुख होईन | मी महंत || १५ ||
तुम्हा ठाऊक संगती | त्याहून ती विसंगती |
हेतूशून्य हो प्रगती | तो महंत ||.१६ ||
तपोनिवास भूवरी | ध्यानकुटी ती विवरी |
नेईन त्वां सांभाळूनी | तो महंत ||.१७ ||
एकांतवास गंभीर | तुम्ही आहा रणवीर |
सिद्धी मिळेल सत्वर | तो महंत ||. १८. ||
पहा पोलादाची दारे | नळातून खेळे वारे |
स्नानासाठी केले झरे | तो महंत ||. १९ ||

जागे असता प्रकाश | स्वप्नात होतील भास
झोपेत तो दुःखनाश | तो महंत || २० ||
मांडी मुडपून बसा | पद्मासनाचा घ्या वसा
मनाचा पहा आरसा | तो महंत ||. २१ ||
बंद केले मागे दार | घालूनी सत्तेचा हार |
भूवरी जाया निघाला | तो महंत || २२ ||
उंच काळे वृंदावन | स्वामींचे समाधीस्थान |
खाली इतरांना मान | तो महंत || २३ ||
असे असेलच का हो ? असे नसेलच का हो
अफाट विश्वी ,सांगा हो | तुम्ही लोक || २४
दुःखाची मगरमिठी | कळवळते ही दिठी |
मोडून गेली घरटी | तुम्ही लोक || २५ ||
माझिया अल्पमतीत | प्रभावहीन कृतीत |
जगणे हे पोखरत | तुम्ही लोक || २६ ||

काव्यात्मक आकलन- भाग ५

महंत आणि स्वामी संवाद ( भाग १ )

महंत सांगे स्वामीला | किती जागा देहाला?
देह रे फिरवायला | अंगभर ||.१ ||
महंत सांगे स्वामीला | किती जागा आत्म्याला ?
शरिरात झोपायला | हातभर ||.२ ||

महंत सांगे स्वामीला | स्वातंत्र्य हवे कशाला ?

जागा अंग पसरायला | टीचभर ||. ३ ||

महंत सांगे स्वामीला | स्वातंत्र्य हवे कशाला ?

पोट तुझे भरायला | वीतभर ||. ४ ||

महंत सांगे स्वामीला | स्वातंत्र्य हवे कशाला ?

गुलाम तू राबायला | आयुष्यभर ||. ५ ||

या टीचभर कुटीत | अंगभर पसरत |

नाहीस तू गुलामीत | आयुष्यभर ||. ६ ||

मंदिराच्या आत्मा आहे | येथे तुझ्या संगतीला |

नाही भय एकट्याला | क्षणभर ||. ७ ||

सांगाडे स्वामींचे तीन | मूक त्यांचे मृत्यूगान

कवट्यांचे हास्य छान | विश्वंभर ||. ८ ||

शुभ्र त्यांच्या दंतपंक्ती | अक्षरे भिंतीवरती |

मृत्यूलिपी उलगडती | हातभर || ९ ||

मांड्यांत मुडपिती | मरणाची भयभीती |

कवटीत शांतवृत्ती | दिगंबर ||.१० ||

लाल प्रकाश उजळत | तम सांगाड्यात विरत

कर ध्यान अखंडित | बोधीरूप || ११ ||

सत्य, शिव ,सुंदर रे , ते | सत्व,रज,तम रे ते |

नर, शक्ती,शिव रे ते | तुझ्यासाठी || १२

पृथिवी,जल, अग्नी ते | मृतस्वामी वायुरूप ते |

होशील आकाशरूप तू | पंचकात || १३ ||

शिवाची ही पंचमुखे | दूर करिती ही दु:खे |

राहशील येथे सुखे | स्वरुपात || १४ ||

ज्ञान, आनंदाच्या शक्ती | इच्छा,ज्ञान,क्रिया येती |

याच तुझिया सांगाती | अखंडित || १५ ||

तीन स्वामींचा त्रिशूळ | सुचवी प्रश्नांचे मूळ

त्रिशूळपंथाचा मार्ग | सनातन || १६ ||

शेवटची ही रे भेट | मरणाचा मार्ग थेट |

आत्मरुपी हो प्रकट | राजयोगी || १७ ||

काव्यात्मक आकलन- भाग ६

महंत आणि स्वामी संवाद ( भाग २ )

महंत सांगे स्वामीला | काळजी नसे कोणाला

येथे सुख तुझ्यासाठी | निश्चितसे ||. १ ||

घरीदारी तू रे शून्य | जो तो जगी अहंमन्य

वाट न पाहि रे कोणी | निश्चितसे ||. २ |

ध्यानकुटीत असशी | किंवा संसारी रमशी |

चित्रगुप्त रोजनिशी | निश्चितसे ||. ३ ||

नाही देणार रे बळी | मृत्यूची सावली काळी

नाही चढविन सुळी | निश्चितसे || ४. ||

महंत सांगे स्वामीला | नाही मी जीव घ्यायला |

तुझा मृत्यूक्षण झाला | निश्चितसे ||. ५. ||

जगी सर्व कोलाहल | विषकंद हलाहल |

शांत न कोणी अचल | निश्चितसे ||. ६. ||

जगी गोंधळ गोंगाट | ध्वनी धावे रे सुसाट |

मौनातून येथे वाट | निश्चितसे || ७. ||

प्रियेची नको आसक्ती | पाही सत्य भ्रमचित्ती |

घात करील ही वृत्ती | निश्चितसे ||. ८. ||

अटळ संगत त्यांची | लालस रूपे सुखाची |

धुंद मधाळ रतिची | निश्चितसे || ९ ||

नामरुप रे मधुर | भाव उठती मदिर |

असहाय क्षुद्र नर | निश्चितसे ||. १० ||

जगी महापूर येती | भूकंप ते उलथती |

सदासर्वकाळ भीती | निश्चितसे ||. ११. ||

येथे ते नसे रे भय | शांततेचे रे वलय |

तुझी वसुंधरा माय | निश्चितसे ||.१२ ||

जगी इतरांच्या व्यथा | जाळती तव रे माथा

करती छळ सर्वथा | निश्चितसे || १३. ||

येथे नसती प्रियजन | न धावे रे तेथे मन |

काळात विरे प्राक्तन | निश्चितसे || १४ ||

नाही वाटे त्यांचा भार | दुःखओझे खांद्यावर

नसेल तो तिरस्कार | निश्चितसे ||. १५. ||

स्मृतिरूप ते आठव | ह्दयांतरी मार्दव |

होतील रे शून्यभाव | निश्चितसे || १६ ||

घरदार रानमळे | नभी दिसे ते सावळे |

निराकार रे सगळे | निश्चितसे ||. १७. ||

मनातील फुलबागा | हिमशिखरांच्या रांगा |

विरतील रे सगळे | निश्चितसे ||. १८. ||

सुखसोयींचा वर्षाव | निर्मी अलिप्त रे भाव |

गाठ वैराग्याचा गाव | निश्चितसे || १९. ||

मिळे विशुद्ध ज्ञान रे | जीवन दुःखमय रे

कर त्यां अर्थपूर्ण रे | निश्चितसे ||. २०. ||

काव्यात्मक आकलन- भाग ७

महंत आणि स्वामी संवाद ( भाग ३ )

अस्तित्ववादी दु:खनिरूपण महंताचे काल्पनिक प्रश्न व स्वामीचे वास्तववादी उत्तर

महंतांचे प्रश्न

माणसांचा तिरस्कार | दुःखाचा तो आविष्कार |

मुंडीतोड एकवार | क्षणभर ||.१ ||

प्रसंग ते आनंदाचे | थुंकशब्द मत्सराचे |

ऐकलेस तू ना का रे | क्षणभर ||. २ ||

भूकंपी कित्येक मेले | पाप येथे फार झाले |

कधीतरी ते भेटले | क्षणभर ||. ३. ||

अंतरिक्षात ग्रहण | चंद्रसूर्याचे बंधन |

मुक्त करण्यां त्यां स्नान | क्षणभर ||. ४.

स्वामींचे उत्तर

माणसांची आधी प्रीती | ढळे अनेकदा नीती

हे रे वास्तव जगती | जीवनभर || ५ ||

आनंदाकडे प्रवास | मत्सर कधी रे खास |

शोधती सुखनिवास | जीवनभर || ६ ||

निसर्गाची रे आपत्ती | भय वाटे त्यांच्या चित्ती |

आधाराची शोधवृत्ती | जीवनभर || ७ ||

दूर अद्भुत रे दृश्य | छायेत ते रे अदृश्य |

कर्मकांडाचे ते दास्य | जीवनभर ||. ८ ||

महंतांचे प्रश्न

संगीतमैफिलीत मढे | पिती मूढत्वाचे काढे |

म्हणती तेच ते पाढे | जीवनभर ||.९ ||

सुरावटी होती ध्वनी | कंपने भासती कानी |

निश्चल होते ते मनी | जीवनभर ||. १०. ||

काव्य जसे त्यां पुराण | शेणचेहरा भयाण |
अस्तित्व ते भावहीन | जीवनभर ||. ११. ||
शब्दांचा तोच तो अर्थ | निरर्थक तो भावार्थ
पाशवी वासना सार्थ | जीवनभर ||. १२. ||
कोमलतेला त्यजू | क्रौर्याने स्वतः सजून |
सत्तासुंदरी पूजून | जीवनभर || १३ ||
लाचारीची परिसीमा | संधीसाधूंचा महिमा |
स्वतःला विकत बसे | जीवनभर ||. १४. ||
वासना वळते अळी | रानवट मांदियाळी |
धुंद होती ती सगळी | जीवनभर ||.१५ ||
स्त्री दिसे तो बेभान | अंधारात सोडे बाण |
भावनांची गुंतवळ | जीवनभर ||. १६. ||
जो करतो हे सहन | मूर्खांना जातो शरण |
क्षणोक्षणी रे मरण | जीवनभर ||. १७. ||
घोड्यापुढे रे झापड | मनाची रे पडझड |
मन होई घोरपड | जीवनभर ||. १८ ||
सुख त्याचे भरताड | जगणे होई रेताड |
खोल रिता होई आड | जीवनभर. || १९. ||
तू एक रे घोळक्यात | फसत दलदलीत |
सुखाच्या मृगजळात | जीवनभर ||. २०. ||

तरंगत आले बोल | निर्विकार आणि खोल |

कठोर रे ,नाही ओल | सत्ताधीश ||. २१. ||

स्वतः जणू महाज्ञानी | बोले जणू ईशवाणी |

क्रौर्याची जणू कहाणी | तो महंत ||. २२. ||

स्वामींचे उत्तर

विश्व अफाट पसारा | जन्ममृत्यू खेळ सारा

दुःखाला नाही किनारा | जीवनभर ||. २३. |

जन्माआधीचे संचित | असंख्य होती वंचित

नियतीचा झंझावात | जीवनभर ||. २४ ||

काव्यशास्त्रविनोद | हा नाही जीवनवेद |

अस्तित्वाचा रे विषाद | जीवनभर || २५ ||

रसिकता रे दुर्मिळ | सारा नशीबाचा खेळ

उदासीन सर्व वेळ | जीवनभर || २६ ||

शब्दांत नाही जाणीव | सुरांत नाही जाणीव |

अस्तित्वात शोध घेतो | जीवनभर || २७||

प्रतिभावान रे व्यक्ती | नाही सत्य त्याची उक्ती |

जरी रे महान कीर्ती | जीवनभर || २८ ||

माझे मलाच शोधणे | हरणे रे हरवणे |

क्षण सुखाचा , दुःखाचा | जीवनभर ||. २९.

प्रत्येकाचे भावविश्व | ज्याचे त्याचे रे कवित्व |

कर्तृत्व आणि होतृत्व | जीवनभर ||. ३०. ||

ज्याची त्याची होरपळ | मग शोधे हिरवळ |

मिळेल त्यालाच फळ | जीवनभर ||.३१ ||

वस्तुस्थिती रे भीषण | परिस्थिती रे भयाण

नवा दिन रणांगण | जीवनभर || ३२ ||

सहजवृत्तीचे दास | रोज नवा रे आभास |

अगतिक, असहाय | जीवनभर || ३३ ||

नाही एकटा जगत | हवी रे साथसंगत |

स्वतंत्र मी अविरत | जीवनभर || ३४ ||

नाती हवी गूढरम्य | दंश कधी रे अगम्य |

साफल्याचा त्यात शोध | जीवनभर || ३५ ||

माणुसकी माझे नाते | कृतज्ञतेचे मी पाते |

चैतन्य रे अंकुरते | जीवनभर || ३६ ||

रिती अस्तित्वपोकळी | उमलेल त्यात कळी

सहस्त्रदल कमळ | जीवनभर || ३७ ||

भासे चैतन्याचे जाळे | आम्ही प्रकाशाची बाळे |

व्यापतो रे नभ निळे | जीवनभर || ३८ ||

काव्यात्मक आकलन – भाग ८

महंत आणि स्वामी संवाद ( भाग ४ )

अस्तित्ववादी स्वातंत्र्यनिरूपण

महंताचे काल्पनिक प्रश्न- स्वामीचे वास्तववादी उत्तर

|| महंताचे प्रश्न -मठातील स्वातंत्र्य ||

आधी पूर्ण रे विचार | मगच तो रे आचार |
ऐसे स्वातंत्र्य रे तुम्हां | नाहीच रे || १ ||
आधी सखोल रे ज्ञान | मग अर्पित रे प्राण
ऐसे सामर्थ्य मानवा | नाहीच रे || २ ||
हे भाग्य क्षुद्र गोष्टीत | दुर्भाग्यच ते खचित
सुखाच्या तृप्तीत रे तू | नाहीच रे ||. ३. ||
का हा तुज मनस्ताप | रोज होतसे संताप
शीतल धुंद आलाप | नाहीच रे ||. ४ ||
विवस्त्र जरी ते ध्यान | ललाटी चिंधी रे छान |
रेशमी वस्त्राचे सुख | नाहीच रे ||. ५ ||
उघडी रे त्याची पाठ | उपरण्याचा रे काठ |
भरजरी शालीत पहाट | नाहीच रे || ६. ||
लाज झाकते रे नारी | ठिगळे दिसती सारी |
लालस रेशमी भारी | नाहीच रे || ७ ||
मुले उघडी असती | जीर्ण वस्त्रांत फिरती |
पोशाखाचा आनंद | नाहीच रे || ८. ||
नियतीचे झंझावात | दुःखमय जीवनात |
अव्यक्ताशी करता हात | सर्वनाश रे || ९ |

अनाकलनीय शक्ती | भिरभिरे प्राणवृत्ती |
अदृश्य हात फेकती | आकाशात || १० ||
डॉन क्विझोटचे वारे | करे हवेत हातवारे |
आंधळेपणाने वार | अंतराळी रे || ११ ||
यातच संपते शक्ती | विरत जाते आसक्ती |
आशेची रे भग्नमूर्ती | जीवनभर || १२ ||
कृतीच्या दलदलीत | फसत जात सतत |
मूलगामी विचारांना | वेळ नाही रे || १३ ||
का? का? इतर नाही का ? प्रश्नांना वेळच नाही |
इतर शक्यतांचे रे | भान नाही रे || १४ ||
'पुन्हा वरीलप्रमाणे ' | 'पुन्हा वरीलप्रमाणे
आयुष्याचा मंत्र नवा | तुझ्यासाठी रे || १५ |
दूर एकाकी मठात | प्रश्नोपनिषद लिहित |
उत्तरे आपण शोधत | जीवनभर || १६ ||
वादळे येती सुसाट | तत्काळ होतो पिसाट |
दिसेनाशी होत वाट | जीवनभर || १७ ||
चंदनासारखे झिजत | आयुष्यपणती विझत |
व्यथालयात राहत | जीवनभर || १८ ||
संधी ही लाखमोलाची | मिळे तुज रे भाग्याची |
कर आत्मनिरीक्षण | आत्ताच रे || १९ ||

कसा वाढविला वंश | प्रियजनांचे रे  दंश |

तुझाच पाहिला अंश | जीवनभर || २० ||

ज्ञानदृष्टीचे धर रे भिंग  | प्रेरित करेल शिवलिंग |

गुंतवळा नात्यांचा करे गुंग | जीवनात रे  ||

मनातले ते काहूर | अलिप्ततेचे माहेर |

तयासाठी ती हुरहूर | जीवनभर || २२ ||

मिळे जगात जरी संधी | मनाची झाली रे चिंधी |

उडून जाईल ती रे | वाऱ्यावर रे || २३ ||

केले रे प्रयत्न जरी |  नसे समाधान अंतरी

किडलेले बीज कसे | अंकुरेल रे  || २४ ||

नसे मठ ,आहे हा आश्रम | आहे हे रे कैवल्यधाम |

जो तो  करितो परिश्रम | येथे रे || २५ ||

नाही कोणी रे पतित | नाही कोणी होई पावन |

जो तो स्वतःचा रे स्वामी | मृत्यूपर्यंत रे ||

मानव असो वा दानव | नाही कोणी महामानव |

अस्तित्वाची असे रे सोबत | मृत्यूपर्यंत रे ||

शरीर मन असती अभिन्न | उगा मानती त्यांना भिन्न |

मन जरी प्रसन्न ,देह रे खिन्न |मृत्यूपर्यंत रे

ज्याचे त्याचे असे आकाश | शोधतो स्वतःचा प्रकाश |

झाला जरी तो रे निराश | मृत्यूपर्यंत रे  ||

इंद्रियांवर मनाचे राज्य | अनादी अनंत रे साम्राज्य |
वासना होत नसे कधी त्याज्य | मृत्यूपर्यंत रे || ३० ||
उघडे स्वातंत्र्याचे दार | आत्मरूपाचे महाद्वार |
महान कृती न् विचार | आता करी रे || ३१
सोडवी नात्यांचा गुंता | कर स्वतःची रे चिंता |
गिरव ध्यानाचा कित्ता | येथे रे || ३२ ||

|| स्वामीचे उत्तर – जगातील स्वातंत्र्य ||.

विचारांती आचार | व्यवहाराला आधार |
प्रत्येकाला रे स्वातंत्र्य | आहेच रे || १ ||
विचार जेव्हा अपुरा | जाणिवेचा खेळ सारा
प्रत्येकजण घडत | आहेच रे ||.२ ||
ज्ञानासाठी धडपड | अज्ञानाची पडझड |
जाणीव रे विस्तारत | आहेच रे ||.३ ||
क्षुद्र गोष्टी महान गोष्टीअस्तित्व रचते सृष्टी
क्षुद्र, महान सापेक्ष | आहेच रे || ४. ||
सुखदुःख रे क्षणिक | वासनेत रे तृप्ती |
मठी काय ,जगी काय | नाहीच रे ||.५ ||
'पिंडी ते ब्रह्मांडी' असे मठात ते जगात दिसे
बिंब- प्रतिबिंब आहे | एकच रे || ६ ||
इथे पूर्ण तुझी आकांक्षा | माणुसकी रे मागे भिक्षा |

दोन्हीकडे दुःखडोंगर | एकच रे || ७ ||

जगी ज्याची त्याची आकांक्षा | नीतीची कधी नाही रक्षा |

दोन्हीकडे रे दुःखडोह | एकच रे || ८ ||

येथे धर्माची तटबंदी | तुझ्यापुढे रे सारे नंदी

दोन्हीकडे दुःखसरिता | एकच रे || ९ ||

जगी गरिबीचा निवास मठात अनीतिचा वास

दोन्हीकडे दुःखसागर | एकच रे || १० ||

जे जे अटळ जगात | कर स्वीकार रे क्षणात

कधी ताप, कधी छाया | आहेच रे ||. ११ ||

प्रत्येकजण स्वतंत्र | नाही जरी सर्वतंत्र |

नीतीचे बंधन त्यांना | आहेच रे ||. १२ ||

नियती ही गूढ माया |मठी जगी एकच राया

अंतर्मन ,नाती तिचा पाया | एकच रे || १३

जगी कृतीची दलदल | येथे मात्र काळ अचल

एकटा मी सुन्न येथे | कृतीशून्य रे || १४ ||

मुक्ती नसे माझे ध्येय | मी जीवनाचा पाथेय |

संवेदना विस्तारत | जगतो रे || १५ ||

येथे नाही सूर्यप्रकाश | नाही वारा नाही आकाश |

निसर्गशून्य रे वास्तव | भय वाटे रे || १६

नको मज सुखओढाळ शय्या | लालस वस्त्रात रे झुरे काया |

उत्कट अत्तरगंधाचा फाया |  नकोच रे ||१७

नको मज स्वामीपणा | मी जन्ममृत्यूचा पाहुणा |

चंद्र-सूर्य ,ग्रह -तारे | माझेच रे || १८ ||

नको मज विशुद्ध ज्ञान | असे मज जाणीवभान

वृक्षवेली न् पक्षी-प्राणी | माझेच रे || १९ ||

यांच्यासवे मुक्त होत | वेदनेचे सूक्त गात |

अनंत पृथ्वीवर मी | फिरतो रे || २० ||

मृत्यूवर उत्तर प्रजनन | जगी आम्ही रे  वासनाशरण |

होतो कधी रे शिवचरण | मनोमनी || २१ ||

कसेतरी उभे राहणे मुडपून  अस्वस्थ बसणे

सरपटणे पालीगत | मृतप्राय रे || २२ ||

होईन संवेदनाहीन | ऐकीन मज अर्थहीन |

पाहीन काळोख भावहीन |  मरणान्त रे || २

मी स्वतंत्र फिरतो रे | पृथ्वीवर |

येथे मृत्यूभान ध्यानी | अखंडित रे || २४ ||

देह जरी सुखसरोवर | मनात थैमानमृत्यू रे

जीवनाजाणीव बदलेल | क्षणात रे || २५ ||

वाटे मज  छळकुटिर |मन धावते रे अस्थिर

संवेदन रे होई बधिर |  निश्चित रे || २६ ||

काय खरे ?काय खोटे ?  भ्रमचित्त मज वाटे

अगतिक, असहाय | झालो रे || २७ ||

असेन का मी स्वामी | साक्षात्कारी आद्य स्वामी ?

आता, काय करू मी ? खचत रे || २८ ||

सोडतो भूतकाळाचा रे ठेवा | मुक्ततेचा अनुभव रे नवा |

निवड -नाते -निर्णय पल्याड | आत्मरूप रे

देहाच्या गरजा विरतील | दु:खमय भाव सरतील|

सचेतन विश्व उजळेल | आत्मभाव रे || ३०

अंधाराचे दर्शन घेतो अंधाराचा अंत पाहतो |

अंधारावर स्वारी करी | अंधारयात्रेकरू रे ३१

अहम् जगताचे दास्यकवट्यांचे अंतिम हास्य

मुक्त होता अनुभवतो | शिवसार्थक रे || ३२

महंत व तो यांचा संवाद, महंत मठ, ,मनातले जीवन आद्य स्वामी,शेवटच्या क्षणांचे भाव –

हे काव्यात्मक आकलन भाग १ते ८ यात आले आहे व या गटावर पूर्वी टाकलेले आहे.

क) स्वामींचे आत्मपरीक्षण ,प्रयत्न, यश-अपयश व मरणजाणीव

एका परंपरेचा प्रमुख असणारा कपटी, सामर्थ्यशाली महंत भूगर्भात खोलवर बांधलेल्या एका अंधारकोठडीत, अंगभर जागेतल्या आमरण नजरकैदेत, त्याची- नव्या स्वामीची, मठपती ,मठाधीश झाल्याची घोषणा करतो. जणू ‘लाल प्रकाशावर

वाफेप्रमाणे तरंगणाऱ्या शब्दांत' एका निष्पाप माणसाला मृत्यूदंडाची शिक्षा फर्मावतो.

नंतर महंत त्याला त्याच्या नवीन जगण्यातल्या चतु:सीमांची , त्याच्या देहाकरिता असलेल्या लालस सुखसोयींची ,त्याच्या अतूट बंधनांची, त्याच्या सुटकेच्या प्रयत्नांच्या निरर्थकतेची, त्याच्याअटळ शेवटाची व त्यानंतरच्या त्याच्या तात्पुरत्या व अंतिम व्यवस्थेची स्पष्ट व प्रत्यक्ष माहिती देतो. मरणोत्तर स्थितीची माहिती त्याला तीन सांगाड्यांच्या भीषण दर्शनानंतर अप्रत्यक्षपणे मिळणारच असते.

हे ऐकल्यावर 'त्याचे अंग बधिर झाले होते. पण पहिला आघात ओसरल्यावर तो बेभान झाला व ओणवे होऊन त्याने लोखंडी दारावर मुठी आढळत ओरडून म्हटले...,'

त्याचा प्रवेश एका विलक्षण, निर्जन, निःशब्द ,अंधारमय, निर्मनुष्य, एकाकी जगात व परिसरात झाला होता जेथे निसर्ग, सूर्य, चंद्र, चांदण्या, प्राणी, वनस्पती यांचे विराट विश्व किंबहुना सूर्यप्रकाश, वारा ,आकाश, पाळीव प्राणी,पक्षी, वृक्ष, फळे, फुले, टेकड्या आणि माती यांचे परिचित विश्व नाहीसे होऊन फक्त तो, त्याच्या आठवणी व त्याचे भविष्य जे घडणार होते किंवा तो घडवणार होता एवढेच शिल्लक राहिले होते.

हे चित्र वाचकांच्या डोळयासमोर उभे करून जी ए कुलकर्णी यांनी एक विलक्षण शारीरिक आणि मानसिक अवस्था सूचित केली आहे. या परिस्थितीशी व वस्तुस्थितीशी अपरिहार्यपणे सामना करीत तो -नवीन स्वामी मृत्यूला कसे सामोरे

जाणार आहे याचा जणू अंधारात, अंधारमय, अदृश्य पायाच घातला आहे. त्या लाल मखमली आसनावर अनिवार्यपणे मांडी मुडपून बसून त्याला त्याच्या मनाच्या ,अंतर्मनाच्या अथांग तळ्यात खोल बुडी मारत जाणे भाग पडणार होते. अखेरीस त्याला तेथे जलसमाधीत वा दिव्य समाधीत प्रवेश करून या जगाचा निरोप घेणे ही अटळ दृकश्राव्य जाणीव महंताने त्याला करून दिली होती.

‘पण मी येथे असा एकाकी – माणसांची संबंध नाही, सूर्यप्रकाश नाही मी येथे करू काय , जगू कसा ? ‘ तो आर्ततेने म्हणाला.

यानंतर जी ए कुलकर्णी यांनी मानवी स्वातंत्र्याच्या विविध पैलूंवर, विविध अवस्थांवर लखलखीत भाष्य केले आहे. स्वातंत्र्य ही संकल्पना सर्व अंगाने – सामाजिक, राजकीय, वैयक्तिक व आत्मिक अंगाने प्रश्नोत्तराच्या स्वरूपात म्हणजे महंताचेच प्रश्न आणि महंताची उत्तरे -सादर केली आहे. हे त्यांचे भाष्य स्वामी या कथेचा प्राण आहे. याचे काव्यात्मक आकलन मी महंत आणि स्वामी संवाद असे चार भागात याआधीच केले आहे. याची काही उदाहरणे अशी –

१) ‘ही सुख सोयींनी भरलेली अलिप्तता तुला अनायासे प्राप्त झाली आहे. तिच्यामुळे तू इतरांच्या यातना पूर्ण विसरून जाण्याचं सर्वात मोठं सुख आपण होऊन निर्माण करणार आहेस.’

२) ‘ घोळक्यापैकीच एक असणं हे तुला जरूर वाटणार सुख फसव आणि भरताड आहे. कारण माणसाला इतर माणसांविषयीची ओढ वाटते ती केवळ भ्रामक व क्षुद्र असहायता आहे.

३)	आत्ता तुझं पुढील आयुष्य ‘ पुन्हा वरीलप्रमाणे ,पुन्हा वरीलप्रमाणे ‘ या अत्यंत रित्या मृत शब्दांखेरीज काही नाही. म्हणून आता तुला गेल्या चाळीस वर्षांच्या आयुष्याचा हिशोब निवांतपणे पारखता येईल. स्वतःला, इतरांना भिंगाखाली ठेवून अलिप्तपणे पाहता येईल. ‘

४)	‘ मानवाचे पुष्कळसे गुणदुर्गुण त्याला रक्तमांस आहे, इंद्रियं आहेत, विशिष्ट मेंदू आहे म्हणून निर्माण झाले आहे तेव्हा त्याचं तेच शरीर ठेवून, स्वतः माणूस राहून, इतरांना अतिमानव करण्याचा प्रयत्न करणे अत्यंत हास्यास्पद आहे.’

५)	‘ ओठावरील शांत स्मित मृत्यूच्या समोर टिकत नाही. पण इंद्रियं निघून गेल्यावर देखील ,मृत्यूच्या तडाख्यातून एकच संवाद वाचून राहतं. ते म्हणजे कवटीचे हास्य आणि ते हास्य म्हणजे आयुष्याबाबतचा माणसाचा अंतिम निर्णय होय.’

६)	‘ शब्द आणि विचार कागदात बंदिस्त झाले की ते मृत होतात .जोपर्यंत बोलणाऱ्याचा प्राण त्यांच्यामागे असतो तोपर्यंतच शब्दांना पंख राहतात  पण त्याच्या मृत्यू नंतर ते केवळ शिलालेख बनतात आणि काही काळानंतर ते लेख पुसून जाऊन त्या शिळांचं अवजड ओझं मात्र अनुयायांच्या गळयात कायमचं अडकतं.’

७) तो म्हणतो ,' माझी माणसं शोधाशोध करतील. शोकांन विव्हळं होतील ,माझ्याबरोबर त्यांचं आयुष्य थबकून जाईल.'

महंत म्हणाला,' कोणी देखील तुझ्या करता खंगणार नाही. आठवड्याच्या आत सगळ्यांच्या भुका ताज्यातवान्या होतील. तू नाहीसा झालास म्हणून काही लोकांना आनंद देखील होईल. तू काय ,मी काय किंवा एखादा सम्राट काय आम्ही जागा खाली केली की ती रिती न राहता दुसऱ्या एका बुडबुड्याने लगेच भरून जाते.'

महंताने वरील वाक्यांमधून स्वतःच्या कुटील कृतीचे अपुरे, न पटणारे व असंगत असे ठोस समर्थन केले आहे. त्याच्यावर – तथाकथित नव्या स्वामीवर त्याने जो अनिवार्य, भीषण एकटेपणा लादला आहे, त्यातून नव्या स्वामीला आपले आयुष्य सार्थकतेने घालवता येईल असे महंत म्हणतो.

तू प्रवासी जणू आता आद्य स्वामीच झाला आहे असे भासवून आद्य स्वामीचे विचार ( लेखनाबद्दलचे) त्याच्यावर लादतो. आश्रमातल्या विलासी जीवनाचे व तेथील शिष्यांसमोर काहीही आदर्श न ठेवण्याचे ,न पटणारे समर्थन करतो. आपल्या शिष्यांच्या जीवनात, त्यांच्या स्वेच्छेने ,सुधारणा करण्याची प्रेरणा देणारे यांची महंत हेटाळणी करतो .पण त्या शिष्यांना तसे वागण्याचे स्वातंत्र्य नैतिक, वैचारिक व भावनिक मिळालेले असते हे तो सोयीस्करपणे विसरतो.

महंताच्या बोलण्यातील ही विसंगती पहा –

‘हताशतेने डोळे ओलसर झालेला ,मरगळल्यासारखा झालेला, नवीन स्वामी दीनवाण्या आवाजात म्हणाला,’ मला कागद, शिसपेन्सिल अशी काहीतरी साधनं द्या. म्हणजे मला निदान माझ्याशी तरी बोलता येईल.’

यावर महंत नवीन स्वामी त्या क्षणीच आद्य स्वामी आहे असे मुद्दाम भासवून म्हणतो,’ जोपर्यंत बोलणाऱ्याचा प्राण त्यांच्या मागे असतो तोपर्यंतच शब्दांना पंख राहतात.पण त्याच्या मृत्यूनंतर ते केवळ शिलालेख राहतात.’

महंत स्वतःचा हेतू साध्य करण्याकरता नवीन स्वामीला कागद पेन्सिल देत नाही आणि नवीन स्वामी कडून ‘(स्वतः:शी/ इतरांशी)बोलणं आणि लिहिणं हा जो मनुष्याचा, त्याच्या मनाचा जीव की प्राण असतो’ तोच हिरावून घेतो.

असे जरी महंताचे स्वार्थप्रधान बोलणे असले तरी जी एं च्या प्रतिभेने लिहिलेली/ उच्चारलेली वरील वाक्ये कोणाही वाचकाला त्याच्या गतआयुष्याचे सिंहावलोकन व कठोर फेरतपासणी करण्यास प्रवृत्त करतात, अस्वस्थ करून सोडतात.

माणसाला इतर माणसांबद्दल, स्त्रियांबद्दल वाटणारी गूढरम्य ओढ,मधाळ सुखाचा ‘पुन्हा पहिल्याप्रमाणे ,पुन्हा पहिल्याप्रमाणे’ येणारा अनुभव भ्रामक आहे असे जरी महंत म्हणत असला तरी अनादी काळापासून ही ओढ ,हे आकर्षण, हा पूर्णत्वाचा अनुभवच मानवी आयुष्याचा पाया आहे या वस्तुस्थितीकडे त्याने डोळेझाक केलेली आहे.

कोणीही एकाकी राहू शकत नाही .त्याला कुटुंबात, समाजात, घोळक्यात ,मठात , इतरांबरोबरच राहावे लागते ही अनिवार्य वस्तुस्थिती आहे हेही महंत मुद्दाम विसरतो. घोळक्यात राहूनच  व्यक्तीला आपला स्वतंत्र मार्ग काढावा लागतो हेही अपरिहार्य सत्य तो मुद्दाम बघत नाही.

एकंदरीत महंताच्या या मायावी बोलण्यातूनच स्वामीला पुढच्या विचारांची प्राथमिक दिशा दिसते . आता नवीन स्वामी महंताच्या बोलण्यावर विचार करत नवीन स्वामी जणू आपल्या गतआयुष्याचा चित्रपट ,नाटक, तमाशा, कीर्तन, मूकपट किंवा मैफल अलिप्तपणे पाहू लागतो-मनाच्या पडद्यावर भावनांचे खेळ साक्षीभावाने पहात आयुष्याचे क्षण अटळपणे पुढे ढकलत राहतो.

त्याला एकदम एकाच वेळी भरभक्कम निराशा व  पुसटशी आशा तेथून जाण्याविषयी वाटू लागते व तो आपल्या मृत्यूनंतर आपल्या मर्यादित नातेसंबंधांच्या जगात काय काय घडेल याचे विचार तरंगांप्रमाणे त्याच्या मनात उमटू लागतात व पसरू लागतात –

मी माझ्या भावाकरता, मित्राकरता, बायकोकरता इतकेच नव्हे तर मोगरीच्या मांडवाकरता आणि मरणप्राय अवस्थेतल्या कवड्याकरता,शेजाऱ्यापाजाऱ्यांकरिता जे काही आतड्याच्या मायेने केले, ते कोठे जाणार? त्यांच्या मनात राहणार का नाही ?’ का त्यांच्या मनात आपण त्यांना काही वेळेला मदत करू शकलो नाही हेच राहणार?

भाग ९  स्वामीला वेलीचे दर्शन व अखेरीस पुनर्जन्म

पारंपारिक धर्माप्रमाणे मुक्ती व आधुनिक अस्तित्ववादातील मुक्तपणा ,तसेच 'स्वामी' या संकल्पनेचा धर्म व अस्तित्ववाद यातील अर्थ, त्यांच्यातील फरक लक्षात घेतला पाहिजे.तो स्वामी झाला का नाही झाला हे कथालेखक जी ए कुलकर्णी यांच्या कथाविश्वाच्या चौकटीतच पाहणे आवश्यक आहे.  अस्तित्ववादातल्या मुक्तपणाची

कल्पना वेगळी आहे आणि त्या कल्पनेप्रमाणे कथालेखकाच्या प्रतिभेने व्यक्त केल्याप्रमाणे ,त्या चौकटीत 'तो' स्वामी झाला हे तुमचे म्हणणे योग्य आहे. अस्तित्ववादाप्रमाणे प्रत्येक व्यक्ती जाणीवपूर्वक जीवनात पराकोटीच्या कठीण, निर्णायक परिस्थितीत जीवनआकलनाचे अनुभव घेत असतो व त्याप्रमाणे त्याला पटलेली मूल्य प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करतो. येथे 'तो' त्याचे स्वातंत्र्य-' बाहेरच्या जगात स्वतःच्या मनाप्रमाणे जगण्याचे स्वातंत्र्य' हे मूल्य प्रत्यक्षात आणण्याकरता निकराचा संघर्ष करीत आहे.' तो 'भगीरथ प्रयत्न न करता, निष्क्रियतेने, सुखासीनतेच्या शय्येवर जाऊन मृत्यूला भेटायला ठाम नकार देतो. त्याच स्वातंत्र्याची एक विश्वमय , परिसरातील भव्य उदात्त संकल्पना म्हणजे आपल्याशी संबंधित असलेल्या वनस्पती विश्वातील एका वेलाचे -चैतन्याचे जगण्याकरता धडपडणे याचे रूप तो स्वतःच्या सुटकेमध्ये पाहतो आणि त्याचे बंदिस्त मन ,बंधनातले अनुभव जणू मुक्त करतो व मुक्तपणाचा अनुभव घेतो. आधीचा' तो' जटाधारी ही ' माणुसकी,सहभावना, सहसंवेदना ' मूल्य प्रत्यक्षात आणून ( अफूची गोळी नंतरच्या 'तो' ला ठेवून) 'स्वामी' होतो.येथे जी ए कुलकर्णी यांनी जटाधाऱ्याच्या मृत्यूप्रसंगाबद्दल धूसरता ठेवली आहे. त्यामुळे जटाधारी' आसन- धारणा-ध्यान-समाधी'('मांडी मुडपून बसलेल्या अवस्थेतील नवनिर्वाचित स्वामी') या पातंजल योगमार्गाने मुक्त झाला का नाही हे (अस्तित्ववादाच्या संकल्पनेप्रमाणे) सांगता येत नाही.मुक्ती ही संकल्पना वेगळी आहे आणि ती अस्तित्ववादाच्या बाहेरील निकष लावून या कथेत व्यक्त करणे बरोबर ठरणार नाही.

|| स्वामी ||

चैतन्य नाचे ध्यानीमनी | स्वामीपण भासे उन्मनी |

मरण जाणता झालो मी | आनंदित || १||

देहात लपे निराकार | अक्षरवेलीत साकार | तयाच्या साक्षात्कारात मी | आनंदित || २

वासनेच्या तळघरात |आत्मरूप होते कैदेत

मुक्त मुक्त लहरत मी | आनंदित || ३ ||

जीवाशिवाच्या गे भेटीत | व्यक्त अव्यक्ताच्या दिठीत |

अखेर तृप्तीत झालो मी | आनंदित || ४||

निजधामाचा तो प्रवास | अविरत करतो प्रयास |

पैलतीरावरी  होत मी | आनंदित || ५ ||

नियतीचे होत प्रहार | माझे पण पलटवार

वेलीस आधार देता मी | आनंदित || ६ ||

क्षणाक्षणांच्या प्रवाहात |सुखदुःखाची वाट पहात |

बंधनातून सुटता मी | आनंदित || ७ ||

कोण मी ? कोठून आलो मी ?| अलौकिकात जातसे मी |

जीवन सफल होता मी |आनंदित || ८ ||

- Madhav Puranik 'स्वामी 'कथा वाचून त्या अनुभवावर आधारित कविता सादर करीत आहे -

चैतन्य नाचे ध्यानीमनी | स्वामीपण भासे उन्मनी |

मरण जाणता झालो मी | आनंदित || १||

देहात लपे निराकार | अक्षरवेलीत साकार |

तयाच्या साक्षात्कारात मी | आनंदित || २ ||

वासनेच्या तळघरात |आत्मरूप होते कैदेत |

मुक्त मुक्त लहरत मी | आनंदित || ३ ||

जीवाशिवाच्या गे भेटीत|व्यक्त अव्यक्ताच्या दिठीत |

अखेर तृप्तीत झालो मी | आनंदित || ४||

निजधामाचा तो प्रवास | अविरत करतो प्रयास |

पैलतीरावरी होत मी | आनंदित || ५ ||

नियतीचे होत प्रहार | माझे पण पलटवार |

वेलीस आधार देता मी | आनंदित || ६ ||

क्षणाक्षणांच्या प्रवाहात |सुखदुःखाची वाट पहात |

बंधनातून सुटता मी | आनंदित || ७ ||

कोण मी?कोठून आलो मी? Iअलौकिकात जातसे मी |

जीवन सफल होता मी |आनंदित || ८ || ....

Dilip Bade: जीएं.नी स्वामी कथे मध्ये अप्रत्यक्षपणे अध्यात्मिक पाखंडावर प्रकाश टाकला आहे.1)तिबेट मधिल लामांची नेमणुक करताना-काही संकेत मिळतात-दिशा कळते-काही शरिर विशेष याचाही प्रत्यय येतो.बाल वयातील अशा एका मुलावर धार्मिक संस्कार करून तिबेट मधील भावी लामा घडवला जातो.स्वामी कथेमध्ये सुद्धा स्वामीची नेमणूक पारंपारिक पद्धतीने होत नाही.तर आद्य स्वामी च्या जागी बसून हात वर केला तर बेलाचे त्रिदल दिसते . 2)आद्य स्वामी श्रीशैल पर्वतापाशी आले त्या ठिकाणी मस्तकात तेजपुंज हिरा चमकावा त्या प्रमाणे त्यांना साक्षात्कार झाला.3)सोने-चांदी, वस्त्रेपक्वान्न याचा मोह करायचा नाही पण ऊपलब्ध असेल तर नाकारायचे नाही.अशा अनेक जागा स्वामी कथेमध्ये दिसतात,आहेत.यातून जी.एं.नी अप्रत्यक्षपणे अध्यात्मिक ढोंग कसे असते, याची

मांडणी पद्धशीर पणे केलेली दिसते.पण त्यांनी या कथेत कोठेही अंधश्रद्धेवर स्पष्ट भाष्य केलेल नाही.

- Dilip Bade: अहंकार आणि आत्मभाव या शून्यत्वाकडे जाव्यात.आणि ऊन्नत भावनांची सहजवृती पूर्णत्वाकडे जावी.या दोन्ही गोष्टी एकच.शुन्य म्हणजे सूक्ष्मतेची परिसीमा ऊदा. .०१, .००१, .०००१-----आणि पूर्ण म्हणजे व्यापकतेची परिसीमा.भास्कराचार्यांचे प्राचीन समिकरण आहे १-०=अनंत ( अनंत चे चिन्ह गणितात आहे )येथे शु

- शून्य व पूर्ण या मध्येही सुसंगती तयार झाली.

- Dilip Bade: आस्था, करूणा , तन्मयता , समर्पण , नम्रता , कृतज्ञता , निरपेक्षत्याग, निर्मळता , अदंभ , क्षमा ,निग्रह ,सहिष्णुता ( कैवल्य The bliss of oneness) या सर्व भावना व्यापक झाल्या तर आणि अहंकार व आत्मभाव या शून्यत्वाला गेल्या तर १-०= ००=अनंत हे समिकरण समजण्याची शक्यता वाढेल.

- विलास वाघोलीकर : कथेचा सर्व तोल सामान्य माणसाला धार्मिक आवरणातून (किंवा कोणत्याही आवरणातून ) हुकूमशाहीत कसे भरडले जाते हे दाखवणारा आहे. कथानायक स्वामीने वेल उगवल्यावर काय करायला पाहिजे होते ? । ) वेल तोडून टाकून महंताच्या कैदेत मरेपर्यंत रहाणे . किंवा २ )अफूची गोळी स्वतः होवून घेवून जीवन संपवणे किंवा 3 ) वेल वाढू देणे . नायकाने तिसरा पर्याय स्वीकारून महंताचा पराभव केला . अफू जवळ होती म्हणून घेतली . नाहीतरी तो हवा न मिळाल्याने मृत्यू पावला असता .महंताने स्वस्वार्थासाठी जिवंत नायकाला कैदेत ठेवले. नायक- स्वामीने ,मरण पत्करून जिवंत वेल वाढू दिला .

राजेश उनवणे: भाग १

स्वामी कथेतील जीए यांनी वर्णिलेली कथेतील मठाची रचना –

१) मठाभोवतालचा परिसर --

रस्ता ओलांडल्यावर लहान टेकडी चढली की, हा मठ लागतो. अंधार पडू लागल्याने तेथे जाणारी पायवाटही आता दिसणार नाही. ही लहान टेकडी काटेरी कातडयाच्या श्वापदाप्रमाणे अंग टाकून बसल्यासारखी आहे.

काटेरी श्वापद –म्हटले की साळींदर हा प्राणी प्रथम नजरेसमोर येतो.याचे वैशिष्ट्य म्हणजे हा शत्रू येताच उलटया दिशेने पळतो. व पळताना आपले शरीरावरील काट्यासारखे केस पाठीमागून येणाऱ्या शत्रूवर बाणासारखे सोडतो. वाघ,सिंह पण यामुळे जखमी होतात.

टेकडी चढून, मठाकडे कोणताही आगंतुक, अनोळखी, पांथस्थ स्वत:हून, एकटा येऊ शकत नाही हेच सांगण्यासाठी यासाठीच टेकडीचे वर्णन जीएंनी 'कातडयाच्या श्वापदा अंग टाकून बसलेली असे केलेले आहे.

टेकडीवर निलगिरीची झाडे आहेत. निलगिरीचे वैशिष्ट्य म्हणजे खूप उंच वाढणे व तेही सरळसोट वाढणे. या झाडावर पक्षी घरटे करीत नाहीत. त्यांचे खोड पांढऱ्या रंगाचे व दिसायला बेंगरुळ असते. मुलायम असते.त्यामूळे खोडावरील साल नेहमी गळून पडते व त्यावर पुन्हा नवीन साल येते. ('टेकडीच्या चढणीवर निलगिरीची उंच झाडे होती व त्या गडद गर्दीत त्यांचे उंच शुभ्र बुंधे जमिनीत रुतवलेल्या विशाल हाडाप्रमाणे दिसत होते.' – इति जीए)

त्या टेकडीवर, त्या कोणतीही जीवसृष्टी नाही हेच जीए यांना निलगिरीची झाडे दाखवून सुचवायचे आहे.

२) मठाचे प्रथम दर्शन –

मठाच्या मागे पण एक टेकडी आहे. ('ती टेकडी झुडुपांच्या झुबक्यांनी केसाळ वाटत असलेली'--- इति जीए)

म्हणजे हिमालयातील, कुंभमेळ्यातील साधू प्रमाणे. दाढी-मिशा, केसांच्या जटा वाढलेले, केसाळ. या टेकडीवरील झुडुपे अशीच ‘केसाळ’ आहेत असे जीए लिहितात.

मठाची इमारत उंच आहे. तिला भव्य प्रवेशद्वार आहे. पण ती इमारत दोन्ही बाजूस हातभर आहे. --- हातभर म्हणजे फूटभर आहे.—

येथे मठाची इमारत जीएंनी केलेल्या या वर्णनानंतर डोळ्यासमोर येते.

मध्ये भव्य प्रवेशद्वार पण त्याच्या शेजारील दोन्ही बाजूच्या भिंती फक्त फूटभर.

मठाच्या मागच्या बाजूस चार मोठे नळ. मागील टेकडीच्या टोकापर्यंत गेलेले. नळाची तोंडे वर उघडी आहेत. नळ जिथे वाकलेत तेथून काही अंतरावर लोखंडी छत्री. ती या तोंडाला आच्छादणारी.

--—एवढ्या मोठ्या नळातून ते सुरू केल्यावर पाणी पडणे म्हणजे पाऊसच. लोखंडी छत्री म्हणजे नळ सुरू करताना कोणीतरी ( तो जो कोणी आहे.. तो) त्या छत्री खाली बसत असावा. त्यासाठी ही छत्री.---

प्रवेशद्वारावर दिवा. पांढऱ्या, प्रखर प्रकाशाचा.

---पांढरा रंग हा मांगल्य, स्वच्छ, पवित्र, शुद्धता, सेवाभावी वृत्ती, आनंदी वृत्ती याचे प्रतिक मानला जातो. चंद्राला पांढऱ्या रंगाचे वस्त्र आवडते. सोमवार हा पांढऱ्या रंगाचा मानला जातो. त्यास ‘मंडे कलर’ असे चित्रकलेत संबोधले जाते.

मठाचे गोपूर कारल्यासारखे निमुळते. वरती लाल प्रकाश. जो अत्यंत तेजस्वी,ठिणगी निघत असल्याप्रमाणे. हा लालप्रकाश कोठून/कसा येत आहे याचा उल्लेख जीए यांनी केलेला नाही. प्रवेशद्वारावरील पांढऱ्या दिव्याप्रमाणे हा लालप्रकाश दिव्याचा आहे का? तर नाही. येथे जीए यांनी दिव्याचा उल्लेख केलेला नाही. ते फक्त लिहितात “लाल प्रकाश.”---- लाल हा रंग चिरंतन, सनातनी, पुनर्जन्माच्या संकल्पना सांगतो. लाल रंग हा मानसिक स्थितीस उभारी देणारा रंग आहे. ---

त्या लाल प्रकाशाशेजारी दोन पंख. त्रिकोणी-पताकाप्रमाणे. जणू पिंजऱ्यातील पक्षी पिंजऱ्यातून मुक्त झाल्यावर आपले दोन्ही पंख पसरून अवकाशात भरारी घेतो तसे हे दोन पंख.

३) मठातील प्रवेश

मठाभोवती एक तारेचे कुंपण. झुडुपामध्ये असलेले. त्यातून २४ तास विजेचा प्रवाह. कुंपणास फाटक. आत येण्यासाठी हा एकमेव मार्ग. त्यासही नेहमी कुलूप.

महंत व तो मठाकडे येताच --- 'मठ सर्पमणी घेऊन उभारलेल्या फण्यासारखा दिसत होता.'— असे वर्णन जीए करतात.

सर्पमणी म्हणजेच नागमणी. नागमणी ज्याच्याकडे असतो त्याचेवर विषाचा अंमल होत नाही असे म्हटले जाते. तो रोग मुक्त असतो. जीएनी मठ कसा दिसत आहे याचे जे एका वाक्यात वर्णन केलेले आहे, ते वाचले की, -- हलाहल विष पचवणारा व त्यासाठी गळ्यात नाग ठेवणारा तो नीलेश्वर, हलेश्वर, नागेश्वर वाचकास आठवलाच पाहिजे.--

कुंपणाच्या प्रवेशद्वारातून महंत व 'तो' प्रवेश करतात. ते मठाकडे येऊ लागतात. मठातील शिष्यगण झाडा आडून येतात आणि.. ..

प्रथम लागते तुळशी वृंदावन. महंत वृंदावनास नमस्कार करतो. आणि 'तो' ला म्हणतो, " ही आदयस्वामींची समाधी आहे. नंतरच्या स्वामींचे देखील हे विश्रांतिस्थान आहे." -- या वाक्यातील 'समाधी' आणि 'विश्रांतिस्थान' यातील फरक दाखवण्यासाठी. जीए यांनी लिहिलेले कथेतील हे वाक्य फार महत्त्वाचे आहे. त्याचा संदर्भ पुढे कथेत येतोच .—

'तो' वृंदवनास नमस्कार करीत नाही. करावा की न करावा या संभ्रमात तो असतो.

महंत मठाच्या प्रवेशद्वारापाशी येतो. तेव्हा दरवाजे उघडल्याचे जीए लिहीत नाहीत. मात्र 'तो' जवळ येताच दरवाजे उघडले जातात. 'तो' आत प्रवेश करतो. तेव्हा प्रवेशद्वारावरील पांढरा, तेजस्वी दिवा बंद होतो.

आत विस्तृत दिवाणखाना असतो व त्यात पिवळसर प्रकाश असतो.

--पिवळा रंग हा सावधगिरीचा,चेतावणीचा रंग मानला जातो. पिवळा हा सूर्यप्रकाशाचा रंग, ऊर्जेशी संबंधित आहे. संपन्न व्यक्तिमत्त्व, अध्यात्मात आवड, प्रगतीचा ओढा असणं, इच्छाशक्ती, संघर्ष करायची तयारी, स्वयंशिस्त, नेतृत्वगुण, स्वाभिमान, स्वतःची आणि आपल्याबरोबर असणाऱ्यांची जबाबदारी घेण्याची तयारी हे गुण पिवळा रंग दर्शवितो. मानसशास्त्राच्या दृष्टिकोनातून आपली मानसिक शक्ती तसेच डाव्या मेंदूस तो (Logical Brain ) सक्रिय करतो. पिवळा रंग तार्किक निराकरण शोधण्यात मदत करतो.

४) मठाची अंतर्गत रचना

जेवणास अवकाश असलेने महंत 'तो' ला तपोमंदिराची रचना दाखवतो. हे मंदिर स्वामींनी विशिष्ट्य तऱ्हेने बांधल्याचे व मंदिर मुख्यत्वेकरून जमिनीखाली असल्याचे सांगतो.

"स्वामींच पीठ म्हणजे साराच पवित्र परिसर असल्याचे व तो पाहण्याचे भाग्य लागलेल्या थोड्याच भाग्यवानापैकी तुम्ही असल्याचे", --'तो' ला महंत सांगतो.

"चौकटीतून काळजीपूर्वक आत या कारण लगेच तेथेच खाली जायच्या पायऱ्या आहेत", --अशी सूचना महंत 'तो' ला करतो.

'तो' चौकटीकडे जाऊ लागतो. महंत त्याच्या मागोमाग जातो. जाताजाता पिवळा प्रकाश महंत बंद करून टाकतो. पिवळा प्रकाश जाताच दिवाणखाना नाहीसा होतो आणि अवजड प्रवेशद्वार बंद होते.

अंधार झाला आणि ‘तो’ कोणीतरी हिरावून घेत पुढेपुढे ढकलत आहे अशा तऱ्हेने पायऱ्या उतरू लागला.

---येथे महंताच्या आत्तापर्यंतच्या एका कृतीमध्ये जीए कथेमध्ये बदल करतात. आत्तापर्यंत महंत ‘तो’ च्या पुढे चालत होता, आता 'तो' च्या मागोमाग चालत आहे.

चार वळणे घेतल्यावर (म्हणजे आणखी खोल गेल्यावर) ‘तो’ च्या पायास जमीन लागते. तेव्हा महंत बटन दाबतो. लगेच निळे दिवे लागतात.

ते विस्तीर्ण दालन त्यातील कोठया, प्रत्येक कोठीसमोर एक शिष्य उभा असलेला तो पाहतो.

महंत म्हणतो, “हे सारे शिष्य येथेच राहतात. त्यांच चिंतन या ठिकाणी होतं. ती प्रत्येक कोठी त्यांची विश्रांतीची जागा आहे. समोर एक लहान निळा दिवा दिसतो. ती माझी मठी आहे; पण मी काय, इतर शिष्य काय, चटई, अंगावरील वस्त्र आणि जेवणाचं भांड याखेरीज कोणाचीच खाजगी मालमत्ता नाही. आपण आता खाली जाऊ.”

जाताना येथे असलेला निळा दिवा महंत बंद करीत नाही.

वरील विवेचनात निळा रंग आहे. निळा रंग - हा शांतीचा निदर्शक आहे. शीतलता आणि स्निग्धता हे या रंगाचं वैशिष्ट्य आहे. हा रंग सागर आणि आकाशाची अमर्यादा खोली यांची अनुभूती देतो. हा रंग ज्यांना प्रिय असतो, ती माणसं स्वभावाने उदार, विश्वासू, श्रद्धाळू, सौंदर्यप्रेमी आणि सुखी जीवन व्यतीत करणारी असतात.

पुन्हा तितक्याच पायऱ्या उतरून दोघे खाली येतात. एक प्रशस्त दालन लागते. दोघे दालनात येताच ते हिरव्यागार प्रकाशाने झळाळते. ( आता आपण पाण्यात जास्तच खोल उतरून तळाशी वनस्पती वाढलेल्या भागात आलो आहोत असे त्याला वाटले.—इति जीए)

हिरवा रंग हा  निसर्गाशी वा भूमीशी असलेले नाते दर्शवितो, निष्ठा व समृद्धीचा बोध होतो. हिरवा रंग, निसर्गाचा रंग - प्रगती, भरभराट, समृद्धी,सुसंवाद, स्थिरता,संतुलन, सहनशक्ती , अंत:र्बाह्य सौंदय आणि चैतन्याचे प्रतीक आहे.

थोडक्यात, हिरवा रंग आर्थिक उन्नती, मानसिक स्वास्थ्य, शांतता समृद्धी देतो. जी आहे ती स्थिती उंचावतो. मी आहे, माझे असणे व माझ्या विश्वात जे काही आहे, त्याला अधिक चांगले कसे बनवायचे ह्यासाठी आपल्या परीने काम करत राहणे, हिरव्या रंगात रंगून I am here to make the world better हे अवलंबिणे हेच हिरवा रंग दर्शवतो.

या हिरव्या दालनात महंत म्हणतो, “ येथून खाली गेले की मात्र आपण खुद्द स्वामींच्या पीठापर्यंत जातो. तो भाग म्हणजे मंदिराचा आत्मा आहे.”

नंतर महंत दालनातील खेळती हवा, ते चार नळ याबाबत महिती देतो. महंत म्हणतो, “खुद्द स्वामींच्या ध्यानमंदिरात देखील एक मुख्य नळ व त्याला दोन मोठे नळ जोडलेले आहेत. म्हणून तुम्हाला एवढ्या खोल जमिनीखाली देखील स्वच्छ हवा मिळते. प्रकाशाचा तर प्रश्नच नाही. निळया दिव्यापासून खालचे दिवे रात्रंदिवस प्रकाशत असतात.”

आता पायऱ्या संपल्या आहेत. एक छोटीशी कमान आहे. तिच्या दोन्ही भिंती अगदी चिकटून आहेत. छोटासा बोळ असल्यासारखेच आहे. कमानीतून  वाकून जावे लागते. जाताना त्या भिंती खांद्याला घासतात. खाली एक विवर आहे. उजव्या बाजूस वर्तुळ आहे. भिंतीच्या दोन्ही बाजूना दगडी चौकोनी खुंटया आहेत. त्यावर एकेक पाय देऊन खाली जायचे आहे.

महंत म्हणतो, “ येथे उतरताना काळजी घ्या. खरं म्हणजे आपण उलटं  उतरत गेलो तर जास्त सोपं  होईल. मी प्रथम तुम्हाला दाखवतो.”

येथे उलटे का चालायचे? आपण मूर्तीचे विसर्जन करतो तेव्हा तिचा चेहरा आपल्याकडे असतो. मंदिरातही आपण देवाकडे पाठ करून बाहेर पडत नाही. या कृतीतून महंत ‘तो’ ला ‘तूच तुझा देव आहेस’ ‘स्वामी आहेस’ असेच सुचवत आहे.

महंत त्याच्याकडे तोंड फिरवून वर्तुळातून उतरू लागतो. त्याच्या अंगाने ते वर्तुळ भरून जाते. (तो पायाखालच्या पायऱ्या शोधात दोन्ही बाजूंनी आधार घेत खाली बुडत चालल्याप्रमाणे नाहीसा होऊ लागला –इति जीए)

‘तो’ ही महंताचे अनुकरण करीत उतरतो.

आता जीएनी तेथील केलेले वर्णन पहा.

--- ‘ते जेथे उभे होते, तेथे दोघांना उभे राहता येईल एवढीच जागा होती. त्यांच्या समोर अंग वळवून तिरपे जाता येईल एवढी फट होती. आतल्या बाजूला एक आसन व त्यासमोर उंचीचे मेज होते. महंताने तेथील समईच्या वाटीसारखा दिवा विझवला; पण नंतर मोठा दिवा लावताच लालभडक प्रकाश उजळला व भोवतालच्या भिंतीवरून ओतत समोरील ध्यानकुटीत भरून राहीला. त्या प्रकाशाने तो दिपला व बावरला. त्याला वाटले, आपण अंधारात उतरून एका विशाल शरीरात निळ्या-लाल रक्तवाहिन्यातून येथपर्यंत पोहचलो आहोत! ही कल्पना इतकी आकस्मिक व विलक्षण होती, की तिच्यामुळे त्याचे अंग थरथरू लागले.’---

ध्यानमंदिरातील हे स्वामीच्या ध्यानपीठाचे वर्णन म्हणजे जणू गर्भाशयाचे वर्णन आहे. रक्तासारखा लाल प्रकाश. निळ्या-लाल रक्तवाहिन्या. हे वर्णन तेच दर्शवते. गर्भाशयाचा तसा उल्लेख कथेमध्ये आलेला आहे.

आणि

गर्भाशयातच जीव प्रथम निर्माण होतो. वाढ होताच त्यातून बाहेर येतो. कधी जिवंत. कधी मृत.

महंत म्हणतो, “येथे स्वामी ध्यानसाधनेसाठी बसत. तुम्ही आत जाऊन आसनावर बसा.”

फटीतून आत शिरायला ‘तो’ नाखूष आहे.

त्याचे वर्णन करताना जीए लिहितात ,--‘आता तर त्याच्या अंगाची थरथर वाढली व आतल्या बाजूचा लहान चौकोन रक्तडोहाप्रमाणे वाटू लागला; पण झोपेत असल्याप्रमाणे तो तिकडे आकर्षित होऊन वाकून आत शिरला. चौकोन इतका लहान होता, की तो आसनावर बसताच भिंतीवरील लाकडी तक्तपोशी जणू त्याला चेंगरण्यासाठी अगदी जवळ आल्या.’—

पोलादी दरवाजा बंद झाला. वर्तुळ पण काळेशार झाले.

जीए पुढे लिहितात,

--महंत बाहेरून म्हणाला, “बेलाच त्रिदल येईल न येईल; आता एक गोष्ट तरी अनिवार्यपणे तुम्हाला उमजली असेल,” महंताचा आवाज आता दुरून येत असल्याप्रमाणे वाटत होता व धगधगीत लाल प्रकाशावर वाफेप्रमाणे तरंगत होता. “ती म्हणजे आता तुम्हीच या मठाचे स्वामी आहात. पूर्वीच्या स्वामीप्रमाणच तुम्हाला आता उरलेल सारं आयुष्य याच ठिकाणी घालवावं लागेल. तेव्हा मी काय सांगतो ते नीट ध्यानात घ्या.”---

महंताने जे ‘तो’ ला सांगितलं आहे ते, जीए किती उच्च कोटीचे आध्यात्मिक साधक होते याची प्रचिती देते. 🙏

(भाग १ समाप्त)

{यातील रंगांची व इतर माहितीसंदर्भ हे आंतरजालवरून घेणेत आलेले आहेत.}

**: भाग २.**

## महंत

बस चुकली. रस्त्यावर तो एकटाच. कोणीच माणूस दिसत नाही. साधं खोपटेही नाही. त्याला प्रश्न पडतो --- 'आता पुढे काय?'

बस चुकल्यावर, 'तो' ची ही अवस्था वर्णन करताना सुरवातीलाच जीए कथेत लिहितात –-----

(---'त्याने चेहरा पुसून घेतला; पण त्याच्यापुढे निरुत्तर करणारा प्रश्न होता--- आता पुढे काय? सकाळी आठ वाजेपर्यंत पुन्हा गाडी नाही; पण तोपर्यंत अंग कोठे पसरायचे? या झाडाखाली आडवे होणे शक्यच नव्हते; कारण वाट जेथे रस्त्याला भेटली होती, तेथे उतरत्या छपराचे एक गवती त्रिकोणी खोपटे देखील नव्हते.

मग आता पुढे काय?' --- इति जीए)..

"आता पुढे काय? ही तर गाडी गेलीच की?" 'स्वामी' कथेतील महंताच्या मुखातून आलेले हे पहिले वाक्य.

ते ऐकताच 'तो' दचकून उडाला आहे. साधं चिटपाखरूही दिसत नसलेल्या या रस्त्यावर अचानक कोणीतरी जवळ येऊन असा प्रश्न विचारल्यावर कोण दचकणार नाही?....

पण आपण करत असलेला मनातला विचारच जर कोणा व्यक्तीने उघडपणे पटकन बोलून दाखवला, तर कोणीही दचकून.... उडेलच.

इथे तर अशा निर्जन स्थळी, जवळपास कोणीही नसताना, संध्याकाळच्या वेळी, अंधार पडत असताना, आपल्या मनातील विचार अचानक जवळ, अगदी शेजारी येऊन कोणी उद्गारले, तर ते ऐकून तसा विचार करणारी व्यक्ति नुसती दचकणारच नाही... तर ते ऐकून दचकून अक्षरशः उडालीच पाहिजे.

जीए पुढे लिहितात ---

(--- ''आता पुढं काय? ही गाडी तर गेलीच की?'' कोणीतरी जवळच म्हणताच तो दचकून उडाल्या सारखा झाला. त्याच्या शेजारी जरा अंतरावर संन्याशासारखा दिसणारा एक माणूस उभा होता. त्याने लांब पायघोळ कफनी घातली होती व डोक्याला चापून बसवलेला फेटा असून त्याचे आखूड टोक त्याने डाव्या खांद्यावर टाकले होते. तो शांतपणे हसला व पुन्हा म्हणाला, "आता तुम्ही पुढं काय करणार? परत जाणार?''----इति जीए)

सुरवातीला जीए कथेमध्ये महंताचा उल्लेख 'संन्याशी' असा करतात. त्याचे थोडक्यात वर्णन करतात. त्याने लांब पायघोळ कफनी घातली आहे, असे लिहितात. पण त्या कफनीचा रंग कोणता आहे याचा उल्लेख जाणूनबुजून करीत नाहीत. चापून बसवलेला फेटा व त्याचे आखूड टोक खांद्यावर. कफनीप्रमाणे त्याचाही रंग कोणता आहे, हे रंगावर अतिशय प्रेम करणारे जीए अजिबात लिहीत नाहीत, हे थोडेसे न पटणारे आहेच.

पण हेच जीए यांचे वैशिष्ट्य आहे.

आता संन्याशी म्हटला की त्याच्या कफनीचा, अंगावरील वस्त्रांचा, डोक्यावरील फेट्याचा रंग 'भगवा' असतो हे तर कोणालाही माहिती आहे. पण --- 'संन्याशाने भगवी कफनी, भगवा फेटा घातला होता' --- असे जर लिहिले असते तर एक विशिष्ट अशी एका साधूची, संन्याशीची काल्पनिक मूर्ती वाचकाच्या अंर्तचक्षू समोर उभी राहिली असती. आणि त्यातही वाचक जर खूप धार्मिक असेल, पोथीपुराण वाचक असेल, आध्यात्मिक असेल, आणि त्यातही विशेषकरून नवनाथाची भक्ति करणारा असेल, तर मग विषयच संपला. नवनाथच्या नऊही मूर्ति, त्यांची चित्रे त्याच्या डोळ्यासमोर येणारच.

जीए पुढे कथेत लिहितात—

--- त्याने त्यावर थोडा विचार करत म्हटले, "तोच तर माझ्यापुढे प्रश्न आहे. नाही, आता मी परत जाणार तरी कसा? अंधारात पायवाटेने जाता येण शक्य नाही. सरळ

रस्त्यानं  जायचं  म्हणजे पाच-सहा मैलांचा पल्ला आहे आणि या खेड्यात जाऊन मी करणार तरी काय? माझी कोणाची ओळख नाही. त्यांना माझं  नाव देखील माहीत नाही, मग तेथे जाऊन मी राहणार तरी कुठे?'' ---- इति जीए )

'तो' चे हे स्वत:चे गाव. या गावात त्याचे बरेच आयुष्य गेले आहे. त्यावेळच्या लहानमोठ्या आठवणी त्याने जपून ठेवल्या आहेत. त्या आठवणी ताज्या करण्यासाठीचं तर  तो गावात आलेला आहे.  ज्या घरात जन्मला तेथे तो रेंगाळला आहे. त्यावेळचा औदुंबर वठलेला दिसलेला आहे. परिजातकाचे झाड तर दिसलेच नाही. आपल्या घरासमोरचा  तुळशीकट्टा सुद्धा दिसलाच नाही. अंगणात (न सारवलेले) तुळशीकट्टा नसेल तर ही माणस घरात राहतात तरी कशी?असा त्याला प्रश्न पडलेला.

बरं गावातील एकही माणूस त्याला ओळखत नाही. इतक्या वर्षानी आल्यामुळे तसं झालं आहे हे खरेच आहे. पण निदान तुमच्या  गावात एक तिऱ्हाईत माणूस आलेला आहे याची तरी दखल घ्या. कधीकाळी स्वत:चे घर असलेल्या त्या घरातून पाठ उघडी टाकून पदर न सावरता बाहेर आलेल्या स्त्रीचे तर या तिऱ्हाईतकडे लक्षच नाही. पदर न सावरता फिरते आहे तिऱ्हाईतासमोर. तिऱ्हाईत माणूस दिसतोय, म्हणून भोवती गोळा झालेली गावातील पोरे अर्ध्या तासातच त्याला सोडून निघून गेलेली आहेत. त्याच नाव-आडनाव माहित असलेले कोणी त्याठिकाणी उरलेले नाहीत. त्या गावाने त्याला पूर्ण झिडकारले आहे.

आपण या गावात का आलो? असा आता त्याला प्रश्न पडला आहे. बसमधून निघाला होता तेव्हा आदल्या स्टॉपवर त्याच्या मनात  गावाला भेट द्यायचा विचार आला. शेकडो मैलावरून आपण पुन्हा कधी या भागात येण्याची शक्यता नाही. म्हणून तो बसमधून उतरला  आणि गावात आला. पण त्याचे नाव-आडनाव माहित असलेला कोणीही गावात नाही.

जीए पुढे लिहितात,--

(---खडावा वाजवत संन्याशी थोडा पुढे आला. त्याचा चेहरा रुंद, मांसल असून त्यावर संन्याशाच्या चेहऱ्यावर क्वचितच दिसणारा ताठरपणा होता. तो केवळ संन्याशी असण्यापेक्षा महंत असावा असे दिसत होते.

“जर कुणाचीच ओळख नाही, तर मग तुम्ही त्या खेड्यात कसे काय आलात?” त्याने आश्चर्याने विचारले----इति जीए)

थोडक्यात--

जर तुम्हाला या गावात कोणी ओळखत नाही. तर कशाला आला आहात या गावात ? आणि तेही स्वत:हून आला आहात. आता बसही गेली. पुढेही जाता येत नाही. मागेही जाता येत नाही. गावातही राहता येत नाही. कोणी चहासुद्धा विचारला नाही गावात. गावभर फिरलास. स्वत:ची म्हणावी अशी एकही व्यक्ति भेटली तर नाहीच. ते तर जाऊ दे. साधी विचारपुसही कोणी केली नाही. ओळखही करून घेतली नाही तुझी. आता सगळे मार्ग बंद झालेत. कुठे जाणार आता? मग आता पुढे काय?

जीए पुढे लिहितात --

( महंत गप्प राहीला: पण त्याची दृष्टी मात्र त्याच्यावरून हलली नाही. त्याने मग पुन्हा विचारले, “पण आता पुढं काय विचार आहे तुमचा?”

त्यावर काय उत्तर द्यावे हे लगेच समजले नाही. तो विमनस्कपणे म्हणाला, “बघू की काहीतरी. कदाचित एखाददुसरी मोटार जाईल या रस्त्यानं. निदान पुढच्या बस स्टँडपर्यंत जायला मिळाल तरी पुरे!”

तो असे म्हणाला खरे; पण हे देखील घडणे अशक्यच दिसते अशी अनिश्चितता त्याच्या शब्दात उघड दिसत होती. ----इति जीए)

महंत अगदी त्याच्या शेजारी येऊन म्हणाला, “तुम्ही अस का करत नाही?”

-------------------०००--------------

इथेपर्यन्त जीए यांनी लिहिलेल्या कथेतून त्यांना जे सुचवायचे आहे, त्यावर पुढील कथा आधारीत आहे.

जीए जणू महंताच्या कृतीतून व मुखातून येथेच सांगून टाकतात ---

“पुढेही नाही, मागेही नाही, इथेही राहता येत नाही.. मग ...आता, चल माझ्याबरोबर. हाच तुझा शेवटचा स्टॉप आहे.

या गावात तुझा जन्म झाला. आयुष्यभर फिरलास. कोणी साधी ओळखही दाखवत नाही आता. झिडकारून टाकल आहे की रे सगळयांनी. चाळीशीतच ही तुझी अवस्था. गावातील कुत्रं पण विचारत नाही.

या आडरानात तुला विचारणारा, तुझी काळजीपूर्वक विचारपूस करणारा, तुला जेवायचं आहे, झोपायचं आहे, तुझी सर्व काळजी, चिंता वाहणारा, तुझी सेवा करणारा येथे कोण असेल तर तो मीच आहे की रे,बाबा....!

चल माझ्याबरोबर. सगळी सोय करतो तुझी. आज रात्रीपुरती.

आजची (काळ)रात्र येथेच काढ. अजून ती संपलेली नाही. उदय उजाडेलच. प्रवास तर आत्तापुरता संपलेला आहे. पुढचा प्रवास करायचा की नाही याचा जरा विचार कर.

आता तरी गांभीर्याने चाळीस वर्षाचा हिशोब मांड. दे सोडून सगळे. ज्या गावात कोणीही तुला विचारत नाही. त्या गावात आता परत येऊ नकोस. सगळी बुचबुच गर्दी झाली आहे येथे गावात.

जर नाही जायचे गावात परत, तर मठात चल.

आदयस्वामींच्या ध्यान मंदिरात बस. चिंतन कर. तुझ्या सारख्यांची काळजी, चिंता आहे रे आद्यस्वामींना. म्हणून तर त्यांनी मंदिर बांधले. त्यावरचा हा मठ मात्र त्यांनी बांधून घेतला. बांधवून घेतला. (कोणाकडून????)

तू चल. निवांत चिंतन कर. ध्यान कर. तू मूढ, अज्ञानी होतास. नुसता धावतपळत होतास. आता जरा शांत बस. ज्याच्यासाठी धावत होतास त्या सगळ्याची सोय केलेली आहे मठात. तू फक्त आता ध्यान कर.

जीवन-मृत्युचा अर्थ, जन्म-मरणाचा अर्थ "न कंटाळता" समजून घे.

माणसान स्वत:ला, इतरांना अस कधी ना कधी भिंगाखाली ठेऊन अलिप्तपणे पाहणं जरूर असतं . तुझी हत्या करण्यासाठी तुला येथे आणलेले नाही.

तू काही लगेच मरणार नाहीस. जेवढी वर्षे जगलास, तेवढीच वर्षे आणखीन जगशील.

पुन्हा या गावात यायचं. ---म्हणजे पुन्हा जन्माला यायचं की रे.

यायच का हे शरीर घेऊन तुला परत जन्माला?

यायच तर ये.

नसेल यायच तर रहा येथेच.

जास्त शरीराची हालचाल तुला करता येणार नाही या ध्याननमंदिरात. अंग फिरू शकेल यापेक्षा जास्त जागा मागणं वेडगळपणाचे नाही का? शिवाय विश्व व्यापून राहणारा आत्मा या देहात सुखानं राहतो, मग जेथे तो देह सहज फिरू शकतो, त्याठिकाणी आत्म्याला रहायला काय अडचण आहे? असो.

बाकी तुझी इच्छा. कोणतेही रूप घेऊन ये.... कोणताही जन्म घे.

परत 'बस चुकणारच आहे', हे निश्चित.

पुन्हा तेच सर्व रस्ते बंद.

मग पुन्हा आता पुढे काय?

कोणताही जन्म घेतलास तरी तुझ पुढील आयुष्य ‘पुन्हा वरीलप्रमाणे, पुन्हा वरीलप्रमाणे’ या अत्यंत रित्या, मृत शब्दाखेरीज काही नाही.

तूच ठरव.

कारल्याप्रमाणे उंच असलेल्या गोपुरावरील त्रिकोणी पताका प्रमाणे पंख पसरून अवकाशात मुक्तपणे विहार करायचं..

की....

मृत्यूला सोबत घेऊन येणारा कोणत्याही रूपातील जन्म स्वीकार करायचा....!

**: भाग-3 (१) -**

**'तो' हा 'स्वामी(ज्ञानी)' झाला नाही.**

---------ॐ------

‘स्वामी होणे’ ही एक आध्यात्मिक अवस्था आहे.

‘स्वामी’ कथा समजण्यासाठी या अवस्थेची माहिती असणे आवश्यक आहे. कारण ही कथा या अवस्थेवर आधारीत आहे, असे माझे वैयक्तिक मत आहे.

ग्रुपमधील बहुतेक सर्वांनाच या अवस्थेची माहिती असणारच आहे. कदाचित कित्येकांना या अवस्थेची अनुभूतीही आलेली असेल.

तरीही ‘स्वामी’ कथा समजण्यासाठी या अवस्थेची पूर्वपीठिका माहिती असणे, ती माहिती अगोचर करणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

‘मी’ कोण आहे, हे ‘विश्व’ काय आहे, मी या विश्वात कोठून आलो, कोठे जाणार आहे, जन्म-मृत्यु होतो म्हणजे काय होते, सुख-दु:ख म्हणजे काय, हा आत्मा कोण

आहे, चराचराला  व्यापून दशांगुळे उरलेला हा परमात्मा कोण आहे  वगैरे वगैरेचे ज्ञान प्राप्त होणे, ते आत्मसात करणे, त्याची अनुभूति घेणे. त्याप्रमाणे उर्वरित जीवन व्यतीत करणे............

थोडक्यात,  ‘स्व’ चा शोध लागणे-‘मी कोण’ याचा अर्थबोध होणे- ‘मी’पणाचा अंत होणे म्हणजे ‘स्वामी’ होणे.  ज्ञानी  होणे

ही अवस्था म्हणजेच जीवाचे व शिवाचे मिलन होणे. दोघेही एकरूप होणे. हीच ‘मुक्ती’. हाच ‘मोक्ष’.

अध्यात्म असे सांगते की,  हे जीवाशिवाचे मिलन होणेसाठी व्यक्तीचा मृत्यु झालाच पाहिजे असे नाही.

हा मोक्ष, मुक्ती जिवंतपणी सुद्धा प्राप्त होते. त्याची अनुभूति घेऊन तो जगू शकतो. ‘ज्ञानी’ झाल्यावर व्यक्ति त्याप्रमाणे त्याचे उर्वरित जीवन प्रवास करू शकते.

पण...

त्यासाठी व्यक्तीला स्वत:वर नियंत्रण ठेवावे लागते. शरीर जिवंत ठेवणेसाठी ज्या गोष्टी आवश्यक आहेत, त्या सोडून इतर गोष्टींची आसक्ती सोडावी लागते.

अर्थात यावर आध्यात्मिक क्षेत्रातील जाणकार अधिक भाष्य करू शकतील.

आणि....

हे सर्वसामान्य संसारी माणसाला शक्य नसते.

तो आपला ‘प्रपंच करावा नेटका’ या समर्थ रामदासांच्या उक्तीप्रमाणे  जीवन जगत असतो. संसारी होतो. सुखदु:ख भोगतो. आणि मृत्यु पावतो.

84 लक्ष योनीत फिरून आल्यावर हा दुर्लभ असा मानवी जन्म मिळाला आहे, असे अध्यात्म सांगते.  या जन्मात सामान्यातीलही अतिसामान्य अशा संसारी

माणसालासुद्धा हे ज्ञान, ही मुक्ती प्राप्त करण्याचा अधिकार आहे असेही अध्यात्म सांगते.

आता आपण स्वामी कथेकडे वळू.

या कथेत एकुण चार स्वामी आहेत.

पहिला आद्यस्वामी. ज्याचा देह तुळशी वृंदावनाखाली समाधी अवस्थेत आहे.

उरलेले तिघेही मठाच्या गर्भाशयरूपी ध्यानपीठात सांगाड्याच्या रूपात आहेत.

त्यांचे देह तुळशी वृंदावन येथे स्वामींच्या शेजारी ठेवले गेलेले नाहीत. कारण..

ते तिघेही स्वामीच्या अवस्थेपर्यन्त पोहोचलेले नाहीत.

(वृंदावनाला नमस्कार करत महंत म्हणाला, “ही आद्य स्वामींची समाधी. नंतरच्या स्वामींचेदेखील हे विश्रांतिस्थान आहे.” – इति जीए)

आता हे नंतरचे स्वामी कोण आहेत?...

आद्य स्वामीनंतर आत्तापर्यंत कोणीही स्वामी अवस्थेला पोहोचलेला नाही. जर कोणी भविष्यात पोहोचला तर त्याचे हे विश्रांतिस्थान आहे, असेच महंत म्हणतो आहे.

भविष्यात ते स्वामी समाधी घेतील किंवा नैसर्गिकपणे देहत्याग करतील. त्यांचा अंत कसा होईल हे आत्ताच सांगता येत नसल्याने महंत ‘विश्रांतिस्थान’ हा शब्द वापरतो.

जीए भाषाप्रभू, शब्दप्रभू आहेतच. या दोन्हीही शब्दांचा अगदी चपखलतेने ते वापर करतात व वाचकाची काहीशी दिशाभूल करतात.

देहाने ‘समाधी’ घेणे व ‘चिरनिद्रा’ घेणे यातील फरक येथे लक्षात घेतला पाहिजे.

थोडक्यात ---‘नंतरच्या स्वामींचे देखील हे विश्रांतिस्थान आहे’ हे वाक्य त्या भविष्यातल्या होणाऱ्या स्वामींसाठी आहे.

महंत ‘तो’ ला डांबून ठेवतो.

डांबून ठेवल्यावर, आपले सुखी जीवन सोडून आलेला महंत म्हणतो, “पण तिकडे मी पाठ फिरवली आणि आद्य स्वामींच्या मागे आलो. त्यानंतर असेच अकस्मात दर्शन देऊन आलेले तीन स्वामी झाले. आता तुला एकटं वाटायची जरूरी नाही, कारण ते सगळे येथेच आहेत.”

याचा अर्थ--- ते तिघे येथेच डांबून ठेवले. तिघेही येथेच मरण पावले व त्यांचे देहही येथेच ठेवले आहेत. तुळशीवृंदावनपाशी ठेवले नाहीत. कारण...

ते 'स्वामी' अवस्थेला पोहोचलेच नाहीत.

तरीही महंत त्यांचा उल्लेख ‘स्वामी’ असं का करतो? .. याचे कारण ---

अध्यात्मान्वये प्रत्येकजण जन्मत: स्वामीच असतो. प्रत्येकात तो देव विराजमान आहे. फक्त तो दीप प्रज्वलित होणे आवश्यक आहे. तो अंधार दूर करणेसाठी, आतील ज्योत पेटवणे साठी काहीकाळ एकांतात बसणे, ध्यान-तप करणे, स्वत:चा-विश्वाचा, विचार करणे आवश्यक आहे., असेच अध्यात्म सुचवते. म्हणून तर कथेमध्ये या मठाचे नाव ‘तपोमंदिर’ आहे.

मग प्रश्न असा पडतो..,

हे तिन्ही स्वामी सामान्य जीवन जगत होते, तर ते स्वामी अवस्थेला पोहोचण्याचे भाग्य, तो अधिकार त्यांना नाही का?

अध्यात्म यावर उत्तर देते.

अध्यात्मानुसार जगात चार प्रकारची माणसे असतात. --- ज्ञानी, मुमुक्षु, अज्ञानी, मूढ.

ज्ञानी तो आहे ज्यास आत्म-बोध झाला आहे.

मुमुक्षु व्यक्ति आत्म-बोधासाठी तळमळत असते. सर्वस्व अर्पूनही आत्म-ज्ञान प्राप्त करण्याची मुमुक्षुची तयारी असते.

अज्ञानी माणसाला शास्त्रांची माहिती असते, परंतु त्याची अंतिम फलश्रुती प्राप्त करण्यात त्याला रुचि नसते. मूढ व्यक्तीला आध्यात्मिक जगाची ओळखही नसते व ती त्याला करूनही घ्यायची आवश्यकता नसते. पशुप्रमाणे शारिरीक गरज व क्रियांची पूर्ती करण्यातच त्याला धन्य वाटते. तो केवळ वासनासक्त शरीर असतो.

जीए यांनी 'स्वामी' कथेमध्ये "आत्मा" हा शब्द फक्त एकदाच आणलेला आहे. तोही महंताच्या तोंडीच आहे.

मूढापेक्षा अज्ञानी बरा, अज्ञानीपेक्षा मुमुक्षु चांगला, आणि मुमुक्षुपेक्षा अज्ञानी श्रेष्ठ होय. – असे अध्यात्म सांगते.

या कथेत--- मूढाचा अज्ञानी, अज्ञानीचा मुमुक्षु व मुमुक्षुचा ज्ञानी (स्वामी) होण्याची प्रक्रिया म्हणजे हे आद्य स्वामींचे मंदिर..!

ज्ञानी झाल्यावरही असे मंदिर उभे करून, आपल्याप्रमाणे सर्व मानवजातीचे कल्याण चिंतनारा स्वामी, त्यांनाही हे ग्यान मिळावे म्हणून या मंदिराच्या माध्यमातून प्रयत्न करतो. त्यामुळे तो श्रीशैल पर्वतावरील दर्शन देणारा जटाधारी ऋषी लोभीत होतो...त्याचा जणू सेवक होतो.

आणि तो महंत म्हणजे...

स्वामी/ ज्ञानी होण्याची ही प्रक्रिया सामन्यजनाना समजावी म्हणुनच त्या मंदिरावर स्वामी हयात असतानाच असा स्वयंपूर्ण मठ उभा करणारा, स्वामींच्या इच्छेप्रमाणे सामान्य लोकांना त्याची अनुभूति व्हावी, मठात नेऊन या प्रक्रियेची निदान ओळख तरी सामान्यास व्हावी यासाठी या सामान्यांना मठात पकडून घेऊन जाणारा, त्यांना डांबून ठेवणारा, आणि डांबून ठेवल्यावर त्यांना या ज्ञानाचा उपदेश करणारा,

अगदीच स्वामी बनला नाही तरी त्या सामान्यास या प्रक्रियेच्या मार्गावर आणून ठेवणारा हा महंत म्हणजे साक्षात भगवान शंकर, तो देवांचा देव महादेव आहे -!

आणि--

या कथेतील 'तो ' हा ज्ञानी होण्याच्या, स्वामी होण्याच्या या मार्गावर पुढील जन्माकडे मार्गस्थ झाला अशीच मध्यवर्ती कल्पना या कथेतून अगोचर होते असे माझे वैयक्तिक मत आहे.

यासंदर्भात--- नाशिकजवळ इगतपुरी येथे गोएंका यांचे ‘विपश्यना’ केंद्र आहे त्याकडे आपले लक्ष वेधतो. तेथेही प्रवेश करणाऱ्या व्यक्तीस असेच ७-८ दिवस जगापासून वेगळे ठेवले जाते. त्यास पूर्ण एकांतवास भोगावा लागतो. आणि या प्रक्रियेच्या मार्गावर आणून ठेवण्याचा प्रयत्न तेथे केला जातो.

**भाग-३ (२)- ‘तो’ स्वामी झाला नाही.**

------------------ॐ-------------

पूर्णात् पूर्णम् उदच्यते !

‘स्वामी’ कथेमध्ये हा मंत्र, हे एकमेव वाक्य जीए यांनी स्वतंत्रपणे लिहिलेले आहे.. तो पूर्ण मंत्र कथेत नाही.

हा पूर्ण मंत्र ईशोपनिषदमध्ये आहे. तो असा आहे,

ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

याचा अर्थ --

सच्चिदानंदस्वरूप परब्रह्म ॐ हे सर्व प्रकारे पूर्ण आहे. हे दृश्य जगत् सुद्धा पूर्णच आहे. या पूर्ण परब्रह्मातून हे पूर्ण जगत् व्यक्त स्थितीस आलेले आहे. त्यामूळे ह्या पूर्ण ब्रह्माच्या पूर्ण स्थितीला बाधा येत नाही. ते आहे तसेच पूर्ण राहते.

( या मंत्राचा फक्त उल्लेख जीए सुचकपणे करतात. मंत्र कथेत येतो 'तो' च्या चिंतनानंतर.

त्या चिंतनात जीए लिहितात,-- 'हा गोलक आहे तरी कसला?क्षणाक्षणाला ............. आणि शेवटी राहते काय? तर सगळे नोंदून, पण काहीच अंगाला लावून न घेता निर्लेप, निर्विकार राहणारे एवढेच भिंग.')

पूर्णातून पूर्ण निर्माण झाले. म्हणून मूळ पूर्ण काही कमी झाले नाही. ते पूर्णच राहिले.

हे सूत्र म्हणजे एक गणिती संज्ञा आहे. भारतीयांनी जगाला दिलेली गणित शास्त्रातील सर्वात महत्त्वाची देणगी आहे ती म्हणजे "शून्य." शून्य ही सम संख्या आहे. शून्य ऋण ही नाही आणि धन ही नाही. शून्य ही मूळ ही नाही आणि संयुक्त संख्या ही नाही. संख्यारेषेवरील मध्यबिंदू हा शून्याने दर्शवतात.

शून्य म्हणजे काहीच नाही. तरीही ते आहे.

हे शून्य, ते शून्य. शून्यातून शून्य वजा केले तरी शून्य उरते, शून्यात शून्य मिळवले तरी उत्तर शून्य येते.

शून्य हे निर्गुण ब्रह्म किंवा स्वरूप नसलेले आणि गुण नसलेले ब्रह्म यांचे संख्यात्मक किंवा प्रतीकात्मक प्रतिनिधित्व आहे.

( याबाबत जीए कथेत लिहितात,

--'निळया लाल प्रकाशात आपण गर्भाशयात आलो, एवढेच नाही तर आता उत्पत्तिमार्गावरून उलट चाललो आहो— माणूस, मग उरग, मग अणुकीटक मग – शेवटी शून्य. चिंतनाने शेवटी शून्य; शरीरानेही शून्य!'---)

‘पूर्णात्  पूर्णम् उदच्यते!’ हा श्लोक/ मंत्र हाच स्वामी कथेचे आध्यात्मिकसूत्र आहे.

प्रतिभावान चित्रकार पिकासोने एका प्रश्नावर दिलेले उत्तर जगप्रसिद्ध आहे. तो म्हणाला होता, "या जगात जन्मणारे प्रत्येक मूल हे जेव्हा जन्माला येते तेव्हा ते प्रतिभावानच असते. जीवनाच्या धकाधकीमध्ये, सुख-दु:खाना तोंड देत मोठे होताना त्याची प्रतिभाशक्ती हळूहळू क्षीण होऊन जाते.”—

या उत्तरात थोडा बदल करूया.

"या जगात जन्मणारे प्रत्येक मूल हे जेव्हा जन्माला येते तेव्हा ते स्वामीच (ज्ञानी) असते. जीवनाच्या धकाधकीमध्ये, सुख-दु:खाना तोंड देत मोठं होताना त्याचं स्वामित्व (जन्मत:प्राप्त असलेले ज्ञान) हळूहळू क्षीण होऊन जाते.” – असे म्हणू या.

त्यासाठी हे जीवन कृत्रिमपणे संपवण्याचा कोणालाही अधिकार नाही. आत्महत्या हे पाप आहे, असेच अध्यात्म सांगते.

जीवन जगताना समाधी, बंधन, अडथळे , साधना यांची सुद्धा ज्ञानी उपेक्षा करतो.

( ---‘म्हणून आद्य स्वामींनी पोथ्यापुस्तक वाचली नाहीत, लिहिली नाहीत आणि लिहविली नाहीत.’----जीए)

अध्यात्मात आवर्जून सांगितले आहे की,--- ‘आत्मबोध झालेला ज्ञानी  सर्वातून मुक्त असतो. आपली नित्यकर्मे सहजपणे, सामान्य माणसाप्रमाणे करीत असतो. तो त्याच्या बाह्यस्वरूपावरून ओळखू येईलच असे नाही.’

( ---‘ स्वामींच्या खूणा  कोठे प्रकट होतील, स्वामी कोणत्या स्वरूपात दर्शन देतील, हे आम्हा अज्ञ अनुयायांना काय कळणार? तुम्ही आज येथे अतिथि म्हणून आलात. कुणास ठाऊक, स्वामीच तुमच्या रूपात आले असतीलही. तेव्हा त्यांना जे आतिथ्य आम्ही दाखवलं असतं, तेच तुम्हाला दाखवण्यात आलं  इतकंच.’---इति जीए)

स्वत:चे ‘स्वामी’ पण ओळखण्याचा, ’स्वामी/ज्ञानी’ होण्याचा, ‘मुक्त’ होण्याचा हा अधिकार सर्वांना आहे. म्हणून आत्तापर्यंतचे तीन स्वामी हे जीए यांनी सर्वसामान्य माणसेच दाखवली आहेत.

( ---‘स्वामी होण्यासाठी कडक तपश्चर्या, कठोर वैराग्य इत्यादी हवंच असं नाही’ -- इति जीए)

-----------०००------

कथेतील ‘तो’ स्वामी का झाला नाही?

‘तो’ हा स्वामी कथेचा 'नायक' आहे, तर ‘महंत’ हा या कथेचा ‘महानायक’ आहे.

महंताने ‘तो’ मरणार नाही, याची पूर्ण दक्षता घेतलेली आहे. डांबून ठेवताना त्याला उपदेश केलेला आहे. तू मरणार नाहीस, याची खात्री दिलेली आहे. ‘तो’ ने शांतपणे बसून ‘स्व’ चे चिंतन करायचे आहे. अंतरीचा दीप प्रज्वलित करायचा आहे. सामान्य माणसाला ज्ञानी/स्वामी होण्याची, त्या मार्गावर मार्गस्थ होण्याची संधि महंताने उपलब्ध करून दिलेली आहे. या मर्त्यजगातून आता मुक्त व्हायचे आहे.

‘तो’ या मार्गावर चालू लागतो. चिंतन करतो. ‘स्व’ चा शोध करू लागतो. त्या शोधाची एकेक पायरी चिंतनातून चढू लागतो.

पण रोजच्या त्याच त्या जीवनाचा त्यास कंटाळा येतो. वर्तमानातील आपल्या जीवनाला काही अर्थच उरलेला नाही अशी त्याची भावना होते. त्याची ही भावस्थिती कथेमध्ये जीए यांनी वर्णन केली आहे. थोडक्यात,

महंताला मात्र त्याला दाखवून द्यायचे आहे की, हा माणूस जिद्दीने जगला आणि आपण होऊन मेला -हा मेला अगर संपला नाही, तो केवळ थांबला- असा नेटकेपणा दिसला पाहिजे.

शेवटच्या दिवशी आपण अंथरुणावर आडवे होऊ, तेव्हा आपल्यात काही हताश चिरडलेले दिसता कामा  नये. त्यावेळी उलट महंतालाच फसल्याची जाणीव व्हायला हवी, असे विचार त्याच्या चिंतनातून निर्माण होतात.

अशातच जिद्दीने सूर्यप्रकाशाकडे जाणारी वेल त्याला दिसते. संवेदनशील मनाचा 'तो' तिला वाढवतो. जपतो. ती वेल हवा येणाऱ्या नळापर्यन्त वाढते. जिद्दीने वाढणाऱ्या वेलावर सूर्यप्रकाशाचा शिडकाव होईल, ती वेल नळातून वरवर जाईल, या  विचाराने  तो सुखावतो.

परंतु एक दिवस अदृश्य प्रवाहाप्रमाणे नळातून खाली उतरत असलेली हवा तिच्यामुळे बंद होईल, या विचाराने त्याची धुंदी उतरते.

हवा बंद झाल्यावर आपला मृत्यु होणार, हा भ्रमित विचार  त्याची छाती दडपून टाकतो.

जणू ती वेल आपणच जन्माला घातली अशा विचाराने संवेदनशील  'तो'  वेलीला जिद्दीने  जगण्याचा उपदेश कवितेतून करतो.

स्वत: मात्र जीवन नाकारतो. अफूची गोळी घेऊन मृत्यूला मिठी मारतो.

कवटीच्या चेहऱ्यावरील हास्य, तो अंतरीचा आनंद गवसण्याआधीच मृत्यूला घाबरून शरण जातो. जणू  स्वत:ची अंतरीची ज्योत चिमटीने स्वत:च विझवून टाकतो.

या पृथ्वीवरील प्रत्येक प्राणिमात्रास सर्वात जास्त भीती वाटत असते ती मृत्यूची.

स्वत:ला अवतारी पुरुष समजणारे, आध्यात्मिक मार्गावर मार्गस्थ असलेले भलेभले लोक देहसक्तीमूळे समोर मृत्यु दिसताच कोलमडून पडतात.

'तो' चेही तसेच झाले.   'तो' मृत्युच्या भितीवर विजय मिळवू  शकला नाही. महंतामुळे 'स्व' चा शोध घेण्याची संधि त्यास या जन्मी प्राप्त झाली होती. या

कथेमध्ये  ‘तो’ हा अध्यात्मामध्ये सांगितलेल्या मार्गावरून मार्गस्थ झाला आहे. तो या जन्मी स्वामी झाला नाही. इतर तीन स्वामी प्रमाणेच तो ‘शिवचरण' झाला.

॥ शान्तिपाठ ॥

ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शान्तिः । शान्तिः । शान्तिः||

-------- 🙏 -----------

**'स्वामी कथेतील शेवटचे वाक्य' ----**

जीए यांनी स्वामी कथेतील नायकाला शेवटच्या वाक्यापर्यंत ‘तो’ याच शब्दाने संबोधले आहे. ‘तो’ विषयी कथेत लिहिताना त्याचा उल्लेख शेवटपर्यंत जीए यांनी ‘स्वामी’ असा केलेला नाही.

या कथेतील शेवटचे वाक्य या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. ते वाक्य खालीलप्रमाणे आहे.

--- ‘आणि दाट पंखांच्या सावलीसारख्या झोपेत शेवटी तो शांत होऊन सौम्य हसण्याखाली खालचे अंतिम हास्य तात्पुरते झाकून तो निश्चल झाला.’ -----

या वाक्यातील ‘’दाट पंखांचा’’ अर्थ शोधण्यासाठी कथेत मागे जावे लागते. पंखांचा उल्लेख कथेत एकदाच आहे. मठाचे वर्णन करताना पंखांचा उल्लेख कथेत येतो. -

‘मठाच्या वर निमुळत्या होत गेलेल्या कारल्यासारख्या आकाराच्या गोपुरावर त्यातून एक अत्यंत तेजस्वी ठिणगी निघत असल्याप्रमाणे लाल प्रकाश होता. लाल प्रकाशाशेजारी चौकोनातून एक त्रिकोण काढून दिसणारी दोन पंखांची पताका होती आणि तिच्याखाली दिव्यांच्याच टिंबात अक्षरे उजळली होती-तपोनिवास.’----

मठातून बाहेर पडण्याचा मार्ग या गोपुरातून जाणारा आहे.

हा मार्ग म्हणजे मानवी जीवनात अंतिमक्षणी अभिप्रेत असलेला मुक्तीचा हा मार्ग आहे.......!

षड्रिपुंच्या जाळयात अडकलेल्या मानवाला हा अंतिम मार्ग कारल्यासारखा कडू वाटत असतो. म्हणून हे गोपुर कारल्याच्या आकाराचे आहे.

तो मार्ग कडू जरी वाटत असला तरी शेवटी तो आनंदाचे डोही आनंद तरंग निर्माण करणारा आहे, असे अध्यात्म सांगते. जणू मुक्तीच्या प्रांगणात शरीरातील 'उर्जेने-चैतन्याने-आत्म्याने' पंख पसरल्याप्रमाणे स्वच्छंदपणे विहार करण्याचा आहे, असेच अध्यात्म सुचवते.

(पंखांप्रमाणेच आत्म्याचा उल्लेखही कथेत एकदाच आहे. तोही महंताच्या तोंडी.)

स्वामी कथेतील 'तो' या गोपूराच्या पंखांपर्यंत ( स्व-चिंतनातून जीवन मुक्तीच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत) पोहोचला होता, हेच कथेतील शेवटच्या वाक्यातून जीए सूचित करतात.

--- 'दाट पंखांच्या सावलीसारख्या झोपेत' ---तो शांत झाला. मरताना 'सौम्य' हसला.

वेलीच्या रूपाने जिवंत (तुझे एकेक पान माझा श्वास आहे) राहून महंतावर जणू आपण विजय मिळवला, अशी भ्रामक मनोवस्था त्याची झाली होती. महंतावर जणू सूड घेतल्याप्रमाणे तो सौम्य हसला.

ते हास्य त्याच्या चेहऱ्यावर होते. पण चेहऱ्याच्या खाली एक अंतिम हास्य असते. ते असते मानवी कवटीवर. 'अंतिम हास्याचा' उल्लेखही कथेत येतो. तोही महंताच्या तोंडी.---

---- ‘ओठावरील शांत ज्ञानी स्मित मृत्युच्या समोर टिकत नाही; पण नाक, कान, डोळे इत्यादी इंद्रिये निघून गेल्यावर देखील मृत्युच्या तडाख्यातून एकच वाचून राहतं, ते म्हणजे कवटीचे हास्य –आणि ते हास्य म्हणजेच आयुष्याबाबतचा माणसाचा अंतिम निर्णय होय.”---

‘तो’ ने महंतावर घ्यावयाच्या सूडाच्या/अहंकाराच्या सौम्य हसण्याखाली ते अंतिम हास्य झाकून टाकले,-- असेच कथेच्या शेवटच्या वाक्यातून जीए सुचवतात.

महंतावर सूड घेण्याचा अहंकार अंतिम क्षणी ‘तो’ नष्ट करू शकला नाही. ‘तो’ आत्मज्ञानी (स्वामी) होण्याच्या अखेरच्या पायरीपर्यंत पोहोचला होता.

‘तो’ ला वेलीच्या ऊर्जेची जाणीव झाली होती. ती ऊर्जा समजली होती. पण वेल तिच्यातील अंत:प्रेरित उर्जेने त्या अंधारमय कोठडीत जन्माला आली होती. त्याच प्रेरणेने ती प्रकाशाकडे निघाली होती. ती वेल काही ‘तो’ ने जन्माला घातली नव्हती. येथे अभेद्य जागेत ते वेलीचे बीज कसे काय आले, ते बीज कोणी निर्माण केले, या अंधाऱ्या जागेत त्या बीजाला कोंब कसा काय आला याचा मात्र त्याच्या चिंतनात ‘तो’ विचारही करत नाही. ( हेच जीए यांच्या लेखणीचे वैशिष्ट्य आहे.)

कथेत जीए पुढे लिहितात, ते संक्षिप्तपणे असे आहे 👉 ---

तो विस्मयाने तिच्याकडे पहातच राहीला. वेलीविषयी त्याचे मन आदराने भरुन गेले. अभेद्य, अगदी पाताळात असलेल्या या ठिकाणी हे बीज उतरत येथे आले आणि साऱ्याला तुच्छ लेखत हिरव्या नम्र डौलाने बाहेर पडले हे पाहून तो आदराने लीन झाला. वेलीसमोर त्याने गुडघे टेकले. त्रिशूळाने त्याने वेलीची सांदर मोठी केली. वेलीला त्याने त्रिशूळाचा आधार दिला. वेलाचे जीवनमार्गी लावताना हा त्रिशूळ वेलाचा आधार ठरला होता. आता वेल चांगला फुलेल, फळेल आणि एकदिवस वेलाच्या ओझ्याने त्रिशूल जमिनीवर पडेल. तोही आपल्याप्रमाणेच. तो त्रिशूळ स्वत: फुले-फळे न निर्माण करताच जमिनीवर पडेल असेही त्याला वाटले आहे.”

(‘त्रिशूल खाली पडेल’ हा कथेतील शब्दप्रयोग नेमके काय सूचित करतो? येथे एक गोष्ट ठळकपणे नमूद करणे जरुरीचे आहे. संपूर्ण कथेमध्ये ‘तो’ हा महंताला अजिबात दूषणे देत नाही. आपल्याला फसवून महंताने कोंडून ठेवल्यावरही ‘तो’ त्याला ‘खुनशी, कपटी, विश्वासघातकी असे शिव्याशाप घालत नाही. महंत गेल्याबरोबर ‘तो’ हा बधिर मनाने आसनावरच बराच वेल बसून बसून राहीला आहे. पण नंतर स्व-चिंतनात बुडून गेला आहे, असेच कथेत जीए यांनी दाखवले आहे. पण महंताचा सूड घ्यायचा हे मात्र त्याने पक्के ठरवले आहे.)

वेलीला वाढवताना,

वेलीचा हिरवेपणा आपणास पाहण्यास मिळणार नाही याचेही दु:ख ‘तो’ ला झाले आहे.

पण ..

ती वेलच आपल्या गुदमरून टाकणाऱ्या मृत्यूचे कारण ठरेल या विचाराने ‘तो’ सटपटला. मृत्युच्या कल्पनेने गर्भगळीत झाला.

पाईपमधील हवा बंद होईल व मृत्यु येईल याचे भय त्यास वाटू लागले. त्याने तिला धागा जोडला. आता...

वेलीकडे न पाहता तो धागाच पहात बसला.

(-- "पुर्वी तो ज्या नियमितपणे वेलाकडे जात असे त्याच नियमितपणे तो आता चारसहादा थरथरणाऱ्या धाग्याकडे पहात असे" –इति जीए)

जणू जीवनाकडे न पाहता मृत्युकडेच पहात बसला.

पण तरीही त्याने ती वेल उपटून टाकली नाही. कारण ऊर्जेची/ आत्म्याची ओळख त्याला स्व चिंतनातून झाली होती. पण महंतावरील सुडाग्नीचा अहंकार नष्ट झाला नव्हता. धागा जमिनीवर कोसळताच स्वत:च्या मृत्यूची जाणीव होऊन त्याने जीवन संपवले. वेलीच्या रूपाने आपण जिवंत राहू या कविकल्पनेने, आपण महंताचा जणू

सूड घेतला अशा मनोवस्थेत त्याने सौम्यपणे हसत जीवन संपवले. गुदमरून टाकणारा, वेदनामय मृत्यु टाळण्यासाठी त्याने अफूची गोळी घेतली. जणू देहाची आसक्ती निर्विकारपणे त्याने संपवली. पण..

महंतावरील सुडाग्नीचा अहंकार तो संपवू शकला नाही.(-- "शेवटच्या दिवशी आपण अंथरुणावर आडवे होऊ, तेव्हा आपल्याला काही हताश चिरडलेले दिसता कामा नये. त्यावेळी महंतालाच फसल्याची जाणीव व्हायला हवी. त्याला वाटले पाहिजे, हा माणूस येथे देखील जिद्दीने जगाला व आपणहून मेला. हा मेला अगर संपला नाही, तो केवळ थांबला--असा नेटकेपणा आपल्यावर दिसला पाहिजे!"-- इति जीए )

जर त्याने तो सुडाग्नीचा अहंकार शरीर संपवण्यापूर्वी संपवला असता, ( महंताला नीटसपणे ओळखले असते) तर ते अंतिम हास्य त्याला सापडले असते. '

तो ' ने वेली प्रमाणे नैसर्गिक मृत्यु येई पर्यंत जगणे महत्वपूर्ण होते... ती समाधी अवस्था त्यास प्राप्त झाली असती, इतका मुक्तीच्या जवळ तो पोहचला होता. पण त्याने ते अंतिम हास्य, तो परमानंद, महंतावर विजय मिळवण्याच्या अहंकारूपी सौम्य हास्यामागे झाकून टाकले.

ज्या वेलीला त्याने जन्म दिला नव्हता, त्या वेलीला केलेला काव्यात्मक उपदेशाचे स्वतः आचरण 'तो' स्वतः करत नाही.. गुदमरून येणाऱ्या मृत्युला घाबरून स्वत चे जीवन त्याने स्वतः च संपवले. जणू ज्योत नैसर्गिकपणे विझण्याआधीच ती चिरडून विझवली. मृत्यूच्या भीती बरोबरच सूड घेण्याचा अहंकार त्यास कारणीभूत ठरला.

आत्मा, ते चैतन्य, ती ऊर्जा कधीही नष्ट होत नाही, असे अध्यात्म मानते. विज्ञानही ऊर्जा कधीही नष्ट होत नाही, हे तत्त्व मानते.

कोणतीही ऊर्जा ही नष्ट होत नाही, तर रूपांतरित होते, हे सत्य विज्ञान व अध्यात्म दोघानाही मान्य आहे. अध्यात्म पुनर्जन्म मानते, ते याच कारणास्तव.

‘स्वामी’ कथेतील ‘तो’ हा वेलीच्या उर्जेशी स्वत:च्या ऊर्जेचे मिलन करून ‘ पुन्हा जन्म-मरणाच्या (जीएंच्या भाषेत ‘मरणजन्माच्या’) दुष्ट चक्रात अडकला.

'स्व’ ला ओळखूनही ‘मी’ नष्ट करू शकला नाही.

‘स्व’ ओळखूनही आपल्याला मुक्तीचा मार्ग दाखवणार ‘महंत’ कोण आहे हे ‘तो’ नीट ओळखू शकला नाही. 'तो' नियतिचा पराभव करू शकला नाही.

मुक्तीच्या अंतिम पायरीच्या जवळ पोहचूनही सूड घेण्याच्या क्षुल्लक अहंकारापोटी जीवा-शिवाचे मिलन झाले नाही.

‘तो’ ज्ञानी’ झाला नाही. तो ‘स्वामी’ झाला नाही.

आयुष्याबाबतचा माणसाचा अंतिम निर्णय देणारे ते अंतरीचे हास्य महंतावर विजय मिळवण्याच्या अहंकारूपी सौम्य हास्यामागे ‘तो’ ने अशा प्रकारे झाकून टाकले..! 🙏


आरती प्रभू यांनी जीएंना लिहिलेल्या एका पत्रात लिहिलेले एका वाक्याचे परत एकदा स्मरण होते. आरती प्रभू लिहितात ---

‘आपल्या कथालेखनाने दिपवून टाकणारी जी वळणं घेतलेली आहेत ते पाहून मला असे वाटते की निर्मितीच्या गर्भाशयात बसून कुणीतरी एक तपस्वी ॐ काराचा जप करीत असावा.’--

या महान, तपस्वी, योगी साहित्यिकास नि:शब्दपणे दंडवत.

जीए कुलकर्णी यांचे धारवाड येथील घर






जीवन इतके अनंतरुप आहे की अगदी
संपूर्णपणे माझ्यासारखेच आयुष्य असलेला
माणूस पूर्वी कधी झाला नाही व पुन्हा कधी
होणार नाही. त्या दृष्टीने प्रत्येक सामान्य माणूस
देखील अद्धितीय असतो. मी गेल्यानंतर एक
अव्दितीय भावविश्व पूर्णपणे विरुन जाणार आहे



**जी. ए. कुलकर्णी** हे मराठी साहित्यातले रत्नच. त्यांची प्रत्येक कथा पैलूदार असे. या प्रत्येक पैलूचे नेमके आकलन होणे हे कोणा एका वाचकाला दुरपास्तच.

२०२२-२३ हे जी. ए. यांचे शताब्दी वर्ष होते! या वर्षाचे औचित्य साधून जाणत्या जी.ए.प्रेमी वाचकांनी एक उपक्रम हाती घेतला. आभासी पद्धतीने एकत्रित येऊन त्यांनी जी. ए. यांच्या १४ कथांवर विविधांगाने चर्चा केल्या, अनेक मते, दृष्टीकोन मांडले. संकलित केले. ही संकलने सात खंडांत उपलब्ध आहेत. जी.ए. यांच्या कथावाचनाचा आनंद घेतांना या चर्चा जी.ए.प्रेमी तसेच अभ्यासक-समीक्षकांना निश्चितच उपयुक्त ठरतील. हा मौल्यवान ठेवा आपल्याकडे नक्कीच हवा!